म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. 630



# येथे देवांची वसती

REFBK-0023774

सागर साहित्य प्रकाशन : ९६

# येथे देवांची वसती

## ( गोव्याची धार्मिक व सांस्कृतिक स्थलयात्रा )

लेखक

बा. द. सातोस्कर

REFBK-0023774

पणजी, गोवा

डिसेंबर १९८२

मुद्रक व प्रकाशक
शचींद्र वा. सातोस्कर
पणजी–गोवा

मुद्रण व प्रकाशनस्थळ
सागर साहित्य मुद्रणालय
डॉ. आ. गो. बोरकर रोड, पणजी

चित्रकार
अनंत सालकर, पुणे

मूल्य रु. २२

संदर्भ भू प्रवास
६३०
२३७७४
१५।२।८३

माझे दिवंगत चित्रकार मित्र

*रघुवीर मुळगांवकर*

याच्या स्मृतीस

# प्रास्ताविक

१९७३ सालच्या चित्रकार रघुवीर मुळगांवकर संपादित रत्नप्रभेच्या दिवाळी अंकात 'येथे देवाची वसती' हा माझा गोव्यांतील देवस्थानांचे धावते वर्णन करणारा ललित लेख आला होता. कै. मुळगांवकराच्या सूचनेनुसार तो मी लिहिला होता.

हा लेख स्वतः मुळगावकरना आणि रत्नप्रभेच्या अनेक वाचकांना आवडला आणि तशी पत्रेही मुळगांवकरना आली लेख आवडणाऱ्या वाचकात भारताच्या प्रसिद्ध गायिका श्रीमती लता मंगेशकर या एक होत्या त्यांनी मुळगावकराना लेख आवडल्याचेच फक्त कळविले नाही तर मी ह्याच विषयावर अशाच स्वरूपाचे एक पुस्तक लिहावे अशी सूचना केली. कै मुळगावकराची भेट झाली तेव्हा त्यांनी लताबाईची ही सूचना मला सांगितली आणि ज्या दैवतावर मी लिहीन त्याची रंगीत चित्रे आणि रेखाचित्रे आपण स्वतः काढून ती त्यांत देईन, शिवाय फोटो देईन आणि स्वतःच ते पुस्तक प्रसिद्ध करीन असे आश्वासन दिले आणि पुस्तक लिहिण्याची विनंती केली.

मी तावडतोब होकार दिला.

सव्वाएक महिन्यात पुस्तक लिहून तयार झाले. चित्राच्या सोयीसाठी ते मोठ्या म्हणजे क्राऊन चतुष्पत्री आकारात आणि संपूर्ण आर्ट पेपरवर छापायचे ठरले त्यानी रत्नप्रभा १९७४ दिवाळी अंकात जाहिरातही केली. नेहमीच्या व्यापातून अधुनमधून वेळ काढून ते चित्रेही तयार करू लागले

पण त्याच्या हातून हे काम पूर्ण व्हावे असे विधिलिखित नव्हते! गोव्याच्या एका भेटीत ते माझ्याकडे आले तव्हा मला म्हणाले, "मला कॅन्सर झाल्याचा संशय आला होता; पण निदान चुकले असल्याचे आढळून आले आहे. गेले वर्षभर अस्वस्थ होतो. पण आता मनावरचे ओझे उतरले आहे. 'देवांची वसती' आता लवकरच प्रसिद्ध होईल. ते माझे एक स्वप्न

आहे." शेवटच्या ५–६ वर्षांत मुळगावकराची देवाधर्मावरची श्रद्धा वाढली होती व आपली ग्रामदेवी लयरायविषयीची भक्ती त्याच्या मनात दाटली होती मुळगांवकराना ओळखणाऱ्या अनेकाना ही गोष्ट माहीत नव्हती

पण दुर्दैवाने त्यांच्या आजाराचे प्रारभीचे निदान चुकले नसल्याचे पुढे दिसून आले त्याच्या हातून रुटीन कामही होईनासे झाले. अटळ भवितव्य टळणार नाही याची त्यांना खात्री पटली. आणि तरीही मृत्यू-पूर्वी बरोबर तीन महिने दि ३०–१२–७५ च्या पत्रात त्यानी मला लिहिले, "धाई गर्दी करून आता देवाची वसती छापणार आहे"

पण नियती वेगळी होती. मुळगावकर दि. ३० मार्च १९७६ रोजी अचानक गेले. वक्रगतीने चालणाऱ्या कर्करोगाची ते शिकार बनले.

सहा महिन्यानंतर मी सहकुटुब मुंबईला गेलो तेव्हा श्रीमती मुळ-गांवकरांना भेटायला गेलो त्याना माझ्या पुस्तकाबद्दलची, मुळगांवकरांच्या तळमळीची माहिती होती त्या म्हणाल्या, "तुमच्या पुस्तकाचे हस्तलिखित त्याच्या कपाटात आहे का पाहा. त्या कपाटाला मी अजून हातही लावला नाही. स्टुडियो साफ करून घेते. पण साऱ्या वस्तू पूर्वी होत्या तशाच आहेत."

मी पार्टीशनमागच्या छोट्या स्टुडियोत गेलो टेबलावर माझ्या पुस्तकातल्या एका देवतेचे अर्धवट केलेले चित्र फलकावर पिनानी अडकलेले तसेच होते! माझे मन भरून आले.

कपाट धुंडाळले तेव्हा हस्तलिखिताचे बाड हाती आले. त्याच वेळी ठरवले, मुळगांवकरांना श्रद्धाजली म्हणून हे पुस्तक त्यांच्या प्रथमश्राद्धदिनी प्रसिद्ध करावे.

कोणता प्रकाशक पुस्तक काढील याचा विचार करत असतानाच ग. पा. तथा दादा परचुरेंचे नाव आठवले. ते मुळगावकरांचे अत्यत निकटचे स्नेही आणि माझेही मित्र त्यांना भेटायला गेलो. पण गाठ पडली नाही मी गोव्याला परतलो.

आणि एकदोन वर्षांनंतर अचानक दादा परचुरे गोव्यात आले तेव्हा माझ्या घरी करंजाळ्याला मला भेटायला म्हणून आले. आम्ही मुळगाव-कराच्या अकाल निधनासंबंधी बोललो, आणि मी त्या बैठकीत माझ्या त्या पुस्तकाची कथा त्यांना सांगितली. त्यांनी लगेच पुस्तकाचे हस्तलिखित ताब्यात घेऊन ते लवकरच येणाऱ्या मुळगांवकराच्या मृत्युदिनी प्रसिद्ध करण्याचे मला आश्वासन दिले.

पण त्याच्या काही व्यावसायिक अडचणीमुळे पुस्तकाचे प्रकाशन लांबणीवर पडत गेले आणि एक दिवस परचुरेंच्या दुर्दैवी निधनाची वार्ता वाचली

शेवटी पुस्तक मीच काढायचे ठरवले. परचुरे याच्या चिरंजीवाकडून हस्तलिखित परत घेतले. आणि आज पांच वर्षांनंतर ते प्रसिद्ध होत आहे लता मंगेशकर आज कदाचित या पुस्तकाच्या निर्मितीला आपण प्रेरणा दिली होती हे विसरून गेल्या असतील. पण त्यांच्या सूचनेनुसार लिहिलेले, पण मुळातल्या कल्पनेप्रमाणे आर्टपेपरवर न छापलेले, मुळगांवकरांच्या चित्रांविना सुनेसुने वाटणारे हे पुस्तक छापून मी माझ्या एका कलावंत सुहृदाची अखेरची इच्छा अल्पांशाने पूर्ण करीत आहे

वाचकहो, 'येथे देवाची वसती' या पुस्तकाची ही जन्मकथा घडली तशी थोडक्यात तुम्हाला सांगितली आहे.

स्वप्नगंध, करंजाळे–गोवा }
दि. २०–१२–८२

बा द सातोस्कर

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्थान | १ |
| २. | ग्रामदेवताचे दर्शन | १५ |
| ३ | मंगलमूर्ती गणेश | २३ |
| ४ : | गोव्याचे राष्ट्रीय दैवत देवकीकृष्ण | ३१ |
| ५ : | जुन्या मंदिरशिल्पाचे नमुने | ३९ |
| ६ | त्राहिमाम् गिरीश | ४५ |
| ७ : | त्रिकळावती म्हाळसा–मोहिनी | ५४ |
| ८ : | दुर्गा खरी, पण वाकड्या मानेची | ६५ |
| ९ : | उग्र नृसिंहाचे सौम्य रूप | ७२ |
| १० | नवनिर्माणाचे प्रतिक : शेषशायी अनंत | ८१ |
| ११ : | फर्मागुडीचा गोपाल गणपती | ९३ |
| १२ : | खड्गधारी प्राचीन नागेश | ९८ |
| १३. | बादोड्याची जगन्माता महालक्ष्मी | १०७ |
| १४ : | वैष्णवाचा देव–शिवरूपी रामनाथ | १११ |
| १६ : | विजयप्रदा, भाविकृता शांतादुर्गा | ११८ |
| १७ : | रै क्षेत्रवासिनी कामरूपची कामाक्षा | १२९ |
| १८ : | एकमेव अनोखे शिल्प : ताम्बडी सुर्ल | १४० |
| १९ : | जागृत देवस्थान . दत्तवाडी | १४७ |
| २० : | सांखळीला आला पंढरीचा राणा | १५२ |
| २१ : | इतिहासाचा साक्षीदार सप्तकोटेश्वर | १५९ |
| २२ | साक्षात्कारी देवता लयराय | १७१ |
| २३. | कासारपालची कमलनयना कालिका | १७९ |
| २४ : | सगीत मराठी रंगभूमीचे उगमस्थान | १८७ |
| २५ : | भक्ताच्या भक्तीचे प्रतीक–दामोदर | १९३ |
| २६. | जेजुरीच्या खंडोबाची बहीण–शांतादुर्गा | २०३ |
| २७. | काणकोणचे क्षात्रदेवत–मल्लिकार्जुन | २१३ |
| २८ | पर्तगाळीचा कानडा राम | २२१ |

६३० ग्रं
दा. क्र. २३५५७
अप्र. १९५३
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

# १ : प्रस्थान

सूर्य मावळायच्या बेतात होता आमच्या घराच्या गच्चीवर वेताची खुर्ची टाकून मी काहीतरी वाचत पडलो होतो पश्चिम सागरावरून येणाऱ्या खाऱ्या वाऱ्याच्या झुळका अंग हुळहुळे करून पुढे सरकत होत्या. टेरेस गार्डनमधल्या सोनटक्क्याच्या कळ्यांच्या पाकळ्या उमलू लागल्या होत्या व त्याचा मंद गंध घ्राणेंद्रियाना जाणवू लागला होता

इतक्यात रस्त्यावर गाडी थांबल्याचा व हॉर्न वाजल्याचा आवाज कानावर पडला उठून खाली पाहिले टॅक्सीतून माझा एक जुना दोस्त सपत्नीक उतरत होता

गच्चीवरून खाली आलो आणि विनय देसाईचे स्वागत केले अगदी मिठीच मारली कित्येक वर्षांनी देसाई मला भेटत होता

हा देसाई नी मी एम् ए. पर्यंत कॉलेजमध्ये बरोबर शिकत होतो वृत्तीने मोठा रसिक साहित्य, संगीत, काव्य, नाट्य याची आवड असलेला, किती सिनेमे, नाटके, चित्रप्रदर्शने आम्ही बरोबर पाहिली, व्याख्यानं ऐकली, कॉलेजमध्ये चळवळी केल्या. पुढे कॉलेज सुटले नी देसाई सरकारी नोकरीत अडकला बदल्या होऊ लागल्या. केव्हातरी लग्न झाले वंशवेलीला फळे आली शेवटी पेन्शन घेऊन पुण्याला स्थायिक झाला

कॉलेज सुटून वेगळ्या दिशानी वाटचाल करू लागल्यावर अधून मधून आमचा पत्रव्यवहार चालू होता कधी मुंबईला आला तर आमच्या घरी येत होता गोवा मुक्त झाल्यावर मी गोव्याला आलो त्यावेळी त्याचे अभिनंदनाचे पत्र आले आणि काही वर्षांनंतर आपण पुण्याला पेन्शनर म्हणून कायम राहाणार असल्याचेही त्याने कळवले. पुढे मग संबंध

सुटल्यासारखाच झाला

अन् अचानक परवा त्याचे पत्र आले " सौ सह मी गोव्याला येत आहे. एक दिवस तुझ्याकडे मुक्काम करून पुढे दक्षिणेच्या दौऱ्यावर जाईन विशेष भेटील "

दीड तपानंतर आमची ही भेट होत होती.

चहापाणी झाल्यावर मी म्हटले, " एकदम पुण्याहूनच आलात ?

" हो कित्येक दिवस हिनं हट्ट धरला होता, पेन्शन घेतल्यावर आधी दक्षिणेची धर्मयात्रा करूं. बाळहट्ट परवडला, पण स्त्रीहट्ट महाकठीण तो पुरविणे हाच त्यावर उपाय ' बायकोकडे कौतुकाने पाहात देसाई म्हणाला

देसाईणबाई चक्क लाजल्या " इश्श " एवढा एकच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडला

" केव्हा निघालात पुण्याहून ? " मी विचारले

" दोन दिवसापूर्वी निघालो जेजुरी झाल, कोल्हापूर झाल, नरसोबा-वाडीवरून आज गोव्यात आलो "

" जेजुरी ? खंडोबा ? नरसोबावाडी ?" मी आश्चर्याने विचारले

" हो म्हणजे त्याचं काय आहे, " देसाई काही वेळ थांबून म्हणाला, " आमचा हा दक्षिणदौरा म्हणजे यात्रा आहे दक्षिण पाहायचा कित्येक वर्षे माझ्याही मनात होत. आता पेन्शन घेतल्यावर ठरवून टाकलं जेजुरीपासून सुरुवात केली नी आज गोव्यात पोचलो शिवाय गोव्याचं खास आकर्षणही होतंच उद्याच्या दिवसात गोव्यातली मंदिरं पाहिली की, परवा निघालो पुढे गोकर्ण–महाबळेश्वरला '

" एका दिवसांत गोव्यातली मंदिर नाही पाहून व्हायची " मी म्हटले

" किती दिवस लागतील ? पाहाण्यासारखी किती मदिर आहेत इथ ? "

" तशीं गोव्यात शेकडो मदिरं आहेत हिंदु धर्मातले सारेच, देव इथं वस्तीला आले आहेत साऱ्या मंदिराची रचना बरीचशी एकसारखीच असली तरी त्याची स्वतःची म्हणून काही वैशिष्ट्यं आहेत. इथल्या

निसर्गाशी ही मंदिर एकरूप होऊन गेली आहेत परंपरेनं, इतिहासानं त्यांना आजचं स्वरूप आलं आहे ती पाहायला भाविकतेबरोबरच रसिकता, सौंदर्यदृष्टी नी इतिहासाची आवड हवी ''

" पण माझ्या प्रश्नाचं उत्तर तूं दिलंच नाहीस '

" कोणत्या प्रश्नाचं ! '

" किती मंदिर पाहायची आहेत इथं ! "

" किमान तीस "

" म्हणजे तीस दिवस इथं राहायचं ? '

" छे छे फक्त तीन दिवस महाराष्ट्रातल्याप्रमाणं इथली गावं दूर दूर नाहीत. गोव्याचा सारा परिसर तेराशे चौरस मैलाचा लांबी फक्त पासष्ट मैल नी रुंदी पंचवीस मैल. उत्तर सरहद्दीवरून दक्षिणेपर्यंत मोटारीने जायला फक्त तीन तास लागतात पण आपल्याला फक्त इथली मंदिर पाहायची नाहीत जाता जाता गोवाही पाहायचा आहे तो समजून घ्यायचा आहे पटतं का तुला ? "

देसाईने होकार देऊन पत्नीशी हितगुज केले "तीन दिवस थांबायचं का ग ?"

" एवढं तुमचे मित्र म्हणताहेत तर थांबायला हरकत नाही. " आणि मग हळू आवाजात सौ देसाई म्हणाल्या, " पण तीन दिवस परक्याकडे राहाणं

" सौ देसाई हळू बोलल्या असल्या तरी मला ते ऐकू आलेच बाही बायकांचा हळू आवाज हा पंचमात लागतो मी चटकन् म्हणालो, " ही परकेपणाची भाषा बोलायची नाही हं वहिनी इथं आमच्या घरी संकोच मानायचं कारण नाही. तरुणपणी आमचे संबंध किती जवळचे होते ते विचारा तुमच्या नवऱ्याला

" जाऊं दे रे. ' देसाई म्हणाला, " राहू आम्ही तीन दिवस पण माझी एक अट आहे नी एक मागणी आहे अट अशी की, तूं आलं पाहिजेस आमच्याबरोबर— आमचा गाईड म्हणून '

" अन् वहिनींनीदेखील ' सौ देसाई म्हणाल्या

" हो. येऊ की ' ' वहिनी च्या होकारनकाराची वाट न पाहाताच

मी उत्तरलो. "अर, आता तुझी मागणी काय ते साग ".

"मागणी म्हणजे तुझ्या गाडींतून हा प्रवास करायचा पेट्रोलचा खर्च मी करीन."

"तूं अजून पक्का पुणेकर बनलेला दिसत नाहीस, देसाई पेट्रोल खर्चाची अशी ऑफर देण पुणेकराला शोभत नाही "

"चुकलास तूं पेट्रोलचा खर्च मी करीन हे नुसत म्हणायच गाडीचा मालक बरोबर असताना पाहुण्याना पेट्रोलचा खर्च करायला लावील का तो ?... बर ते राहू दे कुठल्या मंदिराना भेट द्यायची उद्या ?"

"ते तू सार आता माझ्यावर सोपव "

जेवायची वर्दी आली म्हणून आम्ही उठलो नंतर थोडा वेळ गप्पा झाल्या. पाचचा गजर लावून बिछान्यावर पडलो

•

पहाटे पाचच्या सुमारास घणघण घंटाचा आवाज कानावर आदळला नी आम्ही जागे झालो

"केवढ्या मोठ्याने झाला रे तुमच्या घड्याळाचा गजर! मला तर वाटले घटाच वाजताहेत ' देसाई म्हणाला

देसाईला वाटले ते खरेच होते घंटाचाच आवाज होता तो गजर अजून व्हायचाच होता

आमचे करजाळे गाव हे पणजी राजधानीचे एक उपनगर. नदीच्या मुखावर वसलेले अनेक गाव गोव्यात आहेत त्याचा एक टाईपकास्ट नमुना म्हणजे आमचे गाव आणि तरीही करजाळ्याची स्वत'ची काही वैशिष्ट्ये आहेत मांडवी आणि जुवारी या दोन मोठ्या नद्या जिथे एकत्रितपणे पश्चिम सागराला मिळतात, तिथे त्याच्या सगमावर ते वसलेले आहे अर्धाअधिक गाव माडवीच्या मुखात तर थोडासा जुवारीच्या काठी मध्ये काबची टेकडी समुद्रात दूरवर गेलेल्या या भूशिखराच्या माथ्यावर राजनिवास आहे. मांडवीच्या दुसऱ्या काठावर आग्वादचा किल्ला खडा आहे तर जुवारीच्या मुखात दोना पावल हे गोव्यांतले एक अतिप्रसिद्ध

पर्यटन स्थळ आहे

सारा गाव पूर्वी ख्रिश्चन वस्तीचा मुख्य व्यवसाय मच्छीमारीचा. सहा दिवस लंगोट्या लावून पोटासाठी राबावे नी दर रविवारी सूटबूट घालून पहाटेच्या वेळी चॅपेलमध्ये जावे, हा या गावच्या नागरिकाचा शेकडो वर्षांचा परिपाठ. ज्या घंटानादाने आम्ही जागे झालो त्या घंटा माझ्या बंगलीच्या समोर उभ्या असलेल्या सेंट पीटर चॅपेलमधून घणघणत होत्या सान्या गावाला त्या सागत होत्या, " उठा, आज रविवार आहे साडेपाचला पहिले 'मीस' (प्रार्थना) होणार आहे अर्ध्या तासात तयारी करून वेळेवर चॅपेलमध्ये या सेंट पीटर तुमची वाट पाहात आहे पॅलेस्टाईनमध्ये त्याने एकदा खुद्द येशूची पाहिली होती तशी "

हे सारे देसाईला सांगून मी चॅपेलकडे बोट दाखविले ते छोटे चॅपेल आतून ट्यूबलाईट्सनी झगमगत होते नी शिखरावरचा क्रॉस विजेच्या रंगीबेरंगी बल्बसनी चमकत होता

सान्याचे प्रातर्विधी होऊन, चहापान होईपर्यंत सहा वाजले. गाडी दारात उभी होती नी शांताराम ड्रायव्हर नेहमीच्या सवयीप्रमाणे फ्लॅनेलचे कापड गाडीच्या मुलायम अंगावरून हलुवारपणे फिरवीत होता

चॅपेल एव्हाना पूर्ण भरले होते नी बाहेरही माणसे दाटीवाटीने उभी होती लाऊडस्पीकरवरून पाद्रीचे सर्मन आमच्या कानावर आदळत होते वातावरण शांत, स्तब्ध होते पाखरांच्या किलबिलाटाशिवाय कसलाच आवाज ऐकू येत नव्हता चॅपेलमधला प्रकाश फिकट होऊ लागला होता समोरच्या टेकड्यामागच्या आकाशाच्या तुकड्यावर चमकत्या रंगाचा खेळ चालू झाला होता पाचच मिनिटांच्या आत सूर्याची कड़जी दिसू लागली सौ देसाईंनी भक्तिभावाने उगवत्या नारायणाला नमस्कार केला नी आम्ही गाडीत बसलो

" गोव्याच्या यात्रेचा आरंभ तर चांगला झाला ' देसाई म्हणाला, " सेंट पीटर देवदूताने जाग आणली नी निघताना सूर्यनारायणाने दर्शन दिले "

" थोडीशी चूक आहे या तुझ्या विधानात ' मी म्हटले.

" कसली चूक ? "

" सेंट पीटर हा येशू ख्रिस्ताचा शिष्य नी ख्रिस्त हा देवपुत्र तेव्हां सेंट पीटर हा देवदूत नसून देवपुत्राचा दूत आहे "

" असेल असेल मी कुठं वाचलंय तुमचं बायबल "

असेच काही गमतीचे बोलणे चालू असताना गाडी मिरामारला वळण घेऊन मांडवीला समांतर चालूं लागली

पणजींतला विशाल राजरस्ता आता ओकाबोका वाटत होता फिरायला निघालेली चार पेन्शनर मंडळी सोडली तर सर्वत्र शुकशुकाट होता फुटपाथ मोकळे होते, गाड्याचा पायरव किंवा चाकरव म्हणूया, नव्हता दुकाने तर बंद होतींच, पण हॉटेलेदेखील उघडलेली नव्हती

" या वेळी इतकी शांतता मी महाराष्ट्रातल्या कुठल्याही शहरात पाहिलेली नाही " देसाई म्हणाला

" तेंच तर वैशिष्ट्य आहे गोव्याचं घाई नाही, गर्दी नाही. आज काय साखर मिळत नाही, उद्या घासलेट मिळणार नाही मिळेल की सावकाश ब्रिटीश दीडशे वर्षं राज्य करून घरी परत गेले पोर्तुगीज साडेचारशे वर्षं राहिले शेवटी ते जाणार हे आम्हाला माहीत होतं घाई करायचं काही कारणच नव्हतं "

" फार गंभीर बोलू नकोस बाबा "

" मी तुला सांगतोय गोव्याच्या स्वास्थ्याबद्दल आम्ही लोक पूर्वी झोपाळू होतो, स्वप्नाळू होतो या स्वप्नातून आम्हाला जाग येतेय ती आता स्वातंत्र्यानंतर पूर्वी गोव्यांतले लोक दिवसा दारू पिऊन झिंगत नी बाहेरख्यालीपणात रात्र घालवीत. सरंजामशाहीत वावरणारी आम्ही गोव्याची माणसं त्याना ना वेळेची किंमत ना पैशांची "

" ही तुझी मतं आहेत गोव्याविषयी ? " देसाईने आश्चर्याने विचारले

" माझी नव्हेत, तुझी "

" माझी ! "

" तुझी म्हणजे तुझ्यासारखे 'भायले' गोव्यात आले आहेत त्यांची .. असं इथल्या काही लोकांचं म्हणणं आहे "

" तुझं काय म्हणणं आहे ? " देसाईने विचारले.

" किती गंभीर विषयावर पुन्हा चर्चा करतां आहात हो ?
सौ देसाईंनी पहिल्याप्रथम संभाषणात भाग घेतला " या रामपारी देवाधर्माचं बोलायचं सोडून सेंट पीटर काय, दारू काय, बाहेरख्यालीपणा काय नी काय काय ? म्हटलं, यात्रेला चाललो आहोत आपण ! "

" तुझं काय म्हणणं आहे ? " या देसाईच्या प्रश्नाला उत्तर द्यायच्या धर्मसंकटातून विषय बदलून वहिनींनी मला बचावल्याबद्दल तिचे मी मनातल्या मनात आभार मानले.

## २ : ग्रामदेवतांचे दर्शन

डॉट्सन आतापर्यंत मांडवीच्या किनाऱ्यावरून चालली होती पणजीचे मेडिकल कॉलेज जवळ आले तशी ड्रायव्हरला मी म्हटले, " शांताराम, गाडी महालक्ष्मी-देवळाजवळ घे " नी मग देसाईकडे वळून म्हटले, " ही महालक्ष्मी म्हणजे पणजी शहराची ग्रामदेवी तिचं दर्शन घेऊनच यात्रेला निघणं बरं नाही का ? "

देसाईने होकार दिला

देऊळ जवळ येऊ लागले तसे चौघड्याचे स्वर कानांवर पडू लागले हळुहळू चौघड्याचा आवाज वाढू लागला सनईतून पहाटेच्या त्या स्निग्ध, शीतल वातावरणात स्रवणाऱ्या आसावरीच्या स्वैंद्र स्वरांनी- आमची मने भारून गेली.

भर वस्तीत असलेल्या एका कमानीसमोर गाडी उभी राहिली या कमानीवरच्या नगारखान्यावरूनच चौघडावादन चालू होते.

"गोव्यातल्या बहुतेक सर्व देवस्थानांतून असाच चौघडा ऐकू येतो पहाटे, दुपारी नी संध्याकाळी. " मी माहिती दिली

आम्ही प्राकारात शिरून छोटीसी चढण चढून गेलो आणि पाहातो

ती पूर्वीचा सभामंडप गायब झालेला ! अन् मग आठवले, अरे, मंदिराचे नवे बांधकाम चालू झाले आहे उत्तर भारतीय शैलीचे नवे नी भव्य मंदिर इथे उभे राहाणार आहे

नवा भव्य सभामंडप थोडासा वर आला होता आतल्या छोट्याशा मंदिराचा संपूर्ण कायापालट झाला होता त्यावरून वाटले, हे नवे मंदिर पणजी राजधानीचे एक आकर्षण ठरणार आहे.

ही महालक्ष्मी गोव्यातल्या इतर देवस्थानाप्रमाणे फार जुनी नाही पणजी हे शहरच मुळी नवे फक्त दोनशे वर्षांपूर्वी स्थापन झालेले इथून दहा किलोमिटरवर असलेले गोवा शहर दोन शतकापूर्वी जेव्हा पटकीच्या साथीने उध्वस्त झाले तेव्हा राजधानीचे पणजीला स्थलांतर झाले त्या वेळी पणजी म्हणजे एक दलदलीचा छोटासा गाव होता फक्त विजापूरच्या युसूफ आदिलशहाने बांधलेला राजवाडा तेवढा होता

" कशाला बांधला होता राजवाडा ? " देसाईने विचारले

पोर्तुगीजांपूर्वी इथे विजापूरकरांचा अमल होता आदिलशाहीचा संस्थापक खुद्द युसूफ आदिलशहा गोवा घेण्यासाठी आला होता त्याला इथल्या निसर्गसौंदर्याने एवढा मोह घातला की, आदिलशाहीची राजधानी गोव्याला करावी असे त्याने ठरवले त्याची पूर्वतयारी म्हणून गोवा शहरात त्याने सरकारी कामकाजासाठी इमारती बांधल्या. एक मशीद बांधली आणि स्वतःला राहाण्यासाठी दहा किलोमिटर दूर मांडवीला लागून राजवाडा बांधला पण त्याचे हे स्वप्न अधुरे राहिले. गोवा पोर्तुगीजांनी घेतला आणि पणजीला राजधानी आल्यावर राजवाड्याचे सचिवालयात रूपांतर झाले परवा पोर्तुगीज जाईपर्यंत या इमारतीला 'पालासियु द इदाल्काव (आदिलशहाचा राजवाडा ) या नावानेच ते संबोधीत आणि प्रत्येक सरकारी कागदपत्रावर स्थलनाम म्हणून त्या नावाचा उल्लेख करीत आज हा वाडा मंत्रालय म्हणून वापरला जात आहे

पोर्तुगीजांनी गोव्याचा हा भाग म्हणजे तिसवाडीची बेटे प्रथम काबीज केली आणि पंचवीस वर्षाच्या आंत सारी देवळे मोडून टाकली त्यामुळे पोर्तुगीजांच्या या जुन्या प्रदेशात परवांपर्यंत मंदिराचा अभाव होता त्यांचे धार्मिक धोरण बदलल्यानंतरच क्वचित् ठिकाणी नवी मंदिरे उभी राहिली

त्यापैकी हे महालक्ष्मीचे मंदिर एक. जेमतेम दीडशे वर्षे झाली असतील या मंदिराच्या स्थापनेला ही मोडली जात असलेली इमारतसुद्धा शमरेक वर्षांची असावी पोर्तुगीजांच्या या बालेकिल्ल्यात ही महालक्ष्मी ताठ मानेने उभी होती म्हणून तिचे आम्हाला कौतुक वाटले.

या महालक्ष्मीचे वर्षातून तीन मोठे उत्सव होतात एक चैत्र पौर्णिमा, दुसरा रथसप्तमी आणि तिसरा श्रावणात नागपंचमीपासून सुरू होणारा सात दिवसांचा सप्ताह स्वातंत्र्यापूर्वी पणजीतल्या हिंदु बायका घराबाहेर कधीच पडत नसत अपवाद फक्त या तीन उत्सवांचा पहिल्या दोन उत्सवात नाटके होत अन् सप्ताहातल्या सात रात्रीं चित्ररथ निघत ते पहाण्यासाठी तोबा गर्दी उडे या गर्दीत युरेशियन पोरे हिंदु स्त्रियांची छेड काढीत पण साठ सत्तर वर्षांपूर्वी डॉ शिरगावकर नावाचे एक पुढारी होऊन गेले त्यांनी साहसी तरुणांना हाताशी धरून या गुंड पोरांना असा चोप द्यायला सुरुवात केली की, पुढे उपद्रव कमी झाला आज स्वातंत्र्यात तर समाजस्थितीत इतका फरक पडला आहे की, या सकाळच्या पारी हिंदु बायकामुली निर्भयपणे इथे महालक्ष्मीला येताहेत, दुपारी ऑफिसातून नोकऱ्या करताहेत नी सध्याकाळी मिरामारच्या चौपाटीवर फिरायला जाताहेत !

"पणजीत हे एकच देवस्थान आहे का ? ' देसाईने विचारले

'' नाही आणखी एक आहे हनुमानाचं जाता जाता तेही पाहून घेऊं

देवीच्या दर्शनासाठी गर्भगाराच्या दारापर्यंत गेलो या वेळी देवीचे निर्माल्यविसर्जन झाले होते आणि काळ्या पाषाणाची अभिषेकमूर्ती आम्ही पाहात होतो ही मूर्ती चतुर्हस्त असून कमलोद्भवा होती पुढला उजवा हात वरद होता तर डावा कटीवर ठेवलेला होता मागच्या एका हातात पद्म होते मूर्ती खरेच मनोहारी होती

देवीचे दर्शन घेऊन मंदिरातून बाहेर आलो

गाडी सरळ पुढे गेली व पणजीतल्या सर्वात मोठ्या चर्चजवळ हेअरपिन वळण घेऊन आल्तीनो चढू लागली आल्तीनो या पोर्तुगीज शब्दाचा अर्थ पर्वती— छोटी टेकडी हा पणजीचा मलबार हील. ही टेकडी अलीकडेच वसली आहे गोव्याचे बहुतेक सर्व मंत्र्यांचे बंगले इथेच आहेत

बड्या अधिकाऱ्यांचा निवासही इथेच आर्चबिशपचा राजवाडा गेली दोनशे वर्षे इथे डौलानं उभा आहे पूर्वीचा गोवा रेडियो व आजची पणजी आकाशवाणी आणि गोवा कला अकादमी शेजारी शेजारी आहेत

चढण चढत असताना उजव्या हाताला पणजी दिसत होती छोट्या एकमजली नी दुमजली घराच्या छपरातून ज्यूंता हाऊस, धेंपो हाऊस नी माडवी हॉटेल याच्या सहा मजली इमारती वर आलेल्या होत्या तीन चार मजली तर डझनांनी मोजाव्या लागल्या असत्या ही स्वातंत्र्याची देणगी पूर्वी पणजीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पायी चालायला पंधरा वीस मिनिटे पुरत आता पणजी वाढू लागली आहे रुंदीने नी उंचीनेही तीन हजार नोकरशहा होते ते आज पंचवीस हजारावर झाले आहेत त्यांना राहायला नी काम करायला, किंवा काम करतो असे दाखवायला घरे बांधली जात आहेत पूर्वी पणजीत घरापेक्षा किंवा त्या घरातून राहाणाऱ्या माणसापेक्षा झाडे जास्त होती आता परिस्थिती बदलली आहे

आम्ही टेकडीच्या उंच जागी पोचलो तेव्हा एका नव्या देखाव्याने मने गुंगून गेली माडवीच्या किनाऱ्याचा समुद्राकडला भाग आता दिसू लागला होता आमचे करजाळे गाव, त्यापलिकडे काबू टेकडीवरील राजनिवास, माडवी नदीचे विशाल पात्र आणि अरबी समुद्राचा काब व आग्वाद या भूशिरामधून दिसणारा तुकडा मीरामारला फुटणाऱ्या लाटांची महिरपी सुद्धा स्पष्ट दिसत होती

थोडा वेळ हे दृश्य पाहून घेतले नी कलाअकादमीला वळसा घालून नी आर्चबिशपच्या पॅलेसवरून पुढे निघालो दोन तीन वळणे पार करून सर्किट हाऊसजवळ आलो आणि सृष्टीचे एक वेगळेच रूप इथे दिसू लागले पणजीची तिसरी अन् अधिक देखणी बाजू इथे दिसत होती. समोर जणू एक भव्य नकाशा उलगडला होता पायथ्याशी पणजीची चिंचोळी बाजू, त्यापलीकडे शेते नी मिठागरे, अलीकडे एक कालवा, उजव्या बाजूला कालापूरकडे जाणारी सडक, तिच्यावरचे चार साव, डाव्या बाजूला खोलवर गेलेली नी पुढे रायबंदरच्या आडोशाला लपून

राहिलेली माडबी, तिला फुटलेले दोन फांटे नी त्यामुळे बनलेली चोडण, दिवाडी ही बेटे आणि डाव्या बाजूला बेती, बिठोण, एकोशी ह्या गावाचे पुंजके बोर्डिंगमधून दिसावे तसे हे दृश्य दिसत होते.

" मारुतीचे सोडून दे. पण केवळ हे दृश्य पाहायला इथं यायला हवं " देसाई म्हणाला. ' पणजी हे गोव्यातलं एक सुंदर शहर आहे असं ऐकलं होतं. पण ते इतकं सुंदर असेल, वेगळं असेल, भारणारं नी भारलेलं असेल असं वाटलं नव्हतं "

" पणजी हे देखणं शहर आहे हे खरंच. जगप्रसिद्ध संस्कृत पंडित रा. ना. दांडेकर पणजीला आले तेव्हां ते काय म्हणाले सांगू ? ते म्हणाले होते, ' पणजी मला लॅटिन अमेरिकन शहरासारखी वाटली. तशाच इमारती, रस्ते नी रस्त्यांवरील शांतता. ' त्यांना डीनर द्यायला मी इथल्या फ्लेमिंगो नावाच्या एका हॉटेलमध्ये गेलो. ऑर्डर दिल्यावर अर्ध्या तासाने कॉकलेट नी तासाभराने सुप आले तेव्हां ते म्हणाले, ' ब्राझीलमध्येसुद्धा असाच मस्त कारभार. कुणाला कसली घाई नाही अन् या हॉटेलमध्येही वातावरण असं सुस्त, सुरानी भारलेलं नी मंद कन्सील्ड दिव्यांनी अर्धवट आळसाव-लेलं की, कुणालाही आपण दक्षिण अमेरिकेत असल्यासारखं वाटावं. '

" पण मुद्दा हा नाही देसाई. पणजी सुंदर आहेच. पण सारा गोवाच सुंदर आहे. " मी म्हटले.

" साहजिकच आहे " देसाई म्हणाला, " परशुरामाने ही भूमी निर्माण केली तो किती जिद्दीने ! " आणि मग त्याने परशुरामाने बाण मारून कोकण निर्माण केल्याची, यज्ञकार्यार्थ ब्राह्मण आणल्याची सर्वपरि-चित कथा सांगून शेवटी विचारले, " अशीच आहे ना ही कथा ? "

मी म्हटले, " कथा अशीच आहे पण ती दंतकथा आहे परशुराम ही व्यक्ती ऐतिहासिक होती ही गोष्ट खरी. त्याने भारताचा पश्चिम किनारा वसविला हेही खरं. पण फक्त ब्राह्मण आणून नव्हे. त्याने ब्राह्मण आणले, वैश्य आणले, क्षत्रिय आणले पुढे जातिव्यवस्था सुरू झाली तेव्हां गोव्यात सारस्वत होते, मराठे होते, कऱ्हाडे होते..."

" म्हणजे आम्ही ! " देसाई म्हणाला.

" तुम्ही ! म्हणजे तूं कऱ्हाडा आहेस की काय ? "

" अर्थात् ! "

' काय गमत आहे पाहा वहिनी. तुझा नवरा नी मी कॉलेजात बरोबर शिकलो. पण याच्या जातीची चौकशी कधी केली नाही "

टेकडीवरून वळणावळणानी आम्ही आता खाली उतरत होतो. अर्धी टेकडी उतरल्यावर एका छोट्याशा देवळाजवळ गाडी उभी राहिली. हेच मारुतीमंदिर नी आजूबाजूचा परिसर म्हणजे मारुतीगड.

तीसचाळीस वर्षांपूर्वी इथे कांहीही नव्हते एक ओसाड निर्जन जागा. पण पणजीतल्या ब्राह्मणेतर वर्गाने पुढाकार घेतला नी सर्व समाजासाठी एक मंदिर उभारायचे ठरविले. मारुतीच कां निवडला कुणाला माहीत ! पण मारुती निवडला आणि भर सालाझारशाहीत राजधानींतल्या चर्चपेक्षाही अधिक उंचीवर मारुतीरायाने आपले बस्तान मांडले. मंदिराच्या प्राकाराला नी रस्त्याला सुरेख कठडा बांधण्यात आला. गड चढायला पायऱ्या तयार झाल्या या पायऱ्यावरून भक्तमंडळी दर शनिवारी गडावर जाऊं लागली माघ महिन्यांतली जत्रा हळुहळू पणजीकरांत लोकप्रिय होऊं लागली. गेल्या पंधरा वर्षांत ही जत्रा म्हणजे गोव्यातला एक महोत्सव होऊन राहिला आहे. मारुतीगड त्या दिवशी विद्युद्दीपानी झगमगू लागतो. खेळण्यांच्या नी खाज्यांच्या दुकानांची रांग लागते. प्रचंड गर्दीतून मारुतीराय टेकडीवरून पणजींतल्या मळा या विभागांत उतरतात, प्रत्येक घराला दर्शन देतात नी पहाटेला परत निवासस्थान गांठतात.

मारुतीरायाचे दर्शन घेऊन आम्ही बाहेर पडलो महालक्ष्मी नी मारुती देवस्थानाबद्दल मी फारसे बोललोच नाही. पणजीचे सौंदर्य सकाळच्या वेळी डोळ्यांत साठवणे हा माझा उद्देश होता नी तो सफल झाला होता.

●

आता निराळ्या म्हणजे ' मळ्या 'तल्या रस्त्याने मांडवीपर्यंत जाऊन रायबंदरच्या दिशेने गाडी जाऊं लागली.

पणजी ते रायबंदर या दोनअडीच किलोमिटर्स लांबीच्या 'पाट्या'-वरून आमची डॅट्सन आता वेगाने चालली होती 'पाटा' म्हणजे कॉजवे. या भागांत जी दलदल होती ती भरून काढून मांडवीला समांतर असा हा कॉजवे साडेतीनशे वर्षांपूर्वी मिशनऱ्यानी बांधला होता. पूर्वी या रस्त्यावरून पोर्तुगीज सरदारांचे घोडे, पाद्रींचे तांडे आणि श्रीमंत व्यापाऱ्यांचे मेणे, मंचिले जात असत. आज मोटारी, टॅक्सी, ट्रक, बसेस नी रिक्शा-सायकलींनी हा पाटा गजबजलेला असतो आतांच्या या सकाळच्या वेळी मात्र 'पाटा' निर्जन होता. उजव्या हाताच्या मिठा-गरांतून थोडेसे कामकरी लांब दांड्यांच्या लाकडी खोऱ्यानी चौकोनी वाफ्यातले मीठ गोळा करीत होते नी डाव्या हाताच्या विस्तीर्ण मांडवीच्या पात्रात मासळी पकडण्यासाठी जाळी टाकून स्तब्धपणे उभे असलेले 'पनेळ' (छोट्या होड्या) भरतीच्या लाटांनी डुलत होते सारी रात्र लोहखनिजाची मुरगांवच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या 'बार्जीस'चा घरघरणारा आवाज आता थंड पडला होता परतीच्या प्रवासाला लागलेली एखादी रिकामी बार्ज मात्र आमच्या मोटारीशी शर्यत लावून मांडवीतून तीरासारखी धावत होती, पण पराभव पावून मागे रेंगाळत होती.

रायबंदर पानवेल पार करून आम्ही जुन्या गोव्याच्या प्रचंड चौकात आलो डाव्या हाताला दोन तर उजव्या हाताला एक अशा तीन प्रचंड इमारती दिसत होत्या. कुठल्या तरी एका इमारतीतून घंटांचा आवाज ऐकू येत होता.

"इथं उतरायचं का?" सौ देसाईंनी विचारले

"उतरू या की." मी म्हटले.

शांतारामने गाडी थांबवली आम्ही खाली उतरलो आणि उजव्या हाताला १०-१५ यार्डांच्या अंतरावरच्या बॉं जीझसच्या चर्चमध्ये पाऊल ठेवले. आत पाऊल टाकताच चर्चचे ते प्रचंड मोठे, लांब, रुंद हॉलवजा प्रार्थनागृह पाहून देसाई पतीपत्नी थक्क झाली. वर छताकडे पाहिले तेव्हा तर सौ. देसाई म्हणाल्या, "अहो, मागं विजापूरचा गोलघुमट पाहिला होता, त्याच्यापेक्षाही ह्या घुमटाची उंची अधिक दिसते हो."

समोरची सबंध भिंत सोनेरी वेदीने व्यापली होती नी मध्यावर

'गुड जीझस 'ची मूर्ती स्निग्धपणे आंत येणाऱ्या भक्तांकडे पाहात होती.

सौ देसाईंनी विचारले, " समोरच्या भिंतीवर किती पुतळे आहेत हो? अन् सगळे सोन्यानं मढवलेले! खरं सोनं आहे का हो ते?"

" हो ना खरं सोनं. ही वेदी सोन्याचीच आहे "

" कुणाचं देऊळ आहे रे हे?" देसाईंच्या स्वरातला मिस्कीलपणा मला जाणवला.

" उगाच असं वेडगांवला येऊन पेडगावला जाऊ नका." सौ. देसाई म्हणाल्या. " म्हणे कुणाचं देऊळ आहे? हे देऊळ आहे कां? हे तर चर्च आहे."

" खरं आहे वैनी " मी म्हटले. फक्त हेच चर्च पाहायला जगातले हजारो लोक येतात इथं."

" असं काय आहे या चर्चमध्ये?"

" इथं सेंट झेवियरचं शव आहे. साडेचारशे वर्षं जशाच तसं.. "

पण माझे [illegible] देसाई आकांताने म्हणाल्या,

" चला भाऊजी, आपण परत फिरूया. आपल्या धर्मयात्रेत असलं अमंगळ कांही पाहावं असं मला वाटत नाही. ऐकाल ना माझं?" बाईंने अगदी रडकुंडीला येऊन हा प्रश्न विचारला होता.

" चला मंडळी, आपण परत जाऊं." मी म्हटले.

गाडीत बसता बसता मला उद्देशून सौ. देसाई म्हणाल्या, " तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. हिंदु काय, ख्रिश्चन काय सर्वांची धर्ममंदिरं सारखीच. पण तुम्ही शव म्हणालात ना "

" पुरे वैनी. आता हा विषय नको तुमच्या भावना कळल्या मला आपण आता हिंदु देवस्थानं पाहायला जातो आहो. चर्च पाहायला काही तुम्ही आलेला नाही. पुन्हा याल तेव्हा चर्च, मशिदी, समुद्रकिनारे सारं काही पाहाता येईल असंच ना?"

हां. "

आता मांडवीची संगत सुटली होती नी रस्ता अंतर्भागातून चालला होता. खोर्लीची औद्योगिक वसाहत पार करून पुढे गेलो नी दहाएक मिनिटांत एका पुलावर पोचलो. हा भाणस्तारीचा पूल गोव्याच्या

विजयमोहिमेपूर्वी एक दिवस गोव्यातले जे सतरा पूल खुद्द पोर्तुगीजानीच उध्वस्त करून टाकले होते त्यातला एक.

पुलापलीकडला गोमंतकाचा इवलासा तुकडा हे खरे गोमंतकाचे हृदय. हनुमंताच्या हृदयात जसा राम व्यापून राहिला होता तसा फोंडा किंवा अंतरूज या तालुक्यात विविध रूपानी, विविध कळानी परमेश्वर व्यापून राहिला आहे. मंगेश, नागेश, गणेश, रामनाथ, श्रीकृष्ण, शेषशायी विष्णु, हिरण्यकश्यपूचा वध करणारा करालरूप नरसिंह नी शांतादुर्गा, नवदुर्गा, अजादुर्गा, विजयादुर्गा, म्हाळसा, कामाक्षा..किती म्हणून रूपे सांगावी ?

साडेचारशे वर्षांपूर्वी पोर्तुगीज गोव्यात आले तेव्हां या साऱ्या देव-देवता पणजी–मडगावच्या परिसरात म्हणजे साष्टी, तिसवाडी व बार्देस या तालुक्यात होत्या. बाटवाबाटवीच्या काळात स्थलांतर करून त्या इकडे आल्या मुख्यत. या अंत्रुज तालुक्यांत. पोर्तुगीजानी या प्रदेशावरही स्वामित्व मिळविले, पण ते फार उशीरां—अडीचशे वर्षांनंतर—अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात बाटवाबाटवीचा काळ आता मागे पडला होता आणि इन्क्विझिशनचा निकाल लागला होता. त्यामुळे या दैवतावर पुन्हा एकदा स्थलांतर करण्याचा प्रसंग ओढवला नाही.

भाणस्तारच्या पुलावरून अन्त्रुजच्या देवभूमीत प्रवेश करून डाव्या हाताला खांडोळे–माशेल जवळ करतांना हा इतिहास मी सांगत होतो.

माशेलच्या सीमेत पोचलो नी रस्ता एकदम उजवीकडे वळला. एका छोट्याशा टेकडीची चढण चढून खाली उतरलो तेव्हा खांडोळेचे गणपतीमंदिर दिसूं लागले.

## ३ · मंगलमूर्ती गणेश

गोव्याच्या दैवतसृष्टीत खांडोळेचा गणपती आणि माशेलचा देवकीकृष्ण ही उपेक्षित दैवते. त्याच्या उपेक्षेची दोन मुख्य कारणे आहेत

पाहिले. ही देवळे हमरस्त्याच्या मोठ्या रस्त्यावर नाहीत. ती पाहण्यासाठी मुद्दाम वाकडी वाट करावी लागते. तशी ती करायची घाईगर्दीने गोवा पाहाण्यासाठी आलेल्या प्रवाशाची तयारी नसते. आणि सरकारी टुरमध्येही त्याचा समावेश झालेला नसतो.

पण आम्हाला ही देवस्थाने पाहायची होती. कारण आमचे पाहुणे गोमंतकातील पुण्यक्षेत्रांची यात्रा करणारे होते. ते टुरिस्ट नव्हते यात्रेकरू होते. करवीरची कावड घेऊन कन्याकुमारीला चालले होते. या कावडीत गोव्यांतल्या देवाच्या आठवणी त्यांना साठवायच्या होत्या म्हणूनच पणजी सोडून भाणस्तारपर्यंत आलो तेव्हां पुढे न जाता डाव्या हाताला वळून आम्ही खांडोळे-माशेलचा रस्ता धरला होता.

गोव्यांत स्वतंत्र गणेश-मंदिरे नाहीत. आहेत ती उपदैवते. अनेक ठिकाणी मुख्य दैवताच्या पंचिष्टात गणपतीचा समावेश होतो. मात्र या खांडोळेच्या गणपतीची प्रसिद्धी फार आहे. हे एक जागृत देवस्थान समजले जाते. विनायकी-संकष्टीला इथे भाविकांची गर्दी होते. डॉक्टर, वकील, व्यापारी, कारखानदार गणेश-दर्शनासाठी मुद्दाम येतात.

तीन बाजूनी टेकड्या, मध्ये टुमदार मंदिर, मंदिराच्या अग्रभागी भव्य सभामंडप, समोर खोलगट भागांत तलाव, आजूबाजूला गर्द झाडी असे या देवस्थानाचे स्वरूप आहे. परवापर्यंत सुमारे हजारपंधराशे माणसे बसू शकणारा सभामंडप या देवस्थानात नव्हता. तो अलीकडेच बांधण्यात आला.

" तूं सभामंडप कशाला म्हणतोस, मंदिर कशाला म्हणतोस ते काही कळलं नाही " देसाईने म्हटले

" तुला आपल्या मंदिरशिल्पाची कांही माहिती आहे का ? " मी विचारले.

" नाही "

" भारतीय मंदिरशिल्पाचे दोन प्रकार आहेत. एक नागर व दुसरा द्राविड. नागर हा आर्य तर द्राविड हा दक्षिणेचा. गोव्यांतली मंदिरे नागर शिल्पपद्धतीची आहेत पण त्यात द्राविड शिल्पाचेही मिश्रण आहे "

गाडींतून उतरून देवालयाच्या सभामंडपात आम्ही प्रवेश केला.

मोठ्या खांबावर काँक्रिटच्या कमानी उभारून हा मंडप बांधला होता. देवालयाच्या विरुद्ध बाजूला एक उंच असा रंगमंच होता. कंपनीचे एखादे नाटक करतां येईल एवढा भव्य. वर छप्पर होते. पण बाहेरच्या भिंती नव्हत्या.

"हा सभामंडप." मी म्हटले. "एकादे छोटेसे थिएटरच म्हणेनास. देवाच्या उत्सवप्रसंगी इथे नाटके होतात. इथे खांडोळ्यातच नव्हे, गोव्यातल्या प्रत्येक देवस्थानात एकदाच नव्हे, अनेक वेळी. जत्रेच्या वेळी तर नाटकाचा धूमधडाका असतो. या नाटकासाठी आणि उत्सव-प्रसंगी माणसांना बसण्यासाठी गोव्यातल्या अन्यान्य देवाळयांना जोडून असे सभामंडप बांधलेले असतात. जिथे पक्के सभामंडप नाहीत तिथे उत्सवाच्या वेळी माडाच्या झावळ्यांचे मंडप उभारतात."

"असं. पण तूं मंदिरशिल्पाचं काय म्हणालास?"

"तेच सांगतो आतां. भारतीय मंदिरशिल्पाचा परंपरागत चालत आलेला एक ठराविक ब्लूप्रिंट असतो. त्या ब्लूप्रिंटमध्ये हा सभामंडप बसत नाही. खास नाटकासाठी बांधण्यात येणारा हा सभामंडप म्हणजे गोव्याने मंदिरशिल्पाला दिलेली एक भेट आहे. आपण आतां मंदिरात जाऊ. तिथे तुला या ब्लूप्रिंटची थोडी माहिती देतो."

खुरशा पायऱ्या चढून आम्ही मंदिरात प्रवेश केला. प्रवेश केला ते एक अगदी छोटे दालन होते. त्यात ढोल, ताशा, शिंग अशी काही वाद्ये होती. हे दालन म्हणजे आमच्या कोकणांत 'सोंडियों'. मंदिरशिल्पात या दालनाला म्हणतात मुखमंडप.

मुखमंडपातून आंत प्रवेश केला म्हणजे भोगमंडप किंवा महामंडप भेटतो. त्यांत सहा, आठ किंवा दहा खांब असतात. त्यावर अर्धवर्तुळाकृती छत असते. खांबाच्या बाहेरून ओवरी असते. या महामंडपाला आम्ही चौक या नावाने संबोधतो. चौकाच्या शेवटी गर्भगृह किंवा गाभारा. गाभाऱ्यात देवमूर्ती विराजमान झालेली असते. देवासमोर किमान दोन आणि देवस्थानच्या श्रीमंतीनुसार चार, सहा, आठ, दहा अशा नंदा-दीपाच्या माळा तेवत असतात.

गाभारा आणि महामंडप यांना विभागणारी एक लाकडी किंवा

दगडी भिंत असते गाभाऱ्याच्या बाहेर दहाबारा फूट एवढीच तिची रुंदी असते. या छोट्या दालनाला म्हणतात अंतराळ. चौक आणि अंतराळ विभागणारी जी भिंत असते तिचे नांव द्वारपट्टिका ही द्वारपट्टिका लाकडी असली तर ती आणि गर्भगृहाचे दार चांदीच्या पत्र्याने मढवलेले असते अर्थातच कलाकुसरासह. पाने, फुले आणि मुख्यतः कमलपुष्पे आणि द्राक्षफळे नी वेली याचा वापरच या कलाकुसरीत अधिक केलेला असतो. अंतराळाला जोडून नी गाभाऱ्याच्या बाहेरून प्रदक्षिणामार्ग असतो.

पण एवढ्याने हा [illegible] बाजूकडचा भाग असतो त्याच्या दोन बाजूस दोन दालने जोडलेली असतात या दालनात उपदेवतांचा निवास असतो या दालनाचे नाव अर्धमंडप या अर्धमंडपातून बाहेर पडायला दरवाजे असतात.

भारतीय मंदिरशिल्पाच्या ह्या ब्लूप्रिंटची माहिती मी सांगत असतांनाच पाहुणे मंडळी गणपतीचे दर्शन घेऊन मंदिरात हिंडत होती. प्रदक्षिणा पूर्ण करून आम्ही चौकावर आलो तेव्हा देसाई म्हणाला, "मुखमंडप, महामंडप, अर्धमंडप, अंतराळ या साऱ्या गोष्टी तू सांगितल्यास पण या देवालयांत त्या साऱ्या काही जशाच्या तशा दिसत नाहीत. इथे चांदीची द्वारपट्टिका नाही."

"तू म्हणतोस ते बरोबर आहे. छोट्या देवालयांत या साऱ्या गोष्टी असतातच असं नाही. मोठीं देवस्थानं आपण पाहूं तेव्हां या साऱ्या गोष्टी दिसतील."

"हा गणपती स्वयंभू आहे का हो?" सौ देसाईंचा प्रश्न.

"स्वयंभू!"

"हो, म्हणजे महाराष्ट्रातल्या अष्टविनायकासारखा. पुळे, मोरगाव, थेऊर, "

"कळलं कळलं. तसा हा गणपती स्वयंभू नाही स्वयंभू असता तर त्याची इतकी सुंदर फीगर असती का? हा गणपती मूळचा नावेली गांवचा बाटवाबाटवीच्या काळांत त्याच्या भक्तमंडळींनी त्याला या अंतरुज महालांतल्या खांडेपार गावात आणला. कांही भक्तजन देवाची पूजाअर्चा करायला तिथे राहिले तर काही इतर गावात विखरून गेले.

उत्सवाच्या निमित्ताने देवाचे हे महाजन खाडेपारला येत.

"अशी दोनशे वर्षे गेली आणि एक दिवस—नेमके सांगायचे तर नरकचतुर्दशीच्या पहाटेस ताळगावच्या नावेलकर महाजन मंडळीने गणपतीची मूर्ति पळविली. त्यांचे म्हणणे असे की जी भक्तमंडळी खाडेपारला राहिली त्याना गणपतीचे सान्निध्य तिन्हीत्रिकाळ सहजपणे लाभते, तर आम्हा लोकाना कित्येक मैल तुडवून देवदर्शनाला यावे लागते तेव्हा दोघानाही सारखेच अंतर पडेल अशा जागी गणपतीची पुन्हा स्थापना झाली पाहिजे

"सकाळ होऊन खांडेपारकर मंडळी देवदर्शनाला जातात तर देवळात देव नाही त्याना शका आली गणपतीला पळवला तो नावेलकरानी ते लगोलग पाठलागावर गेले आपण आताच ज्या पुलावरून आलो ना, त्या भाणस्तार गावी नावेलकराशी खाडेपारकराची गाठ पडली मारामारी झाली एक छोटे युद्धच झाले म्हणा ना. शेवटी तडजोड होऊन ठरले की भतग्रामातील नारवे गावी गणपतीची नव्याने स्थापना करावी त्याप्रमाणे सारी मंडळी नार्व्याला जाऊन व गणपतीची स्थापना करून घरोबर निघून गेली हा दिवस होता कार्तिक शुद्ध प्रतिपदेचा आमच्या गोव्यांत नरकचतुर्दशी हा एकच दिवस दिवाळीचा म्हणून मानतात. त्या दिवशी घरच्या पुरुष मंडळींना बायकानी ओवाळायच असतं. पण त्या दिवशी हे गणेशभक्त पुरुष भाणस्तारीला आपापसात युद्ध खेळत होते त्यामुळे त्याची वाट पाहून पाहून घरच्या बायका बिचाऱ्या रडू लागल्या दिवाळीचा दिवस सुना गेला दुसरा दिवस उजाडला नी हातापायाना पट्ट्या बाधलेली पुरुष मडळी घरी आली, तेव्हाच दिवाळी साजरी झाली आजही या खाडेपारकर नी नावेलकर घराण्यातील कुटुबात दिवाळीची ओवाळणी होते ती कार्तिक पाडव्याला

"नार्व्याला नेलेला गणपती मात्र तिथे फार दिवस राहिला नाही. दहाबारा वर्षानंतर त्याला इथे खाडोळ्याला आणला, नी मग इथेच देवालय बाधून त्याची प्रतिष्ठापना केली. या गोष्टीला जेमतेम दोनशे वर्षे झाली दिवाडी बेटांतल्या मूळ नावेली गांवी, नतर खाडेपारला नी पुढे नार्व्याला जिथे जिथे गणपतीने वस्ती केली तिथे तिथे आजही त्याच्या

मंदिराचे अवशेष दाखविले जातात

"या अवशेषाशिवाय याच गणपतीचीं कर्नाटकातल्या असनोटी नी शिराळी या गावात देवळ आहेत आटवाआटवीत जे महाजन या गावी निघून गेले त्यानी ती बांधली आहेत. गोव्याच्या त्या काळच्या धार्मिक इतिहासात असच घडलेलं आहे अनेक देवस्थानाचे महाजन परागंदा झाले, त्यातले खूपसे दक्षिणेला कर्नाटक, मलबार, कोचीनपर्यंत गेले ते जिथे स्थायिक झाले तिथे त्यानी आपल्या कुलदेवताची मंदिरे उभारली म्हणून आजही गोव्यातल्या बहुतेक सर्व सारस्वताच्या कुलदैवतांची मंदिरे उत्तर व दक्षिण कॅनरा जिल्ह्यात दिसतात"

"एक विचारूं का?" देसाई म्हणाला

"विचार की."

"देवाचे महाजन म्हणजे नेमके काय? गोव्यात काही महाजन नी कांही इतरेजन आहेत का? या महाजनाचाच देवळावर हक्क असतो काय? हे महाजन म्हणजे फक्त सारस्वतच का?"

"हा एक मोठा जटिल विषय आहे हा स्पष्ट करून सागायचा तर गोव्यातील पुरातन गावगाड्याची, जुन्या काळात वसाहत कशी झाली त्याची आणि देवस्थानाची व इतर गोष्टींची माहिती सागावी लागेल. आता एवढच सागतो, ज्या घराण्याचे जे कुलदैवत त्या घराण्यातील पुरुष-मंडळीला त्या देवस्थानचे महाजन अस संबोधण्यात येत ते फक्त सारस्वत असतात असं नव्हे मराठ, दैवज्ञ, वैश्य वगैरे इतर जातींचे लोकही महाजन असतात शूद्राना मात्र आमच्या या धर्मयंत्रणेत कुठेच स्थान नव्हते हरिजन तर बिचारे अस्पृश्यच! त्याचा वाराही आमच्या देवाना वर्ज! देवळाच्या चार भिंतीच्या आड कोंडून घेऊन ते आपल्या महाजनाशी हितगुज करण्यात मग्न! आताच कुठे ही स्थिती पालटते आहे अतिशूद्राना आणि मुस्लीम–ख्रिश्चनानाही आज देवदर्शन घेण्यास मज्जाव नाही"

"पण सारस्वतेतराना महाजनाचा अधिकार मिळेल का? आपली कुलदैवत म्हणून त्याना या देवावर हक्क सागता येईल का?"

"पुढलं काही मी सागू शकत नाही पण आज तरी परिस्थिती अशी आहे की गोव्यातली ग्रामदैवत सोडलीं तर बरीचशी कुलदैवतं त्या

त्या महाजनाच्या घराण्याच्या मालकीची आहेत म्हणूनच त्याचा ट्रस्ट करता येईल का, ती सार्वजनिक करता येतील का असे कायदेशीर प्रश्न निर्माण झाले आहेत ''

आमच्या या चर्चेत नायकाना रस नव्हता याचे प्रत्यतर वहिनींनी मध्येच जो प्रश्न विचारला त्यामुळे आले वहिनी म्हणाल्या,

" भावजी, प्रत्येक मगलप्रसगी गणपतीची पूजा का करतात हो ?"

" अहो, गणपती हा मंगलमूर्ती आहे ना ? त्याची पूजा करून कार्यास आरभ केला तर कार्य निर्विघ्नपणे पार पडते अशी आपली श्रद्धा आहे एक सुप्रसिद्ध श्लोक आहे

विद्यारभे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा
सग्रामे सकटे नैव विघ्नस्तस्य न जायते''

" अर्थ कळला ना ? एस. एस सी ला म्हणजे तुमच्या वेळच्या मॅट्रिकला सेकंड लँग्वेज सस्कृत होती ना तुमची ? तेव्हा विचारायचं कारणच नाही

" करा, चेष्टा करा भाऊजी पण माझी दुसरी एक शका आहे, तिचं उत्तर द्या ''

" कसली शंका ? '

" गणपतीचीच पूजा का म्हणून मगलकार्याच्या प्रसगी ? ब्रह्मदेव, महादेव, विष्णु एवढे मोठे देव असताना गणपतीला एवढं महत्त्व कस आल ? "

" एक आठवली ती कथा सागतो वहिनी आजकाल काय दिसत, पापभीरु नी सज्जन माणस दुःखी असतात, तर दुष्ट नी बदमाश माणसाची चलती होते भल्याबुऱ्या मार्गांनी हे लोक पैसा मिळवतात नी सुखी होतात भल्याच्या कार्यात विघ्ने येतात तर दुष्टांची कामे सुखेनैव होऊन जातात पुरातन काळीसुद्धा हे असच चाललं होतं पण हे असं चाललेल देवांना नी ऋषीमुनींना आवडलं नाही ते सर्व महादेवाकडे गेले नी त्यानी आपली तक्रार माडली, ती महादेवाला पटली काही तरी उपाय करून सज्जनाना सुखी नी दुर्जनाना दुःखी करायला पाहिजे असे त्याला

वाटू लागले. शेजारी पार्वती बसली होती तिच्याकडे टक लावून पाहात असतांनाच शिवाच्या मुखातून एक तेजस्वी कुमार निर्माण झाला

"उमा पाहाते तर हा प्रतिमहादेव! दोघात रूपसाम्य एवढे की, एकाला लपवायचा नी दुसऱ्याला दाखवायचा खरा कुठला नी तोतया कुठला, कुणाला कळणे शक्यच नव्हते

"पार्वती एकदम क्रुद्ध झाली. तिने या तोतया शिवाला शाप दिला 'तू गजमुख नी लंबोदर होशील.' या शापामुळे या नवजात कुमाराचे स्वरूप पालटून गेले त्याचे तोंड हत्तीसारखे दिसू लागले नाकाला सोंड फुटली पोट पुढे आले

"पण शंकराने आपल्या या पुत्राला वर दिला 'तुझं रूप बदलणं काही माझ्या हातात नाही पण मी तुला वर देतो की, कोणत्याही कार्यारंभी जो तुझी भक्तीने पूजा करील त्याचे कार्य निर्विघ्नपणे पार पडेल. तेव्हा-पासून गणपती सुखकर्ता नी दुखहर्ता बनला"

"अहो, पण एखाद्या दुर्जनाने गणपतीची पूजा केली तर? त्याच्या कार्यातली विघ्नंसुद्धा नाहीशी होतील की त्यामुळे!'

"छे छे चुकता तुम्ही वहिनी दुर्जन आधी गणपतीची मनोभावे, भक्तीने पूजा करीलच कशी?"

"पण.."

"हे तुझं, पण परंतु राहू दे आता" देसाई वहिनीला पुढे बोलू न देताच म्हणाला, "उन्ह किती वर आली बघ पुढे किती हिंडायचं आहे कुणाला माहीत चला, निघा आता"

गणपतीचे दर्शन आधी घेतलेच होते. खाडोळेच्या या गणपतीत तसे वेगळे वैशिष्ट्य नाही. डाव्या सोंडेच्या काळ्या पाषाणाची ही मूर्ती तशी खूप सुबक आहे ती द्विहस्त असून उजवा वरद आहे गणपतीला पुन्हा एकदा नमस्कार करून आम्ही बाहेर पडलो.

# ४ : गोव्याचे राष्ट्रीय दैवत देवकीकृष्ण

खाडोळ्याहून दोनतीन मिनिटांतच आम्ही माशेल गावात पोचलो गाव असेल तीनचार हजार लोकवस्तीचा पण शहरच्या सर्व सुखसोयींनी युक्त असलेला. वीज, नळ, सिनेमा, बँक, बाजार, मार्केट, मराठी आणि इंग्रजी शाळा आजूबाजूच्या दहाएक खेड्यांसाठी हे मध्यवर्ती गाव

माशेल गाव हे एका काळी गोव्याच्या संस्कृत विद्येचे नी आयुर्वेदाचे माहेरघर होते सुप्रसिद्ध संस्कृत पंडीत नी ग्रंथकार महेश्वरशास्त्री सुखठणकर इथेच होऊन गेले सुखठणकर, करंडे, धूपकर घराण्यांनी विद्वत्तेचे जतन केले कामत-चंदगडकर ऋषूनी अध्यात्मवाद पोसला बाबा माशेलकर हे संगीत क्षेत्रातील तपस्वी याच गावचे. ललितकलेत राहून सोन्याच्या कळसातली हंसाची भूमिका ज्यांनी अमर केली ते गोविंद माशेलकर इथलेच किशोरी आमोणकर ही या गावची सून विद्वत्ता नी कला इथे कित्येक शतके हातात हात घालून नांदत होत्या

"अरे, पण तुझही मूळ गाव हेच नाही का?" देसाईने जणू मर्मावर बोट ठेवावे अशा स्वरात प्रश्न केला

"हो ना"

"म्हणून तर भाऊजींनी एवढी स्तुती चालवलीय या गावची!" सौ देसाईंच्या अंगी मिस्कीलपणाचा गुण आहे याची मला पहिली प्रतीती आली. 'तुमचे मित्र' या शब्दप्रयोगावरून त्यांनी 'भाऊजी' या शब्दा-पर्यंत केलेली प्रगतीही माझ्या लक्षात येऊन चुकली होती.

माशेलात यायचा मुख्य उद्देश होता देवकीकृष्णाचे मंदिर पाहायचा गाडी उभी राहिली तसे आम्ही खाली उतरलो

"काय हो भाऊजी!" सौ देसाईंनी यापुढे बोलायचा पत्कर घेतला होता "मघापासन देवकीकृष्ण असं म्हणतांहा पण चुकून तुम्ही तर तसं म्हणत नाही ना? राधाकृष्ण नाहीतर यशोदाकृष्णाचे तर मंदिर नाही ना हे?"

"मलाही हे जरा खटकत होतं देसाई म्हणाला, "आम्ही

श्रीकृष्णमंदिर पाहिली आहेत राधाकृष्ण, यशोदाकृष्ण, गोपालकृष्ण पाहिला आहे बालाजी, रणछोडही आम्हाला माहीत आहेत पुण्याला तर मुरलीधर श्रीकृष्ण आहे .."

"राधा नव्हे, खुन्या" मी म्हणालो.

"खुन्या म्हणजे खून करणारा नव्हे हो मुरलीधराच्या देवळाजवळ खून झाला म्हणून खुणेसाठी खुन्या मुरलीधर म्हणायला लागले लोक" वहिनींनी पडल्या आवाजात खुलासा केला

"अग पण तुला एवढं का वाईट वाटलं ?" देसाई म्हणाला

"वाईट वाटायचा प्रश्न नाही हो पुण्याबाहेर पाऊल टाकलं ना, म्हणजे आमच्या देवाबद्दल असच चिडवतात माणसं. म्हणतात, असे कसे हो तुमचे देव ! एक खुन्या मुरलीधर तर दुसरा छिनाल बालाजी, तिसरा पऱ्या मारुती तर चौथा "

"जाऊ द्या हो वहिनी" मी म्हटले, "खुणेसाठी ही नांवं पडली हे मान्य आहे मला आपण आता इथल्या देवाबद्दल बोलू तुम्हाला या देवाच्या नावाबद्दल शंका होती ना ?"

"हो हे मंदिर यशोदाकृष्णाचं असून त्याला ."

"छे हो देवकीकृष्णाचंच देऊळ आहे हे. आमचं कुलदैवत आहे ते आमच्या सौ ने संभाषणात पहिल्याप्रथम भाग घेतला होता आणि मंदिरापासून पन्नास यार्ड दूर असलेल्या रस्त्यावरून तिने भक्तिभावाने देवकीकृष्णाला नमस्कार केला होता.

"अस आहे होय !" वहिनी म्हणाल्या, "तरीच ! भाऊजी मघापासनं म्हणताहेत, देवकीकृष्ण उपेक्षित आहे, मार्शेल गाव विद्वत्तेचं नी कलेच माहेर आहे तरी टुरिस्ट इकडे फिरकत नाहीत त्याची आता संगती लागली तुमचं कुलदैवत का हे वैनी ?" सौ देसाईंचा मिस्कीलपणा मला दुसऱ्यांदा जाणवला

पण सौ देसाईंच्या मिस्कील कॉमेंट्सना मी मिस्कील उत्तर दिले नाही माझ्यातला किंचित् इतिहाससंशोधक आता जागा झाला होता मी गंभीरपणाने म्हटले, "वहिनी, केवळ टुरिस्ट इथे येत नाहीत म्हणून देवकीकृष्ण उपेक्षित राहिला आहे अस माझं म्हणणं नाही खुद्द आम्ही

गोमंतकीयानी या दैवताची कित्येक शतकं उपेक्षा केली आहे खर तर हे दैवत गोव्याच राष्ट्रीय दैवत व्हायला हवं भारताच्या दैवतसृष्टीचा इतिहास लक्षात घेतला तर इतर ठिकाणच्याप्रमाणे गोव्यातही आर्यांच्या आगमनानंतर अनार्यांशी संघर्ष व समन्वयाच्याद्वारे अनार्यांचे आर्यीकरण झाले गोव्यात आलेल्या आर्यांच्या टोळ्या मुख्यतः यादवांच्या होत्या द्वारकेतून त्या इथे आल्या त्याना नंतर भोज व सात्वत अशीही नावे मिळाली ही यादव वा भोज कुळे गोपालन व कृषी करणारी होती पुढे श्रीकृष्णाला देवत्व प्राप्त झाले तेव्हा त्याची मंदिरे गुजरातेत उभारली गेली तसेच गोव्यातही त्याचे मंदिर बांधले गेले गोव्यात ज्यानी गोपसंस्कृती आणली व शेती वाढविली, त्यांच्या दैवताला म्हणजे श्रीकृष्णाला गोव्याचे राष्ट्रीय दैवत म्हणून आम्ही गोवेकरांनी स्वीकार करायला नको काय? पण आज परिस्थिती अशी आहे की, काही सारस्वत घराण्यांचं व काही सुतार, खारवी लोकाच ते कुलदैवत आहे आणि गावांतल्या गावडे जमातीच ते उत्सवदैवत आहे गोव्यात दिवाळीचा पाडवा हा गुराख्यांचा पाडवा म्हणून ओळखला जातो या दिवशी या अनुज तालुक्यातले गुराखी गुराची पूजा करतात त्याना डोसे खायला घालतात श्रीकृष्णाची मूर्ती डोक्यावरून फिरवतात इथे माशेल गावात तर फार मोठा रथोत्सव होतो हे सगळं लक्षात घेतलं तर कृषिप्रधान गोव्याचं राष्ट्रीय दैवत श्रीकृष्ण हेच ठरत नाही का? याही अर्थाने हे उपेक्षित दैवत आहे असं म्हणतोय मी"

"हे झालं श्रीकृष्णाचं पण देवकीकृष्णाच काय? श्रीकृष्णाच्या जोडीनं देवकीचा उल्लेख का होतो? भारतात तर कुठंही देवकीकृष्ण मंदिर नाही"

"याबद्दल एक पुराणकथा नी एक दंतकथा आहे त्या तुम्हाला थोडक्यात सागतो कृष्णाचा मामा, मथुरेचा कंस एवढा माजला होता की, शेवटी श्रीकृष्णाला कसवध करून जनतेला त्याच्या तावडीतून सोडवावे लागले परंतु या घटनेने एक संकटपरंपरा श्रीकृष्णापुढे उभी राहिली कंसाचा सासरा मगध देशाचा राजा जरासंध याला कंसवधाची बातमी कळताच तो कृष्णावर भयंकर चिडला व बलाढ्य सेनेनिशी मथुरेवर चालून आला मथुरेचा राजा म्हणून आता कंसाचा बाप उग्रसेन राज्य करीत असला तरी

मथुरेच्या रक्षणाची नैतिक जबाबदारी श्रीकृष्णावर होती त्याने जरासंधाशी जोरदार लढाई दिली या लढाईत जरासंधाचा पराभव झाला नी तो परत फिरला.''

अशा सतरा स्वाऱ्या जरासंधाने मथुरेवर केल्या आणि सतरा वेळा त्याला हार खावी लागली अठराव्या वेळी शक्तीबरोबर युक्तीचा अवलंब करायचे जरासंधाने ठरविले आपल्या सर्व मित्रराजांना आवाहन करून त्याने प्रचंड सेना उभारली व कालयवनाचीही मदत मिळविली

कालयवन हा त्या काळातला एक प्रबळ यवनराजा खरे म्हणजे हा कालयवन जन्माने यवन नव्हता, तो होता गार्ग्यमुनींच्या एका गोपकन्येपासून झालेला पुत्र. म्हणजे एका दृष्टीने गोपालच. पण यवनराजाने त्याला दत्तक घेतल्यामुळे यवन बनलेला.

जरासंध व कालयवन अशा दोन आघाड्यावर लढा देणे श्रीकृष्णाला शक्य नव्हते सतरा वेळा युद्ध खेळून यादवसेना जर्जर झाली होती म्हणून या वेळी श्रीकृष्णाने असा एक पवित्रा घेतला की, जागतिक युद्धाच्या आजपर्यंतच्या इतिहासातदेखील असा डावपेच लढविणारा सेनानी कुणी झाला नसेल. त्याने मथुरा शहर खाली करून नवी राजधानी वसविण्याचे ठरविले एका रात्री मथुरावासी जन सौराष्ट्राच्या दिशेने चालू लागले द्वारकेला नवी राजधानी स्थापन करण्याचे आदेश त्याने आपल्या सहकाऱ्यांना दिले. पण स्वतः श्रीकृष्ण व बलराम मात्र त्यांच्याबरोबर गेले नाहीत ते दंडकारण्याच्या रोखाने दक्षिणेला निघाले

हा पवित्रा घेण्यापूर्वी श्रीकृष्णाने कालयवनाशी शीतयुद्धाचा एक प्रयोग करून पाहिला होता. त्याने एक कृष्णसर्प एका सुंदर घड्यात घालून कालयवनाला भेट म्हणून पाठविला "माझ्यासारख्या कृष्णसर्पाला डिवचू नकोस" असे सुचविण्याचा श्रीकृष्णाचा उद्देश होता.

पण कालयवनही कमी नव्हता त्याच घड्यात त्याने लाखो चावऱ्या मुंग्या घातल्या व तो कृष्णाकडे परत पाठविला. "तू कृष्णसर्प असलास तर माझ्या पाठीशी लाखो सैनिक आहेत मुंग्या सर्पालासुद्धा वठणीवर आणतात" असा त्या प्रतिभेटीचा अर्थ होता.

श्रीकृष्णाला हा अर्थ उमजला आणि त्याने मथुरेतली लोकवस्ती

हलविण्याचे ठरविले

श्रीकृष्ण व बलराम दक्षिणेला पळून जात असल्याचे कळताच जरासंध व कालयवन त्यांच्या पाठलागावर निघाले राम-कृष्णाचा रथ मजल दरमजल करीत करवीर (कोल्हापूर) पर्यंत आला. तिथे वेण्णा नदीच्या तीरावर त्याना परशुराम एका वटवृक्षाखाली बसलेला दिसला.

रामकृष्णानी परशुरामास नमस्कार करून आपल्यावरील संकटाची कल्पना दिली तेव्हा परशुराम म्हणाला, "श्रीकृष्णा, तुम्ही असेच दक्षिणेला जाऊन गोमंतशिखरावर मुक्काम करा अन् तिथे लढाई द्या दुर्गपद्धतीची लढाई करायला हे गिरिशिखर उपयुक्त आहे"

गोमतपर्वतावर रामकृष्ण आले तेव्हा तिथून त्याना एक धबधबा पश्चिमेला खाली कोसळताना दिसला तिथून दूरवर त्याना सागराचे दर्शन घडले, तसेच पाचूंच्या बेटाचा समुदाय दिसला हा गोमंतपर्वत म्हणजे गिरसप्पा जिथून कोसळतो तो की, दूधसागर उड्या घेतो तो याबद्दल संशोधकात मतभेद होते पण हरिवंशातल्या बारीकसारीक वर्णनांवरून तो गोव्याच्या सरहद्दीवरचा तिनईघाटातला दूधसागरचा डोंगर हे शणै गोंयबाब या गोवेकर इतिहाससंशोधकानी सिद्ध केले आहे

या ठिकाणी मग घनघोर युद्ध झाले जरासंध अठरावा व अखेरचा पराभव पत्करून परत गेला कालयवनाच्या बाबतीत मात्र हरिवंश, पद्मपुराण, विष्णुपुराण, ब्रह्मपुराण वगैरे पुराणे जी कथा सागतात ती अद्भुत आहे

जरासंधाचा पराभव करून श्रीकृष्ण एका अंधाऱ्या गुहेत लपून बसला. या गुहेत राजर्षी मुचकुंद कित्येक युगे झोपून राहिला होता राजा मुचकुंदाने दैत्यांविरुद्धच्या लढाईत देवाना यशस्वी मदत केली होती युद्ध खेळून दमलेल्या मुचकुंदाने, "मला कित्येक युगे झोप यावी आणि जो कोणी माझी झोपमोड करील त्याचे माझ्या पहिल्या दृष्टिक्षेपाने भस्म व्हावे" असा वर मागितला होता व देवानी तो दिला होता श्रीकृष्णाने या वराचा फायदा घ्यायचे ठरवून स्वतःचे उपवस्त्र मुचकुंदाच्या अंगावर टाकले

कृष्ण गुहेत शिरलेला कालयवनाने पाहिला नी तोही गुहेत शिरला कृष्णाचा शेला पाहून त्याने मुचकुंदाला लाथ मारली मुचकुंद जागा झाला

त्याने कालयवनाला पाहिले तो तत्क्षणी भस्म होऊन गेला

ज्या ठिकाणी मुचकुंद झोपला होता ती गुहा मात्र आज जुन्या गोव्यातल्या — जिथे मघाशी आपण चर्च पाहिले तिथे — एका डोंगरावर दाखवतात

यापुढील कथा इतिहास-पुराणे सांगत नसून दंतकथा सांगते

श्रीकृष्ण हा देवकीचा औरस पुत्र पण त्याला वाढविला यशोदेने तिनेच त्याच्या खस्ता खाल्ल्या आणि बाललीलाही पाहिल्या कालियामर्दनाच्या वेळी तिच्या हृदयाला कापरे भरले होते आणि गोवर्धनपूजेच्या वेळी इंद्राने जलप्रलय मांडला तेव्हा श्रीकृष्णाच्या जिवाच्या भयाने ती गांगरून गेली होती हे सारे खरे असले तरी श्रीकृष्णाच्या गर्भवासाच्या कळा सोसल्या होत्या त्या देवकीने कंसभयाने नऊ महिने व्याकुळ झाली होती ती देवकी श्रीकृष्णाच्या चढत्यावाढत्या यशाने ती सुखावत होती, पण त्याचा सहवास मिळत नाही म्हणून खंतावतही होती शेवटी कंसवधानंतर श्रीकृष्ण आपल्या जन्मदात्या मातेला पहिल्याप्रथम भेटला

पण नंतरही तिला श्रीकृष्णाचा सहवास लाभला नव्हता जरासंधाशी चाललेल्या युद्धमालिकेमुळे त्याला उसंत मिळत नव्हती. देवकीच्या मनाची तडफड चालली होती

मनाच्या अशा अवस्थेत असताना कृष्ण दक्षिणेला पळून जात असून कालयवन व जरासंध त्याच्या पाठलागावर आहेत असे तिला कळले ती सैरभैर झाली. मेंदूला बधिरता आली इतरांबरोबर द्वारकेला चाललेली देवकी मध्येच एकटी, एकाकी दक्षिणेला वळली

करवीर नगरीला तिला कळले की, रामकृष्णाचा रथ आणखी पुढे गेला आहे

गोमंत पर्वताच्या पायथ्याशी पोचताच ती घाबरून गेली तिथे नुकतेच एक भीषण युद्ध होऊन गेले होते साऱ्या परिसरात रक्तमांसाचा चिखल झाला होता कोल्हीकुत्री नी गिधाडांच्या टोळ्या मांसावर ताव मारीत होत्या

हे भयानक दृश्य पाहून ती गांगरून गेली तिचे मातृहृदय गलबलून गेले ती आक्रोश करू लागली आपला बाळ सुखरूप आहे ना? असला

तर कुठं बर गेला असेल? कोणत्या वाटेने गेला असेल? त्याची भेट कुठे होईल?

आणि अकस्मात तो चमत्कार घडला! तिला पान्हा फुटला! स्तनातून दुधाची धार लागली. ती तिला आवरेना. दूध इतके सांडू लागले, इतके सांडू लागले की, दुधाचा प्रवाह जमिनीवरून वाहू लागला. शुभ्र दुधाची धार पश्चिमेकडे वळली शिखरावरून त्या प्रवाहाने खाली उडी घेतली दंतकथा सांगते, हाच दूधसागर!

ज्या दऱ्याखोऱ्यांतून पुढे या दुग्धप्रवाहाने वाट काढली त्याच वाटेने देवकी चालू लागली.

इकडे मुचकुंदाच्या गुहेतून श्रीकृष्ण बाहेर पडला होता. त्याने खळखळत येणाऱ्या दुग्धप्रवाहाचा आवाज ऐकला आणि काय घडले ते अंतर्ज्ञानाने जाणले. मातेच्या भेटीसाठी तो झपाट्याने चालू लागला.

चूडामणी बेटात त्याने देवकीला पाहिले. क्षणार्धात त्याने बालरूप धारण केले. एका वटवृक्षाखाली तो रांगू लागला, खेळू लागला.

देवकीची दृष्टी बालकृष्णाकडे गेली मात्र, स्तन्याप्रमाणेच तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या बालकृष्ण हात पसरून पुढे झेपावला आणि मातेच्या गळ्याला त्याने मिठी घातली. देवकीच्या स्तनांतून ओघळणारे दूध तो अधाशाप्रमाणे पिऊ लागला. तिची गात्रानगात्रे पुलकित होऊन उठली. तिच्या आनंदाला सीमा नव्हती सुखाला अंत नव्हता. बालकृष्णाला मिठीत घेऊन विश्वाच्या अंतापर्यंत तिथच थांबायची तिची तयारी होती.

आणि तशी ती थांबलीही. मथुरेच्या बंदिशाळेत जन्माला आलेला, गोकुळातल्या नंदगृहांत वाढलेला आणि यमुनेच्या जलाशयात खेळलेला बालकृष्ण देवकीमातेच्या कडेवर बसून तिला मातृसुख देण्यासाठी आणि भक्तजनाचे प्रिय करण्यासाठी इथे गोमंतकांत आज तिष्ठत आहे कल्पातापर्यंत असाच तिष्ठत राहाणार आहे!

गोष्ट संपली तसे आमच्या ग्रुपमधील दोन्ही स्त्रियांकडे माझे लक्ष गेले. कडेवर कृष्णकन्हैयाला घेऊन मंदस्मित करीत गाभाऱ्यांत उभ्या असलेल्या देवकीमातेकडे त्या तन्मयतेने पाहात होत्या. डोळ्यातून आस-

वाचे मणी ओघळत होते आणि दोघींचेही हात भक्तिभावाने जोडले गेले होते !

मला वाटले, ज्या कोणा कवीने ही कथा रचली असेल त्याच्या कल्पकतेचे चीज झाले !

काही वेळ मग स्तब्धतेत गेला. देवदर्शन घेऊन आम्ही चौकावर बसलो आणि मग देसाई एकदम म्हणाला, " ही तुमची कृष्णाला कडेवर घेतलेली देवकीची मूर्ती पाहिल्यावर मला कसली आठवण झाली सांगू ? बालयेशूला कडेवर घेतलेल्या माता मेरीची मूर्ती कुठल्या तरी चर्चमध्ये मी पाहिली होती तिची. "

" चुकीच नाही तुझं म्हणणं. मातापुत्रांची पूजा व्हायचं हे दुसरं उदाहरण तुला फक्त या उदाहरणाची आठवण झाली, पण काही पाश्चात्य पंडितांच्या मते कृष्ण ही ऐतिहासिक व्यक्ती नसून काल्पनिक आहे नी ख्रिस्तावरून ती घेतली आहे ख्रिस्त जसा गोठ्यात जन्माला आला तसा कृष्ण बंदिवासात ख्रिस्ताला मारायला पिलात टपला होता तसा कृष्णाला मारायला कंस टपला होता. ख्रिस्त इजिप्तला पळून गेला तसा कृष्ण द्वारकेला. रामायण जसं ईलियडवरून घेतलं तसं कृष्णचरित्र [illegible].

" बंडल ! ' देसाई त्वेषाने उद्गारला.

" बरोबर. " मी म्हणालो

आम्ही उठलो नी देवळाची रचना पाहायला लागलो. " बाटवा-बाटवीच्या काळात चोडणचा हा देवकीकृष्ण मये गावात गेला व मग तिथून इकडे माशेलांत आला. हे देवळाचे बांधकाम अगदी अलीकडचे— फक्त शंभर वर्षांचे. पण अगदी टीपिकल. अशीच देवळं आहेत इथली मात्र आश्चर्याच्या तीन गोष्टी आहेत. देवालयासमोर दीपस्तंभ नाही आणि तलावही नाही. मंदिराला लागून सभामंडप नाही. शिवाय इतर देवस्थानापेक्षा आणखी काही विशेष गोष्टी आहेत देवालयाभोवती ज्या अग्रशाळा असतात त्याचा अभाव आहे. त्यामुळे प्राकार भव्य वाटते. समोर एक मोठे मैदान आहे त्यामुळे हे देवस्थान उघड्यावर असल्यासारखे वाटते "

देवळाबाहेर पडलो आणि आजूबाजूला नजर फिरविली, तेव्हा

पांचदहा देवळे एकदम दृष्टिपथांत आली

"इथ देवळाची संख्या खूप दिसते" देसाई म्हणाला.

"किमान पंधरा ते बीस देवळ आहेत इथं बाटाबाटवीच्या काळांत हे देव इथं वस्तीला आले. इतक्या देवांना आसरा दिलेला गाव गोव्यात फातर्फेशिवाय दुसरा नाही. चोडणहून आलेले देवच मुळी दहा आहेत. निरनिराळ्या ठिकाणाहून चारपांच शातादुर्गा आल्या आपण उडती भेट देऊया काही देवळांना. आपल्या दैवतकल्पनेची व मंदिर-शिल्पाची थोडी कल्पना येईल त्यामुळं."

## ५ : जुन्या मंदिरशिल्पांचे नमुने

देवकीकृष्ण मंदिराच्या उजव्या-डाव्या बाजूस दोन रवळनाथ मंदिरे आहेत. उजव्या हाताला शंभरेक मीटर दूर असलेल्या रवळनाथाला 'पिसो रवळू' म्हणजे वेडा रवळनाथ म्हणतात अर्थात् डाव्या बाजूचा रवळनाथ शहाणा ठरतो पण एक वेडा का नी दुसरा शहाणा का याचे कारण कांही कळत नाही. तसा या दोन्ही रवळनाथांत डावा-उजवा असा प्रकार नाही दोन्ही देवांच्या मूर्ती घोड्यावर बसलेल्या. उजव्या हातात तलवार तर डाव्या हातात ढाल मूर्ती काळ्या पाषाणाच्या पूजेच्या वेळी त्याना चांदीचे मुखवटे चढवले जातात उत्सवाच्या वेळी तर सोन्याचे

गोव्यात रवळनाथ, वेताळ, भैरव, कालभैरव, भूतनाथ अशी काही दैवते आहेत. कांही स्वतंत्र तर कांही उपदैवते हे शिवगण असल्यामुळे नी क्षात्रदैवते मानली गेली आहेत त्याची पूजा सारस्वत वा द्राविड ब्राह्मणाऐवजी गुरव वा भगत यांजकडून केली जाते गुरव ब्राह्मणेतर असले तरी त्रैवर्णिकांत त्याचा समावेश होतो.

या उग्र दैवतांना कोंबड्या-बकऱ्याचा बळी दिला जाई हे बळी

नवसाचे असत तसेच वार्षिक प्रथा म्हणूनही दिले जात आता फक्त कोंबड्यावरच भागविले जाते. बळी द्यायची देवस्थानाबाहेर एक ठराविक जागा असते बहुधा वाठाराचा—प्राकाराचा रक्षक निरकाराच्या रूपाने तिथे छोट्या देवळीत असतो गोव्यातल्या बहुतेक देवस्थानात हा निरंकार ( निराकार ? ) वाठाराचे रक्षण करण्यासाठी जागत असतो

गोव्यात ज्या प्रसिद्ध जत्रा आहेत त्यांत माशेलातल्या पिशा रवळ-नाथाच्या जत्रेचा समावेश होतो. तिन्ही मंदिरासमोर असलेल्या ४—५ एकर भरेल एवढ्या मैदानावर फेरी भरते फेरीचा विस्तार मागच्या डोंगरा पर्यंत गेलेला असतो पोष शुद्ध पौर्णिमेच्या रात्री फार मोठा— आठदहा पुरुष उंचीचा लाकडी रथ दोरखंडानी ओढला जातो रथावर श्री देवकी-कृष्णाची उत्सवमूर्ती बसलेली असते

हा रथोत्सव – असल्या मोठ्या रथाना काही ठिकाणी ' तेर ' म्हटले जाते गोव्यातल्या मंगेश, शातादुर्गा, म्हाळसा अशा काही संपन्न देव-स्थानांतून होत असतो पतंगाळचा रथ हा सर्वांत मोठा रथोत्सवाची ही पद्धत आम्ही दक्षिणेच्या द्राविड देवस्थानातून उचलली आहे गोकर्णपासून खाली केरळपर्यंत अशा प्रकारचे रथ ओढले जातात रथ लाकडी असतात नी त्यावर कलाकुसर केलेली असते मूर्तीशिल्पही कोरलेले असते उडुपीला असला प्रचंड रथ आम्ही पाहिला होता

पाहुण्याना रथाची कल्पना यावी म्हणून जवळच्या एका उंच शेडमध्ये बंदिस्त करून ठेवलेला रथ दाखवला या ' रथाच्या घरा 'जवळच शातादुर्गेचे एक देवालय होते इथे शातादुर्गाच एवढ्या आलेल्या आहेत की, एकीपासून दुसरीचे भिन्नत्व दाखविण्यासाठी आम्ही त्याना आडनावे बहाल केली आहेत ही कुंमारजुवेकरीण, दुसरी तळावलीकरीण, तिसरी कारैकरीण, चौथी चिमलकरीण वाटवाघाटवीत ज्या गांवाहून त्या आल्या त्या गावावरून ही नांवे पडली. या साऱ्या ग्रामदेवता साऱ्या महिषासुर-मर्दिनी

कुमारजुवेकरीण शांतादुर्गेला व दोन्ही रवळनाथाना धावती भेट देऊन फर्लांगभर अंतरावर असलेल्या मल्लिनाथमंदिराकडे वळलो. सभामंड-पात प्रवेश केला नी मनाला प्रसन्न वाटले छोट्याशा सभामंडपाची बांधणी

सुरेख होती नाटकासाठी पक्का रंगमंच, समोर प्रेक्षागृह, दोन बाजूंना गॅलरी आणि रंगमंचाच्या विरुद्ध दिशेला उत्सवमूर्ती बसवण्यासाठी मुख मंडपावर एक दालन. सभामंडपाची ठराविक रचना

मुखमंडपाच्या जमिनीवर रंगीत सिमेंटमध्ये छानदार नक्शी कोरलेली होती तर भोगमंडपातील जमीन अस्सल इटालियन मार्बलची होती शाता-दुर्गामंदिर, खळनाथाची दोन्ही मंदिरे, हे मल्लिनाथमंदिर ही सारी छोटी असली तरी टीपिकल होती, टुमदार होती आणि तरीही आतापर्यंत पाहि-लेल्या व पुढे पाहाणार असलेल्या मंदिरापेक्षा थोडी वेगळी होती

देसाईला ही गोष्ट जाणवली नी त्याने तसे बोलूनही दाखविले

" खरे आहे " मी देसाईच्या मताला पुष्टी दिली " म्हणून तर तुम्ही ही मंदिरे पाहावी असा माझा आग्रह होता दोन गोष्टी तुमच्या ध्यानात आणून द्याव्या म्हणून मी या छोट्या मंदिरात तुम्हाला घेऊन आलो "

" भाऊजी, तुम्ही ही मंदिर छोटी म्हणता ? आश्चर्य आहे " सौ देसाई म्हणाल्या, " अहो, आमच्या बेलबाग, तुळशीबागेपेक्षा केवढी तरी मोठी आहेत ही मंदिर अन् आमच्या तिकडे काय हो ? लाकडी खांबावर छप्पर टाकलं की झालं मंदिर खांबाना टेकून म्हाताऱ्या बायकानी पुराण ऐकत बसायचं नी हातानी वाती वळायच्या. आजूबाजूला स्टीलची नाहीतर खेळण्याची दुकान उघड्या देवळाच्या भोवती गिऱ्हाईकाची ही गर्दी. देवाचं नाव घेत मंदिरात बसायचं म्हटलं तर लक्ष लागत गर्दीकडे नी बाहेर ठेवलेल्या नव्या चपलाकडे ! "

" अग अग, बोलते आहेस काय तूं ? तुझा पुण्याचा अभिमान कुठं गेला ? पाण्यात राहून असं माशाशी वैर करण बर नाही हं ! " देसाई म्हणाला

" मग खोट बोलते की काय मी ? ही गोव्यातली मंदिर पाहिली..."

" अन् नवा साक्षात्कार झाला असच ना ? म्हणे पुण्याची देवळे उघडीबोडकी अन् ही बंद एकेक भिंत बघ केवढी वाववाव रुंदीची ! ' देसाई म्हणाला

" मी थोडं बोलू का देसाई ? " मी मध्येच म्हटले

" बोल ना तूं बोलावंस नी आम्हाला माहिती मिळावी म्हणून तर तुला बरोबर यायची विनंती केली होती मी "

" मग आता शांतपणानं ऐका मी काय सांगतो ते हे देवस्थान तुम्ही आतून पाहिलं ना ! या फरशी, सिमेंटचे संदर संदर रंग दिलेले हे खांब हंड्यांझुंबर लटकलेलं वर फळ्यांचं छत बाहेर आर. सी सी चं सभामंडप हे सारं आधुनिक आहे या छोट्या देवस्थानाचे महाजन फार श्रीमंत नसले तरी श्रद्धावान असतात. आपल्या स्वतःच्या राहात्या घरा- [illegible] वाटते म्हणूनच प्रसंगी शक्तीबाहेरही खर्च करून ते आपली देवमंदिरे सुधारतात, सजवितात. पूर्वी पोर्तुगीज राजवटीत तर इटालियन बटाटे तळेगांवी बटाट्यापेक्षा स्वस्त होता, तसा इटालियन मार्बलही जयपुरी मार्बलपेक्षा स्वस्त पडत होता. रंगीत सिमेंट तर शाडूप्रमाणे वापरले जात होते त्यामुळे गोव्यांतल्या कित्येक घराप्रमाणेच देवस्थानातूनही परदेशी मार्बल नी रंगील सिमेंटचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केलेला दिसतो

" हे झालं अंतर्भागाबद्दल आता जरा बाहेर जाऊन बघू "

खळनाथ, शांतादुर्गा, मल्लिनाथ ही जी छोटी देवळं आम्ही बघितली ती देवकीकृष्ण, मंगेश, रामनाथ अशा मोठ्या देवस्थानापेक्षा अधिक प्राचीन बांधणाची आहेत मोठ्या मंदिरात त्याच्या महाजनाकडून वारंवार सुधारणा होऊन त्याना आधुनिक स्वरूप आले तर या छोट्या देवळाच्या शिल्पात तशा फारशा सुधारणा झाल्या नाहीत सिमेंट-मार्बल वापरलं गेलं ते अगदी अलीकडे—गेल्या तीसचाळीस वर्षांत. तेही आंतल्या भागात बाह्यस्वरूप मात्र कायम राहिले या देवळाच्या बाह्य भिंतींची एक ठराविक रचना आहे उंच जोते, कमानदार छोट्या खिडक्या, अर्धमंडपाचा अभाव, गर्भगृहावर घुमट, जोत्याच्या जागी अर्धगोलाकृती पट्ट्या बाहेर आलेल्या म्हणजे प्रॉजेक्टेड, वळचणीचा भागही असाच बाहेर आलेला, मुखमंडपाला भिंती नसलेला पण दगडी बैठकींचा अशी या देवालयाची रचना असते पूर्वी ही देवालये बाहेरून लाल-पांढऱ्या रंगाने रंगवीत व लाल भाग कोरून काढून पिंपळपानाची लाल नकशी तयार करीत अंतर्गृहांत मार्बल बसवण्याच्या पूर्वीच्या काळात जमीन घोटून घोटून गुळगुळीत करीत ती इतकी

गुळगुळीत असे की, आरशाप्रमाणे त्यात प्रतिबिंब दिसे

या देवळाची ही पद्धत आम्ही विजयनगरच्या काळात दक्षिण व उत्तर कानडा जिल्ह्यातून म्हणजे तुळूनाडूंतून उचलली असावी आजही गोव्यातल्या ग्रामदेवता, उपदेवता व क्षुद्र देवता यांची देवळे बाहेरून जशी दिसतात तशीच तिकडेही आढळून येतात गोव्याच्या उत्तरेला कुडाळ-पर्यंतही रवळनाथ, वेताळ, माऊली व इतर ग्रामदेवतांची देवळे अशाच पद्धतीची आहेत या दृष्टीने कुडाळ–कणकवली ते कुमठा–अकोलापर्यंतचा प्रदेश हा धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या सलग होता असे म्हणावे लागते

" शिल्पशास्त्राच्या दृष्टीने या देवळाचा कुणी अभ्यास केला का ? कुणी त्यावर पुस्तक लिहिलंय का ? देसाईने विचारले

" कोण करणार याचा अभ्यास ? कुणाला तेवढी आस्था आहे ! '

" पण भारतीय मंदिरशिल्पावर तज्ञांनी पुस्तकं लिहिली आहेत ना ? त्याच्यापैकी कुणी नाही अभ्यास केला गोव्याच्या मंदिरशिल्पाचा ? "

" खर सागू ! गोव्याच्या मंदिरशिल्पात थोडेसे वैशिष्ट्य असले तरी खजुराहो, कोणारक, मदुराई, बेलूर, हळेबीड, सोमनाथपुरम नी अजंठा वेरुळसारख्या शिल्पकलेचा अभ्यास केल्यावर एवढी तृप्ती येते की, गोव्याचे मंदिरशिल्प म्हणजे शिल्प नव्हेच असं म्हणण्याची पाळी येते आणि तरीसुद्धा एका जर्मन बाईने गोमतकातील मंदिरशिल्पाचा एवढ्या बारकाईने अभ्यास केला आहे की, तिच्या चिकाटीचं कौतुक वाटावं. "

" कोण आहे ही बाई ? "

" तिचं नाव ग्रिट्ली मित्तल्वॉल्नर. भारतातील धर्मांचा अभ्यास करून तिने म्युनिक विद्यापीठाची पीएच. डी पदवी घेतली होती नतर ती पुन्हा भारतात आली नी गोव्यात सुमारे दोन वर्षे राहिली त्याच वेळी म्हणजे सुमारे पधरा वर्षांपूर्वी तिची माझी दोनतीन वेळा भेट झाली होती या वेळचा तिच्या अभ्यासाचा विषय होता, **"Survey of Hindu Art and Arehaeology in Goa and Surouding Region "** त्यासाठी ती गोव्यात आणि आजूबाजूच्या परिसरात खूप हिंडली मराठी नी कोंकणी भाषा शिकली खेडोपाडी, रानावनात हिंडून माहिती मिळविली एकूण साडेआठ हजार छायाचित्रे घेतली, त्यातली हिंदू देवस्थानांची

साडेपाच हजार होती तर ख्रिश्चन धर्मस्थानाची साडेतीन हजार शभर मदिराचे ग्राऊंड–प्लॅन्स तयार केले मलाही या विषयाची गोडी असल्यामुळे आमचे गोत्र जुळले आम्ही खूप चर्चा केली या विषयासंबंधी ''

"त्यानंतर या बाईनं, बाईनं म्हणण्यापेक्षा तिला मुलगी म्हणणेच शोभेल—फक्त तीस वर्षांचं या मुलीचं वय होतं त्यावेळी. अन् पोरगी अगदीच कोवळ्या काकडीसारखी पाढरी फटक, शेलाट्या अंगलटीची होती तर तिनं मग या सर्व तपशीलाचा अभ्यास करून जर्मन सरकारला नी म्युनिक विद्यापीठाला प्रबंध सादर केला तिच्या या कार्याला मीही वृत्तपत्रातून खूप प्रसिद्धी दिली."

"पण एकदा पीएच डी घेतल्यावर पुन्हा धार्मिक विषय तिन का निवडला?' देसाईने विचारले

"मीही तिला हाच प्रश्न केला तेव्हा ती म्हणाली की गोव्यात पूर्व-पश्चिमेचा सस्कृतिसगम झाला आहे तसाच अनेक धर्मांचा सगम झाला आहे एकेकाळी गोव्यात बौद्ध, जैन धर्म आले होते मुसल-मानाच्या काळात मुस्लिम धर्म आला पोर्तुगीजानी ख्रिश्चन धर्म आणला हिंदू धर्म तर पहिल्यापासून होता तेव्हा या धर्मांच्या समन्वयातून गोव्या-तील हिंदू धर्ममदिराच्या स्थापत्यावर व कलेवर काय परिणाम झाला हे तिला पाहायचं होतं तिच्या जर्मन प्रबधाचं भाषांतर ती मला पाठवणार होती पण अजून तरी ते मला मिळालेलं नाही"

मी घड्याळाकडे पाहिल उशीर बराच झाला होता. आता निघायला हवेच होते गाडीकडे जाता जाता मी सौ देसाईना उद्देशून म्हणालो, "बर काहो वैनी, "तुमची पुण्याची देवळ उघडीबोडकी असतात म्हणून वाईट वाटून घ्यायचं काही कारण नाही ती सुद्धा एक शैली आहे आपल्या मंदिरशिल्पाची तुम्ही कधी आग्रा–दिल्लीला गेला आहात का?"

"नाही हो यानी नेल तर जायचं ना आग्रा–दिल्लीला!"

"जरूर जा वहिनी दिल्लीला मोगल बादशहांच्या मोठमोठ्या वाड्याची वर्णनं वाचतो ना आपण इतिहासातून? दिवाण ई आम, दिवाण ई खास! अहो, हे आम नी खास वाडे तुमच्या विश्रामबाग वाड्याच्या

पासंगाला पुरणार नाहीत ! सगळे उघडेबोडके कनाता लावून म्हणे ते बंद करील "

"हो का ? म्हणजे नाव मोठं नी लक्षण खोटं म्हणतात तसं म्हणायचं !"

# ६ : त्राहि माम् गिरीश

गाडी परत फिरली आणि थेट भाणस्तरीच्या पुलाजवळ येऊन मुख्य रस्त्याला लागली फोंड्याच्या दिशेने आम्ही आता दक्षिणेकडे चाललो होतो.

कुडईच्या टेकडीवर पोचलो आणि गाडी उताराला लागली तेव्हा पाहुण्यानी समोर पाहिले क्षणभर ते अवाक् होऊन गेले अन् मग देसाई भारावल्या स्वरात म्हणाला, "किती सुंदर हे समोरच दृश्य ! इतका सुंदर निसर्ग तुमच्या वाट्याला याथा हे खरच तुमचं भाग्य या निसर्गात काही तरी दैवी आहे "

"अगदी वाच्यार्थाने तुझे शब्द खरे आहेत ' मी म्हटले. "समोर चारी बाजूनी टेकड्यानी वेढलेला भाग दिसतो आहे ना ? गोव्यांतल्या अशा प्रकारच्या बऱ्याच खोलगट भागात देवमंदिरे आहेत देवांच्या वस्तीसाठी माणसानी अशाच निसर्गसुंदर जागा शोधून काढल्या आहेत त्या खोलगट भागात पाण्याची विपुलता असते त्यामुळे दाट झाडी वाढते 'वायंगण म्हणजे रब्बी पिके होतात कुळागरे करता येतात "

मला मध्येच अडवून देसाई म्हणाला, "हा कुळागराचा काय प्रकार आहे तो एकदा पाहिला पाहिजे तुमच्या पिढीच्या गोवेकर लेखकाच्या कथासाहित्यात हा शब्द पुन्हापुन्हा वाचला होता "

"अरे कसला प्रकार नी काय ? ' मी म्हटले "नारळाची बाग असते ना तिला इथल्या कोकणीत म्हणतात भाट, तसं सुपारीच्या बागेला

म्हणतात कुळागर. जिथं जिथ पाण्याची विपुलता असेल तिथं तिथ कुळागर तयार केली आहेत. सुपारीच्या झाडाशिवाय त्यात पानवेली, मिरवेली लावतात. केळी, रातांबे, फणस, जाम ही फळझाडे असतात. शिवाय अननसे लावतात."

बोलता बोलता गाडी मंगेश देवस्थानच्या महाद्वाराजवळ उभी राहिली.

महाद्वारातून आत शिरून दोन कठड्यामधील मार्गावरून एक फर्लांगभर अंतर चालून गेलो. डाव्या हाताला हिरव्या पाण्याचा चौकोनी तलाव होता. समोर एक प्रचंड इमारत जवळ जवळ पुरी होत आली होती आणि ही इमारत व तलाव यांच्या मध्ये डाव्या हाताला दुसरे महाद्वार होते. त्यावर चौघडावादनाची व्यवस्था होती. पायऱ्या चढता चढता पायऱ्यांना लागून उजव्या हाताला असलेल्या त्या इमारतीच्या कोपऱ्याकडे नाट्यपूर्ण पद्धतीने बोट दाखवीत मी म्हटले, "इथं मास्टर दीनाचं घर होतं!"

"मास्टर दीनाचं? म्हणजे दीनानाथ मंगेशकरांचं? आपल्या लता मंगेशकरांचं?"

"होय."

देसाईचे पाय तिथेच थबकले. त्याने पायातल्या चपला काढल्या. त्याचे हात अभावितपणे आज अस्तित्वात नसलेल्या त्या वास्तूसमोर जोडले गेले. तो जड स्वरात म्हणाला, "श्रीमंगेश हे चराचर सृष्टीचं दैवत. तुम्हा सारस्वतांचं कुलदैवत. पण आम्हा नाट्यप्रेमी मराठी माणसांची दैवतं म्हणजे बालगंधर्व, केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ! गोव्याच्या यात्रेचं इथंच सार्थक झालं!" आणि मग काही वेळ स्तब्ध राहून तो म्हणाला, "ही कसली इमारत होते आहे इथं?"

"ही अग्रशाळा-कम-मंगलकार्यालय."

"मंगल कार्यालय हे मी समजू शकलो. पण अग्रशाळा हा काय प्रकार आहे?"

"अग्रशाळा म्हणजे धर्मशाळा म्हणेनास! पण साऱ्या भारतात धर्मशाळा आहेत तसा कुणाही वाटसरूला या अग्रशाळांचा उपयोग होत

नाही उत्सवाच्या वेळी महाजन मंडळी सहकुटुंब येत असे त्याच्या राहाण्याच्या सोयीसाठी आणि संतर्पण-समाराधनेच्या जेवणावळीसाठी या अग्रशाळा बांधलेल्या असत. अगदी अलीकडे मात्र नव्या अग्रशाळा बांधण्यात येतात आणि कोणाही हिंदु प्रवाशाला थोड्या भाड्यात थोडे दिवस राहाण्याची परवानगी देण्यात येते सुटसुटीत लग्नं करायची नवी पद्धत आली तेव्हा या अग्रशाळांना नवे हॉल जोडण्यात आले त्याचा उपयोग मंगल कार्यालये म्हणून करण्यात येतो "

"भाडं घेऊन ना ?"

"अर्थात् ! भाडं घेऊन. पण ते जुजबी असतं"

"भाडं घेऊन का असेना, शब्दशः देवाब्राह्मणाच्या साक्षीनं नवदांपत्याचं लग्न लागतं हा थोडा का फायदा आहे ? बरं, पण इथं मास्टर दीनानाथांचं घर होतं म्हणालास, ते केव्हा पडलं ?"

"पडलं ?" मी म्हटले "अरे पाडलं ! नुकतंच दोनतीन वर्षामागं ते पाडल्याशिवाय ही इमारत उभी राहिली काय ! घर तसं जुनं झालं होतं !"

"अरेरे ! फार वाईट गोष्ट झाली ! घर शाबूत ठेवून ही इमारत बांधायला हवी होती रे ! दीनानाथांचं घर, लताचं घर हे महाराष्ट्राचं राष्ट्रीय स्मारक होतं, तुमच्या गोव्याचं नी या मंगेशी गावचं भूषण होतं"

"होय तुझ्याशी मी पूर्णपणे सहमत आहे पण आपण मंगेशाचे महाजन नाही की दीनाचे वंशज नाही !"

"म्हणजे काय ?"

"म्हणजे असे, की दीनाच्या वंशजाच्या संमतीनं महाजनमंडळीनं ते घर पाडलं आणि त्या मातीच्या घराची हुबेहुब प्रतिकृती ठरेल अशी पक्की वास्तू या इमारतीच्या पाठीमागे उभारण्यात आली आहे परत फिरताना दाखवीन ती"

पायऱ्या चढून आम्ही प्राकारात शिरलो तीन बाजूंना असलेल्या दुमजली अग्रशाळांच्या इमारतींनी भव्य प्राकार बंदिस्त केले होते. मध्ये मंगेशाचे मंदिर समोर खोलगट भागात तलाव मागच्या बाजूने गर्द झाडीने व्यापलेली टेकडी मंदिरासमोर देवालयाच्या उंचीपेक्षा कितीतरी

...... उंच असा दीपस्तंभ उजव्या बाजूच्या इमारतींत व्यवस्थापक मंडळाचे कार्यालय

"हे सारे पाहून-च्या" मी म्हणालो, "कारण गोव्यातल्या बहुसंख्य मंदिराचा थाट तुम्हाला असाच दिसेल गावात असूनही एकात स्थळीं स्थळ शब्दावरून आठवण झाली. देवस्थान, त्याचा प्राकार आणि आजूबाजूची पुजारी नी सेवेकरी यांची घरे मिळून बनलेल्या जागेला इथे स्थळ याच नावानं संबोधलं जातं. अन् देवस्थानला म्हटलं जातं संस्थान स्थळ नी संस्थान या दोन मराठी शब्दांना आम्ही गोवेकरानी अर्थाच्या दोन छटा जादा दिल्या आहेत"

माशेलमधल्या देवकीकृष्ण मंदिराप्रमाणेच मंगेश-मंदिराची बांधणीही अगदी अलीकडची आजचे हे मंदिर बांधून शंभरेक वर्षं झाली असतील. आजच्या मंदिराला तीन शिखरे दिसतात तशी कलशाकृति शिखरे पूर्वी नव्हती या मंदिराला जोडून सभामंडप मात्र नाही

...... हे गोव्यातील सर्वात संपन्न संस्थान सर्व गोमंतकात मिळून जवळ जवळ शंभर 'ठिकाणे' म्हणजे भातजमिनी वा नारळीच्या बागा या संस्थानच्या मालकीच्या आहेत यावरून या देवस्थानच्या संपन्नतेची कल्पना येईल. मूळचे हे देवस्थान सासष्टीतील कुशाळ गावचे हेच नव्हे तर बहुतेक प्रेक्षणीय देवस्थाने जी आज गोव्यात दिसतात तीं सर्व सासष्टी व तिसवाडी या दोन तालुक्यातली साडेचारशे वर्षांपूर्वी हे तालुके पोर्तुगीजानी घेतले व बाटवाबाटवीस सुरुवात केली तेव्हा इतर देवाप्रमाणेच *मंगेशही सर्व स्थावर* जंगम मालमत्ता सोडून देऊन अगदी निष्कांचन अवस्थेत इथे आला छोटीशी देवळी भक्तजनानी बांधून तिथेच पूजा-उपासना चालविली अखिल विश्वाच्या कल्याणाचा भार वाहणारा मंगेश-स्वरूपी महादेव कैलासाप्रमाणेच प्रियोळ गावातही सर्व वैभवाचा त्याग करून निरिच्छपणे एकाद्या तापसाप्रमाणे कायमचा राहिला असता पण दैवयोग वेगळा होता. देशोधडीला लागलेले मंगेशाचे आणि इतर देवस्थानाचे महाजन आता सुस्थिर झाले होते, संपन्न झाले होते, राजकारण-धुरंधर बनले होते

बाटवाबाटवीनंतर दीडदोन शतके उलटली होती महाराष्ट्रात

शिवाजी महाराजाचा उदय होऊन अस्तही झाला होता संभाजी, राजाराम काळाच्या पडद्याआड गेले होते. शाहू महाराज उत्तरेतून परतले होते नी सातार्‍याला राहू लागलं होतं. आणि त्याचे पेशवे म्हणून श्रीवर्धनचे बाळाजी विश्वनाथ भट कारभार पाहू लागले होते त्यानी स्वराज्याच्या सेवेत नवे सरदार, नवे मुत्सद्दी दाखल करून घेतले सावंतवाडी संस्थानातल्या आरवली गावचे रामचंद्र मल्हार सुखठणकर हे त्यापैकी एक बाळाजी विश्वनाथानंतर बाजीराव व नानासाहेब याच्या कारकीर्दीत रामचंद्रबाबाचे वजन खूपच वाढले नानासाहेबाचे सल्लागार म्हणूनही ते काम करू लागले

हे रामचंद्रबाबा कवळेच्या शांतादुर्गा देवीचे महाजन १७४६ साली ते देवदर्शनासाठी कवळयाला आले, तेव्हां आपल्या कुलदेवीला तर पेशव्याकडून त्यानी जमिनी तोडून देवविल्याच, पण शिवाय प्रियोळ येथे म्हाळसा व मंगेश यानाही जमिनी दिल्या. फोंडा तालुका अजूनही मराठ्याकडेच होता आणि मराठ्याचे माडलीक म्हणून तिथला कारभार सोंधेकर राजे सवाई इमडी सदाशिव राजेंद्र हे पाहात होते त्याच्याकडून पेशव्यानी या देवस्थानाना सनदा करून दिल्या आणि कित्येक ग्रामसंस्थांकडून वार्षिक देणग्याच्या रूपाने इनामे करून दिली

मंगेश, शांतादुर्गा, म्हाळसा, नागेश, रामनाथ अशी काही संपन्न देवस्थाने गोव्यात आहेत त्याची आर्थिक उर्जितावस्था सुरू झाली ती अशी त्यानंतर या देवस्थानानी भांडारात जमलेल्या रकमातून अनेक जमिनी विकत घेतल्या

श्री मंगेश देवस्थानच्या प्राकारात फिरत हा इतिहास मी पाहुण्याना सांगत होतो तो पुरा सांगून होण्यापूर्वीच देसाई म्हणाला, "अन्याच्वशा प्रसिद्ध देवस्थानाबद्दल आख्यायिका, दतकथा असतात या मंगेशाबद्दल अशा काही दतकथा आहेत ना ?"

"आहेत की!"

"एका दतकथेवर कुणीतरी नाटक लिहिलं आहे कुणी बर"

"विद्याधर गोखल्यानी' मी म्हणालो "जयजय गौरीशंकर हे नाव त्या नाटकाचं कैलासावर सारीपाट खेळताना पुनःपुन्हा पार्वती जिंकू

लागली म्हणून शंकराला राग आला तो डोक्यात राख घालून कैलास उतरला नी थेट गोमंतकाननात निघून गेला पुढे पार्वती भिल्लिणीचे सोंग घेऊन तिथे गेली शंकराने वाघाचे रूप घेऊन तिला भिवविले तेव्हा तिने घाबरून "त्राहि माम् गिरीश" असा महादेवाचा धावा केला व्याघ्ररूप सोडून शंकर प्रगट झाला गिरिजा आनंदित झाली. नेहमीच्या सवयी-प्रमाणे शंकराने विचारले, 'प्रिये, मी तुझ्या या रूपावर एकदम खूष झालो आहे हवा तो वर माग' गिरिजा म्हणाली, परमेश्वरा, तुझे भयानक व्याघ्ररूप पाहून मी खूप घाबरले नी 'त्राहि माम् गिरीश' हे शब्द माझ्या तोंडून निघून गेले. तेव्हा 'मांगिरीश' याच नावाने या ठिकाणी तू वस्ती कर शंकराने 'तथास्तु' म्हटले आणि गिरिजेलाही आपल्याजवळ राहवून घेतले"

दंतकथा सांगते की पार्वतीशोधार्थ गोमंतकाननात आलेला महादेव म्हणजे हा पूर्वीचा कुशाळीचा मंगेश आणि भिल्लिणीचे रूप घेऊन इथे कायम वस्ती करून राहिलेली पार्वती म्हणजे आजची कवळेची आणि पूर्वीची कुशाळ शेजारच्या केळोशीची शांतादुर्गा

"पण या दंतकथेला जुळणाऱ्या कांही खुणा आहेत का?" देसाईंने विचारले.

"कसल्या खुणा!"

"म्हणजे या देवस्थानात वाघ या प्राण्याला काही महत्त्व आहे का? त्याची एकादी मूर्तीबिर्ती? किंवा शांतादुर्गेच्या देवालयांत भिल्लिणीची आठवण येणारी एकादी खूण! शांतादुर्गेचे स्वरूप तरी भिल्लिणीसारखे आहे का?"

"छे छे. कवळयाला जाऊ तेव्हा पाहालच तुम्ही लोक. भिल्लिणीशी नाते सांगणारी तशी कोणतीच खूण नाही तिथे मंगेशाबद्दल म्हणाल तर इथेही वाघाबिघाला कांही महत्त्व नाही असलेच तर थोडे सिंहाला आहे. मुंबईच्या डॉ. व्यं मं. कैकिणीच्या मते हा मंगेश म्हणजे हिंदूंचा देव नव्हेच. तो आहे बौद्ध. कुशाळला असतांना तो मांगिरीश नव्हता किंवा मंगेशही नव्हता त्याचे त्या वेळचे नांव होते मजुनाथ. आणि त्याचे म्हणणे

खरे आहे. कुष्ठाळची देवळे मोडल्यानंतर पोर्तुगीजानी त्या वेळी जी यादी केली होती, त्यांत मंगेशाचे नांव ' मंजीनात ' असे दिले आहे डॉ. कैकिणीच्या मते मंजुनाथ हे नांव बौद्ध मतातील बोधिसत्व मंजुश्री याचे आहे."

मंगेशाच्या भक्ताची अशी श्रद्धा आहे की, मंगेशलिंगावर महाभिषेक चालू असतांना सिंहनाद होतो. कोकणमहात्म्य नावाच्या ग्रंथांतही **अचाट करणी देवाची। पूजा काळीं चमत्काराची ॥ मोठी ध्वनी शिंगी नादाची । अभिषेक समयीं होतसे ॥** असा उल्लेख आहे.

गोव्यांतल्या कामाक्षासारख्या काही देवालयात असाच सिंहनाद होतो असे सांगतात.

पण मंगेशाबद्दलच्या आख्यायिका इथेच संपत नाहीत. भारतात महादेव मंदिराबाबत जी एक ठराविक आख्यायिका सांगितली जाते ती इथेही प्रचलित आहे गिरिजेला वर देऊन मंगेश गोमंतकाननांत राहिला. पण तो इथे राहिला हे लोकाना कळणार कसे ? ते कळले ते एका गावडा जातीच्या गुराख्याकडून सारस्वतांची जी कुळे परशुरामाने यज्ञकार्यार्थ गोव्यांत आणली त्यांत वत्स व कौंडिण्य गोत्री ब्राह्मणांना कुशस्थळी ( कुष्ठाळ ) हा गांव अग्रहार मिळाला. हे ब्राह्मण तिथे राहू लागले त्यांच्यापैकी कौंडिण्यगोत्री शिवशर्मा हा एक ब्राह्मण होता. त्याच्या घरच्या गायी चारायला एक गावडा होता हाही त्या ब्राह्मण घराण्याबरोबर त्रिहोत्र गौड किंवा आणखी कुठल्या तरी सारस्वतांच्या मूळ वसतीस्थानांतूनच इथे आला होता म्हणे. शिवशर्म्याची गुरे घेऊन तो रानात जाई. तिथे एक गाय ठराविक ठिकाणी पान्हा सोडी गावड्याने ही गोष्ट मालकाच्या लक्षांत आणून दिली. मालक शिवशर्मा रानात गेला आणि त्याने ती ठराविक जागा खोदून पाहिली. पाहातो तर शिवलिंग. शिवशर्मा मग त्या लिंगाची उपासना करूं लागला. त्या उपासनेच्या योगाने तो लवकरच वैभवसंपन्न बनला. हे लिंग म्हणजेच मंगेश. आज मंगेशीच्या प्राकारात या शिवशर्म्याचे एक छोटे मंदिर उभे आहे, आणि ज्या गावड्याला मूळ लिंगाची जागा दिसली त्या गावड्याचे मूळकेश्वर मंदिरही खडे आहे आजही ठराविक तिथीला एकाद्या गावड्यास भरपूर भोजन

वाढून त्याला तृप्त करण्याची प्रथा मंगेशाच्या महाजनात रूढ आहे
कौंडिण्यगोत्री महाजनांचा मूळ पुरुष शिवशर्मा याचा त्याला देव-स्वरूप देऊन गौरव करण्यात आला तसाच गौरव, पण वेगळ्या प्रकारे, वत्सगोत्री महाजनाचा पण करण्यात येतो. १५६० साली कुठ्ठाळीहून मंगेशाचे लिंग एका मेण्यामध्ये घालून आजच्या जागी आणले ते वत्स गोत्री महाजनानी म्हणून दरवर्षी कार्तिक शुद्ध त्रयोदशी दिवशी देवाची पालखी तळीपर्यंत खांद्यावरून नेण्या आणण्याचा बहुमान वत्सगोत्री महाजनाना देण्यात येतो. मूळ पुरुष शिवशर्म्याला देवालयाच्या समोर उजव्या हाताला व ज्या गावड्याने कुठ्ठाळीला लिंगाची जागा दाखवली त्या मूळकेश्वराला देवालयाच्या मागे स्वतंत्र स्थाने दिली आहेत.

मंदिराबाहेर प्राकारात पादत्राणे काढून ठेवून देवालयाच्या पायऱ्या चढता चढता मी म्हटले, "आपण आधी धूळभेट घेऊ. खरं म्हणजे 'स्थळां'त प्रवेश करताच धूळभेट घ्यायला हवी होती"

"धूळभेट ? हा काय प्रकार आहे !" सौ देसाईंनी विचारले.

"धूळभेट म्हणजे धुळीच्या पावलानी देवदर्शन करणे. भारतात अनेक ठिकाणी तुम्ही पाहिलं असेल, देवस्थानांत शिरायच्या आधी हातपाय धुवावे लागतात केरळ आणि कर्नाटकात तर सर्व कपडे उतरून लुंगी नेसावी लागते काही ठिकाणी स्नान केल्यानंतरच देवालयांत प्रवेश मिळतो. गोव्यात अशी पद्धत नाही अन् जी आहे ती उलटी माणूस देवदर्शनासाठी आला की हातपाय न धुता धूळभरल्या पावलांनी त्याने प्रथम देवदर्शन घेतले पाहिजे याला म्हणतात धूळभेट प्रथमभेट म्हणाना ही ! कारण मग सावकाशीने स्नान करून देवदर्शन घेतात, तासन्तास मंदिरात घालवतात पण आपण यात्रेकरू. आपण धूळभेट घेतली म्हणजे पुरे यात्रेकरूंनी केव्हांही यावं, धूळभेट घ्यावी नी चालू लागावं"

"केव्हांही यावं ? म्हणजे इथली मंदिरं दुपारच्या किंवा रात्रीच्या वेळी बंद नसतात का ? दक्षिणेत तर सर्वत्र काही ठराविक वेळातच मंदिर उघडतात असं ऐकलं होतं आम्ही"

"दक्षिणेत म्हणजे गोव्यात नव्हेत बंद असतात ती द्राविड देशातली मंदिरे परवाच आम्ही दक्षिणेचा प्रवास करून आलो अनुभव असा की,

दुपारी १ ते ४ सारी देवालयं बंद. गुजरातेत डाकोरेनाथाचं मंदिर पाहायला गेलो होतो. देव स्नानासाठी गेले म्हणून सकाळी १० वाजतांच मंदिराचे दरवाजे बंद. गोव्यात ही प्रथा नाही. इथले देव भक्तांसाठी तिष्ठत चोवीस तास उभे असतात. पहाटे चौघडावादनापूर्वी देवालय उघडते ते रात्रौ १० वाजता बंद होते. ते सुद्धा भक्तमंडळी रात्रौ येत नाही म्हणून. उत्सवाच्या दिवसात तर सारी रात्र देवमंदिरे उघडी."

सोंडियाँ ( मुखमंडप ) ओलांडून आम्ही चौकावर ( महामंडप ) प्रवेश केला. अंतराळापर्यंत गेलो. तिथे गर्भागाराच्या दरवाजाबाहेर ग्रामपुरुष देवशर्म्यांची पाषाणी मूर्ती पाहिली. निर्माल्यविसर्जन करून अभिषेकी लिंगाला चांदीच्या अभिषेकपात्रातून अभिषेक घालीत होते. लघुरुद्राची आवर्तने चालू होती. चौकावर भक्तमंडळी अत्यंत शिस्तीने बसली होती. काहींचे पोथीवाचन चालू होते, तर काहींजण फक्त हात जोडून बसले होते. काहींजण, विशेषत: बायकामंडळी प्रदक्षिणा घालीत होत्या. गर्दी बरीच होती; परंतु त्या भव्य भोगमंडपात रुद्रमंत्राच्या घोषाशिवाय दुसरा आवाज नव्हता.

या वातावरणाचा पाहुण्याच्या मनावर फार परिणाम झालेला दिसला. देवदर्शन घेऊन आम्हीही स्तब्धपणे चौकावर थोडा वेळ बसून राहिलो. देसाईदंपती चौकाच्या छतावर टांगलेली प्रचंड हंड्या-झुंबरे, चांदीची द्वारपट्टिका, भिंतींचा चकचकीत तेलिया रंग, तकतकीत फरशी, गुळगुळीत जाडजूड खांब, महाजनांच्या बायकांनी देवाला अर्पण केलेली व स्वतःचे नाव ठळकपणाने विणलेले भरतकामाचे नमुने, गर्भागारात तेवणाऱ्या नंदादीपाच्या माळांच्या माळा या सगळ्या गोष्टी कुतूहलाने पाहात होत्या.

'चला आता' बराच वेळ भारावल्या अवस्थेत बसून राहिलेल्या पाहुण्यांना मी म्हटले, "मास्टर दीनानाथांचं, पण त्यांनी न पाहिलेलं घर बघून पुढं जायचंय."

मंडळी उठली आणि मागे पाहात पाहात बाहेर पडली.

देवळाच्या डाव्या अंगाला आणि नव्या अग्रशाळेच्या मागे उभ्या केलेल्या दिनांच्या हमी दुमजली छोट्या घरात शिरलो. घरासारखं घर. "महाराष्ट्राचे प्रख्यात गायकनट दीनानाथ इथे या खोलीत जन्माला आले,

या इथे ते गोट्यानी खेळत, त्या खोलीत झोपत   असे सागणारा गाईड कुणीही नव्हता मलाही या गोष्टी माहीत नव्हत्या त्या घराला प्रदक्षिणा घालून प्राकाराबाहेर पडलो देसाईचा चेहरा गंभीर होता तो काहीही बोलत नव्हता ।

# ७ . त्रिकाळावती म्हाळसा–मोहिनी

मगेशाचे दर्शन घेण्यासाठी गेलेला प्रवासी म्हाडदोळला गेल्याशिवाय राहात नाही एक तर मंगेशीहून म्हाडदोळ जेमतेम अर्धाएक किलोमिटर अंतरावर आहे किंबहुना ही दोन्ही ‘स्थळे एकाच प्रियोळ गावात आहेत आणि दुसरे म्हणजे मंगेशमंदिराहून म्हाळसामंदिर वेगळ्या स्वरूपाचे आहे. तिसरी गोष्ट, मगेश जितका महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे, तितकीच म्हाडदोळची म्हाळसाही आहे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे गोव्यातील या म्हाळसेचे माहेर महाराष्ट्रात आहे महाराष्ट्रातून अकराव्या शतकाच्या सुमारास ती गोव्यात आली असावी असा ग ह खरे, रा चिं ढेरेंसारख्या तज्ञाचा तर्क आहे सारस्वतानी गोव्यात आणलेल्या दैवताच्या यादीत म्हाळसा हे नाव सह्याद्री–खंडातर्गत स्कदपुराणात आढळत असले तरी ही देवी इतर देवताप्रमाणे तिरहून किंवा गौड किंवा इतर कुठल्या तरी देशाहून—जिथून सारस्वत गोव्यात आले तिथून आली असे मात्र स्कंदपुराण सागत नाही

आज म्हाडदोळ गावात असलेली म्हाळसा ही पोर्तुगीजपूर्व काळात साष्टींतील वेरणे गावात होती तिथे ती कशी प्रगट झाली याबद्दची माहिती स्कंदपुराणाच्या आधारे कोकणाख्यान या ग्रथात सांगितली आहे ती अशी—

> दुसरा ग्राम वेरणे जाण । श्रीम्हाळसेचें आद्यस्थान ।
> तेथींचें अपार महिमान । आहे जनप्रसिद्ध ॥

देवादानवा समुद्रमथनी । पीयूष दुध दिधलें वाटोनी ।
भक्तजनाच्या सभाळा लागोनी । प्रयाण केले साषष्टी ।।
दिव्य तेज प्रकाशलें फार । पर्वतमस्तकी हाणितलें नुपुर ।
सरोवर निर्मिलें महाथोर । रहिवास मदिर वेरणें ।।
गायी चारिता गोवळी देखिले । पाणी पाहोनी श्रुत केलें ।
तें महाजनी परिसले । सत्वर आले त्या स्थाना ।।
चौदा शतें महाजन । श्रुत होता आले धावोन ।
अद्‌भुत चमत्कार देखोन । लोटागणें घातली ।।
मग आज्ञापिती महाजन । टाकिया आवरिले पाषाण ।
औट घटिकामाजी जाण । दिव्य प्रतिमा निघाली ।।
औट घटिका सरता । आणि घावो टाकीसी लागता ।
दुग्ध रक्त अवचिना । धारा पै लागल्या ।।
ऐसा देखोनी चमत्कार । रहिवास केला क्षेत्रामाजार ।
अपार उर्जा निरतर । महोत्साह पै तेथें ।।

पूर्वी वेरणे गावात तलाव वा सरोवर नव्हते ते म्हाळसेने आपल्या मायेने निर्माण केले गायी चारायला गेला असताना एका 'गोवळ्या'ने तें देखिले आणि आपल्या मालकाला श्रुत केले. पुढे देवी त्या सरोवरात आल्याचा त्याला साक्षात्कार झाला चौदा शतें महाजन जमले तलावातील पाषाण बाहेर काढू लागले एका पाषाणाला कुदळीचा घाव लागला तेव्हा दूध व रक्त निघाले मग हीच म्हाळसा असे समजून त्याची मूर्ती घडविली म्हादडोळला दिसते ती हीच म्हाळसा नारायणी.

तीन कमानींच्या भव्य प्रवेशद्वारातून प्राकारात प्रवेश केला तेव्हा देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीचे अध्यक्ष श्री कामत भेटले त्यानीच आग्रह करून आम्हाला कमिटीच्या कार्यालयात नेले चहा पाजला तिथेच बसून आता आमच्या गप्पा चालल्या होत्या

स्कंदपुराणातील म्हाळसेच्या आगमनाची कथा मी सागितल्यावर कामत म्हणाले, " पण जी मूर्ती वेरणे गावी होती ती मात्र नाटवानाटवीच्या

काळात तिथेच टाकून देण्यात आली इथे स्थलातर झाल्यावर दुसरी मूर्ती बनविण्यात आली तिचीही एक वेगळी दंतकथा आहे असे सागतात की, म्हाळसेची मूर्ती बनवण्यासाठी एक शालिग्राम शिला आणली मूर्तिकार तिची मूर्ती घडवायला बसला. देवीच्या दृष्टांतानुसार ती एकवीस दिवसाच्या आत घडवायची होती पण तेवढ्या मुदतीत मूर्तीचा फक्त ओबडधोबड आकार घडविला होता फिनिशिंग टचेस अजून व्हायचेच होते एकवीस दिवस उलटून गेले होते

" बाविसाव्या दिवशी तो कामाला बसला मूर्तीच्या उजव्या डोळ्या-जवळ कपाळाच्या भागी त्याने छिन्नीचा प्रहार केला आणि काय आश्चर्य ? दगडाचा तुकडा निघाला आणि त्या जागेतून रक्त वाहायला लागले " मी यात आहे " असा ध्वनी उमटला मूर्तिकार तिथल्या तिथे बेशुद्ध पडला नी लगेच त्याच्या कुडीतून प्राण निघून गेला

" हीच ओबडधोबड मूर्ती आज गाभाऱ्यात उभी आहे. तिच्या कपाळाच्या उजव्या बाजूचा तुकडा उडालेला आहे ज्या मूर्तिकाराने देवता घडविताना प्राणार्पण केले त्याला देवतेसमोर एका कोनाड्यात स्थान दिले आहे वर्षातून एकदा त्याला नैवेद्य दाखविण्यात येतो '

कामतनी देवस्थानाबद्दल आणखीही काही दंतकथा सांगितल्या त्या ऐकल्या आणि आम्ही उठलो देवस्थान पाहून व देवदर्शन घेऊन पुढे पळायचे होते

इथे मंदिराला लागून सभामडप आहे प्राकाराचे महाद्वार व सभामडप याच्यामध्ये एक ताऱ्याचा तरळसोट असा गरुडस्तंभ आहे आणि त्याच्या उजव्या बाजूस ( म्हणजे देवालयाच्या डाव्या ) सात मजली दीपस्तभ आहे आणि अगदी अलीकडे सात मजल्याची व पन्नास फुटाची एक प्रचंड पितळी समई गरुडस्तभाला लागूनच उभारली आहे अक्षरशः तेलवाती घालून ती उत्सवाच्यावेळी प्रज्वलित केली जाते. मंदिराच्या उजव्या-डाव्या बाजूंस अग्रशाळा आहेत आणि त्यातली एक तर हल्लीच बांधली आहे त्यांतील एका हॉलचा मंगलकार्यालय म्हणून उपयोग होतो लग्नाकार्यांसाठी गोव्यात अगदी मध्यवर्ती जागा—पणजी—मडगांवच्या रस्त्यावर हे मंगलकार्यालय असल्यामुळे गरजू मंडळी त्याचा खूप फायदा घेतात

म्हाळसा मंदिराला जुना सभामंडप आहे आर सी सी चा शोध लागण्यापूर्वी कित्येक वर्षें बांधलेला नाहीत कमानी की नाहीत गॅलऱ्या साध्या वाटोळ्या दगडी खांबावर लाकडी तुळया टाकून कौलांनी आच्छादलेला. पक्क्या रंगमंचाचा अभाव असल्यामुळे नाटकाच्या वेळी फळ्यांचे स्टेज उभारावे लागते. तसा सभामंडप आहे भरपूर मोठा

सभामंडप जुना असला तरी पुराणा नाही पुराणे आहे ते मंदिर. मंदिराबाहेर फेरफटका केला तर तज्ज्ञालाच नव्हे तर अज्ञालाही हे कळते १५६० मध्ये वेरण्याहून म्हाळसा इथे आली तेव्हाच हे देऊळ बांधल्याचे सांगतात. म्हणजे चारशे वर्षांची जुनी ही वास्तू असावी याच्याच आगेमागे बांधलेल्या दुसऱ्या इमारती आहेत त्या जुन्या गोव्यांतली चर्चें. त्यापूर्वी सुमारे शंभर वर्षें बांधलेला पणजीचा आदिलशहाचा राजवाडा अन् त्याही पूर्वीचे शेदीडशे वर्षांचे जुने तांबडी सुर्लेचे हेमाडपंती महादेवमंदिर

म्हाळसा-मंदिराचे बांधकाम जुन्या काळातल्याप्रमाणे लाकडी आहे मुखमंडप, भोगमंडप, अर्धमंडप सर्वांच्या बाह्य भिंतीत कोरीव लाकडी उभे खुंट आहेत. भोगमंडपात फार सुरेख कोरीव काम केलेले लाकडी खांब आहेत त्यांनीच मंदिराच्या छपराचा व छताचा भार पेललेला आहे खांब व छत यांच्यामधील पट्टिकेत विष्णूचे दशावतार व देवीच्या विविध रूपांची पॅनेल्स कोरली आहेत द्वारपट्टिकांवरही कोरीव काम केले आहे छतावर वेलबुट्टी कोरलेली आहे मंदिराचे जोते उंच आहे आणि जोते व खिडक्यांमध्ये एकेक चौरस फुटाची लाकडी पॅनेल्स भिंतीशी ९० अंशाचा कोन करून बसविली असून त्यांच्यावरही कोरीव काम केलेले आहे हे कोरीव काम डेकोरेटिव नसून प्राणी व मनुष्य यांच्या आकृती त्यात कोरलेल्या आहेत मात्र ती स्थिरचित्रे नाहीत, प्रसंगचित्रे आहेत बाहेरचे हे कोरीव काम पूर्वी कदाचित सुबक असेल, पण उन्हापावसाच्या शतकांच्या माऱ्यामुळे आज त्यातला सुबकपणा गेला आहे आणि आऊटलाईन तेवढी शिल्लक आहे. त्या मानाने आतले कोरीव काम चांगल्या स्थितीत आहे जास्तीत जास्त भरगच्च लाकडी कोरीवकाम केलेले गोव्यातले हे एकमेव देवालय होय

देवीचे दर्शन घेऊन चौकावर बसलो काही वेळ स्तब्धतेत गेला नी देसाई एकदम म्हणाला, " काय रे, या देवीच्या मूळ स्वरूपाबद्दल सांग

की काहीतरी. ही शिवपत्नी उमा आहे की विष्णुपत्नी रमा आहे? अन् या म्हाळसेचा आमच्या तिकडल्या म्हाळसेशी म्हणजे खंडोबाच्या बायकोशी संबंध काय? ''

"तुम्हाला काय सांगावं याचाच विचार करत होतो मी या म्हाळसेच्या तीन कळा असल्याची आम्हा गोंयकारात प्रसिद्धी आहे.. ''

"तीन कळा? म्हणजे काय?

"तीन कळा म्हणजे तीन रूपे सकाळी, दुपारी नी रात्री या म्हाळसा-मोहिनीची तीन वेगवेगळी रूपे दिसतात म्हणे म्हणूनच प्रत्येक वेळी एकाच विषयाबद्दल वेगवेगळे बोलणाऱ्या वा कृती करणाऱ्या माणसाचे वर्णन करताना 'म्हाळसेच्या कळाप्रमाणे' असे उपमान वापरण्याची पद्धत आहे आमच्याकडे या तीन कळा कशा याचा काही मला उलगडा होत नव्हता. पण या ठिकाणी बसल्या बसल्या जी उपपत्ती मला सुचली ती तुला पटते का बघ

"म्हाळसा म्हणजे विष्णुपत्नी लक्ष्मी आहे का असं नू विचारलंस त्याचं उत्तर निश्चितपणे नाही असे आहे ती विष्णुपत्नी तर नाहीच, पण खुद्द विष्णूच आहे विष्णूने समुद्रमंथनाच्या वेळी घेतलेलं मोहिनीरूप म्हणजे ही म्हाळसा म्हणूनच ती नारायणी मार्कंडेय पुराणात म्हाळसेची ही कथा आली आहे ती अशी —

"देवदैत्यानी क्षीरसमुद्र घुसळून अमृत वर काढले तेव्हा अमृताच्या प्राप्तीसाठी देवदैत्यात युद्ध जुंपले अशा वेळी देवानाच अमृताचा लाभ व्हावा म्हणून विष्णूने स्त्रीरूप घेतले हीच मोहिनी या परमसुंदर स्त्रीला पाहून दैत्य पाघळले मोहिनीने मग अमृत वाटण्यासाठी देवदैत्याच्या दोन पंक्ती केल्या देवाच्या पानावर अमृत वाढायचे व दैत्याच्या तोंडाना पाने पुसायची असा तिचा बेत होता हे कपट ओळखून राहूने आपली जागा बदलून तो देवाच्या पंक्तीत बसला मोहिनीने त्याच्या पानावर अमृताची धार सोडली तेवढ्यात चंद्रसूर्यांनी चुगली केली देवाच्या पंक्तीत राहू आहे हे मोहिनीने ओळखले नी कानातले कुंडलरूप चक्र काढून राहूची कठनाळ चिरली. त्याचे मस्तक खाली पडले आणि धड जे एकदम उडाले ते मराठ-वाड्यातल्या नेवासे गावातल्या म्हाळसा—डोंगरावर पडले मोहिनीने तिथ-

पर्यंत त्याचा पाठलाग केला नी त्याच्या पोटात गेलेला अमृताचा थेंब आपला आंगठा पोटावर दाबून बाहेर काढला मोहिनी मग तिथेच राहिली म्हाळसा-डोंगरावरून तिचे नांव म्हाळसा पडले इतिहाससंशोधक ढेरे म्हणतात की, म्हाळ म्हणजे माळ माळावरील देवता म्हणून म्हाळसा. ज्या नेवाशात म्हाळसेचे मंदिर आहे त्याच मंदिरात श्री ज्ञानेश्वरांनी गीतेवर भाष्य केले ज्ञानेश्वर आपल्या समारोपात सांगतात

त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।
जेथ जगाचे जीवनसूत्र । श्री महालया असे ।।

"म्हाळसेचेच दुसरे नाव महालया पुराणकालापासून नेवाशाचे म्हाळसेचे स्थान पूज्य समजण्यात येते, पण मराठी साहित्याचे पहिले लेणे तिथे घडविले गेले म्हणूनही नेवाशाचे माहात्म्य महाराष्ट्रात खूप आहे विष्णुरूप मोहिनीचे दुसरे प्रसिद्ध स्थान म्हणजे ही म्हाडदोळची म्हाळसा

या म्हाळसेचे ध्यान पाहा. तिच्या उजव्या मागच्या हातात त्रिशूळ, डाव्या मागच्या हातात अमृतकुंभ, डाव्या पुढल्या हातात राहूचे रक्त गळत असलेले शीर, गळणारे रक्त चाटणारा वाघ, पायाखाली दाबून धरलेले राहूचे धड असे हे म्हाळसेचे ध्यान आहे गोव्यातल्या या म्हाळसेच्या पायाखाली असलेल्या राहूला शीर पण आहे हे शीर खरे म्हणजे असायला नको पण ती मूर्तिकाराची चूक असावी."

"पण या म्हाडदोळ-म्हाळसेने आपल्या उजव्या पुढल्या हातात एका राक्षसाला केस पकडून धरला आहे त्याचे स्पष्टीकरण नाही दिलेस नू" देसाई म्हणाला

"त्यासाठी आणखी एक कथा सांगावी लागेल एकदा महादेवाला विष्णूचे मोहिनीरूप पाहायची पुन्हा इच्छा झाली, तेव्हा विष्णूने ते रूप घेतले या मोहिनीला पाहून विरोचन नावाचा राक्षस इतका मोहीत झाला की, त्याने तिला लग्नाची मागणी घातली मोहिनीने ती स्वीकारली लग्न झाल्यावर एक दिवस विरोचनाच्या डोक्याला तेल लावण्याचे निमित्त करून तिने त्याच्या डोक्यावरचा मुकुट काढला व त्याच्या केसांना धरून डोक्यावर मुष्टिप्रहार केला विरोचन मरून पडला या म्हाळसेच्या उजव्या हातात

दिसतो तो विरोचन राक्षस

"म्हाळसेचे आणखी एक रूप म्हणजे मल्हारी मार्तंडाची पत्नी हे. मल्हार या नावातही मलै म्हणजे माळ हा कानडी शब्द आहेच. या अर्थाने या दोन्ही देवता म्हणजे माळावरच्या देवता, ग्रामदेवता होत या खंडोबा किंवा मल्हार किंवा कानडी मैलार–पत्नीची मंदिरे महाराष्ट्र–कर्नाटकात अनेक ठिकाणी आहेत म्हाडदोळ–म्हाळसा म्हणजेच महाराष्ट्र–कर्नाटकातली मल्हारपत्नी असे म्हणायला आणखी एक पुरावा आहे तो म्हणजे इथल्या परिवार दैवतात मल्हार नांवाचे एक दैवत आहे कसेही असो, ही देवता महाराष्ट्रातून इथे आली हे निश्चित म्हणूनच हिचे माहेर महाराष्ट्रात असून तिची तीन रूपे आहेत असं मी म्हटलं"

या म्हाळसा मंदिराशी निगडित असलेल्या दोन विलक्षण गोष्टी सांगितल्याशिवाय म्हाळसामहात्म्य पूर्ण होणार नाही कोणत्याही कार्याला आपल्या कुलदेवाचा कौल घेण्याची गोव्यात प्रथा आहे काही विशिष्ट झाडाच्या पानाचे तुकडे किंवा फुलाच्या पाकळ्या किंवा तांदुळाचे दाणे पाण्यात बुडवून देवमूर्तीला ठराविक ठिकाणी लावायचे आणि भटजींनी देवाला प्रश्न विचारायचा या प्रश्नाला देव अनेक प्रकारांनी उत्तर देतो ते दाणे वा पाने वा फुले खाली टाकून त्या त्या ठिकाणचे दाणे खाली पडले म्हणजे त्याचा ठराविक अर्थ होतो या कौलाची देवमूर्तीशी बोलायची एक ठराविक भाषाच आहे म्हणा ना! या कौलाला गोव्यात 'प्रसाद' या नावाने संबोधले जाते ही प्रथा दोनअडीच हजार वर्षांपूर्वी ग्रीस देशात होती, बाबिलोनियात होती

म्हाळसा मंदिरात परिवार देवतेपैकी दाड देवतेस असे प्रसाद लावून कौल घेतात साधारणतः हे प्रसाद घेण्याची वेळ दिवसा असते परंतु म्हाळसा मंदिरात पहाटे ४ ते सूर्योदयापर्यंत प्रत्यक्ष म्हाळसामूर्तीस तुळशी–मंजिऱ्या लावून प्रसाद घेतले जातात. मात्र कोणत्याही परिस्थितीत प्रसाद सूर्योदयापूर्वी संपवलेच पाहिजेत या प्रसादात देवीला फक्त एकच प्रश्न विचारायचा असतो "होय की नाही?" म्हणजे अमुक काम करण्यास देवीची संमती आहे की नाही? बस्स

दुसरी एक विलक्षण प्रथा "प्रमाण होण्याची" प्रमाण होणे म्हणजे

चौकामधील घंटेखाली उभे राहून प्रतिज्ञापूर्वक सत्य सांगणे कोणावर चोरीचहाडीचा वा दुसरा कसलाही आरोप असला नी त्याने प्रतिज्ञापूर्वक आपण गुन्हा केला नसल्याचे म्हाळसामंदिरात सांगितले तर ते खरे मानले जाते ही प्रथा पोर्तुगीज न्यायखात्यानेही मान्य केली होती न्यायमूर्ती, वकिलापासून पट्टेवाल्यापर्यंत कोर्टातली मंडळी म्हाळसेच्या चौकात हजर राहून आरोपीकडून 'प्रमाण करीत,' व आपण बेगुनाह असल्याचे त्याने सांगितले तर त्याला सोडून देत खोटी शपथ घेतली तर देवीच त्याला शिक्षा करील अशी या 'प्रतिज्ञोत्तर-पद्धती'मागे भावना असे

म्हाळसा--मंदिरातले उत्सव गोव्यातल्या इतर मंदिरासारखेच असले तरी इथले दोनतीन उत्सव गोव्यात गाजलेले आहेत म्हाडदोळची जत्रा एकेकाळी जुगारासाठी प्रसिद्ध होती गोव्यातल्या जत्रांतून खाजगीरीत्या बेकायदा पत्त्यांचा जुगार चाले हा जुगार अलीकडे बंद झाला आहे दुसरा उत्सव 'जायाच्या पूजे'चा म्हाडदोळ हे फुलाची मोठ्या प्रमाणावर पैदास करणारे एकुलते एक गाव जाईची फुले तर म्हाडदोळशिवाय कुठे दिसायचीच नाहीत या जाई बहरल्या म्हणजे एक दिवस इथे देवीची 'जाई--पूजा' होते त्या दिवशी म्हाडदोळच्या जाईचे गजरे गावाबाहेर जात नाहीत गावात फुलणारी जाईची प्रत्येक कळी मंदिर व मूर्ती शृंगारण्यासाठी वापरली जाते मंदिर नी प्राकार जाईच्या मंद गंधाने भरून जाते

तिसरा खास उत्सव कोजागिरीचा या दिवशी म्हणजे रात्री देवीची अंबारीवाहनातून मिरवणूक निघते रात्रौ एकाद्या नामांकित गवयाचे गाणे होते हा उत्सव अगदी अलीकडे गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांनी सुरू केला बांदोडकर हे म्हाळसेचे एक निस्सीम उपासक होते देवीवर त्यांची परम श्रद्धा सकाळी यथासांग देवांची पूजा केल्याशिवाय ते घराबाहेर कधी पडले नाहीत देवीच्या वरदहस्तामुळे आपणास यश मिळत गेले असा त्यांचा विश्वास असे

"अन् या म्हाळसा-मंदिरातून बाहेर पडण्यापूर्वी तुला शेवटचं सांगतो" मी काहीतरी खूप महत्त्वाचे सांगतो आहे अशा सुरात म्हणालो, "आम्हीसुद्धा गोंयकर आहो असं तू सकाळी म्हणालास ना, ते बरोबर आहे बहुतेक सर्व कऱ्हाडे हे गोवेकरच आहेत. सारस्वतांप्रमाणेच कऱ्हाडेसुद्धा

उत्तर भारतातूनच गोव्याला आले. दुर्गादेवीच्या दुष्काळात त कऱ्हाडहून गोव्याला आले म्हणून त्याना कऱ्हाडे हे नाव पडले असा समज होता पण मला वाटते तो चुकीचा आहे कऱ्हाडच्या शिलाहारानी त्याचे ब्राह्मणत्व मान्य केले म्हणून त्यास कऱ्हाडे नाव पडले असे पी के. गोडे यांचे मत आहे. तुमचे कुलदैवत म्हणून तुम्ही कुणाला भजता आहात?''

"कोल्हापूरच्या अंबाबाईला'' देसाई म्हणाला

"इतिहास काळात गोवा सोडून तुम्ही कोल्हापूरकडे गेलात म्हणून तुम्ही अंबाबाई ही कुलदेवी म्हणून स्वीकारली पण तुमचे खरे नी मूळ कुलदैवत म्हणजे ही म्हाडदोळची म्हाळसा वेरण्याहून म्हाळसा इथे आली तेव्हा तुम्हा देसाईंच्या घराण्याने खूप परिश्रम घेऊन जागेपासून मंदिर-उभारणीपर्यंत मदत केली म्हणून देसाई घराणे इथे पहिल्या मानाचे समजले जाते ''

"म्हणजे आम्ही इथले महाजन का? "

"होय. तुम्ही खऱ्या अर्थाने महाजनच पण पोर्तुगीज सरकारने देवस्थानकायदा करून प्रत्येक देवस्थान सरकारात रजिस्टर केले तेव्हा गोव्याबाहेरच्या महाजनाची नावे महाजनमंडळाच्या यादीतून वगळली, इतकेच नव्हे तर गोव्यातल्या सारस्वतेतर जातींचीही वगळली अन् दुर्दैवाने ही कारवाई सारस्वत महजनानी केली म्हणून तुमचं नाव आज महाजन-मंडळाच्या यादीत नाही ''

"हे सार खरं का भावजी? आमची कुलदेवी ही म्हाळसा?'' सौ देसाईनी विचारले

"होय वहिनी एवढीसुद्धा शंका नाही तुम्हाला पुरावाच पाहिजे असेल तर कमिटी-कार्यालयात जाऊ तिथे खात्री करून देतो तुमची ''

सौ देसाई पटकन् उठल्या आणि पुन्हा एकदा त्यानी अत्यंत विनम्र भावाने म्हाळसेला नमस्कार केला देवकीकृष्णाच्या मंदिरासमोर उभे राहून हात जोडताना जो भक्तिभाव आमच्या सौ. च्या चेहऱ्यावर दिसला होता तोच भक्तिभाव आता सौ. देसाईंच्या डोळ्यात प्रगटला होता.

मंदिराबाहेर पडून पुन्हा एकदा कमिटी-कार्यालयात प्रवेश केला कमाविसदार कामत बसलेले होते त्याना मी म्हटले, "कामतसाहेब,

म्हाळसा देवस्थानचं सरकारी रजिस्ट्रेशनचं पुस्तक जरा दाखवाल का?"

"का नाही? हे जुनं दप्तर पाहायला येतो कोण? तुमच्यासारख्यांनी असा इंटरेस्ट दाखवला म्हणजे बरं वाटतं."

कामतनी शोधाशोध करून एक रजिस्टर काढले. त्यात सरकारने सुमारे ८०-९० वर्षांपूर्वी मंजूर केलेली नियमावली, पोर्तुगीज हस्ताक्षरात लिहिली होती. महाजनांच्या घराण्यांची नावे संपल्यावर कऱ्हाडे भजक-घराण्यांची यादी होती. मी ती यादी वाचू लागलो. "देसाई, धूपकर, प्रभुदेसाई, ढवले, जामेकर, बाक्रे, काळे, भाटवडेकर, देवभक्त, साष्टे, साधले, खाडेकर, महाजन, देव, शेवडे, रायकर."

मला सर्व यादी वाचू न देताच देसाई म्हणाला, "अरे, ही सारी महाराष्ट्रात कर्तबगारी गाजवलेल्या घराण्यांची नावे! किती आहेत ही?"

"एकूण पस्तीस आहेत. आणखीही असतील पण यादीत नाहीत."

"काय आश्चर्य आहे! या सगळ्या लोकांना माहीत असेल का की आपलं घराणं मूळ गोव्याचं असून आपली कुलदेवी ही म्हाळसा आहे?"

"काही कल्पना नाही बुवा. पण अनेक कऱ्हाडे आपलं मूळ विसरून गेले आहेत हे खरं. फार थोड्यांना त्याची जाणीव आहे, पण नक्की कुल-दैवताची माहिती नाही. उदाहरणार्थ नागपूरचे भाऊसाहेब माडखोलकर. ते सहा वर्षांपूर्वी एका व्याख्यानमालेनिमित्त गोव्यात आले. पण आपल्या कुलदेवीचा शोध घेणे हाही गोव्याला येण्यात त्यांचा एक उद्देश होता. माझ्याचकडे त्यांचा मुक्काम होता. मीच त्यांना घेऊन हिंडत होतो."

"त्यांची पण हीच कुलदेवी का?"

"नाही. त्यांची केरीची विजयदुर्गा. अकोल्याची आर्यादुर्गा, कव-ळेची शांतादुर्गा याही कऱ्हाड्यांच्या आणखी काही कुलदेवता आहेत."

आणि मग सौ. देसाईकडे वळून मी म्हटले, "आता झाली का खात्री वहिनी तुमची? तुमची मूळ कुलदेवी हीच ना?"

"हो, झाली खात्री."

कामत हा संवाद ऐकत होते. त्यांनी उत्साहाने म्हटले, "महाजनांनी कुलदेवतेच्या प्रथम भेटीत अभिषेक नैवेद्य करायचा असतो देवीला, बरं का देसाई."

सौ देसाईंनी पर्स उघडली नी दहा रुपयाच्या दोन नोटा कामताच्या हातात दिल्या

" छे छे एवढे नकोत "

' राहू द्या. राहिलेले देवाच्या भांडारात जमा करा "

कामत पावती लिहीत असताना मी म्हणालो, " कामत, जोडप्याने घेतलेल्या देवीच्या प्रथमभेटीच्या वेळची दुसरं पद्धत नाही सांगितलीत तुम्ही ! गाठवलाची पद्धत हो इथल्या बहुतेक देवस्थानात आहे ती "

कामत हंसू लागले

" गांठवल म्हणजे काय हो ? " सौ. देसाईंचा प्रश्न

" लग्नविधीत सप्तपदी होते तेव्हा नवऱ्याच्या शेल्यास नवरीच्या पदराची गाठ बांधायची पद्धत आहे ना ? तसाच एक समारंभ, लग्न झाल्यावर जोडप्याने कुलदैवताची पहिली भेट घेतेवेळी करायचा असतो गाठवल म्हणतात त्याला मग करायचा का हा विधी वहिनी ? "

" इश्श " एवढाच उद्गार सौ. देसाईंनी काढला.

पण देसाई म्हणाला " अग त्यात लाजायचं काय ? तिकडे मद्रास-कडे साठीच्या वेळी म्हणे मुलं-नातवंडं मिळून म्हातारा--म्हातारीचं पुन्हा लग्न लावतात लग्नाचे सर्व विधी यथासांग करून सर्व नातेवाईक अहेर-देखील करतात आपलं गाठवल सुद्धा असं साठीत बांधायला काय हरकत आहे ? पण ते आज नको पुढल्या वर्षी मुला--नातवंडांना घेऊन येऊ तेव्हा मोठी गमत होईल नाही ग ! "

कामत धरून सारेजण हंसू लागले

कामतनी मग आम्हाला प्राकारात हिंडवून आणले प्राकारात मागच्या बाजूला उपदैवताची देवळे विखुरली होती. डाव्या हाताच्या अग्रशाळेत पुजाऱ्याची बिऱ्हाडे होती उजव्या हाताला नवीनच बांधलेले अगदी कोरे करकरीत मंगलकार्यालय होते

या म्हाळसेच्या स्थळाचे आणखी एक वैशिष्ट्य हे की, इथे देवालया-समोर तलाव नाही, तो आहे देवालयाच्या मागे

सर्व प्राकार हिंडून दाखवल्याबद्दल कामताचे आभार मानून आम्ही रस्त्यावर आलो

६३०
ग्रं. क्र. २३८८७
भू. १९५२८३
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)



# ८ : दुर्गा खरी, पण वांकड्या मानेची

डॅट्सनमध्ये बसलो नी घड्याळात पाहिले साडेबारा वाजून गेले होते पोटात कावळ्याचे कुजबुजणे चालू होते. मी देसाईला म्हटले, " जेवून घेणार का ? "

देसाईने होकार दिला तेव्हा जवळच्या हॉटेलात गेलो आरामशीर बसून जेवण केले शेवटी बिल आले तेव्हा देसाईने खिशात हात घातला नी एकदम बिंचू डसल्यासारखा चेहरा केला

" काय झाले रे ! पाकीट गेल की काय ? " मी विचारले

" छे रे पाकीट शाबूत आहे नी पाकिटातली सारी चिल्लरही शाबूत आहे "

देसाईने खिशातून पाकीट काढून टेबलावर खाली केले दोन नी तीन पैशाच्या नाण्याची ही रास टेबलावर झाली

" कशासाठी आणली होतीस एवढी नाणी ? "

" भिकाऱ्याना वाटायला आमच्याकडल्याप्रमाणे इथल्या देवस्थाना-बाहेर भिकाऱ्याची रांग लागत असेल असं वाटलं होतं आम्हाला. "

" गोव्यात भिकारी नाहीत देसाई. अन् जे थोडेसे आहेत त्याना इथल्या गोवा लॉटरी चालवणाऱ्या सरकारी संस्थेकडून मासिक मदत मिळते ती अपुरी पडते म्हणून हे लोक पणजी, म्हापसेसारख्या शहरांतून आठवड्या-तून ठराविक एक दिवस भिक्षा मागायला हिंडत असत पण हल्ली त्याच दर्शन घडत नाही स्वातंत्र्यानंतर मात्र गोव्याबाहेरून अधिकारी आले, व्यापारी आले तसे भिकारीही आले त्याचा खूप सुळसुळाट झाला आहे हल्ली "

बिल चुकते करून गाडीत बसलो तेव्हा शांतारामने प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे पाहिले

" आता मडकई, शांताराम "

मुख्य रस्त्यावरून वीसेक यार्ड पुढे जाऊन गाडीने उजवीकडे वळण घेतले

दहाबारा मिनिटांत आम्ही मडकईला पोचलो

मडकईच्या नवदुर्गा-मंदिराचा थाट काही वेगळा दिसत होता रस्त्यापासून देवस्थान बरेच उंचावर होते पाचपंचवीस रुंद पायऱ्या चढून आम्हाला प्राकारात शिरावे लागले

प्राकार तसे भव्य आहे मंदिरही लहान नाही देवालयाच्या उजव्या व मागच्या बाजूस अग्रशाळा आहेत उजव्या बाजूची अग्रशाळा हल्लीच बांधली असून त्यात सुंदर मंगल कार्यालय आहे पाठीमागे डोंगर आहे. पण मंगेशमंदिरासारखा नवी अग्रशाळा सोडली तर आधुनिकतेचा स्पर्श नाही. म्हाळसा-मंदिराप्रमाणे सभामंडप जुन्या वळणाचा आहे पण मंदिर मात्र म्हाळसेइतके जुने नाही एकूण सगळा थाट गोव्यातल्या मंदिराचा असतो तसाच तलाव मात्र देवालयापासून थोडा दूर आहे नी बराच मोठा आहे.

देवीचे दर्शन घेण्यासाठी आम्ही चौकावर उभे राहिलो तेव्हा ती गोष्ट साऱ्यांच्याच लक्षात आली देवीची मान वाकडी होती आणि हसरा चेहरा डावीकडे झुकलेला होता

भटजींनी दिलेला तीर्थप्रसाद ग्रहण करून झाल्यावर सौ देसाई म्हणाल्या, " काय हो भावजी, या देवीची मान वाकडी झालेली दिसते ती का ? "

वहिनींच्या प्रश्नाला उत्तर द्यायच्या पूर्वीच शेजारच्या वाड्यात राहाणारे कामत बंधू आले दुपारचे भोजन करण्यापूर्वी घरातल्या प्रत्येक माणसाने देवीला नमस्कार करायची या घरात पद्धत होती आम्हाला पाहाताच श्रीधर कामत आश्चर्याने म्हणाले, " दादा, तुम्ही इथं ? अन् सहकुटुंब सहपरिवार ? "

पाहुण्याना नवदुर्गामंदिर दाखवायला आणल्याचे मी सांगितले तेव्हा ते म्हणाले, " आता सारं काही पाहून झाल्यावर आमच्याकडे या जेवण तयार आहेत. "

" तुमच्याकडे येऊच की पण जेवायला नव्हे जेवण झाली आहेत

म्हाडदोळला बसायला जरूर येऊ '

"जेवण झाली आहेत ? आमचं घर इथं असताना तुम्ही मंडळी खाणावळीत जेऊन आलात ?"

दुपारची वेळ होती, सोबत पाहुणे होते, ड्रायव्हर होता अशा सबबी सागून मी वेळ मारून नेली नी शेवटी म्हटले, "जेवण नसलं तरी तुमच्याकडे चहा घेणारच की आम्ही !"

"फार उपकार करणार आहात" श्रीधर कामत म्हणाले, "अन् बर का हो पाहुणे, हे आमचे मित्र नी नातेवाईक पण !"

विषय बदलून मूळ मुद्द्यावर यावे म्हणून मी म्हटले, "वहिनी, या नवदुर्गा देवीची मान वाकडी का असा तुमचा प्रश्न होता ना ? ही मडळी तुमच्या प्रश्नाचं उत्तर देतील '

कामत बंधूंचे चेहरे आता खुलले उत्साहाने दोघेही बंधू माहिती पुरवू लागले

ही देवी नवसाला पावते अशी ख्याती आहे. एकदा कारवारकडच्या एका भक्ताने देवीला नवस केला, "माझे अमुक तमुक काम होऊ दे तुला मी एक हजार रुपयाची फुले वाहीन '

त्याचे काम झाले नवसफेडीसाठी तो मडकईला आला फुले विकत घेण्यासाठी तो हिंडू लागला पण नेमकी त्याच दिवशी सारी फुले संपून गेलेली गृहस्थ हिंपुटी झाला

एवढ्यात सारी फुले खपवून एक माळी घरी चालला होता त्याच्या मोठ्या थोरल्या आबूच्या परडीत फक्त एक फूल होते फक्त एक फूल खपणे शक्य नव्हते म्हणून ते परडीत राहिले होते

पाहुण्याने त्याला विचारले, "ते फूल देतोस का मला ? वाटेल ती किमत देईन पण ते फूल मला हवं"

एका फुलाची वाटेल ती किंमत देऊ करणारा हा पाहुणा वेडसर असावा असे माळ्याला वाटले त्याने गमतीने म्हटले, "वाटेल ती किमत देणार काय ? मग हजार रुपये द्या"

पाहुण्याने हजार रुपये खिशातून काढून दिले पण ते घ्यायला माळी आता तयार होईना त्याला श्रमाचे पैसे हवे होते धर्माचे नको होते.

पाहुण्याने मग आपल्या नवसाची कथा सांगितली नी म्हटले, "मला हजार रुपये फुलासाठी खर्च करायचे होते अन् नेमका हाच आकडा तू बोललास देवीची इच्छा आहे की या एका फुलासाठी तुला हजार रुपये मिळावे."

माळ्याने नवदुर्गेला नमस्कार केला नी पैसे घेऊन घरी गेला

तो देवीभक्त गृहस्थ ते एक फूल घेऊन देवळात गेला, पूजा केली नी ते फूल त्याने श्रीचरणी वाहिले.

यथासांग पूजा झाल्यावर भक्ताने देवीला विचारले, "माते, मनोभावे, यथाशक्ती मी तुझी पूजा केली आहे बोलल्याप्रमाणे हजार रुपयाची फुले मिळाली नाहीत पण तेवढ्या किंमतीचे एक फूल माझ्या मनाच्या सर्व कोमल पाकळ्यासह तुला अर्पण केले आहे तुला ही पूजा पोचली ना?"

देवीकडून उत्तर येईल अशी त्याची अपेक्षा नव्हती पण एक अघटित घडले! देवीने मान हलविली आणि पूजा आपणास पोचल्याचे सूचित केले.

तेव्हापासून मडकईच्या नवदुर्गेची मान डाव्या बाजूला झुकलेली कायम राहिली आहे

कर्नाटकातील भक्तमंडळीत आजही ही देवी वांकड्या मानेची देवी म्हणून ओळखली जाते

गोव्यातल्या सर्व देवळात मडकईच्या नवदुर्गेची पाषाणी पूजामूर्ती सुंदर आहे शिल्पकाराने ही मूर्ती घडवताना आपले सारे कौशल्य पणाला लावले आहे असे ही मूर्ती पाहाताना वाटू लागते इथे इतर देवस्थानाप्रमाणे पूजामूर्तीवर सोन्याचांदीचे कवच चढविले जात नाही गंधाच्या लेपाने चेहरा सजविला जातो नी ओठ, डोळे, केसाच्या जागी रंग वापरले जातात पाषाणमूर्तीला विविध प्रकारची गंधाचीच वस्त्रे नेसविली जातात त्यामुळे मूर्तिशिल्पाची ॲनाटमी, पोझ, मुद्रा नी मुद्रेवरील भाव स्पष्टपणे पाहायला मिळतात

नवदुर्गेचे ध्यान महिषासुरमर्दिनीचे आहे डावा पाय जमिनीवर ठाम रोवून उजव्या पायाने देवीने महिषासुराला पायाखाली दाबून धरला आहे उजव्या वरच्या हाताने त्याच्या अंगात त्रिशूळ टोचला आहे उजव्या

खालच्या हातात उपसलेले खड्ग आहे आणि डाव्या हातात ढाल आहे वास्तविक महिषासुरवधाच्या वेळी आदिशक्ती दुर्गेने धारण केलेले हे उग्र रूप पण गोव्यात सर्व दुर्गांची रूपे सौम्य आहेत महिषासुराचा वध करीत असतानाही त्यांच्या मुखावर स्मित झळकते आहे !

"या देवीबद्दल काही दतकथा वगैरे आहेत की नाहीत ?"

"आहेत ना पण या दतकथा सत्यकथा मानणारे खूप लोक आहेत त्या परपरेने चालत आलेल्या आहेत म्हणून त्यात काही तरी तथ्य असले पाहिजे ' कामत म्हणाले

"म्हणजे याना तथ्यकथा तरी म्हणायला हरकत नाही !"

"तसं म्हणा पाहिजे तर ' आणि कामतनी माहिती पुरवायला सुरुवात केली

मडकईची ही नवदुर्गा मूळची नदीपलीकडल्या गांवशीची ग्रामदेवी प्राचीन काळी या गावशी गावाहून काही कुटुंबे मडकईत येऊन स्थायिक झाली नतर बाटवाबाटवीच्या काळात आणखी काही कुटुंबे देवीला घेऊन या गावातल्या पारपय वाड्यावर आली जुन्या गावकऱ्यानी त्याना आपल्या ग्रामसस्थेत सामावून घेतले काही गांवकरी गोव्याबाहेर गेले तुमचे क्रिकेट-पटू गावसकर आहेत ना ते या गावशीचेच

सुनील गावसकर गावशीचे ही माहिती देसाईंना नी मलाही नवी होती

नव्या निर्वासिताची सोय झाली आता देवीला मंदिर कुठे बांधायचे हा प्रश्न आला देवी बिचारी आसऱ्याविना पारपय वाड्यावर तिष्ठत होती शेवटी अनत कामत नांवाच्या एका ग्रामस्थाच्या अंगात देवीचे वारे आले तो म्हणाला, "मला एक नारळ द्या मी तो दूर फेकीन. जिथे नारळ पडेल तिथे मंदिर बाधा "

अवसराने नारळ फेकला तो दुतळे वाड्यावर पडला त्याच जागी आजचे हे मदिर बाधण्यात आले ज्या वास्तुशिल्पज्ञाने नागेश-मंदिर बाधले त्यानेच हे मदिर उभारले असे सागतात.

आणखी एक दंतकथा किंवा तथ्यकथा सागतात देवीच्या उत्सव-मूर्तीला सोन्याचे मुखे म्हणजे मुखवटा करायचा होता गावच्या सोनाराने

कित्येक प्रयत्न केले पण मुखवटा तयार होईना प्रत्येक वेळी त्याने साचा तयार करायचा, सोने आटवून तयार केलेला रस त्यात ओतायचा पण सोने ओतले की मुखवटा फुटायचा असे चालले होते

शेवटी त्याला देवीचा दृष्टांत झाला "तुझ्या मुलीला समोर बसव तिच्या चेहऱ्याप्रमाणे मातीचा मुखवटा तयार कर. त्यावरून साचा बनव"

सोनाराने त्याप्रमाणे केले साच्यात सोनेरी रस ओतला सुकल्यावर साचा फोडून मुखवटा बाहेर काढला. देवीच्या सुंदर मुखावर मंदस्मित होते भक्ताना अभय देणारी ती स्मितधारिणी मुद्रा होती

पण ह्या अभयदात्री नवदुर्गेने सोनाराला मात्र अभय दिले नाही साचा फोडला फोडताच त्याच्या मुलीची प्राणज्योत मालवली होती

सोनाराने ओळखले, देवीने तिचे पंचप्राण आपल्या अंतरंगात शोषून घेऊन तिला अमर केले आहे! त्याचा एक डोळा रडत होता तर दुसरा हंसत होता

नवदुर्गेच्या पूजामूर्तीप्रमाणेच तिची उत्सवमूर्तीही तेजस्वी आहे, सुंदर आहे, मंदस्मितधारिणी आहे, त्याचे कारण हे असे आहे

त्या दिवसापासून हे सोनाराचे घर म्हणजे देवीचे माहेर बनले दरवर्षी जत्रेच्या एका ठराविक दिवशी ती आपल्या या माहेरी जाते, एक दिवस तिथे राहाते, पूजा घेते, पोटभर नैवेद्य ग्रहण करते आणि परत जाते

मडकईचे हे देवस्थान तसे फार सपन्न नाही पण इथल्या जत्रेमुळे ते सर्वप्रसिद्ध आहे जत्रा प्रसिद्ध आहे ती तिथल्या रथोत्सवामुळे. जत्रा कार्तिक वद्य चतुर्थीपासून सात दिवस चालते सहाव्या दिवशी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत गांवातल्या घराघरातून शिजवलेले अन्न येते ते देवीला 'उकार' (उपाहार) म्हणून अर्पण केल्यावर देवी स्नानासाठी जाते. जत्रेचे इतर विधी झाल्यावर नाटक सुरू होते पहाटे नाटक सपते, दारूसामान उडविले जाते आणि धाकट्या रथात उत्सवमूर्ती आरूढ झाली म्हणजे पाचपंचवीस मंडळी रथाच्या चार दांड्या हातावर तोलून, ढोल–ताशाच्या तालावर व सनईच्या सुरावर रथ नाचवायला प्रारंभ करतात हा रथ म्हणजे मागे सांगितलेला चार चाकांचा ओढून न्यायचा रथ नव्हे. हा रथ म्हणजे एक मेण्याचा प्रकार म्हणा ना चार लाकडी दांड्यावर चौकोनी घुमटी या घुम-

टीच्या माथ्यावर काही सच्छिद्र घुमट छिद्रात खोवलेल्या कागदाच्या गुढ्या आणि मधोमध उभारलेले लखलखते अब्दागीर

हे रथ नाचविणे म्हणजे काय याचे वर्णन करून सागता येणार नाही रथ नाचविण्यासाठी पुढे येणाऱ्या जवान माणसात जो उत्साह सचारतो त्याची रणागणावर लढणाऱ्या जवानाच्या जोषाशीच फक्त तुलना करता येईल एकादा जवान दमून रथाची दाडी सोडील म्हणून इतर जवान टपून असतात पण रथ नाचवणारा तगडा तरुण घामाने न्हाऊन निघाला तरी रथाला पालीसारखा चिकटून असतो

दुसऱ्या दिवशी हा रथ मग गावात ठराविक ठिकाणी हिंडून येतो शेवटी ' रथ पडतो , ( म्हणजे खाली ठेवला जातो ) तेव्हाची धुमश्चक्री म्हणजे एक रणकदन ! शेकडो माणसे रथावरच्या गुढ्या लुटण्यासाठी रथावर अक्षरशः तुटून पडतात पाचसात मिनिटे चालणाऱ्या या धुमश्चक्रीत कुणाला गुढ्या टोचतात तर कुणाचे हातपाय जायबंदी होतात कुणाला जखमा होतात तर कुणी गर्दीत चिरडला जातो शेवटी कुणाच्या हातात अब्दागीर येते आणि मग सर्वत्र शातता पसरते उत्सवमूर्ती मंदिरात हलविली जाते जत्रेची सागता होते

अलीकडे ही मारामारीची जुनी पद्धत सोडून देण्यात आली असून सर्वांना गुढ्या मिळण्याची व्यवस्था झाली आहे

या रथोत्सवाप्रमाणेच मडकईच्या जत्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे देवीचा जलविहार जत्रेच्या पाचव्या रात्री देवालयापासून जवळच असलेल्या तळावात दोन होड्या एकत्र बाधून ' सागड तयार करतात तो शृगारतात दीपरत्नांची आरास करतात आणि या सागडावर देवी बसली म्हणजे दारूकामाच्या पार्श्वभूमीवर सागडाच्या फेऱ्या तलावात सुरू होतात. हा देखावाही अत्यत प्रेक्षणीय असतो

कामत बधूंना त्याच्या घरी यायचे आश्वासन देऊन आम्ही तलावावर गेलो मंगेश किंवा म्हाळसेच्या चारी बाजूनी घाट बांधलेल्या तळीप्रमाणे ही तळी नव्हती. नैसर्गिक स्थितीतला मोठा तलाव होता फक्त एकाच बाजूने बाधकाम करून रस्ता केला होता

याच रस्त्याने मैलभर पुढे गेलो तेव्हा एक आगळे दृश्य दिसले

केरळप्रमाणेच गोवा हा प्रदेशसुद्धा बॅकवॉटर्ससाठी प्रसिद्ध आहे. हा बॅक-वॉटर्स म्हणजे काय प्रकार आहे याची पाहुण्याना या ठिकाणी कल्पना आली तिसवाडी--फोंडा तालुक्यामधून वाहाणारा कुंभारजुव्याचा कालवा जुवारीच्या विशाल पात्राला या ठिकाणी भेटला होता. मडकई गावचे टोक पाण्यात घुसल्यासारखे दिसत होते (आणि म्हणूनच या भूशिराला टोक हे नाव पडले होते ) भरतीमुळे जुवारीच्या आखातातून येणाऱ्या सागराच्या लाटा या टोकावर आदळत होत्या, फुटत होत्या आणि कालवा व नदीच्या मुखातून पुढे पुढे जात होत्या

जुवारीच्या दुसऱ्या तीरावर एक गांव दिसत होते तिकडे बोट करून मी पाहुण्याना म्हटले, "देसाई, ते कुठ्ठाळ गाव त्याच्या अलीकडचं केळशी तिथूनच बाटवाबाटवीच्या काळात मंगेश व शांतादुर्गा या फोंडे तालुक्यात आल्या बहुसंख्य देव समोरच्या साष्टी महालातून इकडे आले म्हणेनास आणि या कालव्याच्या पलीकडे जुवारीच्या उजव्या तीरावर जे गांव दिसते आहे ते आगशी या भागात पूर्वी कदंबाची राजधानी होती पुराणात नी इतिहासात गोवापुरी म्हणून गाजली होती ती ही

परत फिरलो नी विश्रांतीसाठी कामताकडे गेलो

# ९ : उग्र नृसिंहाचे सौम्य रूप

कामताच्या घरी विश्राती घेऊन चुळा भरून टाकल्या एवढ्यात चहा आला

चहा घेता घेता कामत बंधूपैकी एक म्हणाले, "कुंडईची नवदुर्गा पाहून आलात का?"

मी ओशाळते स्मित करून म्हटले, "नाही हो तेवढा वेळ नव्हता एका दिवसात अन्त्रुजेंतली सारी देवालयं पाहून होणे कठीणच नाही का?"

"ते खरं आहे पण कुंडईला जायला हैव होतं तुम्ही "

"काय आहे तिथं ?" देसाईने विचारले.

"नवदुर्गेचे आणखी एक देवस्थान आहे. पूर्वी मडकई व कुंडई मिळून एकत्र ग्रामसंस्था होती. पण नंतर दोन्ही गावकऱ्यात तेढ आली कुंडई गांव वेगळा झाला नवदुर्गेचं वेगळं देवालय कुंडईकरानी उभारलं खूप मोठा इतिहास आहे तो."

"देवीचं देवालय मोठं आहे का ? अन् त्या देवीची मान सुद्धा तुमच्या या नवदुर्गेसारखी वाकडी आहे का ?" देसाईने विचारले

"नाही मान सरळ आहे अन् देवालय पण मोठं नाही "

मी मध्येच म्हटले, "देसाई, कुंडईचं एक खास वैशिष्ट्य सांगतो तुला तुमच्या जेजुरीला गळ लावत असत माहीत आहे तुला ? बगाड घेणे म्हणत त्याला "

"असं ऐकलय मी "

"सवाशे वर्षांपूर्वी कुंडईतल्या भावकादेवी नावाच्या एका उपदैवताच्या मंदिराजवळ गळ लावण्याची ही अघोरी पद्धत होती राटाखुद्री नावाचा एक पाषाणखंड अजूनही या जुन्या चालीची खूण म्हणून दाखवतात ही गळाची पद्धत कुंडई सोडली तर गोव्यात फार थोड्या ठिकाणी प्रचलित होती काणकोण हे त्यापैकी एक पैंगीणला अजूनही गळ लावतात असे ऐकलो हे गळ लावणे बहुतेक नवसाचे असते "

"गळ म्हणजे काय हो ?" सौ देसाईंनी विचारले

"मासे पकडण्यासाठी गळ असतो ना, तसाच हा गळ पण बराच मोठा वीसेक फूट उंचीच्या एका 'धारणा'ला एक रहाट असतो रहाटाला चार गळ लावलेले असतात हा गळ माणसांच्या पाठीला टोचीत नी रहाट चालू करीत रहाट फिरू लागला म्हणजे गळाना लोंबकळणारी माणसेही फिरत "

"बाई ग ! केवढा भयंकर हा प्रकार !"

"हो ना. म्हणूनच १८४४ साली सरकारने तो बंद करून टाकला "

चहा संपवून व कामत मंडळींचा निरोप घेऊन आम्ही गाडीत येऊन बसलो. गाडीत बसल्यावर देसाईंच्या लक्षात आले, दोन्ही मित्रपत्नींच्या

हातात दोन पुडकी आहेत "हे काय ? त्याने विचारले.

"खण नारळ." सौ देसाई उद्गारल्या आणि मग आमच्या सौ कडे पाहात म्हणाल्या, "कशासाठी हो हे वाण ? मघाशी ओटी भरताना विचारणं बरं दिसायचं नाही म्हणून गप्प राहिले "

"त्याचं काय आहे वैनी," सौ सातोस्कर म्हणाल्या, "सवाष्ण बाई पहिल्या वेळी घरी आली म्हणजे जाताना तिची खणानारळानं ओटी भरायची पद्धत आहे इथं "

"अहो पण ओळख नाही देख नाही... सातआठ रुपयाचा तरी पीस असेल हा टू बाय टू चा चहासाठी एवढे पदार्थ केले घरातल्या नायकानी नी वर हा भूर्दंड परतफेड करायची म्हटल "

"परतफेडीची भाषा बोलायची नाही हो आमचा कुलाचार आहे तो '

गाडी पुन्हा म्हाडदोळला आली तशी मी ड्रायव्हरला म्हटले, "शाता-राम, आपल्याला वेलिंगला जायचं आहे "

उजव्या हाताला वळण घेऊन गाडी पणजी--फोंड्याच्या मुख्य रस्त्याला आली आणि फर्मागुडीची टेकडी चढायच्या ऐवजी उजव्या हाताच्या अरुंद रस्त्यावरून धावू लागली

पाच मिनिटे धावून गाडी थांबली. डाव्या हाताला ३०--४० यार्डाच्या अतरावर श्रीलक्ष्मीनृसिह देवस्थानचे महाद्वार दिसत होते

आतापर्यंत आम्ही पाहिलेल्या मंदिरापैकी माशेलचा देवकीकृष्ण व मडकईची नवदुर्गा याची मदिरे जशी उंचवट्यावर होती तसेच हेही मदिर उंचवट्यावर होते मात्र फरक हा की पहिल्या दोन्ही मंदिराच्या प्राकारात पायऱ्या चढून जावे लागत होते तर या मदिराच्या प्राकारात जायला पायऱ्या नव्हत्या आणखी एक फरक असा की ती दोन्ही मदिरे जणू उघड्यावर होती तसे नृसिंहमदिर उघड्या माळावर नव्हते. घराच्या पुंज-क्यात ते लपलेले दिसत होते

महाद्वारातून आम्ही प्राकारात प्रवेश केला तेव्हा आम्ही देवालयाच्या डाव्या अगाला आलो आहोत हे लक्षात आले प्राकारात सर्वत्र दगडी चिरे, खडी, रेती आणि इमारती लाकूड पसरलेले दिसले गवंडी आणि सुतार आपापल्या कामात मग्न होते देवस्थान कमिटीचे एक सभासद देखरेख

करत होते त्याना विचारले, “ काय चालल आहे? ”

ते म्हणाले, “ देऊळ जुनं झालं होतं जीर्णोद्धार करत आहो ”

“ चागली गोष्ट आहे ’ मी म्हटले आणि सभामंडपात शिरायला म्हणून आम्ही डावीकडे वळलो सभामडपाला वळसा घालून आम्ही आत शिरणार तेवढ्यात लक्षात आले की मदिराच्या मागच्या उच्च शिखराच्या दिशेने सूर्य खाली उतरतो आहे म्हणजे हे मंदिर पूर्वाभिमुख आहे

सभामडपात शिरलो तेव्हा तो चागला प्रशस्त असून जुन्या पद्धतीचा, खाबावर उभारलेला व कौलारू असल्याचे लक्षात आले सभामंडपातून मुखमंडपात प्रवेश केला मुखमंडप गोव्यातल्या इतर देवस्थानाप्रमाणेच छोटा आहे मात्र तो दुमजली आहे आणि त्याच्या पुढल्या भागात उत्सवमूर्ती बसवण्यासाठी सज्जा—ज्याला गोव्यात ‘ शेजो ’ म्हटले जाते—आहे याच भागावर देवालयाचे पहिले आणि छोटे कौलारू शिखर आहे

मुखमडपातून आम्ही महामंडपात किंवा चौकात शिरलो या चौकाची रचना वाहींशी म्हाळसा-मदिराप्रमाणेच होती कोरीव काम केलेल्या आठ लाकडी खाबावर छत होते आणि छताचे एका आडव्या तुळईने दोन चौकोनी भाग पाडले आहेत. छत व खाब यांच्या मध्ये दोन्ही चौकोनाच्या चारही बाजूना दोन लाकडी पट्टिका असून म्हाळसा–मदिराप्रमाणे त्यात उठावाच्या मूर्ती आहेत लक्षपूर्वक पाहिले तेव्हा त्यात दशावतारांचा समावेश होता असे दिसून आले सर्व पट्टिका व छत रगवलेले होते जमीन मार्बलने मढवलेली असली तरी खाबापासून छतापर्यंतच्या वरच्या सर्व भागाचे जुने स्वरूप कायम होते देसाईंच्या लक्षात ही गोष्ट मी आणून दिली तेव्हा आमच्याबरोबर मंदिर दाखवायला आलेले कमिटीचे ते मघाशी भेटलेले सभासद म्हणाले, “ मदिराचा जीर्णोद्धार करीत असलो तरी हे जुन काम आम्ही कायम ठेवणार आहो ”

चौक आणि गाभारा याच्यामध्ये एकाऐवजी दोन अतराळे होती आम्ही पहिल्या अतराळात शिरलो आणि दोन्ही बाजूना पाहिले हे अतराळ देवालयाच्या आयताकृतीच्या बाहेर गेले होते आणि त्याचे दोन अर्धमंडप बनले होते मात्र या अर्धमडपात इतर काही देवस्थानातल्या प्रमाणे परिवारदेवता नव्हत्या.

दुसऱ्या अंतराळात शिरून आम्ही गाभाऱ्याच्या दरवाजात उभे राहिलो. भटजी म्हणाले, " भेट घ्या "

देसाई माझ्याकडे पाहू लागला. मी म्हटले, " तबकडीतल्या नारळाला हात लावून नमस्कार कर या विधीला देवाची भेट घेणे असा वाक्प्रचार प्रचलित आहे "

आम्ही दोघानीही देवाची अशी भेट घेतली आमच्या गृहिणींनीही नमस्कार केला भटजींनी आमची नावे विचारून घेऊन गाऱ्हाणे व तीर्थ-प्रसाद दिला

हा विधी झाल्यावर देसाई गाभाऱ्यातील मूर्तीकडे निरखून पाहू लागला गाभाऱ्यात उच्चासनावर मोठी लक्ष्मीनृसिंह मूर्ती होती आणि या मूर्तीच्या पायाशी छोट्या आसनावर एका लिंगाकृती पाषाणखंडाला टेकून लक्ष्मीनृसिंहाची छोटी पंचरशी धातूची अभिषेकमूर्ती होती

देसाईने प्रश्नात्मक मुद्रेने माझ्याकडे पाहिले

मी म्हटले, " देसाई, नृसिंहमूर्तीमागे लिंग कसं आलं हेच तुला विचारायच आहे ना ? "

" होय "

" त्याची एक कथा आहे थोडक्यात सागतो तुला " असे म्हणून मी सागू लागलो " हा नरसिंह मूळचा साकवाळचा मडकईच्या टोकावरून आताच तुला मी पलीकडच्या तीरावर कुठ्ठाळ गाव दाखवला ना ? त्याला लागून पलीकडे हा साकवाळ गाव आहे. तुला धर्मानंद कोसबी, डी. डी कोसबी ही नावं माहीत आहेत ना ? "

" हे काय विचारतोस ? या पितापुत्राची नावे फक्त भारतात नव्हेत तर साऱ्या जगभरच्या विद्वानाना माहीत आहेत त्याची का आठवण झाली तुला मध्येच ? "

" अरे, ते या साकवाळ गावचे तर या साकवाळ गावातून बाटवा-बाटवीच्या काळात १५६७ या वर्षी तिथला हा नरसिंह महाजन मडळीने इकडे आणला इकडे म्हणजे या वेलिंग गावात नव्हे मडकई गावचा करजाळ नावाचा एक भाग आहे तिथे त्याला मडळी घेऊन आली तिथल्या फडते आडनावाच्या गावीत कुटुंबाने देवाचे स्वागत करून काही

काळ तिथे ठेवून घेतले त्यानतर या वेलिंग गावात नरसिंहमूर्तीचे स्थलातर करण्यात आले लवकरच हे देवालय बाधण्यात आले ”

“ हे सर्व ठीक आहे रे ” देसाई म्हणाला, “ पण तू त्या लिंगा-सबधी सागणार होतास ना ? ”

“ हो, तेच माझ्या पद्धतीने सागण्याचा मी प्रयत्न करतो आहे अन् तू मला अडवतो आहेस ’

“ बर बाबा तुझ्या पद्धतीने साग ”

“ सागतो पण त्यापूर्वी ती खालची छोटी मूर्ती दिसते आहे ना, ती आधी व्यवस्थित पाहून घे मग आपण बाहेर चौकावर जाऊ

देसाईने नृसिंहमूर्तीचे निरीक्षण केले आणि आम्ही चौकावर येऊन बसलो

“ हा, तर काय सागत होतो, ” मी मूळ कथेचे सूत्र पुन्हा घेत म्हणालो, “ तर हे जे नृसिंह देवस्थान साकवाळहून इथं आणल असं मी म्हटले ते मूळात त्या गावात नव्हतं सांतेरी, ईश्वर, नारायण अशी काही दैवत साकवाळला होती व या देवस्थानाभोवती गावगाड्याची रचना झाली होती काही काळानंतर नायक नावाचा एक साधू या गावी आला तो नृसिंहभक्त होता गावात येताना त्याने शाळिग्रामासह पंचरशी धातूची नृसिंहमूर्ती बरोबर आणली होती नृसिंह व शाळिग्रामाची पूजा केल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे

“ हा साधू पुरुष साकवाळ गावात येण्यापूर्वी कुठ्ठाळ व साकवाळ या दोन गावात बरीच वर्षं सीमेवरून तटा चालू होता कुठ्ठाळकरानी साकवाळचा कांही भाग आपल्या हद्दीत जबरदस्तीने घेतला होता व म्हणून दोन्ही गावकऱ्यात मारामाऱ्या होत हा तंटा साधुबुवाने मध्यस्ती करून सोडवावा म्हणून दोन्ही गावचे लोक त्याच्याकडे गेले

“ नायक साधूने मान्यता दिली आपण झारीतून पाण्याची धार सोडीत जाईन ती धार म्हणजे दोन्ही गावामधील सीमा समजावी हे साधूचे म्हणणे उभय बाजूना पसंत पडले

“ पण प्रत्यक्ष जेव्हा नायक साधूने झारीने पाणी सोडून गाव विभागले तेव्हा साकवाळकराचा जो भाग कुठ्ठळकरानी बळकावला होता तो मूळच्या

मालकांकडे परत गेल्याचे दिसून आलें

"कुडाळकरांना हा निर्णय पसत पडला नाही त्यातल्या काही तरुण मंडळीने त्याच रात्री नायक साधूला धडा शिकवावा म्हणून त्याची पूजा-मूर्ती साकवाळच्या तलावात फेकून दिली

"दुसऱ्या दिवशी साधूने पाहिले तो देव गायब! त्या दिवशी त्याने अन्नग्रहण केले नाही रात्रौ त्याला झोपेत दृष्टांत झाला की 'मी तलावात आहे. मला वर काढ सकाळी साधुबुवा उठले आणि त्यानी तलावात बुडी मारली त्याच्या हाताला एक पाषाणाचा लिंगाकृति तुकडा लागला. पण नृसिंहमूर्ति काही सापडली नाही संध्याकाळी साकवाळवर तरुणानी तलावात बुड्या मारल्या तेव्हा एकाला ती मूर्ति सापडली. साधु नायकाने मग आपल्या उपास्य दैवताची पूजा करुन दोन दिवसाच्या उपासाचे पारणे फेडले नंतर ग्रामस्थानी साकवाळला लक्ष्मीनृसिंहाचे मंदिर बाधले वाटचावाटवीत जी मूर्ती घेऊन आधी वरजाळला आणि मग इथ वेर्लिंगला आणण्यात आली ती ही आत असलेली छोटी मूर्ती आणि मूर्तीच्या मागे असलेला लिंगाकृति पाषाण साकवाळच्या तलावात साधू नायकाला साप-डलेला खाब!"

"खाब?" देसाईणबाई उद्गारल्या, "मला तर बाई तो लिंगासा-रखाच दिसतोय पंढरपूरच्या विठोबाच्या डोक्यावर असच लिंग असल्याचे मी पाहिल होत तसं मी एका वारकऱ्याला म्हटल देखील तर तो म्हणाला, 'बाई, ते लिंग नाही, किरीट आहे' संशोधक मडळीला देखील कोड आहे म्हणे, विठ्ठलाच्या डोक्यावर आहे ते लिंग की मुकुट?"

"तुम्ही कमाल केलीत वहिनी" मी म्हणालो "नेमके हेच उदाहरण मी देणार होतो"

"काय सबध या नृसिंहाच्या लिंगाचा विठ्ठलाच्या डोक्यावरल्या लिंगाशी?" देसाईने विचारले

"तुझ्या लक्षात आलं नाही का देसाई? अरे, शैव आणि वैष्णव असे जे दोन पथ आपल्या हिंदु धर्मात आहेत ना, त्याच्याशी या दोन्ही लिंगाचा संबंध येतो. विठ्ठलाच्या डोक्यावर लिंग आहे म्हणणारे लोक समजतात की विष्णूचे उपास्य दैवत आहे महादेव म्हणून त्याने ते लिंग

आपल्या डोक्यावर धारण केले आहे तर वैष्णव वारकऱ्याचा ठाम समज आहे की विठ्ठलाचा तो किरीट आहे ''

" म्हणजे इथे सुद्धा तो गाभाऱ्यातल्या मूर्तीमागे ठेवलेला लिंगाकृती पाषाणी तुकडा हे लिंग आहे की खांब आहे असा वाद आहे का ? ' आणि मग एकदम एक कल्पना सुचल्याप्रमाणे देसाई म्हणाला, "अरे, तो खांब म्हणजे ज्या खांबातून नरसिंह प्रगट झाला तो खांब असं तर तुमच्या-कडची वैष्णवमंडळी समजत नाही ना ? ''

" एक्झॅक्टली ! खुद्द नायक साधू विष्णुभक्त होते आणि आजचे या देवाचे महाजनही वैष्णव आहेत आणि ते लिंग आहे असं समजणाऱ्या शैव मंडळीचा या देवस्थानशी संबंध पोचत नाही म्हणून तसा वाद कधी झाला नाही

"बर, तू ती मूर्ती बारकाईनं पाहून घे असं म्हणालास ते कशासाठी ?''

" त्या मूर्तीच्या कारागिरीतही वैष्णवाचा दृष्टिकोन आहे म्हणून ''

" पण मूर्ती पाहून तसं काही माझ्या लक्षात आलं नाही. मूर्तीच्या वामांकावर लक्ष्मी बसली आहे आणि विष्णूने नरसिंहरूप घेतलं त्या वेळी लक्ष्मीला मांडीवर घेऊन तो प्रगट झाला नव्हता ही विसंगती मात्र लक्षात आली ''

" म्हणजे एवढं तुझ्या लक्षात आलं ना ? लक्ष्मी वामांकावर आहे म्हणूनच त्याला लक्ष्मीनृसिंह म्हणतात आता या मूर्तीत वैष्णवीझम कसा आहे ते सांगतो तुला विष्णूच्या सर्व अवतारात फक्त नरसिंह हे एकच उग्र रूप आहे नरसिंहाची कथा तुम्हा सर्वांना माहीत आहे, होय ना वहिनी ?''

" हो तर कथेकरी बुवाकडून हज्जार वेळा ऐकलीय ती ''

" हज्जार वेळा ऐकली असेल तर ती सांगत नाही पण नृसिंहाच्या मूर्तीबद्दल मूर्तीविज्ञानात काय सांगितलेलं आहे ते सांगतो. हिरण्यकशिपूला मारल्यानंतर नरसिंह कसा दिसत होता याचं अग्निपुराणात वर्णन केलं आहे ते असं :-- **सिंहस्य कृत्वा वदनं मुरारिः सदा करालं च सुरक्त-नेत्रम्.** त्रिविक्रमाचार्यांनी नृसिंहस्तुतीत म्हटले आहे, **उदयरवि सहस्र-द्योतितं रुद्रवीक्षं प्रलयजलधिनादं कृद्‌वन्हिवक्त्रं सुरपतिरिपु-वक्षच्छेदरक्तोक्षितांगम्** । आणि हेमाद्रीने आपल्या देवतामूर्तीविज्ञान

ग्रंथात नृसिंहाची मूर्ती कशा ध्यानाची घडवावी ते सांगितले आहे तो म्हणतो की खादे, कमरेच्या खालचा भाग व मान पुष्ट, कंबर व उदर कृश, सिंहमुख व मानवी शरीर असलेला, नीलवस्त्र नेसलेला, तेजस्वी, आलीढ अवस्थेतला, ज्याच्या मुखाभोवती ज्वाला आहेत आणि ज्याची आयाळही ज्वालाची आहे आणि ज्याने तीक्ष्ण नखानी हिरण्यकशिपूचे पोट फाडले आहे असा नृसिंह करावा

"अशा उग्र रूपाच्या दोन, चार किंवा आठ हाताच्या, आसनस्थ किंवा उभ्या अशा मूर्ती भारतभर, विशेषतः उत्तर भारतात सर्वत्र दिसतात पण दक्षिण भारतात मात्र असा उग्ररूपी नृसिंह दिसत नाही वेलिंगच्या या देवळातल्या मूर्तीप्रमाणे त्या शात स्वरूपी आहेत."

"कारण काय?"

"कारण अस की दक्षिणेत वैष्णव पंथीयानी भक्तिमार्गाचा प्रसार केला आणि आणि ही भक्ती विष्णूची वा त्याच्या अवताराची करायची असते आणि ज्याची भक्ती करायची तो विष्णू कृपाळू, दयाळू, कनवाळू, भक्ताच्या हाकेला साद देणारा असा विष्णुभक्तानी कल्पिलेला आहे उग्र देवतेची भक्ती करणे कठीण म्हणूनच हिरण्यकशिपूला मारल्यावर प्रल्हादाने नृसिंहाला विनविले, 'तू सौम्य हो तुझ्या या क्रूर रूपाची मला भीती वाटते मग सौम्यरूपाने विष्णू प्रगट झाला. या सौम्य रूपाच्याच मूर्ती वैष्णव कलावतानी दक्षिणेत घडवल्या आतली गाभाऱ्यातली मूर्ती तू पाहिली आहेस ना? तिला चार हात आहेत वरच्या मागच्या दोन हातात शख चक्र आहे पुढल्या उजव्या हातात गदा आहे आणि पुढल्या डाव्या हाताने वामाकावर बसलेल्या लक्ष्मीला सावरले आहे. बरोबर? '

"हो, बरोबर आहे"

"चला, आता आपण मंदिराबाहेर जाऊ"

साऱ्या जणानी पुन्हा एकदा नृसिंहाला नमस्कार केला व मडळी प्राकारात आली

सभामडपासमोर प्राकार संपते तिथे खोलगट जागेत तलाव आहे तलावाच्या पलीकडे डोंगर आहे आणि या डोंगरातून जो औषधी पाण्याचा झरा आहे त्याचे पाणी तलावात येत असते तलाव व झरा याच्यामध्ये

नगारखाना आहे

देवालयाच्या उजव्या बाजूसही डोंगर आहे प्राकारात परिवार देवतांची स्थाने आहेत डाव्या बाजूकडील एका देवळीत साधक नरसिंहाची मूर्ती आहे हा साधक नरसिंह म्हणजेच नायक साधू होय डाव्या बाजूस अग्रशाळा व पुजारी ब्राह्मणाची घरे आहेत

प्राकारातून देवालयाकडे पाहू लागलो तेव्हा एक विशेष गोष्ट जाणवली आणि देसाईला ती आवडली गाभाऱ्याच्या वर देवालयाचे सर्वांत उंच शिखर आहे आणि ते कलशाकृती नाही खाली चौकोनी, त्यावर अष्टकोनी, त्याच्यावर लिंगाकृती व त्यावर छोटी केळबोंडाकृती अशी या शिखराची रचना आहे

•

प्राकारातून बाहेर पडून रस्त्यावर आलो, गाडीत बसलो नी ड्रायव्हरला उद्देशून म्हणालो, "शांताराम, गाडी फिरवून न्यायची नाही असंच थोडं पुढं गावात जायचं आहे."

"सातेरीच्या देवळात का ?" शांतारामने विचारले

आमचा हा शांताराम गेल्या पाचदहा वर्षांपूर्वी माझ्याकडे ड्रायव्हर म्हणून लागला त्या वेळी एक सामान्य बुद्धीचा ड्रायव्हर होता पण गाडीत बसून गेलेल्या विद्वानाच्या संगतीमुळे आता खूपच बहुश्रुत झाला होता आता आम्ही नेमके कुठे जाणार हे त्याने ओळखले होते

दोनतीन मिनिटातच गाडी शांतादुर्गेच्या देवस्थानासमोर उभी राहिली

आम्ही खाली उतरलो उजव्या हाताला लागूनच शांतादुर्गेचे टुमदार, छोटे, स्वच्छ, सुंदर देवालय पाहिले आणि पाहुणे मंडळी हरखून गेली. देवालयाचे वैशिष्ट्य वेगळे असे सांगण्यासारखे नव्हते आणि तरीही वेगळे-पणा जाणवत होता मोठे प्राकार वगैरे भानगड नव्हती रस्त्याला लागूनच छोटासा सभामंडप होता; हेच कदाचित या देवस्थानचे वैशिष्ट्य असेल.

आत जाता जाता मी देसाईला म्हणालो, "ही शांतादुर्गा इथली नव्हे साखवाळची ती ग्रामदेवता नरसिंहाप्रमाणेच ती इथे आली"

बोलता बोलता गर्भगृहाच्या दाराशी आलो आंतमध्ये शांतादुर्गेची

चतुर्हस्त मूर्ती होती  पण विशेष म्हणजे तिच्या पाठीमागे मूर्तीच्या तिपटीने उंच असे वारुळ होते

"हे काय हो भाऊजी ? मूर्तीच्या मागे टेकडीसारखं दिसतंय ते काय ?"

"ते पाहाण्यासाठीच तुम्हाला इथं आणलं वैनी  मूर्ती आहे शाता-दुर्गेची  तिला सातेरी असही म्हणतात. ही भूमिदेवता म्हणूनच ग्रामदेवता कोकणात अनेक ठिकाणी ती वारुळाच्या स्वरूपात असते. कधी इथल्या-प्रमाणे वारुळाशिवाय मूर्तीही असते  'रोयण' या नावानेही हे वारुळ ओळखले जाते  तिचे संस्कृत रूप 'सान्तर' म्हणजे भोके असलेलो वारुळाला सात पदर किंवा कप्पे असतात म्हणून त्याला सातेरें म्हणतात अशीही एक उपपत्ती सांगतात

"वारुळ हे भूमीचे प्रतीक आहे म्हणजेच मातृत्वाचे प्रतीक आहे स्त्री ही गर्भधारणा करून नवबालकाला जन्म देते ही गोष्ट रानटी अवस्थेतील मानवालाही माहीत होती  हेच सर्जनाचे काम वनस्पतीच्या बाबतीत भूमी करते हेही त्याने पाहिले होते  धरित्रीच्या या सर्जनशक्तीचा उपयोग त्याने कृषीसाठी करून धान्य पिकविले  म्हणूनच सृष्टीतील मानवसंजीवनाचे सातत्य टिकविण्याचे साधन म्हणून सयोनिलिंगाला त्याने जसे देव मानले तसेच वनस्पतीनिर्मितीचे साधन म्हणून भूमीलाही देवता मानले"

अशा या भूमीचे निर्मळ प्रतीक म्हणजे वारुळ  या वारुळात फक्त खाळ माती असते. खडे नसतात की धोंडे नसतात  वारुळाइतके भूमीचे आदर्श प्रतीक दुसरे कोणते मिळणार ? आजही असा समज आणि अनुभव आहे की फुलझाडे तरारून वाढण्यासाठी वारुळाची माती वापरावी. म्हणजे सर्जनाची शक्ती इतर ठिकाणच्या मातीपेक्षा वारुळाच्या मातीत अधिक आहे हे त्या काळातल्या लोकानाही माहीत असेल  कसेही असो, वारुळ हे भूमीचे आणि पर्यायाने मातृत्वाचे प्रतीक म्हणून गावागावातून आदिवासी जनतेकडून पूजिले जात होते  दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रात या वारुळाच्या पूजेची प्रथा प्रचलित आहे

या वारुळाला काही ठिकाणी रेणुका म्हटले जाते विशेषतः लोककथातून तिला हे नाव दिले गेले आहे  परशुरामाची माता रेणुका ती हीच वारुळा-

तच ती जन्म पावली आणि वारुळातच ती अदृश्य झाली असेही लोककथा सांगते

गंमत अशी की रेणुका या शब्दाचा अर्थच वारुळ असा आहे रेणू म्हणजे कण आणि रेणुका म्हणजे कणांनी बनलेली वारुळ हे सुद्धा मृत्तिका कणांनीच बनलेले नाही काय ?

सांगायचे तात्पर्य हे की भूमिका, रेणुका, सातेरी, माऊली या विविध नावानी प्रचलित असलेली आदिवासींची ही कृषीदेवता आणि मातृदेवता या आदिवासींकडून आर्यांनी जशी लिंगकल्पना घेऊन त्याची आपल्या रुद्रदेवतेशी सांगड घातली, तशीच त्याची भूमिदेवता स्वीकृत करून तिला ग्रामदेवतेचे स्थान दिले या आदिवासी लोकाकडूनच आर्यांनी भूमिदेवतेचा स्वीकार केला, यात दुमत नाही

## १० : नवनिर्माणाचे प्रतीक : शेषशायी अनंत

आता आम्हाला सावई वेऱ्याला जायचे होते गाडी मागे फिरून म्हाडदोळच्या मुख्य रस्त्यावर आली आणि डाव्या बाजूच्या अरुंद सडकेवरून धावू लागली

गर्द रानातून आम्ही आता चाललो होतो. रस्ता फारसा रहदारीचा नव्हता गाड्या नव्हत्या, बसेस नव्हत्या आणि माणसेही दिसत नव्हती दोन्ही बाजूंच्या उंच झाडाच्या फांद्यानी रस्ता झाकलेला होता घड्याळात पाहिले तीन वाजून पस्तीस मिनिटे झाली होती पण संध्याकाळ झाल्याचा भास होत होता हवेत गारवा होता, पण वारा नव्हता बाष्पाने जड झालेली हवा हालचाल करत नव्हती ओल्या मातीचा नी हिरव्या वनस्पतीचा एक विचित्र गंध घ्राणेंद्रियाना जाणवत होता

मी एकदम म्हटले, " देसाई, तुला कुळागार पाहायची होती ना ? तर

मग पाहून घे ही कुळागरं

"ही का कुळागर?" आजूबाजूच्या झाडींतून मध्येच अर्ध्या वा एक एकराचे तुकडे सुपारीच्या झुपकेदार झाडानी व्यापलेले होते केळी, कोकम, पानवेली, मिरवेली, अननस नी केतकींची त्यात गर्दी होती कुळागरात मध्यभागी एक झरा होता एका हौदासारख्या कुंडात झऱ्याचे पाणी अडवले होते. हौदाच्या एका कोपऱ्यांतून काढलेल्या पाटातून स्वच्छ, नितळ पाणी वाहात होते वनश्रीचे हे वेगळे रूप पाहून मन प्रसन्न होऊन उठले

"कुठल्या भागातून चाललो आहोत आपण?" देसाईने विचारले

प्रियोळ नुकतच मागं पडलं आहे– पुढे केरी भेटायची आहे"

"म्हणजे अ का प्रियोळकराचं का हे गाव?"

"हो प्रियोळकर इथलेच त्याचा जन्म इथला शिक्षणही याच भागांत झालं. पुढे हायस्कूल शिक्षणासाठी गोवा सोडला नी मग बाहेरच स्थायिक झाले. हे आता केरी गाव येणार आहे ना, ते केशरबाई केरकरांचं त्यानी नवीन घर सुद्धा बांधलं आहे इथं. याच गावात वैद्याच एक घराणे आहे. गोव्यात फार प्रसिद्ध आहे हे. परंपरेत आयुर्वेदविद्या या घराण्याने टिकविली आहे दादा वैद्य हे एक फार मोठे पुढारी या घराण्यात होऊन गेले"

"इथे देवालय आहे की नाही?"

"आहे ना विजयादुर्गेचं कऱ्हाडे महाजन असलेली ही आगळी एक देवता भाऊसाहेब माडखोलकराच कुलदैवत हेच किर्लोस्कर घराण्यांचंही हेच पूर्वी ही देवी वेर्लिंगच्या नरसिंहाप्रमाणे मूळ सांकवाळची तिथे तिचे जे महाजन होते ते तिथले गावकार—गावकार म्हणजे गावचे हक्कदार या दृष्टीने तुमचे माडखोलकर–किर्लोस्कर हे साकवाळचे म्हणजे गोव्याचे."

"म्हणजे कोसबी नी किर्लोस्कर एकाच साकवाळ गावचे? एकच कुलदेवी असलेले?" देसाईने विचारले

मी होकार दिला

बोलत असतानाच गाडी आता टेकडी चढू लागली होती डाव्या

हाताला डोंगर नी उजव्या हाताला हिरवी गर्द दरी.

दहाएक मिनिटात चढण संपली थोडा वेळ पठारावरून गाडी धावू लागली आणि मग पुन्हा उतार सुरू झाला गाडी उताराला लागली तेव्हा गोव्यातल्या निसर्गाच्या एका वेगळ्या रूपाचे दर्शन घडले दूर अंतरावरून नागमोडी वळणाची सुस्तपणे पसरलेली खाडी दिसत होती खाडीने नव्वद अंशाचे प्रचंड वळण घेतले होते या वळणाच्या वेचक्यात नारळाच्या बागा दिसत होत्या पाठीमागे पाचव्या डोंगराच्या उंचसखल क्षितिजाच्या रेषेने जमीन नी आकाश विभागले होते अलीकडच्या खोलगट दरीत वेरे गाव दिसायला होता खाडीवरून वाहात येणारा खारा वारा गाडीच्या झडपातून आत घुरू पाहात होता

"फार सुंदर नी तितकाच वेगळा आहे हा देखावा" देसाई म्हणाला

"म्हणूनच तर आणलं तुम्हाला या आडवाटेला" मी म्हटले

"काय रे, समोर दिसते आहे त्या नदीचं नाव काय?"

"पणजीला तू मांडवी पाहिलीस ना? तीच ही नदी इथून ती आमच्या करंजाळ्यापर्यंत पुढे गेली आहे पण इथं तिला मांडवी म्हणत नाहीत मादय म्हणतात हेच पूर्वीचं नाव गवमादिनी"

"फार सुंदर आहे नाव, नाही ग?' आणि मग मिस्कीलपणे देसाई पुढे म्हणाला, "आपल्या बेबीच्या जन्मापूर्वी आपण या गांवी आलो असतो तर हेच नाव ठेवलं असतं तिला, नाही का? आता हा चान्स हुकला''

"पुरे झाला चहाटळपणा!" सौ देसाई फणकारल्या

आम्ही तर हसलोच, पण शांताराम ड्रायव्हरच्या चेहऱ्यावरही स्मित झळकून गेले

उभे टेकाड उतरून आम्ही आता गांवातल्या स्टँडवर आलो होतो. सबंध गावच अशा एका अरुंद दरीत वसलेला आहे की आम्ही आलो त्या रस्त्याशिवाय वाहने जाणारा दुसरा एकही रस्ता गावात नव्हता सार्‍या पायवाटा घरे सारी खोलगट भागात व टेकड्यांच्या उतारावर नी थोडी माथ्यावर

स्टँडवर उतरून उजव्या हाताच्या बांधावरून चालू लागलो

" कुठलं गाव म्हणालास तू हे दादा ? " देसाईने एकदम विचारले

" सावई-वेरे "

" सावई वेरे, सावई वेरे ! नाव ओळखीच वाटतं "

" वाटणारच " मी म्हणालो, " गोव्यातलं हे श्रवणबेळगोळ आहे. 'चावुडराये करवियले' हे हजार वर्षांपूर्वीचे पहिले मराठी वाक्य जसे श्रवणबेळगोळला गोमटेश्वरच्या पुतळ्यावर लिहिलेले आहे तसा गोव्यात लिहिला गेलेला दुसरा मराठी ताम्रपट या गावात उपलब्ध झाला आहे १३४८ साली म्हणजे ज्ञानेश्वरीनंतर अवघ्या पन्नास वर्षांनी मराठीत हा ताम्रपट लिहिला गेला. आपण आज सकाळी खांडोळ्याला गेलो होतो ना ? तिथे सोनार आणि वाणी यांच्यामध्ये जेव्हा झगडा झाला तेव्हा वेरेकर वैश्यांनी खांडोळेकर वैश्यांना मदत केली ही हकीकत या ताम्रपटात नमूद केली आहे. अगदी पाठ आहे मला हा ताम्रपट ऐकणार आहेस ? खांडोळे-कर वैश्य म्हणतात, ' तुमी आमचे जाति समंधाच्या कारियासि उपेगा आले ते कवण कार्य म्हणाल तरि आमासि आणि सोनारासि सवादा होऊनु हाणमारि जाले समधिं तुमी वरेकार आमचेया वाणियाचे संमविरिधिसि तुमी वाणि समयासि येउनु मानु सभेचा राकिला .."

" पुरे पुरे "

" पुरे पुरे काय ? तुझे चौदाव्या शतकातले पूर्वज सुद्धा हीच भाषा बोलत होते की ! "

" बाबा रे, मला साहित्याची आवड आहे, पण संशोधनाची नाही "

" साहित्याची आहे ना ? मग साहित्याच सांगतो या गावाने जसा हा मराठी ताम्रपट दिला तसे दोन मराठी साहित्यिक पण दिले एक लक्ष्मणराव सरदेसाई आणि दुसरे व्यंकटेश अनंत पै रायकर " डाव्या बाजूला टेकडीच्या चढावाकडे हात करून मी म्हटले, " हा लक्ष्मणरावाचा वाडा नी तो पलीकडे दिसतो तो रायकराचा परिचय आहे ना तुला या दोघांच्या साहित्याचा ? "

" आहे तर ! एका काळचे गोव्यातले हे गाजलेले लेखक

एक बांध संपवून उजव्या बाजूला वळून काटकोनाने सुरू झालेल्या

दुसऱ्या बांधावरून आम्ही चालू लागलो बांधाच्या दोन्ही बाजूंच्या शेतात हिरवे वायंगण -म्हणजे रब्बीचे तांदळाचे पीक—वीतभर पाण्यात उभे राहून जलक्रीडा करीत होते आजूबाजूला भरपूर कुळागरे होती कुळागरातून आणि मुख्यतः समोरच्या देवळाला लागून असलेल्या तळ्यातून लावून दिलेल्या पाण्याने सारा आसमंत भिजला होता

बांध संपला नी प्रवेशद्वारातून आम्ही प्राकारात प्रवेश केला समोर एक टुमदार, छोटे देवालय आमची वाट पाहात होते

"बोलण्याच्या नादात विचारायला विसरलो " देसाई म्हणाला, "हे कोणतं देवालय दादा ?

"हे शेषशायी अनंताचं मंदिर गोव्यात अनंताचं हे एकुलतं एक मंदिर आहे."

"बाटवाबाटवीच्या काळात कुठल्या गावातून आला हा अनंत इथे ? साष्टीहून आला की दिवाडी, चोडणहून ?"

"हा अनंत कुठल्या गोव्यातल्या गावातून आलेला नाही फार लांबून आला तो द्वारकेहून जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा परमेश्वर अवतार घेतो हे गीतावचन तुला माहीत आहे ना ?"

"हो, आहे पण त्याचा इथे काय संबंध ? '

"तोच संबंध तर तुला सांगतो आहे तर काय सांगत होतो, हां वैकुंठपती विष्णू हा बराचसा स्वास्थ्यप्रिय आम्हा गोवेकरासारखा वैकुंठात आरामात राहावं, नाही तर क्षीरसमुद्रात शेषासनावर पडून योगनिद्रा घ्यावी असं त्याचं चाललं होतं पण कृष्णावतारात त्याची अशी काही धावपळ चालायची की त्याला उसंतच मिळेना त्यातच सोळा हजार एकशे आठ बायकांचा; गराडा शेवटी कंटाळला आणि गुपचूप क्षीरसमुद्रात जाऊन विश्रांती घ्यायचा बेत ठरवला पण खऱ्या क्षीरसमुद्रात पोल्यूशन झालं होतं की काय कुणाला माहीत, तो निघाला तो सरळ इथे वेऱ्याला आला.. '

आणि बोलता बोलता मी एकदम अवाक् झालो पुढले शब्द तोंडा-तल्या तोंडात उरले .

"काय झालं रे ? असा एकदम गप्प का झालास ? देसाईने आश्चर्याने विचारले

"गप्प झालो, एकदम एक नवीनच कल्पना सुचली म्हणून खऱ्या क्षीरसमुद्राकडे जायच्या ऐवजी तो इकडे आला असं मी म्हटलं पण आत्ताच वाटलं, हा परिसर म्हणजे तर खरा क्षीरसमुद्र नसेल? हे क्षीराब्धि-शायी अनंताचं देऊळ बघ अर्धा तलाव बुजवून, म्हणजे एका अर्धी तलावात ते बांधलं आहे मंगेश, म्हाळसा, मडकईचे तलाव तू पाहिलेस देवालयाच्या प्राकाराबाहेर आहेत ते पण इथं देवळाची उजवी भिंतच बघ कशी तलावा-तूनच वर आली आहे या तलावात बघ कस काठोकाठ शुभ्र सफेत पाणी भरलं आहे हा सारा परिसर पाण्यानं समृद्ध आहे. खुद्द अनंतमूर्तीच्या खालीही पाणी आहे. तेव्हा .."

"तेव्हा पुराणात वर्णन केला आहे तो क्षीरसमुद्र हाच क्षीरसमुद्राच दुसर नाव दूधसागर अन् हा दूधसागरही गोव्यात आहे. तेव्हा गोवा म्हणजेच क्षीरसमुद्र असे आपण समजू " देसाई माझ्याइतकाच गंभीरपणे म्हणाला, "नाहीतर क्षीरसमुद्रातूनच गोवा वर आला असेही म्हणू "

"तू हे म्हणायचा प्रश्न नाही देसाई गोवा आणि सारी कोकणपट्टी समुद्रातून वर आली असे मुळी भूगर्भशास्त्रज्ञाचेच म्हणणे आहे पूर्वी सह्याद्री पर्वत अरबी समुद्राला लागून होता. नंतर भूगर्भातल्या घडामोडीमुळे कोक-णची किनारपट्टी वर आली "

बोलता बोलता आम्ही देवालयात प्रवेश केला मंदिर अगदी छोटे होते पण सुंदर होते, टुमदार होते, हवाप्रकाश भरपूर होता आणि विशेष म्हणजे जाणवण्याइतका गारवा होता कारण पाण्यातच तर हे मंदिर होते! गाभाऱ्यात अनंताची मूर्ती ठराविक पोझ घेऊन शेषासनावर आराम करीत होती.

हिंदू दैवतसृष्टीत शेषशायी विष्णूला एक खास स्थान आहे बौद्ध आणि जैन धर्मांचा प्रभाव कमी झाला आणि चंद्रगुप्तादी हिंदू धर्माचे अभिमानी गुप्त राजाचा अमल सुरू झाला तेव्हा 'शेषशयना'च्या मूर्ती घडविल्या जाऊ लागल्या. बुद्ध आणि महावीराच्या ज्या ध्यानस्थ मूर्ती आज सर्वत्र दिसतात त्या गुप्तकाळापूर्वीच निर्माण होऊ लागल्या होत्या या ध्यानाच्या किंवा योगनिद्रेच्या कल्पनेचे हिंदू धर्माने केलेले अनुकरण म्हणजे शेषशयनाचे मूर्तीशिल्प. गुप्तकाळात निर्माण झालेल्या पुराणानी

विष्णूच्या या ध्यानमग्न स्वरूपाला आकार दिला आणि तदनुसार मूर्तीकार मूर्ती घडवू लागले

या शेषशायी स्वरूपाची कल्पना अशी आहे . जगबुडती आलेली आहे सर्वत्र अंधार पसरलेला आहे या अंधाराच्या पोकळीखाली अथांग सागर पसरलेला आहे त्यात देहाचे वेटोळे करून शेष नाग तरगत राहिलेला आहे त्याच्या देहाच्या पर्यंकावर चतुर्हस्त विष्णू योगनिद्रा घेत आहे. शेषाने त्याच्या डोक्यावर सहस्रफणा उभारल्या आहेत. विष्णूच्या हातात शंख, चक्र, गदा, पद्म आहेत त्याच्या नाभीतून कमलपुष्प उमलले असून त्यांत ब्रह्मदेवाचा जन्म झाला आहे लक्ष्मी पायाशी बसून योगमग्न विष्णूचे पाय दाबीत आहे

शेषशायीच्या मूर्तीशिल्पातील या संकेताना काही दार्शनिक असे अर्थ आहेत अंधार हे अनत कालाचे तर सागर हे अनंत विश्वाचे, अनंत स्थळाचे प्रतीक आहे या अनादिअनंत स्थल–कालावर सत्ता गाजवितो तो अनंतशयन श्रीविष्णु एक युग संपलेले आहे, जलप्रलय झाला आहे आणि नवे जग त्याला निर्माण करायचे आहे त्याच्या नाभीतूनच हे नवे जग स्फुरणार आहे कारण नाभिस्थान हेच देहाचे चैतन्यस्थान आहे नाभि-चक्राच्या मुळाशीच कुडलिनी शक्ती असते ज्ञानेश्वरानी नाभी, कुडलिनी आणि विश्वनिर्मिती याचे संबंध दाखविणारी एक सुदर ओवी लिहिली आहे —

ते कुडलिनी जगदबा । जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा ।
जिया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ।।

विष्णूच्या नाभीतून जो कमळाचा देठ निघाला आहे ते जन्मजात बालकाच्या नाळेचे प्रतीक आहे. आणि कमळाची कळी ही अड्याच्या आकाराची आहे, म्हणजे ते ब्रह्माड आहे या ब्रह्माडाला विष्णूच्या देहा-तूनच जीवनरस शोषून घ्यायचा आहे तोच त्याचे रक्षण करणार आहे विष्णू शेषावर पहुडला आहे याचा अर्थ असा की हे विश्व व्यापूनही श्रीविष्णू दशांगुळे शेष उरला आहे या शेषाचे प्रतीक म्हणजेच शेष नाग

श्रीविष्णूच्या हातातील शंख पोकळ असतो त्यातून नाद निघतो

हे नादब्रह्म निर्माण होते ते अवकाशाच्या पोकळींत आणि चक्र म्हणजे तर ऋतुचक्र, कालचक्र आणि आध्यात्मिक अर्थाने भवचक्र त्याच्या भ्रमणामुळेच कालचक्राला गति मिळते विश्वात बदल होतो. निर्मिति, गति आणि लय या चक्रात समाविष्ट आहेत

या अनंताच्या गळ्यात रुळणारा कौस्तुभ हे प्रकाशाचे प्रतीक चैतन्याचे मूलस्थान हृदयस्थ आत्मा जसा चैतन्यमय, तसाच विश्वाचा आत्मा म्हणजे हा कौस्तुभ

विष्णूच्या पायाशी असलेली लक्ष्मी ही त्रिगुणात्मक प्रकृति अमूर्त अशा सत्व, रज तमाचे हे समूर्त रूप आहे. तिच्यामुळेच विश्वाला हे रंग प्राप्त झाले आहेत

या सर्व साधनाच्या सहायानेच जलप्रलयानंतरचे नवे विश्व निर्माण होणार आहे आणि म्हणूनच शेषशायी अनंत हा या नवनिर्माणाचे प्रतीक आहे अशा या अनादि, अनंत, नवनिर्माणाचे प्रतीक असलेल्या अनंत-शयनाचे दर्शन घेऊन बाहेर आलो नी 'तळी'च्या कट्ट्यावर बसलो थोड्या वेळाने देसाईंने म्हटले,

"त्रिवेंद्रमला शेषशायी पद्मनाभाचं फार मोठ मंदिर आहे २५ फुटांची मूर्तीच आहे म्हणे तिथं मूर्तीच दर्शन म्हणे तीन दारांतून घ्यावं लागतं तू पाहिलं आहेस का हे मंदिर ?"

"हो पाहिलं आहे द्रविड शिल्पाच उत्कृष्ट उदाहरण आहे हे मंदिर म्हणजे मंदिराचा विस्तारच एवढा मोठा आहे की प्रत्यक्ष पाहिल्या-शिवाय त्याची कल्पना येणार नाही. देवालयात वीज आली आहे पण गाभाऱ्यांत मात्र तेलाचे दिवे त्यामुळे होत काय की मूर्तीची काहीच कल्पना येत नाही एका दारातून पद्मनाभाचा उशी म्हणून केलेला उजवा हात दिसतो मधल्या दारातून नाभी दिसते नी तिसऱ्या दारातून पाऊल दिसते दिसते असं आपलं उगाच म्हणायचं दिसल्याचा भास होतो त्रिवेंद्रमचे मल्याळीमधलं नाव तुला माहीत आहे? तिरुअनंतवरम्. ब्रिटि-शानी त्याचा अपभ्रंश त्रिवेंद्रम असा केला पण संस्कृतात त्याचं होतं श्रीअनंतपूर तिरु म्हणजे श्री बर का ?"

"अस होय ?" सौ देसाई मध्येच उद्गारल्या, "म्हणजे तिरुपती

हा श्रीपती का ? '

" करेक्ट वैनी. "

थोडा वेळ स्तब्धतेत गेला कुणीच काही बोलत नव्हते. त्या स्तब्धशीतल वातावरणाशी आमच्या मनाचे धागे जुळले होते

" आता चलायचं ना ? अजून खूप पल्ला गाठायचा आहे पुढं. " त्या नीरव, शांत स्तब्धतेत माझेच शब्द मला कर्णकटु वाटले

" हो चला " सौ देसाई म्हणाल्या, " पण द्वारकेहून तो अनंत इथं केव्हा आला, का आला ते मात्र सांगा "

" सांगतो रायकरानीच या घटनेवर एक कथा लिहिली आहे "

जुनी गोष्ट आहे त्या वेळी या वेरे गावात सातेरीचे एकच देवालय होते विश्वंभरभट चाकाडकर नावाचा पुजारी तिची मनोभावे पूजा करी ईश्वरभक्त श्रद्धावान पुजारी म्हणून त्याची ख्याती होती

एक दिवस रात्री झोपेत त्याला स्वप्न पडले स्वप्नात काळ्या पाषाणाची शेषशायी अनंताची एक मूर्ती दिसली मूर्ती लगेच नाहीशी झाली आणि त्या ठिकाणी एक ब्राह्मणकुमार उभा असलेला दिसला विश्वंभरभटजींना उद्देशून तो म्हणाला, " उद्या द्वारकेहून निघालेलं एक गलबत तुमच्या बंदरात येईल त्या गलबतावर मी असेन. तिथून मला घेऊन ये तुमच्या गावच्या तलावात मला राहायचं आहे "

विश्वंभरभटजी जागा झाला बायकोला त्याने ही स्वप्नाची हकीकत सांगितली ती म्हणाली, " अहो, द्वारकेचं गलबत म्हणजे फार मोठं असेल. ते आपल्या या लहानशा खाडीत येईल कसं ? "

विश्वंभरभटजींनाही हाच प्रश्न पडला होता पण दुसऱ्या दिवशी सकाळीच तो बंदरावर गेला तेव्हा त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले खरो खरच एक मोठे गलबत नदीच्या मध्यभागी उभे होते

विश्वंभरभटजींनी एक होडी घेतली नी ते गलबताजवळ गेले गलबतावरच्या मुसलमान खलाशांशी मोडक्या तोडक्या हिंदीत ते बोलू लागले तेव्हा त्याना कळले की हे गलबत गोपीचंदन भरून द्वारकेहून कोचीनला चालले होते. गोव्याजवळ ते वादळात सापडले म्हणून त्यानी गोवा बंदराचा

आश्रय घेतला पण तिथे ते थांबेचना भरतीच्या लाटांनी ते आत जाऊ लागले अन् शेवटी इथे येऊन थाबले

विश्वभरभटजींनी विचारले, "गलबतावर एकादी पाषाणी मूर्ती आहे का ? असली तर ती मला द्या."

खलाशांनी सागितले, अशी मूर्ती गलबतात नाही "शोधून पाहाता का ?" या भटजींच्या प्रश्नाला त्यानी नकार दिला.

ब्राह्मण परत फिरला नी नदीकाठावर अश्रू ढाळीत बसून राहिला

दुपार झाली खलाशानी नागर ओढला, शिडे उभारली, वल्ही हातात घेतली

पण गलबत जागेवरून हलेना ते जड झाले होते इंचाइंचाने पाण्यात जाऊ लागले होते

गलबतावरच्या सरतांडेलाला वाटले, या प्रकाराशी भटजींच्या माग-णीचा संबध असेल का ?

भटजींना किनाऱ्यावरून आणण्यात आले ते येईपर्यंतच्या वेळात गलबतावर शोधाशोध चालू झाली आणि काय आश्चर्य, एका पोत्यामागे शेषशायी अनंताची काळ्या पाषाणाची मूर्ती पडली होती !

ब्राह्मणाच्या हाती ती देण्यात आली आसूभरल्या डोळ्यानी विश्वं-भरभट किनाऱ्यावर गेला आणि मग गलबत वाऱ्याच्या झोतात भरभर चालू लागले

विश्वंभरभटजींनी गावकऱ्याच्या मदतीने मिरवणुकीने तलावापर्यंत मूर्ती आणली, आणि मग हे देऊळ बाधले

एवढा वेळ एकाग्र मनाने शेषशायी अनंताची ही दंतकथा श्रोते मडळी ऐकत होती मी बोलायचा थाबल्यावर देसाई म्हणाला, "विश्वं-भरभटजींची ही गोष्ट ऐकता ऐकता माझं मन कुठे गेले होते सागू ?"

"साग ना."

"पैठणला."

"पैठणला ?"

"हो पैठणला तिथे नाथाच्या घरी श्रीकृष्णाची मूर्ती आहे तिची कथाही अशीच आहे एकदा एक व्यापारी यात्रा करीत करीत द्वारकेला

गेला मोठा कृष्णभक्त होता तो त्याने तिथून येताना श्रीकृष्णाची एक सुंदर मूर्ती आणली घरी जाताना पैठणला त्याचा मुक्काम पडला तिथे रात्री झोपेत त्याला स्वप्न पडले विश्वंभरभटजींना दिसली तशीच ती कृष्णमूर्ती साक्षात् त्याच्यासमोर उभी राहिली म्हणाली, 'मी पुढे येणार नाही मला एकनाथाकडे पोचव

"पण व्यापाऱ्याचा एवढा जीव त्या मूर्तीवर जडला होता की ती मूर्ती त्याला हातची सोडवेना मुक्काम हलवून तो पुढे गेला पुढेही हे स्वप्न त्याला आणखी एकदा पडले स्वप्नात तो बालकृष्ण म्हणाला, 'मला भूक लागली आहे नाथाकडे जेवायचे आहे तू मागे फीर नी मला नाथाच्या घरी पोचव नाहीतर मी तुझा सत्यानाश करीन '

"व्यापारी घाबरला मागे फिरला नाथाना सारी हकीकत सांगितली नी ती श्रीकृष्णमूर्ती त्यांच्या स्वाधीन केली नाथाच्या डोळ्यातून अश्रुधारा लागल्या नाथानी ती मूर्ती मग आपल्या घरी ठेवून घेतली तिची पूजाअर्चा सुरू केली आजही पैठणला नाथाच्या घरी ही मूर्ती आहे. ज्या विटेवर ती खडी आहे तिच्यावर लिहिले आहे, '**दास, जेऊं घाला वा न घाला** द्वारकेचा राजा विश्वाचा शास्ता भगवान श्रीकृष्ण म्हणतो, 'नाथमहाराज, मी तुमचा दास आहे. मला भूक लागली आहे तुमच्या घरचे अन्न मला खायचे आहे मी आगांतुकपणे इथे आलो आहे मला वाढा किंवा वाढू नका पण मी तुमचा सेवक म्हणून इथेच राहाणार आहे!"

"काय बाई देवाची लीला ही! कुठे द्वारका नी कुठे पैठण!" सौ देसाई म्हणाल्या.

"नी कुठे सावई वेरे!" मी म्हटले

## ११ : फर्मागुडीचा गोपाळ गणपती

"आतापर्यंत पाहिलेल्या देवळापेक्षा हे देऊळ अजीबात वेगळं दिसतंय "

फर्मागुडीच्या पठारावरल्या गोपाळ-गणपती मंदिराच्या दिशेने बोट दाखवीत देसाई म्हणाला

सावई वेऱ्याहून परत फिरल्यानंतर अर्ध्या तासात आम्ही फर्मागुडीला पोचलो होतो मात्र गेलेल्या रस्त्याने परत न येता केरी--कुर्टी- फोंडा असा प्रवास केला होता.

पण या रस्त्याने आल्यामुळे दोन नव्या गोष्टी — खरे म्हणजे एक जुनी आणि एक नवी -- पाहुण्याना पाहायला मिळाल्या होत्या जुनी म्हणजे फोंड्याच्या परिसरात असलेला आणि गोव्याच्या इतिहासात गाज-लेला मर्दनगड पूर्वी खुद्द फोंडे शहरात एक कोट होता १६८३ मध्ये पोर्तुगीजांचा समूळ उच्छेद करायच्या हेतूने संभाजीने मोहीम माडली आणि त्या फोंडेच्या किल्ल्याजवळ घनघोर लढाई झाली संभाजी या लढाईत विजयी झाला पुढे त्याने जुवे नावाचे पोर्तुगीजाचे बेट घेतले तिथून खुद्द गोवे शहरावर मोर्चे लावले. पण मोगलाचे सैन्य कोकणात उतरल्यामुळे हा प्रयत्न फसला याच मोहिमेत संभाजीने फोंडेचा किल्ला मोडून टाकून जवळच नवा मजबूत गड बाधला हाच मर्दनगड आज तो जवळजवळ उध्वस्त झाला आहे पण किल्ल्याच्या खुणा दिसतात त्या पाहायला गाडी थाबवून चालत जावे लागले असते पण आम्हाला तेवढा वेळ नव्हता शिवाय आमची ही धर्मयात्रा होती त्यात गड--किल्ल्यांना स्थान नव्हते

कुर्टी नांवाच्या खेडेगावात पोचलो तेव्हा सारा परिसर कारखान्यानी भरून गेलेला दिसला मी म्हटले, "हे आधुनिक गोवे या कारखान्यामुळे आता गोव्याचा कायापालट होत आहे. हे कारखाने आता आग खात आहेत नी धूर ओकीत आहेत मंदिराचे घुमट नी चर्चचे बुरुज याच्या-ऐवजी कारखान्याची धुराडी हे आधुनिक गोमतकाचे प्रतीक बनणार आहे"

"हा कालमहिमा आहे ' देसाई उद्गारला

याच विषयावर चर्चा करीत आम्ही फर्मागुडीच्या टेकडीवर आलो होतो

फर्मागुडीच्या माथ्यावरच्या प्रचंड वृक्षाखाली गाडी उभी करून आम्ही खाली उतरलो तेव्हा सौ देसाईंना पहिल्या प्रथम दिसला तो

अश्वारूढ शिवाजी महाराजांचा प्रचंड पुतळा त्या देसाईला म्हणाल्या, " अहो, तिकडे काय पाहाता वेंधळ्यासारखे ? इकडे बघा "

" पहात होतो ते छोटेसं आधुनिक पद्धतीचं देऊळ हेच पाहायला आपण इथे आलोय ना ! " मला उद्देशून देसाई म्हणाला

" हो पण वहिनी म्हणतात तिकडेही पाहा जरा "

देसाईने आम्ही उभे होतो त्याच्यापेक्षा अधिक उंचीवरच्या टेकाड्याच्या पायथ्याशी असलेला शिवाजीचा पुतळा पाहिला व तो हरखून गेला

मी म्हटले, " देसाई, हा पुतळा हल्लीच आपल्या सरकारने इथं उभा केला मुद्दाम दिल्लीहून परराष्ट्रमंत्री वाजपेयी आले होते पुतळ्याचं उद्घाटन करायला फार सुंदर भाषण केलं होतं त्यानी "

अश्वारूढ पुतळा पाहून आम्ही उजवीकडे वळलो आणि गोपाळगणपती मंदिराच्या प्राकाराच्या पायऱ्या चढू लागलो

जी मंदिरे आतापर्यंत आम्ही पाहिली होती आणि पुढे पाहाणार होतो त्याना शेकडो वर्षांचा इतिहास होता. पण हे मंदिर अगदी अलीकडचे होते. १९६६ साली बांधलेले

उत्तर भारतीय शिल्प पद्धतीचे हे मंदिर आहे अगदी छोटेसे. पण तरीही याला लाख दोन लाख रुपये खर्च आलाच आणि तो सारा खर्च केला भाऊसाहेब बांदोडकरानी

" पण या परिसरांत एवढी देवळे असताना हे नवीन देवालय त्यानी का बांधले ? " सौ देसाईंचा प्रश्न.

" त्याचं काय आहे वैनी बांदोडकर हे एक धर्मनिष्ठ पुरुष होते पूर्वी गरिबी होती पण खाणधंद्यामुळे हातात पैसे येऊ लागले तेव्हा शाळा-देवळासाठी देणग्या देऊ लागले.

एकदा काय झालं, भाऊ असे या रस्त्यानं कुठं तरी चालले होते वाटेत गुराख्याची पोरे गोट्या खेळत होती गाडी थांबवून त्यानी त्या पोरांची विचारपूस केली " शाळेत जात नाही का रे तुम्ही ? "

" नाही शाळेत गेलो तर गुरे कोण राखणार ? "

सवालाला जबाब बिनतोड होता

" मग इथे वेळ कसा घालवता ? "

" असाच कसा तरी "

एक चुणचुणीत पोरगा म्हणाला, " दुपारी इथं फार तापतं बघा एकादं देऊळ असत तर सावलीत बसायला तरी मिळालं असतं "

" कसलं देऊळ हव तुम्हाला ? "

" गणपतीच "

आणि मग हे देऊळ उभे राहिले गणपतीचे गोपालासाठी बाधले म्हणून गोपाळगणपती असं नाव पडले

" ही तू सागतोयस ती सत्यकथा आहे की दंतकथा ? " देसाईने म्हटले.

" भाऊच्या बाबतीत दतकथा नी सत्यकथा यात फरक नाही करता येत, देसाई. " मी म्हटले " अशा काही विलक्षण गोष्टी त्याच्या जीवनात घडल्या आहेत की ज्याना सत्यकथा म्हणायचं, दतकथा म्हणायचं की तथ्यकथा म्हणायच असा कुणालाही सभ्रम पडेल "

अनेक दृष्टींनी गोव्यातल्या मदिरापेक्षा हे मदिर वेगळ आहे चंद्रनाथ, सिद्धनाथचा अपवाद केला तर गोव्यातली सर्व देवालये दऱ्याखोऱ्यात आहेत, खालाटीत आहेत पण गोपाळ--गणपती मंदिर पठारावर आहे मंदिरासमोर दीपस्तंभ नाही, तलाव नाही, अग्रशाळा नाहीत सर्व परिसर उघडा आहे उघड्या अगणातून एकादे भुईचाफ्याचे फूल वर यावे तसा ह्या देवालयाचा प्रकार आहे

प्राकारांत प्रवेश केल्यावर लक्ष वेधून घेते ती देवालयाच्या समोरच्या महाद्वारावर उभारलेली गणेशमूर्ती हा प्रकार मी कुठल्याही देवस्थानात पाहिलेला नाही आतला मुखमडप एवढा छोटा आहे की चारपाच पावलात तो आपण ओलाडू शकतो पण तसा तो कुणी ओलाडत मात्र नाही कारण या एवढ्याशा जागेतल्या जमिनीवर सिमेंटमधून रंगचित्रानी किमया केली आहे अशी रगचित्रे आम्ही यापूर्वी पाहिली ती माशेलमधल्या मल्लिनाथ देवालयात. गोव्यातली ही खास कारागिरी आहे मंदिराशिवाय धनिकाच्या बंगल्यातूनही अशी कारागिरी आढळते

दरवाजावरच्या दोन द्वारपाळामधून आतल्या चौकावर प्रवेश केल्या-

वर या देवालयाचा आटोपशीरपणा अधिकच जाणवतो आणखी एक गोष्ट जाणवते ती चकाकी आतल्या भिंती, खांब, जमीन सारे काही जणू आता नुकतेच पॉलीश केले आहे! दिल्लीच्या बिर्लामंदिरात हीच तकाकी, हीच नव्हाळी मी पाहिली होती नाहीतरी धर्ममंदिरे, देवमंदिरे कशी निर्मळ, प्रसन्न असायला हवीत देवभक्ताच्या भेटीत माणसाचाच नव्हे तर केरकच-ऱ्याचा, घाणीचा, गोंगाटाचा नी गर्दीचाही व्यत्यय येता कामा नये पण आपल्या भारतातील मंदिरातून नेमके हेच आढळते. सुदैवाने गोव्यातली मंदिरे या नियमाला अपवाद ठरावी दक्षिण भारतातही ही स्वच्छता दिसते

या गणपतीमंदिराच्या गर्भागारातील पंचरशी धातूची मूर्ती हा कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे गर्भागाराच्या खिडक्यातून भरपूर प्रकाश येत असल्यामुळे आणि गर्भागार अतिशय छोटे असल्यामुळे आपण मूर्ती-पासून फार थोड्या अंतरावर उभे राहून मूर्ती पाहू शकतो असा प्रकार गोव्यातल्या इतर कुठल्याही देवस्थानात दिसत नाही

मूर्तीचे ध्यान आपण नेहमी पाहातो तसे नाही गणपती बैठक मारून बसला आहे सोंड डावीकडेच आहे तो मुकुटधारी आहे कान भव्य व हत्तीसारखे खाली वळलेले आहेत लंबोदरावर सर्पाने विळखा घालून फडा उभारली आहे आणि हाताची रचना कुठल्याही ध्यानात वर्णन न केलेली अशी आहे चारी हात कोपरातून खाली दुमडलेले आहेत मूर्तीकलेच्या नियमानुसार त्याचा उजवा हात अभय देणारा नाही त्याची मूठ वळलेली असून त्यात काहीतरी ( मोदक ? ) भरलेले आहे इतर सर्व हाताच्याही मुठी वळलेल्या त्या मुठी रिकाम्या आहेत.

एकूण हे छोटेसे मंदिर गोव्यातल्या देवालयाच्या साच्यात न बसणारे एक आगळेवेगळे मंदिर आहे उणीव एकच सभोवारचा उजाडपणा. तशी झाडी आहे पण ती प्राकारात नाही. प्राकारही लहानसेच आहे

आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे पणजीला जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या हाताला एक डांबरी सडक फुटली आहे या ठिकाणी उतारावर छोटे छोटे टुमदार, सुंदर बंगले आहेत साऱ्या उतारावर झाडी तर आहेच, पण बंगल्याभोवती सुंदर बागा केल्या आहेत हे बंगले सरकारने प्रवाशासाठी बांधले असून अल्प भाड्याने ते दिले जातात जो रस्ता इथून फुटला आहे

तो थेट मैल दीड मैल जातो तिथे स्थापत्य महाविद्यालय आहे फर्मागुडी-पेक्षाही अधिक उंचावरील पठारावर.

हा सारा परिसर आता वृक्षवल्लरींनी बहरला आहे माणसाच्या वस्तीने यापुढे फुलणार आहे गोपाळ--गणपती इथे आल्यापासून या परिसराच्या विकासाला प्रारभ झाला आहे.

# १२ : खड्गधारी प्राचीन नागेश

नागेशीला जाण्यासाठी म्हणून गाडी आता खाली उतरू लागली सहा वाजायला आले होते टेकडीवर उन्हे होती परतु नागेश, रामनाथ, शातादुर्गा याचा ज्या समोरच्या खोलगट खोऱ्यात निवास होता तिथे अंधार दाटू लागला होता झाडामाडांच्या झुपक्यातून वर आलेल्या नागेशाच्या शुभ्र ' घुडा 'वर ( कळसावर ) मात्र सूर्यप्रकाश चिसावला होता

खाली उतरून नागेशी गाव जवळ करीत असताना चौघड्याचे मंद स्वर कानात घुमू लागले हळुहळू स्वरांची तीव्रता वाढू लागली आणि गात्रागात्राना एकप्रकारची शिथिलता येऊ लागली साऱ्या दिवसाच्या धावपळीने मनाला नी शरीरालाही मरगळ आली होती, ती या स्वराच्या जादूने पार वितळून गेली नागेश-प्राकाराच्या महाद्वारात आम्ही गाडीतून उतरलो तेव्हा मी खाली उतरत नसून, स्वर्गाच्या हिंदोळ्यावर बसून वरवर जात आहे असे वाटू लागले

असे वाटण्याचा हा अनुभव नेहमीच येत नाही स्थल, काल, वाद्य, वादक आणि राग याचा मिलाफ होण्याचे हे क्षण आयुष्यात क्वचित् येतात ते आणू म्हटल्याने येत नाहीत तो योग यावा लागतो. असा योग आज आला होता

हा चौघडा हे गोव्यातल्या अनेक देवस्थानाचे वैशिष्ट्य आहे

मुख्यत संपन्न देवस्थानातून साधारणत पहाटे ५ ते ६, दुपारी ११॥ ते १२॥ आणि संध्याकाळी ५॥ ते ६॥ असा त्रिकाल चौघडा झडत असतो मूळच्या पवित्र वास्तूला नी मंगल परिसराला या चौघडा-वादनाने अधिक पावित्र्य नी अधिक मांगल्य येते. चौघड्यातील समेळाचा ठेका हृदयाच्या ठेक्याला साथ करतो, तर सनईचा सूर विश्वातील नादब्रह्माशी माणसाच्या मनाला एकरूप करतो

चौघड्याच्या त्या नादब्रह्मात विलीन झालेल्या स्थितीतच आम्ही नागेशाच्या प्राकारात प्रवेश केला आतापर्यंत पाहिलेल्या सर्व देवस्थानाच्या प्राकारात मंदिरासमोरून किंवा बाजूने आम्ही प्रवेश केला होता. पण नागेश मंदिराच्या प्राकाराचे प्रवेशद्वार मात्र मंदिराच्या पाठीमागे होते आत शिरताच मंदिराचा पार्श्वभाग दिसतो आणि पुरोभागी असलेला भव्य व उच्च असा पांढरा शुभ्र सात मजली दीपस्तंभ एकदम लक्ष खेचून घेतो

देवालयाच्या डाव्या बाजूने वळसा घालून मंदिराच्या प्रवेशद्वाराशी पोचलो तिथे एक शिलालेख आहे गोव्यात मराठी भाषेत लिहिला गेलेला हा चौथा लेख विजयनगरच्या पहिल्या देवरायाचा प्रतिहस्त माई शेणवी याने तो कोरवला आहे

मुखमंडपात प्रवेश करताच मधोमध काळ्या पाषाणाचा भला मोठा नंदी दिसला

महामंडपात गेलो तेव्हा चांदीने मढविलेल्या द्वारपट्टिकेच्या दरवाजा-कडे लक्ष गेले बहुतेक संपन्न देवालयाचे हे दरवाजे चांदीच्या पत्र्याने मढविलेले असतात, तसाच नागेश-मंदिरातला हा दरवाजाही मढवलेला होता खांबांवरील चित्रपट्टिकेत उठावाची कोरलेली चित्रे होती ती रामायणातील प्रसंगचित्रे होती, तसेच अष्टदिक्पाल, गंधर्व वगैरेंचीही होती. छताला हंड्या-झुंबरे लटकत होती. बाहेर सधिप्रकाश होता, पण नागेशाचा चौक मात्र विद्युद्दीपाच्या प्रकाशाने उजळून निघाला होता.

अंतराळात उभे राहून आम्ही नागेशाचे दर्शन घेतले मंगेशाप्रमाणे इथेही शिवलिंगाला सोन्याचा मुखवटा चढवला होता पण या मुखवट्याचा वेगळेपणा पाहिल्याबरोबर जाणवत होता मंगेश सौम्य वाटत होता नागेश काहीसा उग्र दिसत होता अधिक प्रौढ वाटत होता त्याच्या मिशा अधिक

घोसदार होत्या नी त्याची टोके वर वळलेली होती मस्तकावर गंगा होती नी त्यावर नागाने आपल्या पाच फणा उभारून धरल्या होत्या बाजूला असलेले धातूचे दोन प्रचंड नाग हा 'नागेश' आहे हेच सांगत होते. आणखी एक विशेष गोष्ट होती. चांदीच्या प्रभावळीला मध्यभागी छत्र, चार अब्दागिरे, दोन पताका व दोन चामरे अडकवलेली होती डाव्या बाजूच्या पायाशी नागेशाकडे तोंड करून नंदी बसलेला होता

पण याशिवाय तात्काळ लक्षात येण्यासारख्या आणखी दोन मूर्ती होत्या आणि मौज अशी की त्याही नागेशमूर्तीच होत्या लिंगाच्या पाठी-मागे पूर्णाकार द्विभुज उत्सवमूर्ती होती आणि तिच्या पाठीमागे नीळसर टाईल्स बसवलेल्या भिंतीत आणखी एक पूर्णाकार मूर्ती होती मधल्या मूर्तीने आमचे विशेष लक्ष वेधून घेतले कारण ही मूर्ती घोड्यावर बसली होती उजव्या हातात खड्ग उपसलेले होते डाव्या हातात ढाल होती डोक्याला मुंडाशासारखे शिरस्त्राण होते

नागेश-दर्शन घेऊन झाल्यावर उजव्या बाजूचा लक्ष्मीनारायण व डाव्या हाताचा गणपती या परिवारदैवताचे दर्शन घेणे हा शिरस्ता होता. त्याप्रमाणे दर्शन घेऊन नंतर प्रदक्षिणेच्या मार्गाला लागलो

प्रदक्षिणा संपवून चौक्यावर बसलो तेव्हा देसाई म्हणाला, "हा नागेश ."

त्याला मध्येच थांबवून मी म्हणालो, "हा नागेश कुठल्या गावाहून इथे आला असं तूं विचारणार आहेस होय ना?"

"हो. कारण आतापर्यंत पाहिलेले बहुतेक सर्व देव बाहेरून तिथे वस्तीला आले आहेत असं तू सांगितलंस जिथून जिथून ते आले त्या गावाची नावं सांगितलीस तेव्हा नागेश देवाचं मूळ गाव कोणतं ते आता सांग पाहू हा नागेश सुद्धा कुठून तरी आला असलाच पाहिजे"

"तुझा प्रश्न बरोबर आहे पण उत्तर चुकीचं आहे"

"म्हणजे?"

"म्हणजे नागेश हा पोर्तुगीजांच्या बाटवाबाटवीच्या काळात इथं आलेला नाही बाटवाबाटवीचा नी देवळं मोडण्याचा काळ हा १५४० च्या पुढला अन् त्यापूर्वी सव्वाशे वर्षं म्हणजे इ स १४१३ साली

कोरलेल्या लेखात या नागेशाचा उल्लेख आहे गावकऱ्यानी हा गाव नागेश व शेजारच्या महालक्ष्मीला दान दिला त्यावर विजयनगर सरकारचं अधिकृत शिक्कामोर्तब झाल आहे

"आणखी एक तुला सागतो हा नागेश १४१३ वर्षी इथं बांदोड्याला असला तरी त्याच्यापूर्वी तीनचारशे वर्षं तो इथ नव्हता तो होता प्रियोळला सन १०९९ चा कदंब काळातला एक ताम्रपट सापडला आहे त्यात त्रिभुवनमल्लाने प्रियोळच्या नागेश्वराला—नागेशाचा नागेश्वर असा उल्लेख त्यात केला आहे बर का? तर या नागेश्वर देवाला १९ निष्काचे दानपत्र नागेश्वरराय ब्राह्मणाच्या नावे केले आहे त्यापूर्वी नागेश किती काळ प्रियोळला होता याचे लिखित पुरावे मात्र उपलब्ध नाहीत. प्रियोळला तो देसाई याच्या भाटात होता इतके मात्र कळते."

"पण तरी सुद्धा नागेश बाहेरून आला हे माझ उत्तर चुकीचं नसाव" देसाई म्हणाला

"ते कसं?" मी विचारले

"सारस्वतानी उत्तर हिंदुस्थानातून येताना जे कुलदेव आणले अस सह्याद्रीखड म्हणतं, कोकणाख्यात सागत, त्यात या नागेशाचा उल्लेख आहे की नाही?"

"हो, आहे ना पण तरी सुद्धा नागेश इथलाच की सारस्वतांनी कुलदेव म्हणून बरोबर आणला याबद्दल ठामपणे कांही सागता येत नाही मुख्य म्हणजे नागेश, मंगेश, रामनाथ, दामोदर ही शिवलिंगे आहेत आणि सशोधकानी सिद्ध केलं आहे की लिंगदेवता या आर्यांच्या नसून कोल, गोंड, गावडा या ऑस्ट्रिक लोकाच्या होत्या सस्कृती व वंशसमन्वयाच्या काळात आर्यांनी ही लिंगदेवता आपल्यात सामावून घेतली तेव्हा गोव्यात आलेल्या आर्यांच्या टोळीने गोव्यात आल्यावर बांदोडेची ही लिंगदेवताही आपली कुलदेवता म्हणून स्वीकारली असली पाहिजे"

"असेल, तसही असेल" देसाई म्हणाला, "माझ्या अभ्यासाचा काही हा विषय नाही पण मला एक साग लिंगदेवता या मूळ ऑस्ट्रिक लोकाच्या असल्या तरी या देवतेला नागेश हे नाव का पडलं? मंगेशाप्रमाणे या नागेशाला हे नाव का पडलं ते सागणारी एकादी दतकथा

आहे का ? ”

“ नाही दंतकथा नाही पण नागेशाला नागेश हे नाव पडायचं कारण एवढंच की गोव्यात एके काळी नाग लोकांची वस्ती होती... ह, थांब काही विचारू नकोस तू न विचारता मीच पुढे सांगतो हे नाग म्हणजे नागालँडमधील नाग नव्हेत. आपल्या पुराणात तक्षक, वासुकी, शेष, कर्कोटक वगैरे नागांचे उल्लेख आहेत ना, ते सर्प नव्हते नाग नावाच्या एका जमातीचे ते नेते होते या नाग जमातींची मूळ वसती कोकण व मलबारात होती असं आपले राजवाडे सांगतात तल, अतल, पाताल, रसातळ ही त्यांची राहाण्याची ठिकाणं ती गोव्यापासून मलबार-पर्यंतच्या कोकणपट्टीत होती. त्यातले काही नाग आर्यांचे मित्र होते, काही शत्रू होते त्यांच्यात मातृसत्ताक पद्धती होती गोव्यापासून खालच्या कोकण-पट्टीत ही पद्धती काही जातींत प्रचलित होती. तुळूनाडूत या पद्धतीला अळीय संतान पद्धती म्हणतात गोव्यात नागांची वस्ती होती हे नागझरी, नागवे, नागनाथ अशा नावांवरून दिसतं ”

देवालयातून बाहेर पडलो आणि अर्ध्या मिनिटातच समोरच्या महाद्वारात आलो तेव्हा इतर देवस्थानातल्याप्रमाणे तलाव दिसला. गोव्या-तील सर्व देवस्थानात नागेशाचा हा तलाव सर्वांगसुंदर असल्याची ख्याती आहे आणि ती खरीच आहे तुडुंब भरलेल्या या जलाशयाचे पाणी इतके नितळ होते की तळातील वस्तू वरून स्पष्ट दिसत होत्या या निळावंतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विरुद्ध बाजूच्या पायऱ्यावर उभे राहिल्या-नंतर कित्येक यार्ड दूर मंदिराच्या गर्भागारातील नागेशमूर्ती आणि दीपमाळा यांचे प्रतिबिंब या तलावात दिसते म्हणतात आम्ही ते पाहू शकलो नाही कारण ठराविक दिवसात म्हणजे श्रावण ते आश्विन महिन्यांतच ते दिसते असे आम्हाला सांगण्यात आले कदाचित पावसाळ्यातील जड हवेत ते दिसत असेल

तलाव पाहून आम्ही पुन्हा प्राकारात आलो तेव्हा आणखी एक गोष्ट देसाईच्या लक्षात आली तो म्हणाला, “ या देवस्थानाला सभामंडप नाही ! ”

“ कसा असेल ? ” मी विचारले देवस्थानासमोर भरपूर प्राकार

असले तरच सभामंडप बांधता येतो. अन् इथे तर मुखमंडप नी समोरची अग्रशाळा यामध्ये बांधकाम करण्याएवढी जागाच नाही."

"मग इथे नाटके वगैरे कुठे होतात?"

"चला या माझ्याबरोबर."

देवालयाच्या डाव्या बाजूच्या प्राकारात आणखी एक महाद्वार होते त्या दारातून आम्ही बाहेर पडलो. उजव्या बाजूला सौंदेकराचा राजवाडा होता. राजवाड्यासमोर मोठे पटांगण होते. या पटांगणात उत्सवाच्या वेळी स्टेज उभारले जाते आणि नाटके केली जातात. इथेच नागेशाचा चारचाकी मोठा रथ ओढला जातो. नागेशाचा कार्तिक पौर्णिमेचा रथोत्सव हा एक गाजलेला सोहळा.

सौंदेकराचा राजवाडा असा त्या वाड्याचा मी नुकताच उल्लेख केला. या सौंदेकराचा थोडा इतिहास सांगितल्याशिवाय पुढे जाता येत नाही. कारण पोर्तुगीजांच्या ताब्यात गेलेल्या गोव्याच्या प्रदेशात बाटवा-बाटवी होऊन आमच्या देवदेवता जेव्हा परागंदा झाल्या तेव्हा या सौंदे-कराच्या राज्यातच त्यातल्या बहुसंख्यांना आसरा मिळाला.

सौंदे हे उत्तर कानडा जिल्ह्यात सिरसीजवळचे एक गाव. या ठिकाणी विजयनगरच्या काळात व्यंकटपती राजेंद्र यांनी एक छोटे संस्थान निर्माण केले. हळुहळू मंगळूरपासून उत्तरेला गोव्यापर्यंतचा मुलुख त्यांच्या कबजात आला. ही सत्ता सार्वभौम नव्हती. विजयनगर, विजापूर, नंतर मराठे यांना करभार देऊन त्यांनी मांडलीक म्हणून आपल्या मुलखात राज्य केले. १७६३ मध्ये हैदरने सौंदेच्या राजाला पराभूत करून त्याची राजधानी काबीज केली तेव्हा आपल्या उत्तरेकडच्या मुलखात बांदोडे येथे सौंदेचा राजा येऊन राहिला. हे राजघराणे सौंद्याहून आले म्हणून गोव्यात त्याला सौंदेकर हे नांव पडले. हे घराणे गोव्यात आले तेव्हा खरे म्हणजे गोव्यातला फोंड्यापासून पोळेपर्यंतचा मुलुख त्यांच्या ताब्यात नव्हताच. हैदरविरुद्ध लढाई करायला पोर्तुगीजांकडे त्यांनी तो गहाण टाकला होता व त्यांची मदत मिळविली होती. पण शेवटी ज्याच्या हाती ससा तो पारधी या न्यायाने पोर्तुगीजांनी १७९१ मध्ये सौंदेकर राजे सवाई बसवसिंग यांच्याशी सौंदेकरांना वर्षासन देण्याचा करार करून तो प्रदेश स्वतःच्या राज्यास

जोडला तेव्हापासून गोव्यातल्या या राजघराण्यातील पुरुषाची राजे ही पदवी राहिली, पण अधिकार मात्र गेले, ते कायमचेच !

कसेही असो, नागेशाच्या सन्निध येऊन राहिल्यानंतर हे कानडी राजे कोंकणी नागेशाला भजू लागले मनोभावे त्याची पूजाअर्चा करू लागले या भक्तिभावामुळेच नागेशाचे कांही उत्सव राजवाड्याच्या पटांगणात करण्याची प्रथा सुरू झाली

ही गोव्यातली देवमंदिरे केव्हा व कुणी बांधली याचा नेमका पत्ता लागत नसला तरी नागेशाचे आजचे देवस्थान त्याला अपवाद आहे इ स १७८० साली कुंभारजुव्याच्या नारायण फोंडे कामत यांच्या घराण्यातील दोन विधवा बायानी मूळ देवालयाचा जीर्णोद्धार करून हे मंदिर बांधले असा लेखी उल्लेख सांपडला आहे म्हणजे दोनशे वर्षांपूर्वीच्या गोव्यातील मंदिरशिल्पाची या देवालयावरून कल्पना करता येते.

सध्या या देवस्थानात रस्त्याच्या बाजूने व उजव्या अंगाने नवीन अग्रशाळेचे बांधकाम केले आहे. अगदी आधुनिक पद्धतीचे आणि तरीही पारंपरिक. तळमजल्यावर शुभकार्यासाठी एक सुंदर हॉल व पहिल्या मजल्यावर प्रवाशांसाठी, यात्रेकरूसाठी स्वयंपूर्ण खोल्या. देवळाच्या उजव्या बाजूची अग्रशाळा फार मोठी आहे एका वेळी दोनतीन मंगलकार्यें इथे होऊ शकतात

नागेश देवस्थानचे आणखी एक सांगण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे सारस्वतातील स्मार्त आणि वैष्णव अशा दोन्ही पंथातील घराणी त्याचे महाजन आहेत सारस्वत समाज हा मूळचा शिवोपासक असे सांगतात पण सात शतकांपूर्वी होऊन गेलेल्या मध्वाचार्यांच्या परंपरेतील नारायणतीर्थ नांवाचे स्वामीजी द्वैतमतप्रचारार्थ गोव्यात आले तेव्हा मूळ स्मार्त संप्रदायापैकी अनेक सारस्वतानी या द्वैतमताचा स्वीकार केला हे द्वैतमत स्वीकारलेल्या या सारस्वताना वैष्णव असे संबोधण्यात येते गोव्यातील अनेक गावातील लोकानी समुदायशः या मताचा स्वीकार केल्यामुळे त्या गावातील देवालयात वैष्णवपूजापद्धती सुरू झाली म्हणूनच काही ठिकाणी, उदाहरणार्थ रामनाथ किंवा दामोदर या मूळ देवता लिंगरूपी असूनही भक्तानी त्या वैष्णवरूपी मानल्या. म्हणजे पंथ बदलला, पण कुळदेव बदलला नाही

इतर गावानी द्वैत मताची डाळ शिजू न दिल्यामुळे तिथली देवस्थाने व त्याचे महाजन शैव राहिले मंगेश व शातादुर्गा ही पूर्णपणे शैव देवस्थाने आहेत नागेश हे मात्र एकमेव देवस्थान असे आहे की जिथे अर्धे महाजन स्मार्त आहेत तर अर्धे वैष्णव पण सारस्वत पूर्वी सारे शैव होते व नंतर ते वैष्णव बनले ही कल्पना अनेक वैष्णवाना व वैष्णवाच्या धर्मपीठाला मान्य नाही वैष्णव किंवा नारायणी धर्म महाभारतात भीष्माने प्रतिपादिला आहे, किंबहुना तो साख्ययोगातच सागितला आहे असे त्याचे मत आहे आणि ते चुकीचेही नाही

"म्हणजे अर्धे सारस्वत शैव का आणि अर्धे वैष्णव का हे कोडे अजून सुटलेले नाही असेच ना?" देसाईने विचारले

जवळजवळ असेच आणखी एक गमत सागतो नागेशाचे बहुसख्य महाजन नाईक आडनाव लावतात मग ते स्मार्त असोत वा वैष्णव असोत नाईक आडनाव लावणाऱ्यात प्रतापराव सरदेसाईसुद्धा आहेत."

"सरदेसाई? म्हणजे विजापूरकराच्या काळात ज्यानी तलवार गाजविली तेच ना?"

"हो, तेच"

"मग बरोबर आहे"

"काय बरोबर आहे?"

"अरे, या नागेशाच्या हातात यांच्र सरदेसाईंच्या कुणा तरी पूर्वजानं तलवार दिली असेल! नाहीतर त्रिशूल धारण करणाऱ्या महादेवाच्या हातात खड्ग येणार कसे?" देसाई म्हणाला

सरदेसाईविषयी चर्चा चालू होती तेव्हा एकदम आठवले, इथे लक्ष्मणराव सरदेसाई राहातात मी देसाईला तसे म्हणालो तेव्हा त्याने विचारले, "म्हणजे जुन्या काळचे प्रसिद्ध कथालेखक?"

"होय"

"ते या गावचे?"

"ते या गावचे नव्हे पण शक्य तो एकातवासात राहून लेखन करावे म्हणून या देवस्थानात एक खोली घेऊन राहातात भेटू या का त्याना?"

" म्हणजे प्रश्न आहे की काय? चल " तेवढ्यात प्राकारात गजानन वझे भेटले त्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, " लक्ष्मणराव इथं नाहीत तूर्त मडगावला गेले आहेत अर्थात त्याना भेटण्याचा प्रश्नच मिटला मग मी देसाईला म्हणालो, " हे गजानन वझे देवस्थानचे एक पुजारी "

" वझे? म्हणजे गवई वझेबुवाचे कुणी लागतात का? "

" होय " वझे म्हणाले, " ते माझे आजोबा लागतात "

मी म्हटले, " अरे देसाई, वझेबुवा या नागेशी गावचेच बरं का त्याचं घर पाहायचंय तुला? चल दाखवतो "

प्राकारातून आम्ही रस्त्यावर आलो व समोरच्या बोळकंडीत गेलो. तिथे उजव्या हाताला असलेल्या घराकडे बोट दाखवीत म्हणालो, " हे वझेबुवांचं घर सुमारे चाळीस पंचेचाळीस वर्षांमागं त्यानी ते विकलं होय ना हो गजूभटजी? "

" होय. " वझेनी होकार दिला अन् मग त्या घराला लागून असलेल्या नव्या कोऱ्या दुमजली घराकडे बोट दाखवीत ते म्हणाले, " अन् बर का हो पाहुणे, हे दादा सातोस्कराच्या गावकर नामक जामाताचं घर ह्याला लागून रस्त्यावर आहे ते त्याचं जुनं घर हे गावकर म्हणजे मूळ नाईकच नागेश देवस्थानात त्यांना पहिला मान आहे. त्यांच्या पूर्वजांनी हे देवस्थान व गाव वसवण्यात पुढाकार घेतला म्हणून हे गावकर पहिल्या मानाचे "

देसाई म्हणाला, " हे वझे भेटले नसते तर या गृहस्थान पत्ता लागू दिला नसता आपली मुलगी इथे राहाते म्हणून. चला आता मंडळी, दादाच्या मुलीकडे जाऊन चहा पिऊ "

" ते शक्य नाही पाहुणे ती सारी मंडळी मुंबईला आहे घर बंद आहे " वझेभटजींनी परस्पर उत्तर दिले

# १३ : बांदोडयाची जगन्माता महालक्ष्मी

नागेश मंदिरापासून हाकेच्या अंतरावर महालक्ष्मी देवस्थान आहे बांदोडे गावातलेच हे आणखी एक मंदिर नागेशाच्या तलावाच्या काठाने व नंतर छोट्याशा रस्त्याने या महालक्ष्मी मंदिराकडे जाता येते

विद्वानांच्या म्हणण्यानुसार महालक्ष्मी ही लक्ष्मी असली तरी ती विष्णुपत्नी लक्ष्मी नव्हे ती आहे आदिशक्ती, आदिमाया दुर्गा देवीमाहात्म्यात तिच्या उत्पत्तीची कथा दिली आहे. एकदा देव-दानवाच्या युद्धात दानवाचा जय झाला दानवांचा प्रमुख महिषासुर हा त्रिजगताचा स्वामी बनला त्याला इंद्रपद प्राप्त झाले सारे देव लज्जित होऊन शिव व विष्णु यांच्याकडे गेले. देवानी त्यांची करुणा भाकली महिषासुराचा वध झाला नाही तर देवाना स्वर्गात उभे राहायलाही जागा उरणार नाही हे सत्य त्याना कळून चुकले शकर व विष्णु क्रुद्ध झाले. त्याच्या मुखातून महान् तेज बाहेर पडले इतर देवांच्या शरीरातूनही असेच तेज निघाले हे सर्व तेज मग एकत्र झाले आणि त्यातून एक देवता प्रगट झाली. ही जगदंबा महालक्ष्मी ती प्रगट झाली तेव्हाच्या तिच्या स्वरूपाचे वर्णन दुर्गासप्तशतीत आले आहे

शाक्त संप्रदायाचे अनुयायी ज्या आदिशक्तीची उपासना करतात ती महालक्ष्मीच होय ती चतुर्भुज असून तिच्या चार हातात फळ, गदा, ढाल व कपाल अशा वस्तू असतात तिच्या मस्तकावर सर्प, लिंग व योनी असते

महालक्ष्मी व दुर्गा यांच्यामध्ये अभेद असल्याचे हे वर्णन, देवीमाहात्म्य, दुर्गासप्तशती इ. ग्रंथांवरून दिसते परंतु गोव्यातल्या दुर्गा व महालक्ष्मी या महिषासुरमर्दिनी असल्या तरी वामाचारी शाक्ताच्या उपास्य देवता नाहीत गोव्यात शाक्त पथाचा उदय कधी झालाच नाही याला अपवादात्मक असा एक उल्लेख माझ्या वाचनात आला तो असा —

माशेल गावातील सुप्रसिद्ध अमरकोशाचे टीकाकार महेश्वरभट्ट सुखठणकर हे देव्युपासक होते कवळेची शातादुर्गा हिचे ते कुळावी त्याना शाक्तमार्गातले गुह्य ज्ञान अवगत होते असे सारस्वत रत्नमालाकार मठस्थ

गणेश रामचंद्र शर्मा सांगतात त्यांच्याच काळात एक शाक्तमार्गी महापंडित भास्करराय हे नारवे येथे सप्तकोटीश्वराच्या सन्निध राहात असत श्रीसप्तशतीवर गुप्तवती नावाची टीका त्यांनी लिहिली आहे ही टीका लिहिताना भास्कररायांनी महेश्वरभट्टाची मदत घेतली होती

भास्कररायाबद्दल विशेष माहिती मिळत नाही परंतु महेश्वरशास्त्री शाक्त होते ही माहिती मात्र मला इतरत्र कुठेही सापडली नाही

नुकतेच जे मी ग्रंथांतर्गत असे महालक्ष्मीचे वर्णन केले त्याप्रमाणे बादोड्याची ही महालक्ष्मी आहे का ? प्रत्यक्षात या महालक्ष्मीला चार हात आहेत हे खरे तिच्या दोन डाव्या हातात फळ व ढाल आहे पण उजव्या हातात गदेऐवजी दंड आहे आणि पुढल्या उजव्या हातात कपाल नसावे डोक्यावर सर्प नाही की योनी नाही पण लिंग आहे असे मात्र डॉ गुणे म्हणतात आणि ही महालक्ष्मी कोल्हापूरच्या महालक्ष्मीसारखीच आहे असे सांगतात पण प्रत्यक्षात ते लिंग नसून मुकुट असावा असे वाटते देवी उभी असून डाव्या पायाशी सिंहवाहन आहे महिषासुराचा मात्र पत्ता नाही एक विशेष गोष्ट म्हणजे महालक्ष्मीच्या गर्भागारातच नारायणाची मूर्ती आहे त्यामुळे शंकेला जागा राहाते की ही खरीच महिषासुरमर्दिनी दुर्गा आहे की विष्णुपत्नी लक्ष्मी आहे ? गोंव्यातील अनेक देवस्थानात लक्ष्मीसह विष्णु, नारायण वा केशव दिसतो त्यामुळे ही शंका अधिक दृढ होते

बादोड्याच्या देवस्थानाचे खास वर्णन करून सांगायचे असे काही वैशिष्ट्य नाही इतर देवालयाप्रमाणेच ह्या देवळाचाही ब्लूप्रिंट आहे हां, एक वैशिष्ट्य जरूर होते, ते म्हणजे मंदिराचा चौक—महामंडप या प्रमाणबद्ध महामंडपाला लाकडी खांब होते ते खांब आणि वरचे छत कोरीव कामाचे उत्कृष्ट नमुने होते. परंतु १९१६ मध्ये महामंडपाचा जीर्णोद्धार झाला व हे खांब काढून टाकून दगडी बांधकाम करण्यात आले त्यामुळे महालक्ष्मीचा चौक हा इतर देवळाप्रमाणेच झाला

या महालक्ष्मीने कोलासुराचा वध केल्याची एक कथा पुराणात आहे कोलासूर हा शेती करणाऱ्या आर्यांचा शत्रू शेती करण्यात तो त्यांना अडथळा आणी त्याच्या वधाने आर्यांच्या कृषिकार्यांपुढील अडथळे

नाहीसे झाले. जमीन फुलू-फळू लागली या दृष्टीने महालक्ष्मी ही कृषि-देवताही आहे

परंतु बांदोड्याच्या या कृषिदेवता महालक्ष्मीने सरस्वतीच्या अधिकारावर आक्रमण करून संगीतक्षेत्रावर आपला प्रभाव पाडला हे विशेष गोव्याची भूमी ही कलाभूमी म्हणून ख्यातनाम आहे नाटक आणि संगीताच्या क्षेत्रात गोमंतकाने विशेष कर्तबगारी दाखविली आहे ही कर्तबगारी दाखविली ती या महालक्ष्मीच्या प्रेरणेने तिच्या कृपाछत्राखालीच गोव्यातील संगीताला कंठ फुटला तिच्या परिसरातच गोव्यातल्या पहिल्या पिढीने संगीताच्या आराधनेला प्रारंभ केला आणि हा प्रारंभ केला तो महालक्ष्मी-मंदिराच्या चौकात एका अद्वितीय गायनाचे स्वर निनादले म्हणून म्हणूनच गोमंतकातील शास्त्रीय, हिंदुस्थानी संगीताची गंगोत्री म्हणून बांदोड्याला ओळखले पाहिजे पाहिजे असे मी म्हणतो, कारण गोमंतकीय संगीतकलेचा हा जुना इतिहास खुद्द गोमंतकीयानाच माहीत नाही माहीत आहे ते एवढेच की गोमंतकाने संगीतक्षेत्रात खूप नाव कमावले आहे

खूप खूप वर्षांमागे गोमंतकातील देवस्थानांतून गायनवादन होत असे पण त्यात व्यासंग किंवा शास्त्र याचा अभाव होता पण १८७० साली मालवणचे विठोबाअण्णा हडप नावाचे एक थोर गायक गोव्यात आले आणि याच महालक्ष्मीच्या चौकावर त्यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला ख्याल गायकी ही काय चीज असते आणि शास्त्रीय गायन म्हणजे काय याचा गोमंतकीयाना पहिला साक्षात्कार त्या वेळी झाला

लगेच बांदोड्याच्या सरस्वतीबाई बांदोडकरानी त्याच्याकडून ख्याल, प्रबंध व ध्रुपद गायकीचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली आणि काही काळानंतर याच महालक्ष्मीच्या पालखीसमोर, झुलव्याऐवजी तिने ध्रुपद गायकीच्या चिजा गायिल्या तेव्हा सारा कलावंत समाज स्तिमित होऊन गेला हे काहीतरी नवे आहे, शिकण्यासारखे आहे असे त्यास वाटू लागले त्यानंतर रामनाथीच्या शाणेबाईने विठोबाअण्णाकडून शास्त्रीय गायकीचे धडे घेतले इथून गोव्यातील संगीत परंपरेला प्रारंभ झाला विठोबाअण्णानंतर कित्येक वर्षांनी वझेबुवा बांदोड्याला येऊन राहिले त्याच्याकडूनही अनेक कलावंतानी शिक्षण घेतले सरस्वतीबाईंच्या घराण्यातच पुढे केशर-

बाई बादोडकर, ज्योत्स्ना भोळे, गिरिजाबाई केळेकर या नामांकित गायिका झाल्या

या दृष्टीनेच बादोडे हे गोमंतकीय संगीतकलेचे उगमस्थान आणि जगन्माता महालक्ष्मी ही त्याची प्रेरक शक्ती असे मानायला हवे

सर्व देऊळ पाहून झाले गर्भागारातील महालक्ष्मीच्या उजव्या बाजूस नारायणदेव आहे, त्याचे दर्शन घेतले आणि तेवढ्यात मला देसाईंच्या सनातन प्रश्नाची आठवण झाली "ही देवता बाटवाबाटवीच्या काळात कुठून आली?"

पण हा प्रश्न देसाईंने विचारण्यापूर्वीच मी म्हटले, "ही महालक्ष्मी साष्टी तालुक्यातल्या कोलवे गावाहून आली असे काही लोकाचे म्हणणे आहे तर काहींचे म्हणणे नागेशाप्रमाणे ती इथली मूळचीच आहे बादोड्याच्या विजयनगरकालीन इ स १४१३ मधील शिलालेखात नागेशाप्रमाणेच या महालक्ष्मीचा उल्लेख आहे, असा पुरावा ते पुढे करतात पण आणखी काही समन्वयवादी संशोधकाचा एक तृतीय पंथ आहे त्याचे म्हणणे महालक्ष्मीची पूजामूर्ती आहे ती मूळची इथली. नंतर कोलवेहून दुसरी महालक्ष्मी आली आणि या दोन्ही देवतात मग पुढे अद्वैत निर्माण झाले. ही दुसरी मूर्ती पंचरशी धातूची आहे इथे महालक्ष्मीचे दोन मुख्य उत्सव होतात शिवरात्रीला होतो तो मूळ महालक्ष्मीचा, तर रामनवमीस होतो कोलव्याहून आलेल्या देवतेचा कारण रामनवमीच्या दिवशीच ती कोलव्याहून बादोड्याला आल्याचे सागतात

मंदिराबाहेर पडल्यावर शेजारीच खळनाथाचे मंदिर दिसले या मंदिरात एक विशेष गोष्ट होती ती म्हणजे लाकडी पॅनेल्स विष्णूची जी चोवीस व्यूह नामे आहेत त्याची वेगवेगळी ध्याने दाखविणारी ही पॅनेल्स आहेत पूर्वी ही पॅनेल्स महालक्ष्मीच्या मंदिरात होती पण महालक्ष्मी मंदिराच्या जीर्णोद्धारानतर ती खळनाथ मंदिरात बसविली जीर्णोद्धार न करता जी जुनी देवालये गोव्यात आहेत त्यातील बहुतेक ठिकाणच्या चौकावर छताला लागून अशी पॅनेल्स असतातच

उशीर एवढा झाला होता की आता निघायलाच हवे होते

# १४ : वैष्णवांचा देव शिवरूपी रामनाथ

आता साडेसात वाजले होते आसमंतात काळोख दाटला होता साऱ्या दिवसाचा शीण शरीराला जाणवत होता कुठेतरी मुक्काम करणे भाग होते

पण माझ्या नियोजित कार्यक्रमाप्रमाणे अजून दोन देवस्थाने पाहायची शिल्लक होती एका मैलावरचा रामनाथ आणि त्यापुढे हाकेच्या अंतरावर असलेली कवळेची शांतादुर्गा

चार पाच मिनिटात झाडी आणि शेते यामधून रस्ता कापीत रामनाथीला पोचलो रामनाथी हा गाव म्हणजे बांदोडेचाच एक भाग एकाच गावात अनेक देव वस्तीला आले तेव्हा त्या त्या देवाच्या नावावरून गांवच्या निरनिराळ्या भागांना ती ती नावे पडली एवढेच

रस्त्यापासून किंचित् चढावावर असलेल्या रामनाथ-मंदिराच्या प्राकाराकडे जाताना प्रथम तलाव दिसला तलावाचे कौतुक पाहण्याला आता उरले नव्हते म्हणून त्याकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकून महाद्वारातून प्राकारात पाय ठेवला सगळीकडे विजेच्या दिव्यांचा झगमगाट दिसत होता इथूनच कित्येक यार्ड दूर असलेल्या रामनाथाचे प्रथम दर्शन झाले गर्भागारातील दीपमालाही सभामंडपात शिरताना स्पष्ट दिसू लागल्या

रामनाथाचा सभामंडप ही एक आगळी चीज आहे गोव्यातल्या इतर कुठल्याही देवस्थानात असा सभामंडप नाही एकाद्या छोट्या थिएटरप्रमाणे त्याची रचना आहे. मध्ये कुठेही खांब नाहीत प्रेक्षागृहातील मागच्या बाजूला तरंगती गॅलरी आहे मधोमध रामनाथाच्या उत्सवमूर्तीला बसवायची जागा राखून ठेवली आहे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इतर सभामंडपांत असतो तसा इथे पक्का दगडी रंगमंच नाही प्रवेशद्वाराशी दोन बाजूंना दोन खोल्या आहेत. त्याच्यामध्ये उत्सवाच्या वेळी फळ्या टाकून रंगमंच उभारला जातो आणि खोल्यांचा उपयोग ग्रीनरूम्स म्हणून

केला जातो फळ्या काढल्या म्हणजे इतर दिवसात मोकळे नी भव्य प्रवेशद्वार तयार होते अगदी अलीकडे म्हणजे १९५१ साली हा सभामंडप बांधण्यात आला

या सभामंडपात शिवरात्रीच्या उत्सवात नाटके होतात ती गोव्यात खूप गाजली आहेत रामनाथची महाजनमंडळी ही खूप नाट्यप्रेमी आहे नवनवीन नाटके बसवून ती रामनाथासमोर सादर करणे हा त्याचा शौक यासाठी त्यानी एक नाट्यमंडळ स्थापन केले आहे निरनिराळ्या पेशातील उच्चपदस्थ मंडळीही एकतर नाटकाची हौस म्हणून आणि दुसरे देवाची सेवा म्हणून या नाटकात भाग घेतात

आणि ही परंपरा गेली शेदीडशे वर्षं चालू आहे नुकतेच वारलेले शतायुषी रघुवीर नामनाथकर—ज्यानी गंधर्व कंपनीचे पहिले पडदे रंगवले त्याचं बालपण इथंच गेले त्यानी या रामनाथाच्या रंगभूमीसाठी खूप श्रम घेतले. पुढे ते गोव्याबाहेर पडले तरी परंपरा खंडित झाली नाही. नव्या उमेदीची नवीन माणसं पुढे आली गोव्यातल्या अनेक देवस्थानातून अशी नाट्यपरंपरा चालत आली आहे या हौशी, उत्सवी रंगभूमीनेच महाराष्ट्राला कित्येक चांगले नट दिले आहेत

देवालयात प्रवेश केला तेव्हा रात्रीच्या पूजा-आरतीची तयारी चालू होती चौकावर पुराणिकासाठी चौरंग मांडलेला होता आणि तिथे एक बाई तेलवात करीत होती दोन्ही बाजूंनी लांबचलांब सतरंज्या पसरलेल्या होत्या अंतराळाच्या द्वारपट्टिकेजवळ तीर्थप्रसाद घेऊन भटजी बसले होते गाभाऱ्यातही एक भटजी नंदादीपातील तेलवात प्रज्वलित करीत होते आम्ही गाभाऱ्यातील रामनाथमूर्ती न्याहाळू लागलो. घोड्यावर बसलेली, चेहऱ्यावर दाढीमिशा असलेली, डोक्याला पगडी घातलेली, पायघोळ धोतर नेसून आसनावर बसलेली रामनाथ-मूर्ती डाव्या हातात ढाल घेऊन व उजव्या हातातली तलवार उगारून भक्तावरील संकटाशी मुकाबला करण्यासाठी सज्ज होती पण मौज ही की युद्धाच्या पवित्र्यात अश्वारूढ झालेल्या महारुद्राच्या चेहऱ्यावरील भाव मात्र सात्त्विक होते, स्निग्ध होते गोव्यातल्या निसर्गात आणि मानवातही जिथे उग्रता प्रत्ययाला येत नाही तिथे गोव्यात वस्तीला आलेल्या दुर्गा, रुद्र आणि रुद्रगणाच्या चेहऱ्यावर

तरी ती कशी दिसणार?

"हा रामनाथ सुद्धा महादेवच आहे का?" देसाईने विचारले.

"होय नागेशाप्रमाणेच हा रामनाथही प्रत्यक्ष शिव आहे रावणवधानंतर आपल्या हातून ब्रह्महत्या घडली म्हणून दोषपरिहारार्थ काय करावे असा प्रश्न रामाने ऋषिमुनींना विचारला तेव्हा शिवाची आराधना कर असा सल्ला त्यांनी दिला तो शिरोधार्य मानून रामाने धनुष्कोडीजवळ रामेश्वराची स्थापना केली व त्याची उपासना तो करू लागला. सारस्वतांच्या दोन कुटुंबांनी आपला कुलदेव म्हणून त्याला गोव्यात आणला तोच हा रामनाथ"

"अरे, पण सारस्वत जर उत्तरेतून गोव्यात आले तर दक्षिणेतला रामेश्वर त्यांनी गोव्यात कसा काय आणला?" देसाईने विचारले

"या प्रश्नाचे माझ्याजवळ तरी उत्तर नाही" मी म्हणालो "परंपरेनं ही दंतकथा चालत आली आहे. अन् पुन्हा रामनाथ हा महादेव असला तरी त्याचे महाजन शैव नाहीत"

"म्हणजे नागेशाप्रमाणे!" देसाई म्हणाला.

"होय पण नागेशाचे अर्धे महाजन वैष्णव आहेत, तर अर्धे शैव पण रामनाथाचे सर्वच वैष्णव रामनाथाच्या मागे, थोड्या उंचीवर लक्ष्मी-नारायणाच्या मूर्ती दिसतात ना, त्याचे कारण वैष्णव पंथाचा प्रभाव पूर्वी या लक्ष्मीनारायणाचं वेगळं मंदिर होतं पण १९०५ साली रामनाथाचे हे नवीन मंदिर बांधलं त्या वेळी वैष्णवांचे धर्मगुरु श्रीमदिंदिराकांतस्वामीजी यांच्या आज्ञेवरून लक्ष्मीनारायणाला रामनाथाच्या गर्भागारात वरचे स्थान देण्यात आलं इतकंच नव्हे तर इथे शैव पद्धतीनं पूजादी विधी होत, त्याऐवजी वैष्णवपरंपरा सुरू करण्यात आली रामनाथाच्या कपाळावर ती लाल टिकली नी वर काळी रेघ दिसते ते काय आहे ते तुला माहीत आहे?"

"नाही

"वैष्णव पंथाचे ते प्रतीक आहे शैवपंथीय भस्मलेपन करतात तर वैष्णव अंगावर गोपीचंदनाचे टिळे लावतात. मुद्राधारण करतात पण याशिवाय कपाळावर लाल गंध व त्यावर धूपारतीतील अंगाऱ्याची काळी रेघ ओढतात तू मध्वाचार्यांचं चित्र पाहिलंस तर त्यांच्या कपाळावर सुद्धा

हे चिन्ह दिसेल मोठी गंमत आहे नाही ? ''

" हो ना आज शैव किंवा वैष्णवच नव्हे तर जातिभेदानाच सुरुंग लागण्याची वेळ आली आहे, तिथे या पंथाना अन् त्याच्या बाह्य चिन्हाना असं महत्त्व काय उरलं आहे ? ''

" महत्त्व उरलेलं नाही हे खरं. पण आपण हिंदू लोक रूढिप्रिय आहो सामाजिक क्षेत्रात आपण जातिभेदाची बरीच बंधने तोडून टाकली आहेत. पण धार्मिक क्षेत्रात ती तोडायला अजून आपल्याला धीर होत नाही या रामनाथचंच पाहा गोव्यातल्या नागेशासारख्या मंदिरात उच्चवर्णीय स्त्रियाना शिवलिंगावर अभिषेक करायला मोकळीक आहे पण दुसऱ्या बऱ्याच मंदिरात हे स्वातंत्र्य नाही. हे बंधन मोडून काढायची अनेक महाजनाची इच्छा आहे. पण सर्वेषाम् अविरोधेन हे होत नाही अस्पृश्याना नी आविंधाना अलीकडे गोवामुक्तीनंतर चौकापर्यंत प्रवेश मिळाला आहे पण गाभाऱ्यात ! छे छे ! हे अब्रह्मण्यम् कोणता ब्राह्मण मान्य करील ? ''

रामनाथाचे यथासांग दर्शन घेऊन आम्ही मंदिराच्या उजव्या बाजूकडील अर्धमंडपात गेलो. हे कामाक्षीमंदिर ही कामाक्षा व डाव्या बाजूच्या अर्धमंडपातली शांतादुर्गा या उपदैवताना मुख्य देवालयात जागा देण्यात आली आहे वेताळ आणि काळभैरव या उपदैवताची प्राकारात स्वतन्त्र छोटी मंदिरे आहेत ही जी उपदैवते प्रत्येक देवस्थानात असतात त्याना पंचिष्टे किंवा परिवार दैवते म्हटले जाते. पुष्कळ देवस्थानातल्या या उपदैवतापैकी काही इतर ठिकाणी मुख्य दैवते असतात रामनाथींची कामाक्षाच बघा ना, ही पूर्वीची राय गांवातली आणि बाटवाबाटवीच्या काळात जी शिरोड्याला जाऊन स्थायिक झाली ती शांतादुर्गा ही कवळेची याशिवाय या पंचिष्टांत एकादा गणपती असतो मुख्य विष्णुमंदिर असले तर एकादे उपदैवत शिवस्वरूपी असते, मुख्य शिवमंदिरात एकाद्या नारायणाला उपदैवतांत स्थान दिले जाते मूळ दैवत--पंचायतनाच्या कल्पनेतून ही पंचिष्टरचना आपल्या देवस्थानात आणि धर्मकृत्यात आली आहे गणेश, विष्णु, शिव, शक्ती व सूर्य या आपल्या हिंदू धर्मातील महत्त्वाच्या देवता त्याच्या उपासनेचे वेगवेगळे पंथ निर्माण होऊन त्याच्यात वैमनस्य निर्माण झाले

तेव्हा या सर्व पंथाचा समन्वय साधून धर्मातले हे अराजक नाहीसे करण्याचा मार्ग म्हणून पंचायतन--पूजा प्रचारात आली '**एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति** या ऋग्वेदातील मंत्रात या कल्पनेचे जे बीज होते त्याचाच उपयोग विविधतेतून एकतेकडे नेण्यासाठी आपल्या उदारमतवादी पूर्वजानी ही पंचायतन--कल्पना निर्माण करण्यासाठी केला.

''गोव्यातल्या या पंचिष्टात भूमिदेवता व शिवगण याचाही समावेश होतो भूमिदेवता ही मातृदेवता असल्याचं नी तिचा आर्यांनी स्वीकार केल्याचं मी तुम्हाला मघाशी वेलिंगाच्या सातेरी देवस्थानात सांगितलं होत आठवतं ना?'

"हो" देसाई म्हणाला

पण गोव्यात कांही ठिकाणी भैरव, कालभैरव, खळनाथ, भूतनाथ, वीरभद्र, वेताळ अशा काही शिवगणानाही ग्रामदेवतांचा मान दिला जातो. पण ही गोष्ट मात्र गोव्यातच दिसत नाही दक्षिण भारतात भूमिका--देवतेचे पर्याय पेडम्मा, पोलेरम्मा, एल्लम्मा असे आहेत, म्हणजे दक्षिण भारतात ग्रामदेवता ही स्त्रीरूप आहे तर उत्तर भारतातील ग्रामदेवता या पुरुषरूपी आहेत ते पुरुषरूपी का? तर ते ग्रामरक्षक आहेत म्हणून म्हणजे स्त्रीदेवता ही सर्जनाचे प्रतीक तर पुरुषदेवता ही संरक्षणाचे प्रतीक गावाचे परचक्रा-पासून, रोगापासून, अरिष्टापासून रक्षण करणारे हे ग्रामरक्षक यानाच क्षेत्र पाल ही संज्ञा लावली जाते गोव्यात तर क्षेत्रपाल-खेत्री नांवाचा एक वेगळाच देव आहे या ग्रामदेवता उग्रदेवता म्हणून समजल्या जातात त्याना रोट, कोंबडी देऊन संतुष्ट करावे लागते

संस्कृतिसंगमाच्या कालात या पुरुष ग्रामदेवताचाही स्वीकार आर्य-कुलांना करावा लागला आणि त्याना शिवगणाची जागा द्यावी लागली गोव्यातल्या प्रमुख देवताच्या परिवारदेवतात या ग्रामदेवताचा समावेश झाला तो असा वेताळ तर शिवगणाचा सेनापती म्हणून त्याचे माहात्म्य फार इथल्या रामनाथ संस्थानातच पाहा ना रामनाथाची अनेक महाजन घराणी अशी आहेत की वेताळाचा कौल घेतल्याशिवाय त्याच्या शुभ-कार्याला प्रारंभच होणार नाही

वेताळ हा कांही ठिकाणी नग्न दाखविला जातो "नागडो वेताळ" या नावाने तो इथे प्रसिद्ध आहे नेतुर्लीच्या नग्न वेताळाची गोव्यात फार प्रसिद्धी आहे

कामाक्षा देवतेचे दर्शन घेत असताना भटजींनी एक विशेष गोष्ट सांगितली दर एकादशीला कामाक्षा देवीला पंढरपूरच्या विठ्ठलाचा वेष देण्यात येतो त्याचे कारणही त्यानी सांगितले कामाक्षादेवीच्या मूळ सस्थापक अग्निमुखशर्मा हा पंढरीचा वारकरी होता दर आषाढीकार्तिकीला तो पढरपूरला जाई पुढे म्हातारपणी हा नेम चुकल्याने तो तळमळू लागला एका आषाढीला विठ्ठलस्मरण करीत तो घरीच झोपला, तेव्हा स्वप्नात श्रीपांडुरगाने साक्षात् दर्शन दिले आणि म्हटले, "तुझी वारी चुकली म्हणून काळजी करू नकोस तुझ्या कामाक्षी देवींतूनच दर एकादशीला तुला माझं दर्शन घडेल." तेव्हापासून कामाक्षा देवीला पाडुरगाचा पेहराव करण्याची प्रथा पडली

सर्व देवताचे दर्शन घेऊन आम्ही प्राकारातून हिंडू लागलो देवस्थान व सभामंडप याच्याप्रमाणेच तिन्ही बाजूंच्या अग्रशाळाही अगदी आधुनिक घाटणीच्या होत्या डाव्या हाताची अग्रशाळा तर तिमजली होती शंभरावर खोल्या होत्या त्यात राहाण्याची सोय होती खाटा, बिछाने, टेबले, खुर्च्या, वॉशबेसिन, बाथरूम साऱ्या सोयी होत्या आणि भाडे फक्त दिवसा रुपये तीन गोव्याबाहेरून येणाऱ्या प्रवाशाना या खोल्याचा थोड्या खर्चात फायदा मिळत होता याशिवाय दोन मोठे व दोन छोटे हॉल होते एका वेळी तीन तीन लग्नकार्यें इथे होत असतात

बोलत बोलत देवस्थानाच्या डाव्या बाजूला आम्ही चाललो होतो आणि तेवढ्यात कानावर शब्द आले

"दादा ! एऽदादा !"

चमकून मी डाव्या बाजूला पाहिले डॉ सावळो केणी आणि प्रभाकर आगले कमिटी--ऑफिसबाहेरील कठड्याला रेलून उभे होते.

"या ना" आगल्याचे अगत्यपूर्वक आमंत्रण

आगले हे रामनाथ देवस्थान कमिटीचे एक पदाधिकारी त्याचे आमत्रण स्वीकारल्यामुळे आम्ही सस्थानचे पाहुणे ठरणार होतो. एवढा

मोठा मान मिळत असताना तो नाकारण्याचा करंटेपणा मी करणार नव्हतो

कमिटीरूममध्ये जाऊन स्थानापन्न झालो आणि ओळखीचा विधी उरकला "हे माझे पुण्याचे मित्र देसाई या त्यांच्या पत्नी या सौ दादा "

' आणि हे श्रीयुत दादा डॉ केणी सात मजली हसत म्हणाले त्यांच्या गडगडाटाला इतरांनी साथ दिली

देसाईकडे वळून मग मी म्हटले, "अन् बर का देसाई, हे माझे मित्र डॉक्टर केणी अन् हे प्रभाकर आगले गोवा कला अकादमीचे डॉक्टर-साहेब उपाध्यक्ष होते आता दिल्ली अकादमीचे सदस्य आहेत, तर हे आगलेसाहेब गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी आणि महाराष्ट्र फिनान्स कॉर्पोरेशनचेही कुणीतरी अधिकारी आहेत फार मोठी माणस आहेत ही गोव्यातली अन् दोघेही नाटकं नी संगीताचे दर्दी हे विशेष "

"अन् हे आमचे दादा सुद्धा मोठे साहित्यिक, पत्रकार, विद्वान वगैरे वगैरे आहेत बर का ! आगले म्हणाले

"यातल फक्त वगैरे वगैरे लक्षात ठेवायचं बर का देसाई ' मी म्हटले आणि डॉ केणींकडे वळून विचारले, "डॉक्टरसाहेब, तुम्ही केव्हा आलात ? आज पेशंटना रजा वाटत ? '

"त्याचं काय आहे दादासाहेब, डॉ केणी म्हणाले, "डॉक्टर दोन अवस्थांतून जातो त्याची पहिली अवस्था पेशंटाची वाट पाहाण्यात जाते दुसऱ्या अवस्थेत पेशंट डॉक्टराची वाट पाहातात मी दुसऱ्या अवस्थेत आहे तेव्हा देवाच्या भेटीला डॉक्टर गेल्यावर पेशंटानी डॉक्टरच्या भेटी-साठी वाट पाहायला नको ? पण तुम्ही इथ या वेळी कसे ? "

मी आमच्या दौऱ्याची कथा सांगून टाकली. बराच वेळ गप्पा झाल्या चहा झाला आणि आम्ही उठू लागलो गप्पाच्या मोहाने अर्धा-पाऊण तास खाल्ला होता

"आता कुठं ? आगल्यानी विचारले

"ववळ्याला शांतादुर्गेची भेट घेऊन तिथ मुक्काम करायचा विचार आहे."

"वेड लागलंय का तुम्हाला ? आता नऊ वाजायला आलेयत महाआरतीची वेळ झाली आहे ती करा आणि मुक्कामाला इथेच थांबा

इथे सुद्धा राहायची चांगली सोय होईल तुमची ''

आगले बोलत असतानाच 'इशारत' झाली इशारत म्हणजे ढोलाचा आवाज. महाआरतीची तयारी झाली अशी सूचना देण्यासाठी ही 'इशारत' दिली जाते

महाआरतीसाठी आम्ही देवळात गेलो पुराण संपवून पुराणिकबुवा पोथी गुंडाळीत होते तेवढ्यात गाभाऱ्यात धुपारती सुरू झाली मुखमंडपातील पंचवाद्ये वाजू लागली. धुपाच्या उग्रमधुर वासाने आसमंत भरून गेले

गाभाऱ्याचा दरवाजा बंद करून भटजींनी देवाला नैवेद्य दाखविला दरवाजा पुन्हा उघडला तेव्हा दीपारतींना प्रारंभ झाला होता गाभाऱ्यातील घंटा, चौकावरील घंटा, तास नी पंचवाद्याच्या नादाने वातावरण धुंद होऊन गेले चौकात उभे राहून व हात जोडून भक्तमंडळी आरतीचा आनंद लुटत होती रामनाथाच्या मुखावर त्या आरतींच्या लालपिवळ्या प्रकाशात स्मित उमटून गेले असा उगाचच मला भास झाला

आरत्या संपल्या मंत्रपुष्प झाले प्रसादवितरण झाल्यावर बाहेर पडलो

प्राकाराच्या बाहेर एक हॉटेल होते. पाहुणे व यजमानासह तिथे जेवण घेतले आणि अग्रशाळेतील आरामशीर खोल्यातील खाटावर अंग लोटून दिले

झोप हळुवारपणे डोळ्यावर केव्हा उतरली ते कळलेच नाही

## १९ : विजयप्रदा, शांतिकृता शांतादुर्गा

दुसऱ्या दिवशी पहाटे जाग आली ती चौघड्याच्या सुरानी. काही वेळ या स्वरलहरींच्या सागरात बुडून गेलो स्थलकालाचे भान हरपले. सनईच्या नळीतून पाझरणारी एक धून संपली आणि एकदम आठवण झाली अरे, आपल्याला आज खूप मोठा प्रवास करायचा आहे

दाराहूर झोपलेल्या पुण्याच्या दंपतीला जागे केले नेहमी आठ आजता उठणाऱ्या सौ ला हाक मारली

प्रातर्विधि व स्नाने आटोपून कँटिनमध्ये गेलो. पण कँटिनचा दरवाजा अजून उघडला नव्हता. शांताराम गाडीला आंघोळ घालीत होता तुकतुकीत काळ्याभोर रंगाची डॅटसन गाडी एखाद्या थुलथुलीत, मांसल आफ्रिकन युवतीच्या तकाकणाऱ्या अंगकांतीप्रमाणे पहाटेच्या अरुणप्रकाशात तजेलदार दिसत होती मित्र आणि पत्नी यांच्याप्रमाणे या सहचारिणीचा सहवासही सारा दिवस लाभणार या कल्पनेने मन प्रसन्न झाले

चहाचा कार्यक्रम कवळ्याला उरकावा असे ठरवून गाडीत बसलो आणि दोन मिनिटांच्या आंत कवळ्याला उतरलो कवळ्यालाही चौघडावादन चालू होते पण आमचे सारे लक्ष लागले होते ते आतां चहापानाकडे सुदैवाने रस्त्यावरचे हॉटेल उघडे होते

चहाचा कप तोंडाला लावून आम्ही शांतादुर्गेच्या प्राकारात प्रवेश केला अशा अवेळी यात्रेकरू आलेले पाहून रेगे भटजींना आश्चर्य वाटले त्यांनी विचारले, "आज एवढ्या सकाळी कसं काय येणं केलंत ?"

"देवदर्शन ठराविक वेळीच घ्यावं असा कांही नियम आहे का ?" मी विचारले

"छे छे अस कुठं म्हटलंय मी ! देवदर्शन केव्हाही घ्यावं. पण संध्याकाळी पूजाविजा बांधलेली असते पुराणप्रवचन असतं. गोव्याबाहेरून आलेल्या माणसांना संध्याकाळी आणलं तर त्यांच्यावर 'इंप्रेशन पडतं आता या वेळी पाहुणे आलेयत तेव्हां त्यांना काही देवकृत्य करायचं असेल बर, नाव काय तुमच्या पाहुण्यांचं ?"

"देसाई"

"देसाई ? म्हणजे सरदेसाई असतील. प्रतापराव की सूर्यराव ? प्रतापराव असले तर नागेशाचे अन् सूर्यराव असले तर सप्तकोटीश्वराचे"

"हे सरदेसाई नव्हेत रेगे भटजी साधे देसाई. शिवाय कऱ्हाडे"

"कऱ्हाडे का ? म्हणजे म्हाळसेचे या शांतादुर्गेचे सुद्धा कऱ्हाडे कुळावी आहेत बरं का देसाईसाहेब सरदेसाई, मावळकर या कऱ्हाडे घराण्याची कुलदेवता हीच पण पुष्कळदा काय होतं, त्यांची त्यांनाच ही माहिती नसते अहो महाराष्ट्रातले सारे कऱ्हाडे ब्राह्मणच मुळी गोव्याचे आणि बर का सातोस्कर, माझी नवीन कविता ऐकणार ना ?.. "

रेगेभटजींना मध्येच थांबवून मी म्हटले, "कऱ्हाड्यांचा सारा इतिहास आमच्या या देसाईला आता पाठ झाला आहे रेगेभटजी तुमच्याशी गप्पा मारायला नी तुमचं नवीन काव्य पाहायला केव्हातरी येईन मी पुन्हा आता आम्हाला थोडी घाई आहे पुष्कळ देवस्थानं पाहायची आहेत अजून. तेव्हा आपण आधी देवळात जाऊं"

देवळातील चौकावर जाऊन प्रथम देसाईने घंटा वाजविली आणि आजूबाजूचे निरीक्षण करीत म्हटले, "आता या देवस्थानाच्या अंतर्भागाचं नी प्राकाराचं वर्णन करून सांगण्याच्या कामातन तुझी सुटका करतो दादा इथल्या देवस्थानाची मूळ गावे वेगवेगळी असतील, पण त्यांचा इतिहास एकसारखाच आहे, नी त्यांची प्राकृतिक रचनाही एकच आहे तेव्हा हा विषय सोडून इतर काही मुद्दे असले तरच त्याची माहिती सांग"

"तेच आता मी करणार आहे पण तुला तुला मी एक गोष्ट सांगतो इथे या अंतरूज महालात बाटवाबाटवीच्या काळात आलेल्या देवस्थानाचा इतिहास सारखाच असला तरी गोव्यात आणखी देवस्थाने अशी आहेत की त्यापैकी प्रत्येकाचा इतिहास वेगळा आहे आज नी उद्या ही मंदिरे आपण पाहाणार आहोत"

ठीक आहे." देसाई म्हणाला, "मात्र उद्याच्या दिवसात आपला हा दौरा पुरा करायचा आहे एवढ लक्षात ठेव तुमच्या या नंदनवनात आम्ही आणखीही राहिलो असतो पण आमच्यासाठी तुम्ही त्रास घ्यायचा हे काही ठीक नाही"

'हे म्हणतात ते खरं आहे भावजी" सौ. देसाई म्हणाल्या, "मित्र झाले म्हणून काय झालं? ऊस गोड लागला म्हणून मुळासकट का खायचा असतो?"

"असं काही मनात आणायचं नाही हं वैनी" सौ सालोस्कर म्हणाल्या, "आमच्या घरी परकेपणा बाळगायचं काऽही कारण नाही तुम्हाला अहो, ह्यांचे महाराष्ट्रातले कितीतरी मित्र अगदी सहपरिवार उतरतात आमच्याकडे ही मंडळी आली ना, म्हणजे बर वाटतं आम्हाला अगदी मुंबईत असल्यासारखं वाटतं."

बोलता बोलता आम्ही द्वारपट्टिकेजवळ पोचलो होतो द्वारपट्टिकेच्या

दरवाजातून आंत अंतराळात गेलो आणि देवीचे दर्शन घेतले. पुजारी निर्माल्यविसर्जनाच्या कामत गुंतले होते. पंचरशी धातूच्या देवीच्या अंगावरची शिळी फुले काढून बाजूला ठेवली होती. अलंकार, वस्त्रे, कवच नी मुखवटा उतरले जात होते. ब्राह्मणांच्या मुखांतून देवीस्तोत्राचा घोष चालला होता.

देवीच्या पूजामूर्तीकडे एकाग्रपणे पाहात असतांनाच देसाईने विचारले, "दादा, ही शांतादुर्गा म्हणजे कोण रे ?"

"शातादुर्गा कोण म्हणजे काय ! शातादुर्गा ही शातादुर्गा."

"तस नव्हे. ही शांतादुर्गा दुर्गा आहे हे उघड आहे. पण दुर्गेप्रमाणे ही महिषासुरमर्दिनी आहे का ! किंवा म्हाळसेप्रमाणे ही नारायणी आहे ! की शिवपत्नी गौरी आहे ?... अरे हां, आत्तां आठवलं, काल मंगेश देवस्थानात तूं मंगेशाची कथा सांगितलीस तेव्हां म्हणालास की, ही गौरी आहे. वाघाच्या भयानं ती बोबडं बोलली. मग शिव प्रगट झाला. तो मंगेशरूपाने तिथेच राहिला नी गौरी दुसऱ्या कुठल्या तरी गांवी.. मला वाटतं केळोशिला राहिली. तिथून बाटवाबाटवीच्या काळात इथ आली. तेव्हां माझ्या प्रश्नाचं आतां उत्तर द्यायचं कारण नाही."

"कारण नाही कसं ! काल तुला मंगेशाच्या संदर्भात ती गोष्ट मी सांगितली "**यत्र मांगीश्वरो देवो यत्र सा जगदंबिका**" असा उल्लेख सह्याद्री खंडांतच आला आहे. पण ही व्याघ्रभीतिकथा इथे शातादुर्गेच्या भक्तमंडळीला मान्य नाही. या कथेमुळे शांतादुर्गा या नांवावरही प्रकाश पडत नाही. ही गिरिजा नाही. शातादुर्गेचे ध्यान महिषासुरमर्दिनीचे नाही तसेच ते मोहिनीचेही नाही. ही बंगालमधल्या दुर्गांप्रमाणे अष्टभुजा नसून द्विभुजा आहे. तिने आपल्या दोन्ही हातांनी दोन पुरुषांना धरून ठेवले आहे. हे दोन पुरुष म्हणजे चंडमुंड असावेत असे एक मत होते पण चंडमुंड वधाचे प्रसंगीचे देवीचे जे सप्तशतीत वर्णन केले आहे ते असे आहे — चल, आपण चौकावर जाऊन बसू, मग तुला सांगतो."

बाहेर येऊन आम्ही चौकावर एका खांबाशेजारी बसलो. भक्तमंड-ळींची तुरळक रहदारी नुकतीच कुठे सुरू होत होती.

"हं, तर काय सांगत होतो..."

"सप्तशतींतील दुर्गेचं वर्णन." देसाईने आठवण करून दिली

"हो. चंडमुंडवधाच्या वेळचं दुर्गेचं वर्णन असं आहे :—

भ्रुकुटीकुटिलात् तस्या ललाटफलकाद्रुतम्
काली करालवदना विनिष्क्रान्तासिपाशिनी
विचित्र खट्वाङ्गधरा नरमाला विभूषणा
अतिविस्तारवदना जिव्हाललनभीषणा

दुर्गेचे हे करालवदन रूप शांतादुर्गेशी मुळीच जुळत नाही. शिवाय चंडमुंडाची फक्त मुंडकी तिने हातात धरली असाही सप्तशतींत उल्लेख आहे"

"मग या दुर्गेला शांतादुर्गा हे नांव कसं पडलं?"

"सांगतो ना. पण जरा सबुरीने घे बाबा. शांतादुर्गा हे नाव शांता नावाच्या एका ऋषीपासून पडले असा एक समज प्रचलित होता. सह्याद्री-खंडांतील नागाव्हय माहात्म्यात शांतामुनीस जगदंबेने दर्शन दिले अशी कथा आहे म्हणून तिला शांता हे नाव पडले असे सांगतात. परंतु यात कांही अर्थ दिसत नाही. कारण

ततो भगवती देवी प्रसन्नाभून्महामने
तस्य कामवर दातु कन्यारूपेण संस्थिता
सखीद्वय समायुक्ता चामरव्यजनादिभि
स्तूयमाना देवगणैर्नागकन्याभिरर्चिता
तदग्रे संस्थिता बाला सर्वाभरणभूषिता

हे जे शांतामुनीस दर्शन देतेवेळचे देवीचे कन्यारूपी ध्यान आहे ते शांतादुर्गेस लागू पडत नाही

"शेवटचा एक पर्याय आहे तो हरिहरयुद्धप्रसंगाचा. विष्णु आणि शिव यांचे जे भयानक युद्ध झाले त्यात सर्व जग नष्ट होऊन जाण्याचा प्रसंग ओढवला. त्या वेळी सर्व देवांनी आदिशक्तीची प्रार्थना करून हे युद्ध थांबवण्याची तिला विनंती केली तिने ती मान्य केली. जगदंबारूपाने ती प्रगट झाली आणि दोन हातांत शिवविष्णूंना धरून तिने बाजूला केले. त्यांची समजूत घातली आणि अशा प्रकारे भयानक संहारापासून जगाचे रक्षण करून शांती निर्माण केली. शांतता प्रस्थापित करण्याकरता तिने अवतार धारण केला म्हणून तिला शांतादुर्गा हे नांव मिळाले. या देवीचे एक निस्सीम उपासक अठराव्या शतकात होऊन गेले आणि ज्याच्याबद्दल मी काल कुठेतरी उल्लेख केला त्या महेश्वरशास्त्री सुखठणकरांनी जो शांतादुर्गास्तुतिपर श्लोक रचला आहे त्याचा पूर्वार्ध असा आहे.

श्रीशांता विजयप्रदा विजयते दुर्गां हृदा तां भजे
क्रुद्धौ शांतियुतौ कृतौ हरिहरौ कृत्वाऽधिहस्ते यया

यावरून या शांतादुर्गा नांवाची संगती लागते हरिहरांत शांतता प्रस्थापित करणारी, आपापसातील कलहांना पायबंद घालणारी शांतरूपिणी देवता म्हणजे शांतादुर्गा "

पण शांतादुर्गेचे हे शांत, स्निग्ध, सुंदर रूप निर्माल्य विसर्जन झाल्यामुळे आम्ही पाहू शकलो नाही. म्हणून रेगेभटजींना सांगून देवीच्या शयनागारांतील मूर्ती दाखविण्याची व्यवस्था केली. भल्याथोरल्या पलंगावर देवीच्या तीन उत्सवमूर्ती इथे विश्रांती घेत होत्या. मुखवटे सोन्याचे होते. रेखीव होते प्रमाणबद्ध होते. त्याच्याकडे पाहाता पाहाता सौ. देसाईंनी प्रश्न केला,

"भावजी, देवीच्या कपाळावर भली लांब कुंकवाची आडवी रेघ कशाला लावली आहे हो!"

"त्याचं काय आहे वैनी, इथे स्मार्त नी वैष्णव असे दोन पंथ आहेत म्हणून सांगितलं ना मी तुम्हाला ! तर या पंथातल्या स्त्रीपुरुषांचे गंध लावायचे प्रकार सुद्धा वेगळे आहेत स्मार्त पुरुष अंगाला आडवं

भस्म फासतात तर स्त्रिया कपाळाला आडवं कुंकू लावतात. वैष्णव पुरुष गोपीचंदनाचे उभे 'नाम' लावतात नी नायका खालच्या बाजूने टोक असलेलं लंबवर्तुळाच्या आकाराचं उभं कुंकू लावतात. पण खरं सांगायचं तर 'लावतात' हा शब्दप्रयोग काही बरोबर नाही. लावत असत असं म्हणायला हवं. आजच्या काळात हे उभे–आडवे प्रकार कुठं दिसतच नाहीत. पण तरी सुद्धा देवस्थानातून ही परंपरा चालू आहे. मंगेश नी शांतादुर्गा ही स्मार्तांची देवस्थानं असल्यामुळे ही आडव्या गंधाची प्रथा इथे चालू आहे."

चौकावर बसल्या बसल्या सौ देसाईंनी सहज वर पाहिले. मधोमध दोनतीन प्रचंड झुंबर टांगले होते नी आजूबाजूला पाचपन्नास हंड्या छता-वरून लटकत होत्या.

"अगबाई, केवढा मोठा आहे तो मधला झुंबर!" सौ. देसाई नवलाने उद्‌गारल्या.

"म्हणजे आताच दिसला का तुला हा झुंबर! अग, मंगेशमंदिरांत पाहिला नव्हतास का तूं काल!" देसाईने विचारले

"नाही बाई. काल किती घाईनं पाह्यलं ते मंदिर! नाही तेव्हा लक्षात आलं."

"काल दादानं म्हटलं नाही का की मंगेश हे फार श्रीमंत संस्थान आहे म्हणून! त्या झुंबरावरूनही ते दिसत होतं. मंदिरांत गेल्याबरोबर मला ते दिसलं. पण क्षुल्लक झुंबराबद्दल काय बोलायचं? अग, झुंबराचं कौतुक करायचं ते पोरांनी. थोरांनी नव्हे."

"बरं बाई, राह्यलं. मी पोर आहे, मग तर झालं?"

"ए देसाई," मी म्हटले, "असा खिजवू नकोस वैनीला. झुंबरां-सारख्या, तूं म्हणतोस तशा क्षुल्लक वस्तूंनी सुद्धा वास्तूंचं मूल्यमापन होत असतं. असली झुंबरं मोठमोठ्या श्रीमंतांच्या पुण्या–मुंबईतल्या वाड्यात होती. आजही असतील. पण तुझ्यामाझ्या घरकुलात आहेत का? या देवस्थानांचेच पाहा. ही एवढी झुंबरं आहेत ती मंगेश–शांतादुर्गेच्याच मंदिरांत. कारण ही दोन मंदिरच सर्वांत समृद्ध आहेत. तीच गोव्याबाहेर

सुद्धा प्रसिद्ध आहेत प्रवासी येतात ते हीच मंदिरं पाहायला. अन् त्याचं आणखी एक कारण आहे या दोन देवस्थानांचे, त्यातल्या त्यात शांता-दुर्गेचे कांही थोर कुळावी इतिहासकाळात गोव्याबाहेर मोठमोठे सरदार होऊन गेले. त्यांनीच या देवस्थानाना वैभव प्राप्त करून दिले. नारो राम मंत्र्यांचे नाव काल तुला सांगितलं ना ! — नसेल सांगितलं तर या शांतादुर्गेचे नारो राम रेगे म्हणून कुळावी होते ते बाळाजी विश्वनाथाच्या काळात एक मातब्बर सरदार म्हणून सातारला होते. शाहू महाराजानी त्यांना आपल्या अष्टप्रधानांत घेतले. तेव्हापासून ते मंत्री म्हणून ओळखले जाऊ लागले. हे देवस्थान अडीचशे वर्षांपूर्वी त्यांनी बांधले. त्यानंतर पेशवाईत रामचंद्र मल्हार सुखठणकर हे मोठे तलवारबहाद्दर नी मुत्सद्दी होऊन गेले नानासाहेब व सदाशिवराव भाऊ त्यांना वडिलासमान मानत. उत्कृष्ट कारभारी म्हणून पहिल्या बाजीरावांचा त्याच्यावर विश्वास होता. नाना फडणीसांनी फडणिशीचे धडे त्यांच्याच हाताखाली गिरविले होते. वैनी, पुण्याच्या कसबा पेठेतला गणपती तुम्हाला माहीत आहे ना ? ”

“ हो तर. ”

“ तर त्या गणपतीच्या पाठीमागल्या बोळात या रामचंद्र मल्हार बाबांचा सात मजली वाडा होता. ते वारल्यानंतर तो जळून गेला. या रामचंद्र मल्हाराची आपल्या या कुलदेवीवर नितांत श्रद्धा होती. त्यांनी या अग्रशाळा बांधल्या. पेशव्याकडून कवळे गाव देवीला इनाम मिळवून दिला. सदाशिव मल्हार या त्यांच्या चिरंजीवानीही वडिलांचा नेम पुढे चालवला. जिवबादादा केरकर नी लखबादादा लाड हे दोन पाटीलबुवांचे सरदार ”

“ पाटीलबुवांचे ? ” सौ. देसाईंनी विचारले.

“ पाटीलबुवा म्हणजे महादजी शिंदे. उत्तर हिंदुस्थानात त्यांनी बाजी मारली त्यांत त्यांना या दोन सरदाराचे फार मोठे सहाय्य झाले. ह्यांचे कुलदैवत मंगेश. त्यांनी मंगेशाला वैभवाला चढवले. ही सर्व मंडळी देवदर्शनासाठी इकडे आली म्हणजे शेजारच्या गोवे राज्याचे गव्हर्नर त्याना नजराणा पाठवीत एवढा त्यांच्या नावाचा दबदबा होता

"बादोड्याच्या महालक्ष्मीने गोमंतकाच्या संगीताला प्रेरणा दिली तशी कवळ्याच्या शांतादुर्गेने गोमंतकीयांच्या मराठी साहित्याला प्रेरणा दिली. शांतादुर्गा जेव्हा केळोशीला होती तेव्हा कृष्णदास शामा नांवाचा एक देवीभक्त तिथे राहात होता. १५२६ साली त्याने कृष्णचरित्रकथा हा ग्रंथ या शांतादुर्गेच्या सान्निध्यात लिहिला. गोव्यात लिहिला गेलेला हा पहिला ज्ञात ग्रंथ. त्यापूर्वी लिहिलेला ग्रंथ अजून तरी उपलब्ध झालेला नाही. म्हणून शांतादुर्गा ही मराठी साहित्याची प्रेरक शक्ती, निदान पहिल्या लिखित ग्रंथाची साक्षीदार एवढं तरी म्हणायला हरकत नाही."

"म्हणजे इतिहासाची कशी नी कुठे पुनरावृत्ती होते पाहा" देसाई म्हणाला.

"ती कशी काय?"

"ज्ञानेश्वरानी आपली ज्ञानेश्वरी नेवाशाला अशाच एका देवस्थानांत लिहिली नाही काय?"

"लिहिली नाही, सांगितली."

"असेल. सांगितली असेल. पण सच्चिदानंदबाबांनी ती लिहून घेतली. ज्ञानेश्वरी जशी एका देवालयात निर्माण झाली तशीच तुमच्या या कृष्णदासाची कृष्णकथा."

मी होकार दिला.

या शांतादुर्गा देवस्थानात अशी एक प्रथा आहे की ती सांगितल्याशिवाय हे देवीमाहात्म्य पुरे होणार नाही. इथे जत्रोत्सव मोठ्या प्रमाणात होतो, तेव्हा एक दिवस अस्पृश्याना मुक्तद्वार प्रवेश असतो. त्या दिवशी शिवाशिव पाळली जात नाही. सुमारे चारशे वर्षांची ही प्रथा आहे. १५६६ साली जेव्हां केळोशीहून शांतादुर्गेचे स्थलांतर झाले तेव्हां भक्तांनी तिला या गावात आणले आणि अस्पृश्यांच्या वस्तीत ठेवले. पुढे देवालय बांधण्याचा प्रश्न उभा राहिला तेव्हा सोयीस्कर जागा मिळेना. ज्या जागी शांतादुर्गा ठेवली ती जागा सर्वोत्कृष्ट होती. शिवाय जुन्या केळोशीच्या जागेप्रमाणेच थेट ती दिसत होती. शेवटी अस्पृश्यानी आपली वस्ती तिथून हलविली आणि महाजनांचा प्रश्न सोडविला. त्या दिवसापासून

अस्पृश्य मंडळींना ही सवलत देण्यांत आली

देवस्थानातून बाहेर पडून प्राकारात आलो तेव्हा देसाई म्हणाला, " मोठी गंमत आहे बघ "

" कसली गंमत ? "

" मंगेश नी शांतादुर्गा ही गोव्यातली सर्वांत संपन्न देवस्थाने. आणि नेमक्या या दोन देवालयानाच सभामंडप नाही ! "

" बरोबर आहे. पण त्याचं कारण एवढंच की या देवालयांच्या अगदी जवळ दीपस्तंभ आहेत. एवढे प्रचंड दीपस्तंभ मोडून सभामंडपा-साठी जागा तयार करणं कांही शक्य नाही ! "

प्राकारांत हिंडून देवालयाला प्रदक्षिणा घातली. उजव्या बाजूला दुमजली अग्रशाळा होती आणि तिथे भक्तमंडळीसाठी स्वतंत्र डबलरूम्सची सोय केली होती डाव्या बाजूला अग्रशाळेत मंगलकार्यासाठी हॉल होते प्राकाराच्या तोंडाशी नगारखाना होता नगारखान्याखालच्या महाद्वारांतून बाहेर पडलो तेव्हां सूर्य वर आला होता. पण तरीही अंगाला किंचित् गारवा जाणवत होता.

तळीजवळून खाली उतरता उतरता मी बोलत होतो, " कवळे या गावाला आणखी एका गोष्टीमुळे महत्त्व आले आहे. इथे जवळच स्मार्त-सांप्रदायी सारस्वतांचे आचार्यपीठ आहे आद्यशंकराचार्यांचे परात्पर गुरु गौडपादाचार्य याच्यापासून ही मठपरंपरा सुरू झाली असे मानण्यात येते यांचे दोन प्रशिष्य. शंकराचार्य हे एक आणि विवरणाचार्य हे दुसरे. शंकराचार्यांनी आपली परंपरा द्रविड ब्राह्मणात चालवावी आणि विवरणा-चार्यांनी गौडात असे ठरल्याचे सांगतात. कसेही असो. शांतादुर्गा केळो-शीत असताना तिथे हा मठ होता. नंतर तो कवळ्याला आला तेव्हापासून त्याला कैवल्यपूर मठ असं नांव पडलं या मुख्य पीठाचे अनेक उपमठ काशीपासून गोकर्णपर्यंत विखुरले आहेत जाणार का हा मठ पाहायला ? "

" तेवढा वेळ आहे का आपल्याला ? "

" नाही. आज पाहाणे थोडे; पण हिंडणे फार अशी आपली अवस्था होणार आहे रात्री आठनवापर्यंत आपण घरी पोचू. मी मनात ठरवल्या-

पेक्षा आणखी कांही पाहायचं म्हटलं तर उशीर होणार "

"मग चला तर. तू ठरवल्याप्रमाणे होऊ दे ही यात्रा "

"ठीक आहे पण एक गोष्ट लक्षात ठेव गोव्याची यात्रा आटोपून तुम्ही गोकर्णला जाणार. होय ना ? "

"होय "

"तिथे या स्मार्त मठाचा जो एक उपमठ आहे असं मी तुला श्यामांच म्हटलं. तो पाहिल्याशिवाय राहू नका तिथे एक चक्रवर्ती शिवलिंग आहे ते मुद्दाम पाहून घ्या हे लिंग सुंदर तर आहेच; पण त्याचा इतिहास मोठा इंटरेस्टिंग आहे. शेपाऊणशे वर्षांपूर्वी अमेरिकेतल्या फिलाडेल्फिया शहरात एक जागतिक धर्मप्रदर्शन भरले होते. या प्रदर्शनात ठेवण्यासाठी कलकत्ता शहरात एक संगमरवरी शिवलिंग तयार करून पाठविण्यात आले पण अमेरिकन लोकांच्या भावना दुखतील अशा कल्पनेने चालकांनी ते प्रदर्शनात न ठेवता इंग्लंडमध्ये पाठवून दिले सुदैवाने बेळगावला जन्म झालेल्या आणि हिंदु धर्माचा अभिमान असलेल्या सर जॉर्ज बर्डवुड नावाच्या एका सेवानिवृत्त इंग्रज गृहस्थाने ते शिवलिंग सन्मानपूर्वक आपल्या वाड्यात आणलं आणि दिवाणखान्यात मध्यभागी ठेवून दिले. त्याला रुद्राक्षमाळा घातल्या. छतावर झुंबर टांगले आणि दररोज तो लिंगाला फुले वाहू लागला

"पुढे सन १८९६ साली घनश्याम नीळकंठ नाडकर्णी हे तत्कालीन प्रसिद्ध वकील इंग्लंडला गेले होते त्याच्या पाहाण्यात ते शिवलिंग आले. त्या लिंगाची कुठेतरी योग्य ठिकाणी प्रतिष्ठापना व्हावी अशी इच्छा बर्डवुडसाहेबांनी व्यक्त केली. तेव्हा नाडकर्णींनी या कैवल्यपूर ( म्हणजे कवळे ) मठाच्या आत्मानंद स्वामींशी पत्रव्यवहार केला व हे लिंग बेळगांवजवळच्या खानापूर मठात स्थापन करायचे ठरले लिंग खानापूरला पाठवण्यात आले पण तेवढ्यात स्वामीमहाराज समाधिस्थ झाले. नंतर १९२० साली त्याची स्थापना गोकर्णमठात करण्यात आली. तुम्ही मुद्दाम पाहा हे चक्रवर्ती शिवलिंग. "

"होय जरूर पाहू. "

हँड्ब्रेक सोडून चावी फिरवत असतानाच शांतारामने नेहमीप्रमाणे अपेक्षेने माझ्याकडे पाहिले.

मी म्हटले, " शांताराम, गाडी प्रथम फोंड्याला जाऊदे. तिथे नास्ता करू मग सांगेन तुला कुठे जायचं ते."

# १७ : श्री क्षेत्रवासिनी कामाक्षा

थंडीने काकडलेली गाडी थोडा वेळ थडथडली आणि गरम झाल्यावर आवाज न करता मांजराच्या पावलांनी पळू लागली.

दोन मिनिटात फोंडा–दुर्भाटच्या मुख्य रस्त्यावर आलो तशी गाडीने डावीकडे वळण घेतले.

थोड्याच वेळात उजव्या हाताला एक छोटेसे देवालय दिसले. आजूबाजूला वस्ती होती. हा कपिलेश्वरी गाव नी देवाचे नांव कपिलेश्वर. मुंबईचे किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक कपिलेश्वरीबुवा हे इथलेच. मुंबईतले दुसरे प्रसिद्ध वकील सुशील कवळेकर यांचे गांवही हेच.

पण इथे न थांबता आम्ही पाचेक मिनिटांत फोंडे गाठले मध्यवर्ती चौकातली हॉटेले उघडली होती तुरळक रहदारी सुरू झाली होती चौकातल्या दादा वैद्याच्या पुतळ्याभोवतीच्या परिसरात मात्र शुकशुकाट होता

गोव्यातल्या न्याहारीचे खास वैशिष्ट्य म्हणून समजली जाणारी पातळ भाजी व पुरीचा फडशा पाडून पुन्हा गाडी गाठली.

" आता सरळ शिरोडा, शांताराम " मी ड्रायव्हरला म्हटले.

गाडीने सरळ दक्षिणेची दिशा धरली.

फोंडे गांवातल्या ' तिस्का 'वरून पुढे गेलो, मिलिटरी कँप मागे पडला आणि गाडी चढावाला लागली तसा उजवीकडे हात करून मी

म्हटलं, "इथल्या दरीत एक देवस्थान आहे कामनेश्वर नावाचं. शिवलिंगच आहे आणि ज्या ढवळी गावात ते आहे तो गांव हिरव्या रंगानं रंगवलेला आहे. देवस्थान छोटं आहे. म्हणून ते सोडून देऊ "

टेकडी उतरून गाडी बोरी गावातून चालली होती डाव्या हाताला सिद्धनाथाची टेकडी होती. टेकडीवर सिद्धनाथाचे देवालय होते. हा सिद्धनाथ म्हणजे कुणाचा कुलदेव नव्हे. कदाचित ग्रामदेव असावा. त्यामुळे पेशव्यापर्यंत वशिला लावणारे महाजन त्याला नव्हते. टेकडीवरच्या थंडी वाऱ्यात एकलेपणाने तो वावरत होता. फाटाच्या फॅक्टरीवरून पुढे गेलो, तेव्हा देसाई म्हणाला, " हे बोरी गांव कवि बोरकराच का ? "

" हो. हे पाहा डाव्या बाजूला त्यांचं घर. रेडियो सुटल्यावर ते इथंच राहायला आले होते पण तूर्त ते पर्वरीला राहातात "

" असं का ? ठीक म्हणजे हे बोरकरांचं मकाण "

समोर बोरीचा लांबलचक पूल दिसला तेव्हा आमच्या बोलण्याला खंड पडला. जुवारी नदीच्या पात्राला इथे या पुलामुळे एक आगळी शोभा आली होती.

नदीच्या किनाऱ्याने पुलाच्या कमानीखालून आम्ही पुढे गेलो आणि दहाएक मिनिटांत शिरोड्याच्या बाजारात पोचलो.

हमरस्ता सोडून डाव्या बाजूच्या रस्त्याने गेलो तेव्हा कामाक्षा संस्थानची पहिली भव्य कमान दिसली. आणखी पुढे गेलो तेव्हा प्राकाराची दुसरी कमान दिसली. या कमानीजवळ गाडी उभी करून खाली उतरलो नी कमानीखाली उभे राहिलो तेव्हा आतांपर्यंत कुठेच पाहिले नव्हते असे दृश्य समोर दिसले. आतांपर्यंतची मंदिरे एक तर रस्त्याच्या समपातळीवर होती किंवा उंचावर होती. पण खांडोळ्याच्या गणपतीप्रमाणे कामाक्षीचे प्राकार खोलगट जागेत होते. या प्राकाराची रचना, देखणेपणा नी प्रमाणबद्धता कांही और होती. नागेशमंदिराप्रमाणेच प्राकाराचा महादरवाजा देवालयाच्या पार्श्वभागी होता.

आणखी एक गोष्ट चटकन् नजरेत भरली. मंदिराचा कळस हा कळशासारखा गोल नव्हता तो होता अष्टकोनाकृती एकाद्या मिनारा-

सारखा. त्याला दोन मजले होते नी वर छप्पर होते देसाईंच्या लक्षात ही गोष्ट आली. तो म्हणाला, " देवालयाच असं मिनारासारखं शिखर कुठं पाहिलं नाही मी "

"हो, मीही पाहिलं नाही. हे शिखर नेहमीच कळशाकार असतं, आमच्या गोव्यात तरी. दक्षिण भारतात शिखर रचना वेगळी असते "

" कळसाकार म्हणजे कळशीप्रमाणे का हो भावजी ? कुठल्याही देवळाचे कळस बघा. सारे वाटोळे गरगरीत कळशीसारखे तसे ते कां बांधतात हो ? काही कारण आहे कां त्याला ? "

" आहे ना ! भारतीय मंदिरशिल्पात देवालयावर कळस असलाच पाहिजे असं सांगितलं आहे. हा कळस तुम्ही म्हणता तसा कळशीच्या म्हणजे घटाच्या आकाराचा असावा लागतो. घट किंवा कलश आपल्या हिंदु धर्मात पवित्र मानला आहे. कोणत्याही शुभकार्याच्या प्रसंगी सर्वप्रथम कलशाची पूजा केली जाते. हा विश्वाचे प्रतीक म्हणजे कलश. या कलशांत सर्व देव, सर्व तीर्थे सामावली आहेत कलशपूजेवेळचे प्रार्थनेचे श्लोक बघा,

कलशस्य मुखे विष्णु कंठे रुद्र समाश्रिता
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणा स्मृता
कुक्षी तु सागरा सर्वे सप्तद्वीपा वसुधरा
ऋग्वेदोऽथ यजुर्वेद सामवेदोह्यथर्वण
अंगैश्च सहित सर्वे कलश तु समाश्रिता
अत्र गायत्री सावित्री शांतिपुष्टिकरी तथा
आयातु मम शात्यर्थं दुरितक्षयकारका.
सर्वे समुद्रा सरितस्तीर्थानि जलदा नदा.
आयांतु मम शात्यर्थं दुरितक्षयकारका

तर असा आहे हा कलशाचा महिमा. शुभकार्याच्या वेळी प्रथम याची पूजा केली जाते त्याचं आणखी एक कारण म्हणजे त्यात वरुण प्रवेश करतो वरुण ही समृद्धीची देवता. वरुणकृपेनेच पाऊस पडतो चराचर

सृष्टीत जीवन संचरते. धनधान्याची रेलचेल होते माणसाचं जीवन सुखी होते. आपल्या लग्नसमारंभात नवरदेवाची बहीण करवली म्हणून मिरवते ना, ती हातात 'करा' धरते. हा करा म्हणजे कलशच. नवरानवरीच्या भावी सुखी जीवनाचे ते प्रतीक."

"पण हा कलश देवळावर का ते सांगा की."

"देवळावर हा कळस आला तो आपल्या संस्कृतींतलं एक प्रतीक म्हणून. कमळ, हत्ती, स्वस्तिक ही प्रतीकें आपल्या धर्मात पूज्य मानली गेली आहेत देवळावरल्या कोरीव कामात ही प्रतीकं दिसतात, तसाच हा कळस"

"काय रे," देसाईंनी मध्ये विचारले, "बहुतेक सर्व मशिदींवर कळस असतात. तेव्हा मुस्लिम शिल्पावरून तर आपण ही कल्पना उचलली नाही ना? या विषयावर चर्चा झालेली मी कुठेतरी वाचली होती."

"मला तस वाटत नाही. कारण या दोन्ही कळसात फरक आहे. आपल्या देवळावरच्या मोठ्या कळसावर आणखी एक शेंडी असलेल्या नारळासारखा दिसणारा छोटा कळस असतो, तसा मुस्लिम शिल्पांत नसतो. शुभकार्यात कलशपूजा होते तेव्हा घटावर नारळ ठेवतात ना. त्याचेच अनुकरण आपल्या शिल्पशास्त्रज्ञांनी केलं आहे त्याला एक आध्यात्मिक अर्थही आहे. या कळसाखाली असलेली देवमूर्ती कलशरूपी ब्रह्मांड व्यापून राहिली आहे ही कल्पना या कळसाच्या बांधणीत अभिप्रेत आहे."

"भावजी, तुम्ही म्हणता तसा कामाक्षेच्या शिखरावर नारळासारखा एक छोटा कळस आहे खरा. उन्हात कसा चकाकतो आहे पाहा. सोन्याचा का हो तो?"

"हो अस्सल सोन्याचा. सबंध गोव्यात फक्त याच मंदिरावर सोन्याचा कळस आहे. गोव्याबाहेर असा सोन्याचा कळस मी पाहिला तो मदुराईच्या मीनाक्षी मंदिरावर. हल्लीच मंगेशमंदिरावरही सोन्याचा कळस उभारला आहे."

कमानीपुढल्या दहावीस पायऱ्या उतरून आम्ही खाली उतरलो आणि कामाक्षामंदिरात प्रवेश केला. या मंदिराला सुरेख सभामंडप होता.

भोगमंडपात सुंदर कोरीव काम केलेले मलेमोठे लाकडी खांब होते. भोग-मंडपात कित्येक परिचित व स्नेही मंडळी दिसली. त्यांत सोमनाथ धुंगट होते, शांबारी होते, कामत होते. मनात आले, आज कसला तरी उत्सवाचा दिवस असला पाहिजे. भेटलेल्या मंडळीशी नमस्कार–चमत्कार झाल्यावर विचारले, " आज काही विशेष आहे का ? "

" आज आवळीभोजनाची पवेणी. "

आवळीभोजनाचा उत्सव गोव्यातल्या अनेक देवस्थानांतून होत असतो. जवळपासच्या आवळीच्या झाडाजवळ देवतेची उत्सवमूर्ती मिर-वणुकीने जाते. तिथे पूजा नैवेद्यादी विधी होतात. मग देवता परत फिरते ब्राह्मणसंतर्पण व समाराधना होते. रात्री पुराण, कीर्तन, नाटक असे कार्यक्रम होतात.

अंतराळात जाऊन आम्ही देवदर्शन घेऊ लागलो. मी सहज सौ देसाईंकडे पाहिले. त्या एकटक गर्भागारात पाहात होत्या. मी म्हटले, " काय हो वैनी, काय पाहाता आहां ? "

" काल सकाळपासनं पुष्कळ देवळे पाहिली सगळ्याच देवळात कुठं ना कुठं तरी. . ते बघा . हो तेच... विचित्र तोंड दिसतं डोळयाला शिंगं. तोंड उघडलेलं. काही ठिकाणी जीभ बाहेर आलेली. कुणाचं आहे हो ते ? "

" त्याला कीर्तिमुख म्हणतात. सर्वं देवळांत ते असतंच. पण ते कुठंतरी नसतं वैनी त्याच्या ठराविक जागा असतात. मुखमंडपातून चौकांत जातानाच्या दारावर, द्वारपट्टिकेवर, गाभाऱ्याच्या दारावर अशी त्याची स्थाने असतात. पण त्याची खरी जागा म्हणजे प्रभावळीची. "

" प्रभावळीची म्हणजे ? "

" प्रभावळ म्हणजे पूजामूर्तींच्या भोवती पितळेची, चांदीची किंवा क्वचित् सोन्याची अर्धवर्तुळाकार नकशीदार आटी दिसते ना, ती प्रभावळ इथे कामाक्षा–मूर्तीभोवती तर एक सोडून तीन प्रभावळी आहेत नी त्या तिन्हींवर कीर्तिमुखं आहेत. तुमच्या डोक्यात एकदम भरलं ते बाहेरच्या प्रभावळीवरलं कीर्तिमुख. खर म्हणजे प्रभावळ शब्दाचा खरा अर्थ आहे

प्रकाशकिरणाचे वर्तुळ देवादिकांची चित्रं तुम्ही पाहिली आहेत ना? त्याच्याभोवती प्रकाशवलय काढलेलं असत देवतांचा चेहरा तेजस्वी असतो आणि त्याच्या चेहऱ्यातून तेजाचे किरण बाहेर पडतात अशी समजूत असते देवमूर्तींच्या बाबतीत हे प्रकाशवलयाचे काम प्रभावळ करते. प्रभावळ म्हणजे प्रभेचे वलय."

"ते कळलं हो. पण या प्रभावळीवर हे कीर्तिमुख की काय, आलं कसं?"

"त्याची एक कथा आहे वैनी सांगू का?"

"सांगा ना त्यात विचारायचं काय?"

"कालपासनं इतक्या कथा सांगितल्या वैनी, की तुम्हाला कंटाळा आला असेल, म्हणून विचारलं."

"वा, वा. कथा ऐकून कधी कंटाळा येतो का?"

"नाही ना? मग सांगतो ही कीर्तिमुखाची कथा. एकदा काय झालं, असुराच्या जालंदर नावाच्या एका राजाने शिवपत्नी पार्वतीला पहिल्या-प्रथम पाहिले तेव्हा तो तिच्यावर मोहीत झाला. त्याने काय केले? आपला दूत म्हणून राहूला शंकराकडे पाठविले नी पार्वतीची मागणी केली. शंकर जालंदराचं हं धाडस पाहून भयंकर संतापला. त्याने आपल्या जटेतून एक महाकाय गण निर्माण केला. सिंहाचे तोंड, तीन पाय, तीन शेपट्या व सात हात असे त्याचे विचित्र रूप होते त्याने सगळ्या असुरांना मारून खाल्ले. पण तरीही त्याची भूक शमली नाही शिवाकडे जाऊन त्याने विचारले, "आता काय खाऊ?" महादेव उत्तरला, 'तुझं शरीर खाऊन टाक' त्याने स्वतःचे सारे शरीर खाऊन टाकले आणि तो मुखरूपाने शिल्लक उरला. त्याला कीर्तिमुख हे नांव देऊन आपल्या मंदिरात शिवाने स्थान दिले. पद्मपुराणांत आहे ही कथा."

"आपल्या भारतीय शिल्पातही कीर्तिमुखाला काही तरी महत्त्व आहे, नाही का? अजंठा–वेरूळला गेलो होतो तेव्हा कुणातरी जाणकाराने सांगितलं होतं की लेणी खोदताना ज्या गवाक्षापासून सुरुवात करतात त्याला कीर्तिमुख म्हणतात" देसाई म्हणाला.

"हो, बरोबर आहे. या गवाक्षात जो तोरणाचा भाग असतो तिथे प्रथम हे कीर्तिमुख कोरून मग खडकांतला आतला भाग खोदीत. हे कीर्तिमुख म्हणजे बहुतेक वेळी सिंहाचे तोंड असे सिंह हे सामर्थ्याचं प्रतीक वास्तूच्या शिखरावर किंवा प्रवेशद्वारावर सिंहमुख असले म्हणजे ती वास्तू सुरक्षित व बळकट बनते असा समज होता राजाच्या आसनांना सिंहमुखे असतात त्याचं कारणही हेच राजसत्ता सामर्थ्यवान् असली पाहिजे, ती टिकली पाहिजे म्हणून सिंहाची तोंडे सिंहासनावर कोरण्याची प्रथा सुरू झाली अन् बरं का वैनी, तुमच्यासाठी म्हणून सांगतो, तुम्ही केयूर म्हणून एक सोन्याचा दागिना वापरता ना, उजव्या दंडावर..."

"केयूर ?" सौ देसाई आश्चर्याने उद्गारल्या, "नाही ग बाई नाव सुद्धा ऐकलेलं नाही या दागिन्याचं "

"तू ऐकलं आहेस की नाही ग ?" मी सौ. ला विचारले

"नाही."

"घ्या. तुम्हाला काय वाटलं भावजी, माझ्यापेक्षा तुमच्या बायकोचं ज्ञान अधिक असेल ?" सौ देसाईंचा मिस्कील प्रश्न.

"बायकाच्या सामान्य ज्ञानाबद्दल माझं फारसं चांगलं मत नाही वैनी पण तो मुद्दा नाही केयूर हा दागिना तुम्ही वापरला नसला तरी तुमच्या सासवा, आजेसासवा वापरत होत्या मला माहीत आहे ना !"

"तुम्हाला माहीत आहे !" सौ. देसाईंनी आश्चर्याने विचारले.

"हो हो मी स्वतः माझ्या लहानपणी वापरत होतो हे केयूर. या केयूराच्या दोन टोकाना सिंहाची तोंडे असत. स्त्रियांनी नी मुलांनी फक्त नाजूक असून चालत नाही, त्यांनी सुदृढ पण असलं पाहिजे या कल्पनेचे प्रतीक म्हणजे केयूर. त्याला मराठीत सिंहमुख म्हणत तर कोकणीत म्हणत 'बळ.' बळ म्हणजे शक्ती. बळावरच्या सिंहाची ही तोंडं कीर्तिमुखासारखीच असत "

"काय तर्कट लढवता भावजी ! केयूराला सिंहाची तोंडे असतात म्हणून म्हणे ते शक्तीचे प्रतीक ! चला "

"बर, चला तर चला पण आधी देवीचं साग्रसंगीत दर्शन तर घ्या."

देवीचे निर्माल्यविसर्जन झाले होते. जी मूर्ती समोर दिसत होती ती अभिषेकमूर्ती होती. पंचरशी धातूची ही अभिषेकमूर्ती कोरीव, कातीव, प्रमाणशीर अवयवाची होती. ती चतुर्हस्त होती. तिच्या उजव्या वरच्या हातात खड्ग तर खालच्या हातात त्रिशूळ होता. डाव्या वरच्या हातात चक्र होते नी खालच्या हातात राक्षसाचे धूड त्याच्या शेंडीला धरून ठेवले होते. डाव्या पायावर ती उभी होती उजवा पाय दुमडून महिषाला तिने खाली चेपले होते. महिषाच्या मागे तिचे सिंह वाहन होते. शिवाय पिंडिकेच्या दोन्ही बाजूंना दोन सिंहमुखे होती पिंडिकेच्या खालील बैठकीवर दोन बाजूला पूर्ण सिंहाकृती व मध्ये हत्ती होता. मूर्तीभोवतीच्या दोन प्रभावळींवर दोन मोर होते. मध्यभागी एक छत्र होते. दोन बाजूंना दोन द्वारपाळ होते. सर्वांबाहेर एक भव्य प्रभावळ होती नी तिच्यावरचे कीर्तिमुख एकदम डोळ्यात भरत होते. अशा तीन भव्य प्रथावळी असलेली दुसरी देवता गोव्यांत कुठेही नव्हती

"ही कामाक्षादेवी महिषासुरमर्दिनी दिसते." मूर्तीचे संपूर्ण निरीक्षण केल्यावर देसाई म्हणाला.

"हो. ही महिषासुरमर्दिनीच पण ज्या महिषासुराचे तिने मर्दन केले तो दुर्गेने मारलेला पुराणप्रसिद्ध महिषासुर नव्हे. हा महिषासुर त्याच्याच वंशातला त्याचा कुणीतरी नातेवाईक होता"

"हे आणखी नवीनच काय काढलंस तूं!"

"माझ्या पदरचे सांगत नाही देसाई. कामाक्षामाहात्म्यांत तसे सांगितले आहे. "शेजारी उभ्या असलेल्या भटजींना मी म्हटले, "भटजी, कामाक्षामाहात्म्य आहे का हो तुमच्याकडे?"

"आहे ना. पण घरी आहे. आणून देतो थोड्या वेळाने.

"मग असं करा. देवदर्शन करून आम्ही रायकराच्या अग्रशाळेत जातो. तिथे मला आणून द्या. व्यंकटेश रायकर आहेत ना इथं!"

"हो. आहेत."

अंतराळातून चौकावर येण्यासाठी मागे वळलो तेव्हां अंतराळाच्या मधोमध एका चौकोनी कट्ट्यावर फुले वाहिलेली दिसली.

" हे काय आहे हो ? " देशाईने विचारले.

" हा गण. या शिळेखाली एक घंटा आहे नी हजारो गण आहेत अशी भाविकाची श्रद्धा आहे " भटजी म्हणाले.

संकटपरिहारार्थ इथे गाऱ्हाणे घालतात. अशी गणाची जागा फक्त याच देवस्थानात आहे "

" पण गण म्हणजे काय ? "

" गण म्हणजे काय हेही तुला कामाक्षामाहात्म्यावरून कळेल. " मी म्हटले. " पण-तुला इथली आणखी एक गंमत दाखवतो "

भटजींकडून कामाक्षादेवीचे दोन छापील फोटो मी मागून घेतले नी पाहुण्यांना दाखवीत म्हणालो, " एकाच कागदावर कामाक्षीचे हे फोटो छापले आहेत ना, त्यांतली ही एक आहे अभिषेकमूर्ती ती तुला आता समोर दिसते आहे. पण ही जी दुसरी आहे ती बघा. तिला दोनच हात आहेत. उजव्या हातात खड्ग नी डाव्या हातात राक्षसाचे मुंडके आहे. अभिषेकमूर्तीला अभिषेक झाल्यावर ही द्विहस्त पूजामूर्ती पुढे ठेवली जाते व तिलाच वस्त्रालंकारांनी नटविले जाते. दुपारनंतर आपण इथे आलो असतो तर ही दुसरी द्विहस्त मूर्ती तुम्हाला दिसली असती. अशा द्विहस्त व चतुर्हस्त बऱ्याच उत्सवमूर्ती या देवस्थानात आहेत उत्सवाच्या वेळी लालखी, पालखी, रथ, मखर अशा वाहनात त्यांचा वापर केला जातो. "

मंदिरातून बाहेर पडून आम्ही बाजूच्या छोट्या मंदिरांत रायेश्वर, लक्ष्मीनारायण व शांतादुर्गा या परिवारदेवतांची ' भेट घेतली ' व रायकरांच्या अग्रशाळेत गलो व्यंकटेश रायकर अग्रशाळेच्या पुढच्याच दालनात एका बाकावर बसले होते. आम्हाला पाहून ते उठले नी स्वागता-साठी पुढे आले

मी मंडळीची ओळख करून दिली आणि आमच्या आगमनाचे प्रयोजन सांगितले. तेवढ्यात भटजी कामाक्षामाहात्म्य घेऊन आले. पुस्तक उघडले आणि ते छोटेसे आख्यान मी सुरावर वाचू लागलो. ज्या अग्निमुख ब्राह्मणाची कथा रामनाथ–मंदिरात पंढरपूरच्या विठ्ठलाच्या संदर्भात मी

सांगितली होती तोच या कामाक्षा माहात्म्याचा नायक होता. हा अग्निमुख ब्राह्मण रै क्षेत्रात हरिहराची पूजा करून कालक्रमण करीत होता. त्याला गुणाकर नांवाचा एक मुलगा होता या मुलाला त्याने एक दिवस समिधा आणण्यासाठी रानात पाठविले या रानात प्रसिद्ध अशा महिषासुराच्या कन्येच्या वंशात जन्मलेला एक महाबलवान् महीष राहात होता त्याने या गुणाकराला खाऊन टाकले

उशीर झाला म्हणून अग्निमुख ब्राह्मण त्याच्या शोधार्थ निघाला. महिषाची गाठ पडली तेव्हा तो ब्राह्मणाला म्हणाला, "बरं झालं तू आलास तो. तुझ्या मुलाला मी गिळून टाकलं आहे. पण भूक शमलेली नाही आता तुलाही खाऊन टाकतो."

ब्राह्मण प्राणभयाने पळून गेला. हरिहराची त्याने प्रार्थना केली तेव्हा ते म्हणाले, "तुझा मुलगा तुला परत हवा असेल तर काहूर (कामरूप= आसाम) क्षेत्री जा. तिथे कामाक्षा देवीचा वास आहे. तिला प्रसन्न करून घे. ती महिषाला शिक्षा करून तुझा पुत्र तुला परत मिळवून देईल"

अग्निमुख शर्मा काहूरला गेला. तिथे त्याने कामाक्षीला प्रसन्न करून घेतले ती ब्राह्मणाबरोबर रै क्षेत्री येण्यास निघाली. वाटेत 'पठ' या गावी ती थांबली तेव्हा तिथला भैरव म्हणाला, "मीही तुझ्या मदतीला येतो"

भैरव, त्याचे साठ सहस्र गण आणि साडेतीन कोटी भुते याना बरोबर घेऊन कामाक्षा रै क्षेत्री आली. महीष आपल्या सेनेसह तयार होताच प्रचंड युद्ध झाले! महीष शरण आला. त्याने गुणकराला पोटातून बाहेर टाकून दिले व तो पाताळात निघून गेला. ब्राह्मण संतुष्ट झाला आणि त्याच्या विनंतीस मान देऊन कामाक्षा रै क्षेत्रात कायमची राहिली

हे रै क्षेत्र म्हणजे साष्टीतील राय गाव. तिथूनच बादशाहीच्या काळात कामाक्षा परिवारासह शिरोडे गावात आली

युद्ध संपल्यावर या सहस्र गणांना मंदिराच्या अंतराळातील एका खड्ड्यात जागा देण्यात आली. कामाक्षीला रुद्राने युद्धप्रसंगी दिलेली एक

घंटाही तिथेच ठेवण्यात आली आणि मग खड्डा बुजविण्यात आला. या खड्ड्याला म्हणतात गणाची जागा किंवा गण

कामाक्षामाहात्म्य संपता सरताच चहा आला होता. त्याचा समाचार घेऊन आम्ही निघायच्या तयारीला लागलो. घड्याळात अकरा वाजायला आले होते घाई करणे भाग होते

"म्हणजे, आता निघणार तुम्ही !" रायकरानी विचारले

"हो, निघायलाच हवं. पुढले कार्यक्रम लागले आहेत ना !" देसाई म्हणाला.

"असं करू नका आज पर्वणीचा दिवस आहे प्रसादाला थांबा मग जा."

"हो, प्रसाद होईल मग चहापानासाठी वेळ जाईल. सध्याकाळी तर उत्सव आहेच मग नाटक म्हणजे हे आमंत्रण स्वीकारल तर उद्या सकाळपर्यंत इथं मुक्काम करावा लागेल देसाई" आणि मग रायकरांकडे वळून म्हटले, "आम्ही खरंच राहिलो असतो. पण या लोकांना फार घाई आहे म्हणून जाव लागतं. नाईलाज आहे"

"निघायच्या पूर्वी एक प्रश्न विचारतो रायकरसाहेब. दीपलक्ष्मीचे रायकर तुमचे कोण?" देसाई म्हणाला

रायकरांनी उत्तर देण्यापूर्वीच मी म्हटले, "अरे, हे रायकर वेगळे नी ते वेगळे. पण रायकर या नावावरून ते दीपलक्ष्मीकार रायकर गोव्यातल्या राय गावचे असावेत असे दिसते. ते इथले पूर्वी पुजारी असावेत. ते म्हाळसेचे महाजन होते. बाटवाबाटवीच्या काळात ते रत्नागिरी जिल्ह्यात गेले असतील."

देवालयाभोवती एक फेरी टाकून आणि समोरचा तलाव पाहून आम्ही परत फिरलो

गाडीपर्यंत रायकर आम्हाला निरोप द्यायला आले होते.

# १८ : एकमेव अनोखे शिल्प : तांबडी-सुर्ल

आलेल्या रस्त्याने आम्ही परत फिरलो आणि फोंड्याला आलो. उन्हे चढत होती, घशाला कोरड पडली होती. सौ. देसाई म्हणाल्या, " इथं शहाळी मिळतील का हो ? "

" नाही वैनी. इथं सहसा शहाळी विकत मिळत नाहीत. नारळ जून झाल्याशिवाय काढायची इथं पद्धत नाही. कुठे कुठे विकत मिळतात नाही असे नाही. पण ती चोरीची. "

" म्हणजे पिकते तिथे विकत नाही म्हणतात तेच खरे म्हणायचे. मागे मुंबईला गेले होते तेव्हा किती पोटभर शहाळी खाल्ली म्हणून सांगू ! "

" शहाळ्याची तहान सोड्याने भागवू; चला. " मी म्हटले.

एका सोडावॉटरच्या दुकानात जाऊन सोडा मागविला. देसाईने म्हटले, " आता कुठे जायचं ? "

" तोच विचार करतोय मी. अंत्रुज तालुक्यांतली पाहाण्यासारखी सर्व देवळे आता पाहून झाली. यापुढची मंदिरे लांब लांब अंतरावर आहेत. तांबडी सुर्लेच्या महादेवाला जायचं म्हणत होतो. पण ते आहे जंगलात सह्याद्रीच्या पायथ्याशी हे पाहा इथे. " मी नकाशा काढून टेबलावर उलगडला नी तांबडी सुर्ले मंदिराच्या ठिपक्यावर बोट ठेवले.

" हे पाहा इथे आहे हे मंदिर. अगदी गर्द रानात पूर्वेला हे तांबडी गाव नी पश्चिमेला सुर्ले. या दोन गांवाच्या मध्ये हे मंदिर; म्हणून त्याला म्हणतात तांबडी-सुर्ले. तिथपर्यंत जाणे हे एक दिव्य आहे. तिथे दोनदा जाऊन आलो. अन् दीड दोन वर्षांमागं कांही मित्रमंडळीसह तिसऱ्यांदा जायचं ठरवलं. हिलाही घेतलं बरोबर. चार वाजता मुख्य रस्ता सोडून रानात शिरलो. सांकोर्डेच्या एका धनगर पोऱ्याला वाटाड्या म्हणून बरोबर घेतला. अर्धाएक तास रानातल्या कच्च्या रस्त्याने गाडी चाललीच आहे.

तरी वाटाड्या म्हणतो, अजून लांब आहे देऊळ. दोन वाहात्या पाण्याच्या नाल्यातून गाडी काढली, तिसरा नाला भेटला तो कोरडा. नाल्यात लहानमोठे गुळगुळीत गोटे झाडी इतकी दाट की पाच वाजताच अंधारून आले. गाडी बंद पडली असती तर बायकामंडळीसह रानात राहायचा प्रसंग आला असता. बायकामंडळीच्या अंगावर दागिन्याच ओझं..."

"खरच ग बाई," सौ. सातोस्कर म्हणाली, "आमची तर घाबरगुंडीच उडाली. तरी हे आपले चाललेच आहेत पुढ नाल्यांतनं गाडी काढताना प्रत्येक वेळी खाली उतरायचं, पुन्हा चढायचं पायाना दगडगोटे नी काटे बोचायचे मग आम्ही म्हटलं, नाही देवाच्या मनात भेट द्यायचं. चला, आपण परत फिरू. अन् मग गाडी वळवून परत घरी गेलो."

"मोठा रोमांचक अनुभव आला असेल तुम्हाला वहिनी या प्रवासात!" देसाई म्हणाला.

"रोमांचक कसला, डोंबलाचा!" सौ. देसाई म्हणाल्या, "मला वाटत भावजी, हे देऊळ आपण सोडून देऊ."

"तसच करावं लागेल वैनी. कारण तिथं जाऊन येईपर्यंत सध्याकाळ होईल नी मग आणखी कुठंच जाता येणार नाही. आणखी एक दिवस तुमची राहायची तयारी असली तर मात्र"

"नाही दादा ते शक्य होणार नाही. पण तू असं कर. तिथं काय आहे ते वर्णन करून सांग डोळ्यानी नसलं तरी कानानी तरी हे मंदिर टिपून घेऊ." देसाई म्हणाला.

"ठीक आहे. चला तर."

शेवटचा सोड्याचा घोट घशात ओतून आम्ही उठलो

गाडी फोंडा सोडून पूर्वेला जाऊ लागली. मध्ये खांडेपारची नदी भेटली. पुलावरून पुढे गेलो तेव्हा मी म्हटले, "ह्या उजवीकडल्या डोंगरांत गोवा सरकारने एक अभयारण्य तयार केलं आहे. पशुपक्ष्यांना इथ अभय आहे. कृत्रिम जलाशय, धबधबा, अशा सोयी आहेत कडे असे उभे आहेत की जीपशिवाय दुसरे वाहन जाऊ शकत नाही वोंडलाचं

अभयारण्य असं म्हणतात त्याला. ”

थोड्याच वेळात तिस्कावर येऊन पोचलो. ‘ तिस्क म्हणजे तीन रस्ते भेटलेली जागा आम्ही फोंड्याहून आलो तो एक रस्ता उजवीकडे बेळगावला गेलेला दुसरा रस्ता नी डावीकडे साखळी–डिचोलीवरून एका बाजूने पणजीला नी दुसऱ्या बाजूने सावंतवाडीला गेलेला तिसरा रस्ता. बेळगावकडे गेलेल्या रस्त्याला धारबांदोडे या गावाजवळ साकोर्डे गावी जायला एक रस्ता फुटतो साकोर्डे हा गाव खाणधंद्यासाठी प्रसिद्ध आहे. हा सारा परिसर लोहखनिजाच्या खाणींनी भरलेला आहे

साखळीच्या रस्त्याने जाता जाता ही माहिती मी सांगत होतो.

साकोर्ड्याहून एक कच्चा रस्ता सुरू होतो. तिथून पुढे तांबडी गावच्या वाटेवर दाट रानात एक महादेवाचे मंदिर आहे या प्रकारचे मंदिर गोव्यात एकमेव हेच बांधणीच्या दृष्टीने आणि प्राचीनतेच्या दृष्टीनेही एकमेव.

हे मंदिर हेमाडपंती बांधणीचे आहे. हेमाडपंती बांधणीची मंदिरे महाराष्ट्रात आणि उत्तर कर्नाटकांत खूप आहेत. काळ्या खडकाचे दगड एकावर एक ठेवून आणि भूमितीतील अनेक आकाराचे दगड बनवून चुन्याशिवाय ती बांधली जातात. पायापासून शिखरापर्यंत चुन्याचा वापर कुठेही केला जात नाही आणि तरीही शेकडो वर्षे ही मंदिरे टिकून आहेत.

हेमाडपंती देऊळ हा शब्द महाराष्ट्रात चुन्याशिवाय बांधलेल्या सर्व देवळांना उद्देशून वापरला जातो. कर्नाटकांतील देवळे जकणाचार्याने बांधली. ( उदा० बेलूर व हळेबीड ), गुजरातेतील देवळे गवळीराजाने बांधली तशी महाराष्ट्रातली देवळे हेमाडपंताने बांधली व चुन्याशिवाय बांधकाम करण्याचा शोध त्यानेच लावला अशी समजूत प्रचलित आहे. परंतु इतिहास आणि महाराष्ट्र–कर्नाटकातील मंदिरशिल्पाचा विकास लक्षात घेतला तर चुन्याशिवाय मंदिरे बांधण्याचा शोध हेमाडपंताने लावला असे वाटत नाही

हेमाडपंत वा हेमाद्री हा तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन

गेलेल्या रामदेवराव यादवाच्या मंत्री. रामदेवरावाच्या राजवटीत हिंदु धर्माला राजाश्रय मिळाला व आपल्या कारकीर्दीत हेमाडपंताने खूप देवळे बांधली, अनेकांचा जीर्णोद्धार केला ही गोष्ट खरी. पण चुन्याशिवाय मंदिरे बांधण्याची कला त्याहीपूर्वी अस्तित्वांत होती हे नाकारता येत नाही तांबडी सुर्लेच्या मंदिराचेच उदाहरण घेतले तर हे मंदिर ११५० च्या सुमारास म्हणजे हेमाडपंताच्या कालापूर्वी सवा शतक, शिवचित्र कदंबाची महाराणी कमलादेवी हिने बांधले असे डॉ. पिसुर्लेकरांनी सिद्ध केले आहे. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी हेमाडपंताच्या काळापूर्वी बांधलेली असली देवालये अस्तित्वात आहेत

शिल्पशास्त्राच्या दृष्टीनेही ही गोष्ट सिद्ध करता येते कझीन्सने आपल्या ' Mediaval Temples of The Deccan या ग्रंथात हेमाडपती देवालयाची माहिती देताना म्हटले आहे की ही देवालये अगदी ओबडधोबड स्वरूपाची, दगडावर दगड रचून उभारलेली आणि कुठलेही शिल्पसौंदर्य नसलेली असतात. महाराष्ट्रातली तत्कालीन राजकीय परिस्थिती विचारात घेतली तर अजंठा–वेरूळच्या शिल्परचनेचा काळ आता मागे पडला होता व यावनी आक्रमणामुळे अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे हेमाडपंतांनी जी देवालये बांधली ती अगदी साधी, शिल्प-सौंदर्य नसलेली बांधली हे उघड होते.

तांबडी-सुर्ले मंदिर असे अगदी साधे नाही. बेलूर हळेबीडच्या मंदिराइतके ते शिल्पाने नटलेले नसले तरी थोडेबहुत शिल्प तिथे दिसतेच बेलूरप्रमाणे या मंदिराचे जोतेही उंच आहे. ते तारकाकृती आहे. हा काळ होयसळांचाच असला पाहिजे या काळात राजकीय अस्थैर्य निर्माण झाले नव्हते. याच काळात गोव्यांत कदंबाचे राज्य होते. म्हणजेच हे मंदिर हेमाडपंती काळापूर्वीचे आहे ही मंदिर परंपरा चालुक्य–होयसळांचीच दिसते

देवालयाला जो दगड वापरला आहे तो जवळपासचा नाही. धारवाडकडून तो आणला असला पाहिजे. धारवाडी दगडावरच कलाकुसरीची

कामे होतात हळेबीड-बेळूरची मंदिरे याच दगडाने बांधली आहेत मुखमंडपाला चार खांब असून त्यावर कलाकुसर आहे भोगमंडपातील छतावर अष्टदलाचे शिल्प आहे अंतराळ अत्यंत आकुंचित आहे. बहुतेक सर्व मंदिरावर शिल्प आहे ते कमलपुष्पाचे

गर्भागारात फूटभर उंचीचे शिवलिंग आहे बाहेर लक्ष्मीनारायण, गणपती व देवी यांच्या मूर्ती आहेत. तीन शिलापटावर नागाच्या मूर्ती कोरल्या आहेत. एका खांबावर सोंड वर उभारलेल्या हत्तीची प्रतिमा आहे एका स्थानिक गावकाराने या देवाचे जुने नाव नागेश असल्याचे सांगितले होते नागमूर्तींच्या अस्तित्वामुळे हे खरे असावे असे वाटते

हे देवालय मागच्या बाजूने मोडकळीला आले होते काही वर्षांपूर्वी आंब्याचे एक जुनाट झाड मोडून पडल्यामुळे मागचा कोपरा पडला होता. धारवाडी दगड आणून तो नुकताच दुरुस्त केला आहे. पक्का रस्ता केला तर प्रवाशांचे हे एक आकर्षण होण्यासारखे आहे.

स्थानिक लोकांना या देवालयाची माहिती होती. तिथे नित्यपूजा होत होती. अजूनही होते. वार्षिक उत्सव होतो पिसुर्लेकरांसारख्या संशोधकांना या देवालयाची माहिती होती. सर्वसामान्य गोवेकरांना मात्र असे एक जुने देवालय गोव्यात आहे याची काहीच कल्पना नव्हती. पिसुर्लेकरांकडून १९६१ साली त्या वेळचे पोर्तुगीज गव्हर्नर व्हासालु ई सील्व यांना या देवालयाची माहिती कळली तेव्हा हे देवालय पाहायची इच्छा त्यांनी व्यक्त केली जंगलात झाडी तोडून रस्ता तयार झाला. गव्हर्नरसाहेब तिथपर्यंत गेले आणि खूष झाले. त्यांनी ठरवले, थोरले गोवे येथे-जो पोर्तुगीजपूर्वकालीन वस्तूंचा म्युझियम करायचा आहे तिथल्या प्राकारात हे देवालय जसाचे-तसे उचलून ठेवून द्यावे स्वातंत्र्य एक-दोन वर्षे उशीरा आले असते तर कदाचित हे देवालय आज इथे दिसले नसते आणि ते पाहायला थोरल्या गोव्याला जावे लागले असते

तांबडी-सुर्लच्या देवालयाची ही माहिती एकून श्रोत्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया झाल्या

सौ. सातोस्कर म्हणाली, "त्या दिवशी आपण पुढे जायला हवे होते".

देसाई म्हणाला, "म्हणजे- तांबडी--सुर्लला आपण गेलो नाही ही चूक केली म्हणायची अशा रम्य स्थळी एक सबंध दिवस घालवण्यात सुद्धा मजा आली असती नाही ग!"

"हो अन् आज सोनवार होता. अनायासे महादेवाचं दर्शन घडलं असत" सौ देसाई उद्गारल्या.

"महादेवाच्या दर्शनाचं म्हणत असाल तर अर्ध्या तासाच्या आत तुम्हाला दुसरा महादेव भेटेल वैनी काही काळजी करू नका. पण तांबडी–सुर्लचा महादेव काही भेटणार नाही. विरुद्ध दिशेने फार पुढे आलो आहोत आपण."

एवढ्यात समोर रस्त्याच्या उजव्या बाजूने डाव्या बाजूकडे माडभर उंचीवरून ट्रॉलीसारखी एक पेटी घरंगळत वेगाने गेलेली दिसली

"ते काय हो?" सौ. देसाईनी विचारले.

"ती या गोव्याची नवलक्ष्मी!"

"ही गोव्याची नवलक्ष्मी? एक एक नवलच सांगता हो भावजी"

"नवल खरं; पण थाप नव्हे वैनी. जरा आजूबाजूला पाहा. हे उघडेबोडके, तासलेले, कापलेले, फोडलेले, सुरुंग लावून उडवलेले डोंगर दिसतात ना तुम्हाला? गोव्यात गेल्या तीस वर्षांत एक नवी संपत्तीची देवता इथे सापडली आहे. या डोंगरात लोहखनिज हे या देवतेचे नाव. या देवतेची इथं उपासना होते वीस पंचवीस हजार मजूर इथे दररोज आठ आठ तास तिची पूजा करतात, घाम गाळून सेवा करतात नी खाणमालक तिचा प्रसाद ग्रहण करतात. पन्नास, साठ, सत्तर कोटी रुपयांचे परकीय चलन ही डोंगरातली नवलक्ष्मी भारताला मिळवून देते. शिरगांव, वेळग, पाळी, साकोर्डेच्या परिसरात तिचा निवास आहे गेल्या तासेक वर्षांत गोव्यात जी सुबत्ता आली तिचे हे मूळकारण."

इतक्यात आमच्या गाडीसमोरून माडभर उंचीवरून उजव्या हाताकडून डाव्या हाताला दोरखंडावरून पुन्हा एक पेटी घरंगळत गेली

"ती दोरावरून सरकत गेली ती नवलक्ष्मी म्हणालात तुम्ही. नवलक्ष्मी म्हणजे खनिज हेही कळलं. पण ती खनिजाची पेटी इकडून तिकडे का गेली ?" सौ. देसाईंनी विचारले

"डोंगरातलं लोहखनिज नदीच्या धक्क्यापर्यंत वाहून नेण्याची यांत्रिक व्यवस्था आहे ती "

होंडला आलो तेव्हा डावीकडच्या रस्त्यावर वळलो उजवीकडचा रस्ता सत्तरी तालुक्यांतल्या वाळपई गांवी जात होता. तिथून आणखी पुढे ब्रह्मा करमळी नांवाचे एक गाव होते. ब्रह्मदेवाचे देऊळ इतर कुठे आहे की नाही ते मला माहीत नाही. पण या करमळी गांवात चतुर्मुखी ब्रह्मदेवाचे एक देऊळ आहे तेही सोडणे वेळेच्या अभावी आम्हाला भाग होते सत्तरी हा साराच भाग उपेक्षित आहे. गर्द झाडीचा, विपुल पाण्याचा, धनगर, कुणबी, कुळवाडी आणि शेती–बागायत करणारे थोडे द्राविड ब्राह्मण यांची विरळ वस्ती असलेला हा गोव्याचा भाग सह्याद्रीच्या कुशीत झोपला आहे. त्याला नुकतीच कुठे जाग येत आहे एका काळी राण्यांनी त्याला जाग आणली होती पण ती खरी जाग नव्हती. सुषुप्ती होती.

"याच सत्तरीचे वर्णन पं महादेवशास्त्री जोशी यांनी आपल्या कथांतून केलं आहे. ते इथल्या आंबेडे गावचे. या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या तेव्हा तुमच्याप्रमाणे आम्हालाही अनोख्या वाटत होत्या. कारण सत्तरी आम्हाला ऐकून माहीत होती. प्रत्यक्ष कुणी पाहिली नव्हती मी गोव्याचा कानाकोपरा डोळ्याखाली घातला आहे. पण इकडे वाळपईपलीकडे गेलो नव्हतो. अगदी परवा परवा सत्तरी पाहिली."

बोलत होतो तरी माझे लक्ष रस्त्याकडे होते नी धबध'ब्याकडेही होते. हरवळे जवळ आले तशी मी सौ. देसाईंना म्हणालो, "वैनी, चला. तुम्हाला महादेवाचं दर्शन घ्यायचं होतं ना ?"

हरवळे हे गोव्यातले एक छोटेसे प्रेक्षणीय स्थळ आहे. इथे महादेवाचे एक मंदिर आहे पण त्याला महत्त्व आहे ते तिथल्या धबधब्यामुळे जोग फॉल्सप्रमाणे हा धबधबा उंच नाही, परिसर प्रचंड नाही की त्याचे

खोरे छाती दडपण्यासारखे खोल नाही. गोव्याच्या इवल्याशा जिवाप्रमाणे त्याचा जीव सुद्धा एवढासा आहे. पण जिवंत पाण्याची ओढ असलेल्या माणसाला तो आकृष्ट करू शकतो.

महादेवाच्या मंदिरात जाऊन व देवदर्शन करून आम्ही लगेच बाहेर पडलो.

## १९ : जागृत देवस्थान : दत्तवाडी

साखळीच्या पुलावर गाडी उभी करून आम्ही पायऱ्या उतरू लागलो तेव्हा साडेबारा पार करून तासकाटा एकाचा आकडा जवळ करू लागला होता. उदरभरणाची वेळ झाली होती. पण आज दत्तगुरु आणि पांडुरंगाचे दर्शन घेतल्याशिवाय आम्ही अन्नाला स्पर्श करणार नव्हतो.

दत्तवाडी आणि विठ्ठलापूर ही साखळीतील दोन प्रख्यात देवस्थाने. दोन्ही समोरासमोर उभी ठाकलेली. दत्तवाडी नदीच्या अलीकडे सांखळी गांवाच्या हद्दीत सखल भागात, तर विठ्ठलापूर कारापूर गावात समाविष्ट होणाऱ्या नदीपलीकडच्या उचवट्यावर. पहिले अर्वाचीन तर दुसरे मध्ययुगीन. पण दोन्ही देव भक्तांच्या हाकेला साद देऊन गोव्यांत आलेले पांडुरंग पंढरीहून तर दत्त नरसोबावाडीहून.

गोव्यात दत्तसंप्रदायाची परंपरा नव्हती. बाटवाबाटवीच्या काळात गोव्यातल्या तीन तालुक्यातली नऊशे देवालये पोर्तुगीजांनी नष्ट केली त्यांत दत्ताच्या एकाही देवालयाचा उल्लेख नाही. अपवाद फक्त एकच. केळोशी येथील दत्तात्रेयाच्या मंदिरास म्हाळू शेणव्याने एक शेत दिले असा एक सोळाव्या शतकांतला उल्लेख सरकारी दप्तरात सापडतो. पण ते देवालय कोणते याचा पत्ता मात्र लागत नाही.

या दृष्टीने गोव्यातल्या दत्त संप्रदायाचा उगम फक्त शंभर वर्षांपूर्वी या सांखळीच्या दत्तमंदिरापासून झाला असे म्हणावे लागते. तसे पाहिले तर दत्ताची वैयक्तिक उपासना करणारी माणसे गोव्यात होती. ती महाराष्ट्रातल्या जागृत दत्तमंदिराच्या यात्रेलाही नियमाने जात. याच उपासकांपैकी सांखळीचा एक लक्ष्मण म्हाळू कामत दरवर्षी नरसोबाच्या वाडीला जाई व भक्तिपूर्वक गुरुचरित्राचे पठण करून परत येई. त्या काळात सारस्वताना द्राविड ब्राह्मण आपल्यापेक्षा कमी दर्जाचे समजत किंवा त्यांना मुळी ब्राह्मण समजतच नसत. त्यामुळे या कामताचा तिथे अपमान होई

एक दिवस असाच काहीतरी अपमान झाल्यामुळे लक्ष्मण कामत खिन्न होऊन बसला व त्याने दत्तमहाराजाची प्रार्थना केली, "गुरुराया. हा अपमान माझा नसून तुझा आहे रे बाबा "

आणि त्या रात्री त्याला दृष्टांत झाला एक जटाधारी, दंडकमंडलूनी युक्त असा तापसी त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाला, "भक्ता, यापुढे तू इथ यायचे श्रम घेऊ नकोस. मीच तुझ्या गांवी येईन."

ही गोष्ट बरोबर शंभर वर्षांपूर्वीची १८७८ सालची.

लक्ष्मण कामत सांखळीला परत आले तेव्हा इकडे एक नवीनच घटना घडली होती बोडके घराण्यातील एका विधवा बाईने एक औदुंबराचा पार बांधायचे ठरविले होते. सध्याच्या पांडुरंगाच्या देवालयाजवळची जागा निवडली होती. पण काही कारणामुळे हा पार नदीपलीकडे मुसलमानाच्या स्मशानभूमीजवळ बांधायचे ठरले. पाराच्या खोदकामास सुरुवात केली तेव्हा एक नवल घडले खणता खणता एक सोन्याचा नाग, चांदीच्या पादुका आणि गणपती व मारुतीच्या पाषाणाच्या मूर्ती सापडल्या

गावातल्या मंडळींनी मग लक्ष्मण कामताच्या पुढारीपणाखाली वर्गणी जमवून औदुंबराच्या पाराजवळ दत्तमंदिर म्हणून एक छोटी देवळी बांधली. त्यात बोरी येथील शिल्पकाराकडून तयार केलेली काळ्या पाषाणाची दत्ताची एकमुखी मूर्ती बसवली आणि तिथेच पाराच्या पायात सापडलेला पादुकांचा जोड ठेवला.

यानंतर लक्ष्मण कामत चे बंधु वासू कामत यांस एक स्वप्न पडले. स्वप्नात दत्तमहाराज येऊन म्हणाले, "मी सह्यपर्वत ओलांडून आल्यामुळे फार थकलो आहे. मला विश्रांती हवी" आणि अधिक कांही न बोलताच स्वारी नव्या दत्तमंदिराच्या दिशेने चालू लागली.

दुसऱ्या दिवशी गांवकऱ्याना स्वप्नाची हकीकत कळली तेव्हा त्यांना अत्यानंद झाला. नरसोबाच्या वाडीहून सह्याद्री पर्वत ओलांडून स्वतः गुरुमहाराज साखळीला आले होते. त्या दिवसापासून सांखळीला दत्तगुरु आल्याची वार्ता सर्व गोव्यात पसरली.

गांवकऱ्यात आता अमाप उत्साह संचारला. गोव्यात हिंडून त्यानी वर्गणी गोळा केली आणि पूर्वीच्या छोट्या मंदिराला जोडून आज दिसते ते मंदिर उभारले. १८८२ साली या मंदिरात मुंबईहून आणलेल्या संगमर्मरी जयपुरी दगडाच्या त्रिमुखी दत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली

असे हे अगदी अलीकडच्या काळात स्थापन झालेले देवालय. दत्ताच्या इतर देवस्थानातून पूजाविधी, गुरुचरित्रवाचन, पाविञ्याचर कटाक्ष, भूतबाधेपासून मुक्तता करणे वगैरे प्रकार दिसतात तेच या दत्तमंदिरातही दिसतात. या दृष्टीने हे गोव्यातील एक जागृत देवस्थान समजले जाते.

ज्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली आहे तिच्याबद्दल एकदोन चमत्कार-कथा सांगतात. मंदिराचे बांधकाम पूर्ण होताच मंडळी मूर्ती आणण्यासाठी मुंबईला गेली जेमतेम दोन अडीचशे रुपये त्यांच्याजवळ होते अनेक मूर्तिकारांकडे दत्तमूर्ती होत्या. पण कुटलीही मूर्ती त्याना पसत पडेना. शेवटी कोणा एका प्रख्यात मूर्तिकाराकडे एक सुंदर मूर्ती असल्याचे कळले नेपाळ नरेशासाठी त्याने ती तयार केली होती. पण नेपाळचे राजे अकस्मात वारल्यामुळे ती बरेच दिवस पडून राहिली होती साखळीच्या मंडळीच्या ती एकदम डोळ्यात भरली. किंमत विचारली तेव्हा आठशे रुपये सागण्यात आले. एक पैसा कमी घेण्यास मूर्तिकार तयार होईना. हिरमुसल्या मनाने मंडळी परत फिरली.

पण दुसऱ्याच दिवशी एक चमत्कार झाला मूर्तिकाराकडून एक

मनुष्य सांखळीकर मंडळीचा पत्ता शोधीत आला. म्हणाला, "मालकांनी तुम्हाला तातडतोब बोलावले आहे "

मंडळी गेली तेव्हा मूर्तिकार म्हणाला, "ही मूर्ती तुम्ही आता घेऊन जा. तुम्ही खुशीने द्याल ते घ्यायला मी तयार आहे."

चौकशी करता कळले की त्याला पूर्वरात्री स्वप्नात दत्तगुरूंचा दृष्टांत झाला होता सांखळीला जायला गुरुमहाराज उत्सुक होते.

मोठ्या आनंदाने मंडळी मूर्ती घेऊन सांखळीला आली. बोडके याच्या घरी ती ठेवण्यात आली आणि तिथे आणखी एक चमत्कार झाला. त्या घरातल्या राधाबाई नांवाच्या बाईस पिशाच्चबाधा झाली होती. मूर्ती घरात आली मात्र ही बाई घुमू लागली तीन तोंडांच्या त्या पाहुण्याला शिव्या देऊ लागली अखेर जमिनीवर निश्चेष्ट पडली. उठली तेव्हा खडखडीत बरी झाली होती! तेव्हापासून भूतबाधा निवारणासाठी माणसे सांखळीला जाऊ लागली

आम्ही महाद्वारांतून प्राकारांत प्रवेश केला तेव्हा समोरच दोन बाजूंना दोन पिंपळाचे वृक्ष दिसले. जरा पुढे 'पादत्राणे येथे ठेवावी' अशी पाटी होती. वास्तविक ही जागा मंदिरापासूनच नव्हे तर सभामंडपापासूनही बरीच दूर आहे पण पावित्र्यरक्षणाची पहिली साक्ष या पाटीने पटते

दुसरी साक्ष पटते ती मुखमंडपात मुखमंडपांत तुम्ही तुमचे अपवित्र शरीर घेऊन जाऊ शकता. परंतु चौकावर जायचे झाल्यास स्नान करून शुचिर्भूत होऊन जाणेच योग्य मांस–मासेच नव्हे तर कांदालसूण सुद्धा खाऊन जाणे अनिष्ट देवालयात घासलेटचे दिवे लावण्यास बंदी होती. झुंबरे आणि समयाच रात्रीचा प्रकाश देत. १९६६ साली वीज येईपर्यंत ही प्रथा चालू होती प्राकारात देखील पादत्राणे घालून हिंडता येत नाही

सर्वसाधारणपणे देवालयात शिरल्यावर भक्तमंडळी चौकावरील घंटा वाजवतात. पण गोव्यात हे एकच देवालय असे आहे की जिथे घंटा वाजवायला बंदी आहे.

मंदिराबाहेर पडून चपला न घालताच आम्ही प्राकारात फिरू लागलो. जमीन तापली होती. पायांना चटके बसत होते

गोव्यातल्या इतर देवस्थानांप्रमाणेच प्राकारांत स्वच्छता होती. पण माणसांची गर्दी नव्हती. यात्रेकरूंना उतरण्याच्या आधुनिक सोयी असलेल्या अग्रशाळा नव्हत्या. सेवेसाठी येऊन राहणाऱ्या लोकांसाठी निवारा म्हणून अग्रशाळा होत्या. पण त्यांत भव्यता नव्हती. आणि तरीही एकूण 'स्थळा 'तल्या वातावरणात एक प्रकारची गूढरम्यता होती

पिंपळाच्या वृक्षाखाली आम्ही थोडा वेळ उभे राहिलो. देसाई म्हणाला, "रम्य वाटले मला हे देवस्थान. नरसोबाची वाडी आम्ही परवाच पाहून आलो. त्या पार्श्वभूमीवर तर ही दत्तवाडी किती शांत, किती पवित्र वाटली खरं ना ग ?"

सौ. देसाईंनी होकार दिला.

देसाईच पुढे म्हणाला, "इथे दत्तसंप्रदाय नव्हता असं तूं म्हणालास पण दत्तसंप्रदायाला जवळचा असा जो नाथसंप्रदाय तो तरी होता का इथे!"

"कांही नक्की सांगता येत नाही" मी म्हणालो, "नाथ संप्रदायांचे कांही अध्वर्यु इथे येऊन गेले याबद्दल शंका नाही. नाथपंथातील जे प्रसिद्ध नवनाथ समजले जातात त्यांनी भारतभर संचार केला होता. त्यांपैकी मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ गोव्यांत आल्याचे पुरावे निश्चित उपलब्ध आहेत. काल तूं माशेलांतले मल्लिनाथ देवस्थान पाहिलंस ना, तो मल्लिनाथ हा मूळ मच्छिंद्रनाथ. या देवस्थानात नवनाथभक्तिसार ही पोथी वाचायची परंपरा आहे. देवाचा अवसर येतो तेव्हा तो म्हणतो, "मी जोगी आहे. तुम्हा भक्तजनांच्या कल्याणासाठी मी या संसारात इथे असा अडकून पडलो आहे." दत्त हा आपला गुरु आहे असेही तो सांगतो अन् ही अवसराची प्रथा शेकडो वर्षांची जुनी आहे.

"मच्छिंद्रनाथाचा शिष्य गोरखनाथ गोव्याला येऊन गेल्याची साक्ष जुन्या गोव्याला मिळते. काल आपण तिथे गेलो तेव्हा गोरक्षतीर्थ पाहिले. गोरखनाथ इथे आले नसते तर त्याच्या नांवाचे तीर्थरूपी स्मारक निर्माण

करायची कुणाला काय गरज होती! इतर नाथापैकी कुणी इथे येऊन पंथप्रचार केला किंवा काय याचा मात्र पत्ता लागत नाही याशिवाय मडगावजवळ रावणफोंड इथे कानफाट्या गोसावी जातीची वस्ती आहे. तिथे मत्स्येंद्रनाथ व गोरखनाथ याचे एक छोटे देऊळ आहे. खळनाथ हा नाथपंथातील असावा असे एक मत मांडले जाते परंतु खळनाथ, भूतनाथ वगैरे मंडळी भैरव, वीरभद्राप्रमाणे शिवगण असले पाहिजेत यात शंका वाटत नाही. इथे नाथ जोगी नावाची एक नाथपंथीय जात मात्र आहे, ती रावणफोंडप्रमाणे डिचोलीलाही आहे"

आमच्या या नाथ–चर्चेत बायका मंडळीला रस नव्हता हे त्यांच्या चुळबुळीवरून दिसत होते देसाईला खूण करून मी मुकाट्याने पुलाच्या पायऱ्या चढू लागलो.

## २० : सांखळीला आला पंढरीचा राणा

दत्तवाडीहून विठ्ठलापूर इतके जवळ की पायी गेलो तेव्हा आम्हाला पांच मिनिटे लागली. टेकाडावजा उंचवट्यावर चढता चढता देवालयाचा वरचा भाग दिसू लागला.

वर चढून देवालयाकडे नजर फेकली तेव्हा देसाई म्हणाला, "अगदी आधुनिक टाईपचे दिसतेय हे देवालय. एक तुमच्या त्या गोपाळ–गणपतीचे मंदिर सोडले तर असे सिमेंट–कांक्रिटचे मंदिर आतापर्यंत पाहिले नव्हते याची रचना पण वेगळीच दिसते शिखरे आहेत; पण शिखराची रचना सुद्धा वेगळीच इतर देवळांवर कौले आहेत, तर या देवळावर स्लॅब आहे. शिवाय नक्षीदार पॅरापेट दिसते. दोन मजले असावेत असे वर–खालच्या खिडक्यांवरून तरी दिसते दोन्ही शिखरे आणि मंदिराच्या

महाद्वारावरील गवाक्षाची रचना पाहिली तर मध्यप्रदेश किंवा राजस्थानच्या शिल्पाची आठवण होते."

"करेक्ट आधुनिक शैलींत राजस्थानी शैलीचे मिश्रण करून हे देवालय बांधले आहे. आणि त्याचे कारण म्हणजे ग्वाल्हेरच्या राणीसाहेबांनी अवघ्या ४० वर्षांपूर्वी ते बांधले आहे"

"ग्वाल्हेरच्या राणीसाहेबांनी?" देसाईने आश्चर्याने विचारले "त्यानी का बांधले हे गोव्यांतले मंदिर?"

"अरे, त्या गोव्याच्या होत्या, या सांखळीतल्या होत्या म्हणून!"

"आमची ही म्हणते ते खोट नाही एकेकदा तूं अगदी कोड्यात बोलतोस! ग्वाल्हेरच्या राणीसाहेब एकाच वेळी ग्वाल्हेरच्या नी गोव्याच्या कशा असतील!"

"का असू नयेत? गोव्यांत एका मुलीचा जन्म होतो, तिथेच ती लहानाची मोठी होते नी लग्न करून ग्वाल्हेरच्या राजघराण्यात जाते यांत आश्चर्य कसलं आलं आहे!"

"अरे, पण राजपुत्राशी लग्न व्हायला ती राजकन्या असायला नको! गोव्यांत राजे असल्याचं मला कांही माहीत नाही. काल तूं नागेशीला ते सौंदेकर राजे असल्याचं सांगितलंस त्याच्याकडची तर ही राजकन्या नव्हे?"

"नाही. त्याची नव्हे. ते कानडी राजे. ही अस्सल रजपूत वंशांतली."

"अन् तरीही गोव्यातली?"

"हो, तरीही गोव्यांतली. या सांखळी गांवची. याच विठ्ठलापुरांतली. चल दाखवतो तुला"

देवालयांत प्रवेश न करता प्रथम आम्ही प्राकारातून देवालयाला प्रदक्षिणा घातली देवालयाच्या पाठीमागे एक भव्य जुना वाडा होता. त्याच्याकडे बोट दाखवीत मी म्हटले, "हा राण्याचा वाडा. चार पाच शतकांपूर्वी सत्रोजी राणा नावाचा एक रजपूत राजपुरुष गोव्यात आला नी सत्तरीत स्थायिक झाला. शिवाजीकालापासून तरी या घराण्याचा इतिहास सांपडतो. त्यांतली एक शाखा इथे सांखळीला स्थायिक झाली या घराण्यांतली एक कन्या—योगायोगाने तिच्या वडिलांचे नांवही

सत्रोजीराव हेच होते—ग्वाल्हेरच्या राजघराण्यांत लग्न होऊन गेली. अलिजाबहादुर श्रीमती गजराराजे शिंदे हे या राजस्नुषेचे नांव. माधवराव शिंदे यांच्या या पत्नी नी जिवाजीरावाच्या माता. आपल्या माहेरच्या देवाची कांही सेवा करावी म्हणून त्यांनी हे देवालय बाधून दिले."

"म्हणून ही राजस्थानी शैली?"

"हो."

'काय रे, तुमच्याकडे राणे नांवाचे एक मंत्री होते ते याच घराण्यातले काय?"

'हो याच घराण्यातले. प्रतापसिंग राणे त्याचे नाव. आज ते गोव्याचे मुख्यमंत्री आहेत."

प्राकारात हिंडत असताना एक गोष्ट लक्षात आली इथे अग्रशाळा, सभामंडप, तलाव, प्रचंड दीपस्तंभ या गोष्टींचा अभाव होता टुरिस्ट मंडळी इथे येऊन रहात नव्हती त्यामुळे त्याच्या सोयीचा प्रश्न नव्हता. इथे माणसे येतात. हजारोनी येतात, ती चैत्री पौर्णिमेला. आषाढी कार्तिकीलाही लोक येतात. हे विठ्ठलापूर म्हणजे गोव्यातले प्रती पंढरपूर समजले जाते.

देवालयात प्रवेश केला तेव्हा त्याची आधुनिकता आणखी प्रत्ययाला आली. मुखमंडप, भोगमंडप, गर्भागार वगैरे गोष्टी होत्या. परतु भारतीय मंदिरशिल्पाप्रमाणे त्याची काटेकोर रचना केली नव्हती.

देवळात शुकशुकाट होता. भटजी सुद्धा कुठे दिसत नव्हते. मी जोराने घंटा वाजवली.

देसाई म्हणाला, "जो तो देव उठतो नी गोव्याबाहेरून गोव्यात येतो त्याचे कारण आता कळले. ह्या पंढरपूरच्या विठोबाचेच पाहा ना, तो तिन्ही त्रिकाळ तिकडे पंढरपूरला भक्तमंडळीच्या गर्दीत सापडलेला असतो. गर्दीचा हा त्रास टाळावा म्हणून तो गोव्यात आला असेल. काय अशीच आहे ना दंतकथा?"

भर दुपारच्या या अवेळी देवाला त्रास द्यायला कोण आले हे पाहायला रामकृष्ण भटजी धाके देवळात आले.

मी भटजींना म्हटले, " बाक्रेभटजी, आम्ही प्रथम दर्शन घेतो. आम्हाला तीर्थप्रसाद द्या. नी मग आमच्या या पाहुण्यांना पंढरीचा हा राणा गोव्याला का आला ती कथा सुनवा सोनाराच्या हातूनच कान टोचलेला बरा नाही का ! "

भटजी हंसले

" का हंसलांत ! "

" भटजींना तुम्ही सोनाराची उपमा दिली म्हणून. "

भटजींच्या हजरजबाबीपणाने आम्हालाही हंसू आले.

गाभाऱ्याच्या दाराशी उभे राहून आम्ही त्या सावळ्या विठूमाऊलीचे दर्शन घेतले. एका बाजूला रखुमाई नी दुसऱ्या बाजूला सत्यभामा. तिन्ही मूर्ती पाषाणी होत्या. बाक्रेभटजी म्हणाले, " तीनपैकी दोन मूर्ती फार जुन्या आहेत " गर्भगृहाच्या बाहेर एक गणपतीची पूजामूर्ती आहे.

विठ्ठलाकडे पाहाता पाहाता माझे मन इतिहासकाळात गेले. हा विठोबा मूळ कानडा. विजयनगरचा. तिथे विठ्ठलाचे मंदिर अजूनही आहे; पण ते मूर्तिविना सुने आहे. कारण तिथून भानुदासाने त्याला पंढरीला नेला. केव्हाची बरे गोष्ट ही ? हजार वर्षांपूर्वीची ? असेलही. ज्ञानेश्वरांच्या काळात तर वारीची प्रथा रूढ झाली होती त्यापूर्वी कित्येक वर्षे कानडा विठ्ठल मराठा बनला होता. नामदेव, ज्ञानोबाने विठ्ठलभक्तीच्या मंदिराचा पाया रचला नी तुका त्याचा कळस झाला ! तो हा बरवा विठ्ठल गोव्याला का बरे आला असेल ?

' हं सांगा आता तुमची दंतकथा " मंडळी चौकावर बसल्यानंतर मी म्हटले.

" दंतकथा नव्हे हं, ती सत्यकथा आहे असा इथे सर्वांचा विश्वास आहे. " भटजी म्हणाले

" दंतकथा असो की सत्यकथा असो. आमचे हे मित्र त्याना तथ्यकथा म्हणतात.

आम्ही सारेच पुन्हा एकदा हंसलो.

भटजी कथा सांगू लागले

" फार फार जुनी गोष्ट आहे. शके तेराशे सव्वीसची. म्हणजे इसवी सन चौदाशे चार सालची. त्याही काळात गोव्यांत वारकरी संप्रदाय प्रचलित होता. पुष्कळ वारकरी आषाढी कार्तिकीला पंढरपूरला जात. आम्हा वाक्रयाच्या घराण्यात नी राण्याच्याही घराण्यांत वारकरी संप्रदाय चालत आला होता. त्या वर्षी मोर्लेकर राणे वारीला निघाले आणि राजापूरला आमच्या मूळ गावी त्याना लक्ष्मीधर विश्वनाथ भट्ट वाक्रे भेटले. दोघेही पुढे पंढरपूरला गेले.

" पंढरपूरला गेले. यात्रा उठली. राणे–वाक्रे परत यायला निघणार तर त्या रात्री त्यांना देवळातच दृष्टांत झाला. " उठा " असा आवाज कानी पडला. दोघेही धडपडत उठले. पहाटेला निघताना त्याना झोळींत दोन मूर्ती दृष्टीस पडल्या. दोन्ही पंचरशी धातूच्या. चकचकीत सोन्यासारख्या दिसणाऱ्या. एक विठ्ठलाची नी दुसरी रखुमाईची. दोन्ही मूर्ती घेऊन राणे–वाक्रे परतले. कृष्णापूर, भिवगड, कणकुंबी, मोर्ले असे मुक्काम करीत करीत मूर्ती सत्तरीत आल्या. बऱ्याच वर्षांनी सत्तर प्रांतातून राण्यानी त्या सांखळीला आणल्या "

" शके १४१० म्हणजे इ. सन १४८८ साली चैत्र शुद्ध पौर्णिमा गुरुवार रोजी इथे या ठिकाणी राण्यानी छोटेसे देऊळ बांधून मूर्तीची स्थापना केली. आजही चैत्र पौर्णिमेच्या दिवशी हा प्रतिष्ठेचा दिवस धूमधडाक्याने साजरा होतो "

कांही वर्षे गेली. पांडुरंगाची कीर्ती सर्वत्र पसरली. भक्तमंडळी त्याच्या भजनी लागली नवस करू लागली

" माशेल गावी हिरे परोब नावाचा एक तारवांचा व्यापारी होता. त्याची तारवे समुद्रातील वादळामुळे अडून पडली होती. कित्येक दिवस पत्ताच लागेना. म्हणून तो नवस बोलला, देवा, माझी गलबते सुखरूप येऊ देत. मी तुला भव्य देऊळ बांधून देईन. आणि काय आश्चर्य! दुसऱ्याच दिवशी तारवे बंदराला लागली हिरे परोबने नवसफेड केली राण्याचे कारभारी काशीअण्णा दुभाषी याजकडे देवळाच्या खर्चासाठी लागणारी रक्कम रोख असपर्यांत दिली काशीअण्णाने देवालय बांधून

घेतले. ही गोष्ट पंधराव्या शतकांतली. १९३५ मध्ये हे नवे देवालय गजराराजे शिंदे यांनी बांधले तेव्हापर्यंत हिरे परोबने बांधलेले मंदिर उभे होते. गजराराजेनी सुद्धा फार चांगले बांधले आहे हे मंदिर. खूप खर्च केलाय त्यांनी. त्यांच्या माहेरचा तर हा देव. ''

'' म्हणजे हा राण्याचा कुलदेव का ! नी तुम्हा वाक्याचा सुद्धा ? ''

'' नाही. विठ्ठल ही महाराष्ट्रात सुद्धा कुणाची कुलदेवता नाही. ती आहे उपास्य देवता इथे सुद्धा राणे, वाक्के, पिंगे, शिरोडकर, नार्वेकर वगैरे सासळीतील घराण्याची ही उपास्य देवताच आहे गोव्यांत हे एकच मंदिर असे आहे की जे सार्वजनिक स्वरूपाचे आहे कुलदेव म्हणून त्याला कुणी बंदिस्त केलेले नाही. ''

' खरे आहे. '' देसाईने म्हटले, '' अहो, चराचर सृष्टी व्यापून दशांगुळे उरलेल्या या परमेश्वरी अवताराला बंदिस्त कोण करणार ! बड-व्यांनी त्याला बंदिस्त करण्याचा प्रयत्न केला. पण अखेर ते हरलेच की नाही ? विठ्ठल हा कुणा एका जातीचा नाही, धर्माचा नाही, प्रदेशाचा नाही. तो सर्वांचा आहे. ''

आम्ही उठलो तेव्हा विठ्ठलरखुमाईसमोर उभ्या राहून सौ. देसाई म्हणत होत्या,

' पंढरीचा वास चंद्रभागे स्नान ।
आणिक दर्शन विठोबाचे ।।
हेचि घडो मज जन्मजन्मांतरीं ।
मागणे श्रीहरी नाही दुजे ।।

त्यांच्या डोळ्यातून दोन अश्रुबिंदु गोळा झालेले दिसले. आम्ही काल आज एवढी मंदिरे पाहिली; पण म्हाळसा व देवकी कृष्णाचा अपवाद केला तर त्यांच्या डोळ्यात एवढा भक्तिभाव गोळा झालेला मी कुठे पाहिला नव्हता पंढरीच्या पांडुरंगाचा मराठी मनावर केवढा प्रभाव आहे याचे मला प्रत्यंतर आले.

वाक्केभटजीही उठले होते. पण त्यांना एकदम एक आठवण झाली

ते म्हणाले, "सारे मुसळ केरात अशी मायकाची म्हण आहे ना, तशी गत झाली बघा."

"काय झालं हो ?"

"अहो, मूळ पंढरपूरहून आणलेल्या मूर्ती कुठं आहेत हे तुम्हीही विचारलं नाही मीही सांगितलं नाही."

"कुठे आहेत त्या मूर्ती ! या गर्भागारांत दिसतात त्या नव्हेत का त्या !"

"नाही. मूळ मूर्ती इथे उत्सवमूर्ती म्हणून शेकडो वर्षे वापरल्या जातात. पाहायच्या आहेत का तुम्हाला ?"

"हे काय विचारता भटजी ! अभाग्याच्या घरी कामधेनू आली तर तिला जा म्हणून का सांगायचं !"

भटजी गर्भागारात जाऊन तीन मूर्ती घेऊन आले आणि एका चौरंगावर त्यांनी त्या ठेवून दिल्या. तिन्ही मूर्ती धातूच्या होत्या सोन्या-सारख्या चकाकत होत्या त्यांना वस्त्रे नेसविली होती. पाऊण ते एक फूट उंचीचा विठोबा होता तर त्याहून लहान रखुमाई व सत्यभामेच्या होत्या

भटजी म्हणाले, "राण्या-बाक्यांनी मूळ मूर्ती आणल्या त्या विठ्ठल रखुमाईच्या. सत्यभामेची मग नंतर करून घेतली."

तिन्ही मूर्तींच्या पायावर आम्ही मस्तक ठेवले

सौ. देसाई असून आपल्या मूडमध्येच होत्या आजूबाजूच्या वाता-वरणाचा त्यांना जणू विसर पडला होता. पांडुरंगाच्या चरणावर मस्तक टेकल्या टेकल्या त्या म्हणत होत्या,

"भेटीलागी जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥
पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन ।
तैसे माझे मन वाट पाहे ॥
दिवाळीच्या मुळा लेक आसावली ।
पहातसे वाट पंढरीची ॥

भुकेलिया बाळ अति शोक करी ।
वाट पाहे परी माऊलीची ।।
तुका म्हणे मज लागलीसे भूक ।
धावोनी श्रीमुख दावी देवा ।।

काही तरी बोलून सौ. देसाईंच्या प्रार्थनेने निर्माण झालेल्या त्या गंभीर वातावरणाचा भंग करू नये म्हणून भक्तमंडळीच्या त्या माऊलीला अखेरचा नमस्कार करून आम्ही मंदिराबाहेर पडलो

पुलावरल्या गाडीजवळ आल्यावर मात्र मी म्हटले, "वैनी, पांडुरंगाबद्दल तुम्हाला एवढा जिव्हाळा असेल याची मला कल्पना नव्हती. ती असती तर त्याचं यथासांग दर्शन घेतलं असतं. इथं पंढरपुरासारखीच नदी आहे तिथं वाळवंट आहे तसंच इथंही आहे. मात्र इथं नदीलाच वाळवंट म्हणतात. सुंदर, गार पाणी आहे तिथे स्नान करून धूतवस्त्र नेसून आपण दर्शनाला गेलो असतो."

"पांडुरंगाचं इथं असं निवांत दर्शन घडेल असं वाटलं नव्हतं हो. पंढरपूरला देवाची भेट तरी होते का मनासारखी ? सारखी घाई नी गर्दी इथं किती बरं वाटलं. पंढरपूरचा पांडुरंग इथं सांखळीत भेटला. गोव्याच्या यात्रेचं सार्थक झालं. पंढरीचा वारू चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ।। हेचि घडो मज जन्मजन्मांतरी । मागणें श्रीहरी नाही दुजें ।।"

## २१ इतिहासाचा साक्षीदार श्रीसप्तकोटीश्वर

चार मैलावरच्या डिचोली शहराच्या दिशेने गाडी धावू लागली तेव्हा सौ देसाईंनी गायलेल्या तुकोबाच्या अभंगाचा एकच चरण मला आठवत होता, "तुका म्हणे मज लागलीसे भूक."

एका खाणावळीत जाऊन मिळाले ते अन्न पोटात ढकलले पण सौ. देसाईंना मात्र विठोबाच्या दर्शनानंतरही पारणे फेडण्याचा योग आला नाही. त्याना जवळजवळ उपास घडला. खाणावळीत शिरून टेबलावर बसल्यावर त्यांची तक्रार सुरू झाली, "इथं माशांची घाण येते." शिवराक (शाकाहारी) जेवण पुढे आले तरी ते त्याच्या घशाखाली उतरेना.

"वैनी," मी म्हणालो, "या वासा-घाणीच्या कल्पना आता काढून टाकल्या पाहिजेत तुम्ही मनातनं. तुमची मुलं नी नवरे काय शाकाहारी राहिले असतील असं वाटतं तुम्हाला? आमच्याकडे पुण्यामुंबईचे माझे ब्राह्मणमित्र येतात ना, त्याना 'तुम्हाला मासे चालतात का?' असा प्रश्न विचारायचा मी सोडून दिलं आहे अलीकडे. अहो, मासेच काय, बीयर नी व्हिस्की..."

"पुरे पुरे भावजी. आमच्या शेजारचा गोडबोल्याचा राजू नी खऱ्यांचा विपीन याच्या नादाने आमची मुलं कुठं कुठं शेण खातात ते कानावर आलंय माझ्या. पण आमच्या घरी मात्र हे असलं कांही चालत नाही हो." सौ. देसाई आपल्या यजमानांकडे अभिमानाने पाहात म्हणाल्या

"असं म्हणता वहिनी? तर मग तुमची आमची पैज. तुमचा हा नवरा कधी तरी कँपात जाऊन व्हिस्कीबरोबर मटनाचे जेवण जेऊन नी वर बडिशेप खाऊन घरी येत असेल काय रे दोस्ता, खर ना?"

देसाई ताटावर नजर एकाग्र करून जेवतच होता त्याने मान वर केली नाही

जेवण करून बाहेर पडलो नी जवळच माझ्या एका मित्राच्या— जयवंतराव सरदेसाईंच्या घरी गेलो कालचा मडकईचाच अनुभव आज येणार याबद्दल माझी खात्री होती

जयवंतराव घरीच होते कोर्टातून घरी येऊन नी जेवण करून आराम खुर्चीवर पडले होते.

आम्हाला पाहिल्यावर त्याना आश्चर्य वाटले नाही. अशी अगांतुकपणे पाहुण्यांसह त्यांच्या घरी जायची मला सवय होती प्रथम पाहुण्यांची ओळख करून दिल्यावर मी म्हटले, "हे जयवंतराव सरदेसाई. इथले एक

सुप्रसिद्ध वकील आणि समाजनेते "

देसाई म्हणाला, "पुष्कळ वर्षांपूर्वी तुमच्याच नांवाचे एक लेखक कथा लिहीत होते बघा."

"अहो, मीच तो."

"अरे, हेच ते." मी म्हटले, "वकिली चालत नव्हती तेव्हा लिहीत होते नंतर लिहिणं थांबवलं अन् वकिली चालू लागली."

"ते राहू द्या" जयवंतराव म्हणाले, "प्रथम पानावर बसा. जेवायच्या वेळी आला आहांत."

"जेवायच्या वेळी? तीन वाजायला आले आहेत. ही काय जेवायची वेळ!"

"अहो, आम्हा वकिलांची हीच वेळ जेवायची. कोर्ट एकदीडला सुटतं मग विश्रांती, आंघोळ करून जेवण होईपर्यंत अडीचतीन वाजतातच"

आम्ही जेवण करून आल्याचे सांगून चहाची मागणी केली.

अर्धा तास गप्पागोष्टींत गेला. तेवढ्यात चहा आला. चहाबरोबर खाणे होतेच. गोव्यात 'चहा' या शब्दाचा अर्थ खाद्य चहा असाच होतो फक्त चहा देणे अतिथिधर्माला सोडून असते.

चहापान होताच अधिक वेळ न घालवता आम्ही नारव्याच्या मार्गाला लागलो. नारव्याचा सप्तकोटीश्वर हा जयवंतरायांचा म्हणजेच सूर्यराव सरदेसाईंचा कुलदेव. कुलदेवाला येण्याबद्दल आम्ही वकिलसाहेबांना विनंती केली पण त्यांना तेवढी सवड नव्हती अशीलाच्या वतीने एका नोटिशीचे अर्जंट लेखन करायचे होते

सप्तकोटीश्वराचा विश्वसनीय असा ऐतिहासिक उल्लेख सापडतो तो नऊशे वर्षांपूर्वीच्या कदंबांच्या शिलालेखांत, ताम्रपटात नी सुवर्णनाण्यात बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या जयकेशी नावाच्या कदंब राजाने दिवाडी बेटातील सप्तकोटीश्वराला आपले आराध्य दैवत मानले आणि त्याच्यापुढल्या सर्व राजांनी '**श्रीसप्तकोटीश्वरलब्धवरप्रसाद**' असे बिरुद आपल्या नावामागे लावले या राजांनी ब्राह्मणांना दिलेल्या

अग्रहारांचे उदक सप्तकोटीश्वराच्या पायांजवळ सोडल्याचे उल्लेख ताम्रपटां-तून सापडतात.

सप्तकोटीश्वर या नांवाला काही अर्थ आहे का ? आहे असे पुराणे सांगतात. वसिष्ठ, कश्यपादी ऋषींनी सात कोटी वर्षें तपश्चर्या केल्यावर दीपवती (दिवाडी) बेटाजवळच्या पंचगंगा तीरावर महादेवाने त्याना दर्शन दिले. शिवदर्शनाचे स्मारक म्हणून ऋषींनी मग सप्तधातूचे शिवलिंग तयार करून त्याची स्थापना केली. कोंकण माहात्म्य सागते,

द्वीपवाड क्षेत्र महाथोर । जेथे देव सप्तकोटेश्वर ।
नारवें रहिवास मंदिर । स्थान सप्तऋषींचें ।।
सप्तधातूचें लिंग म्हणती । नवरत्नाची ज्योति ।
ऐशी नवल प्रभा स्थिती । चोजवेना कवणाते ।।
पचगगा तीर्थ जेथें । पाताळाहुनी जळ येतें ।
जन्माष्टमी यात्रा भरते । उत्साह अद्भुत होतसे ।।

पुराणांत सप्तकोटीश्वराचा आणखी एका संदर्भात उल्लेख येतो देवकीकृष्णाच्या कथेत कालयवनाच्या नाशासाठी श्रीकृष्ण गोमतकांत आल्याचे मी सांगितले होते कालयवनाला मुचकुंदाच्या हातून मृत्यु आल्यावर जरासंधाशी होणाऱ्या शेवटच्या लढाईत आपल्याला विजयी करावे अशी श्रीकृष्णाने सप्तकोटीश्वराची प्रार्थना केल्याची हकीकत पुराणे सांगतात

पुराणांतील ही वागी पुराणातच ठेवून इतिहासाकडे वळू. जयकेशी-नंतर दोन शतके सप्तकोटीश्वर मोठ्या ऐश्वर्यात नांदला पण चौदाव्या शतकांत दिल्लीचा अल्लाउद्दिन खिलजी आणि मग बहामनी सुलतान हसन गंगू यानी कदंबांना नामशेष करून गोवा घेतला तेव्हा इथली मंदिरे त्यांनी भ्रष्ट केली सप्तकोटीश्वराचे लिंग त्यांनी मूळासकट उपटून काढले. कारण सोरटी सोमनाथाप्रमाण या सप्तकोटीश्वर मंदिरात आपण संपत्ती पुरून ठेवली आहे असा त्याचा समज होता. "**श्रीसप्तकोटेश्वर देवासी उपटून चिखलीं घातला बांदासी**" अशी सप्तधातूच्या

लिंगाची त्यानी अवस्था केली.

पण मुस्लिमांना फार दिवस हे पाप पचले नाही विजयानगरच्या नवजात राज्याच्या माधव मंत्र्याने स्वतः गोव्यात येऊन मुसलमानांना हुसकून लावले **प्रतिष्ठांस्तत्र तुरुष्क संघानुत्पाट्य** म्हणजे बद्धमूल होऊ पहाणाऱ्या तुर्कांना हुसकावून लावून सप्तकोटीश्वराचा व गोव्यातील इतर मंदिराचा माधव मंत्र्याने पुनरुद्धार केला

दीडशे वर्षे गेली आणि इतिहासाची पुनरावृत्ती झाली पोर्तुगीज आले त्यांनी पुन्हा एकदा हिंदु धर्माचा उच्छाद माडला सप्तकोटीश्वराचे दिवाडींतले मंदिर संपूर्ण उध्वस्त करून त्यावर चर्च उभारले. शिवलिंग एका विहिरीवर टाकले खिस्ती बाया त्यावर उभे राहून पाणी भरू लागल्या. पंचगंगेच्या तीरावर गोकुळाष्टमीच्या दिवशी स्नान करण्यास बंदी झाली. नदीपलीकडला किनारा विजापरकराच्या ताब्यात होता. इथे सूर्यराव सरदेसाई कारभारी होते. त्याच्या संमतीने मग भतग्रामच्या किनाऱ्यावर यात्रेकरू स्नान करू लागले. आजही या नव्या 'तीर्था'वरच स्नानविधी होतो.

एक दिवस भतग्राम महालाचे कारभारी नारायण सूर्यराव सरदेसाई याना दृष्टांत झाला नी त्यांनी गुपचुप आपली माणसे दिवाडीला पाठवून ते शिवलिंग रातोरात हलवून लाटंबार्से गावास ठेवले. तीन वर्षांनी १५४९ साली नव्या तीर्थाजवळ हिंदळे गावी त्याची प्राणप्रतिष्ठा केली. १५६९ साली त्यावर छोटेसे मंदिर बांधले. हिंदळ्याच्या या भागाला मग नार्वे म्हणू लागले. सूर्यराव सरदेसायांनी सप्तकोटेश्वराला आपला कुलदेव मानायला तेव्हापासून सुरुवात केली.

इतिहासकाळात सप्तकोटीश्वराने चार राजवटी पाहिल्या कदंब आणि विजयनगरच्या राजवटीत त्याचे दैव फळफळले तर मुसलमान व पोर्तुगीजांच्या काळात तो दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडला. आता देसाईंच्या आधारावर त्याला सुखासमाधानाने राहाता आले असते पण त्याला आपल्या वास्तूत चैन पडत नव्हती नदीपलीकडे चाललेला हिंदु धर्मांचा उच्छेद त्याला पाहावत नव्हता या धर्मलंडांना गोव्यांतून घालवून द्यायला

कुणाला प्रेरणा द्यावी याचा तो विचार करीत होता

बरोबर १०० वर्षांनी ही संधी त्याला लाभली. शिवाजी महाराजांची स्वारी स्वराज्यात धुमाकूळ घालणाऱ्या देसायांच्या बंदोबस्ताकरता डिचोलींत आली होती. याच मोहिमेवर असताना पोर्तुगीजांना नेस्तनाबूत करायचे विचार त्यांच्या मनात येऊं लागले.

या कथेशी संबंधित अशी एक आडकथा सांगतो ही आडकथा किंवा दंतकथा सांगते की ही मोहीम काढण्यापूर्वी शिवाजी महाराज वेष पालटून या प्रदेशांत आले होते. भर श्रावण महिन्याचे दिवस. रात्रीची वेळ. पाऊस धो धो कोसळत होता अशा वेळी दोन खेडवळ माणसे डोकीवर घोंगड्या घेऊन डिचोली गावांत हिंडत होती गस्तीच्या शिपायांना त्यांना हुलकावणी द्यायची होती.

चालता चालता दोघेही एका चौकात आले तेव्हा त्यांतला तरुण, हुशार खेडूत म्हणाला, " हे पाहा मित्रा, आपण आता वेगळे होऊ. उद्या याच वेळी, याच ठिकाणी भेटू. तुला मिळेल ती माहिती तूं काढ. माझ्या परीने मी प्रयत्न करतो. "

एवढे सांगून आपला हात चिखलात बुडवून खुणेसाठी म्हणून त्याने एका घराच्या भिंतीवर पंजाचा ठसा उमटवला

तरुण खेडूत मग आडवाटेने चालू लागला. पाऊस कोसळत च होता. त्याला थंडी वाजत होती जवळची शिदोरी संपल्यामुळे खायलाही कांही नव्हते.

जवळपास कुठे आसरा मिळेल याचा विचार करीत असताना दूर एके ठिकाणी त्याला उजेड दिसला तिथे जाऊन पाहातो तर घराचं दार बंद ओसरीवर एक शेकोटी मात्र मंदपणे जळत होती

आतून मुलाच्या रडण्याचा आवाज आला तेव्हा माणसे जागी आहेत असे समजून शिवाजी महाराजांनी—तो खेडूत म्हणजे महाराज होते—दरवाजा ठोठावला एका मध्यमवयीन बाईने दरवाजा उघडला त्याची आपुलकीने चौकशी केली. त्याला भूक लागल्याचे नी थंडीने काकडत असल्याचे तिला दिसले. ती म्हणाली, " बाबा रे, मी गरीब आहे. माझे

यजमान दोन वर्षांपूर्वी वारले. ते होते तेव्हा खूप दानधर्म केला. पण आज आमची अन्नान्नदशा आहे पदरी एक मूल आहे. त्याला पेज शिजवून घालते. आता तुला वाढायचं म्हटलं तर पेजेशिवाय दुसरं घरात कांहीच नाही. तेवढी खाऊन घे."

महाराजानी पुनः पुन्हा नकार दिला तरी बाईने ऐकले नाही. घरात जाऊन एका 'पोवली'त तिने पेज आणली. तोंडी लावायला खारवलेल्या कैरीची फोड आणली अन् शेकोटीवर पेज गरम करून ती त्याला वाढली

पेज पिऊन झाल्यावर महाराज म्हणाले, "बाई, तुमचा आताच निरोप घेतो. पहाटेला तुम्ही उठण्यापूर्वीच मी निघून जाईन."

ही घटना घडून एक महिना झाला. आणि एक दिवस एक मराठा घोडेस्वार बाईच्या दारात उभा राहिला. दरम्यानच्या काळात भतग्राम महाल शिवाजीने घेतला होता

दंतकथा सागते, त्या वेळी बाईची त्रेधातिरपीट उडाली. ती लटलट कापू लागली. त्या धामधुमीच्या काळात कुणाला केव्हा पकडण्यात येईल याचा नेम उरला नव्हता. स्वाराने तिच्या भिन्या मुद्रेकडे पाहून म्हटले, "बाई, घाबरू नका. महाराजानी हे नळकांडे तुम्हाला द्यायला सांगितले आहे एक महिन्यापूर्वी महाराज रात्रीच्या वेळी तुमच्या आश्रयास राहून पेज पिऊन गेले. या नळकांड्यातल्या दानपत्रात तुमच्या लाडक्या मुलाला महाराजानी अखंड अन्नाची व्यवस्था केली आहे."

बाईच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या

सत्तर वर्षांपूर्वी सत्सग मासिकांत ही दंतकथा "ऐतिहासिक कथा" म्हणून दिली आहे आणि दानपत्र मिळालेल्या बाईचे नाव बोरकर असे दिले आहे

याच मुकामात महाराजांनी पोर्तुगीजाकडून बारदेस महाल जवळ जवळ हिसकावून घेतला होता पण पुढे तह झाला. पोर्तुगीजांशी जंग मांडून मोगल, विजापूरकर नी पोर्तुगीज अशा तीन आघाड्यांवर लढणे शिवाजीला शक्य नव्हते

आणखी चार वर्षांनी—१६६८ साली शक्तीने नसले तरी युक्तीने मस-

ळत पार पाडून पोर्तुगीजांना घालवावे असा एक विचार करून महाराज डिचोलीला आले सोमवारच्या शिवपूजेसाठी ते नार्व्याला गेले. एकान्त खडकात कोरलेल्या काळोख्या गर्भगृहावजा खोलीत सप्तकोटीश्वराचे लिंग होते. त्याला जोडून एक अर्धवट उभारलेला मंडप होता. कौलाऐवजी तो माडाच्या झावळ्यानी व लव्हाळ्यानी शाकारलेला होता. महाराज पूजा करून गर्भागाराबाहेर आले तेव्हा छपरातून एक लव्हाळा तुटून खाली पडला तीच परमेश्वरी आज्ञा मानून सोबत असलेल्या मोरोपंत पेशव्यांना त्यानी सप्तनाथमंदिराच्या जीर्णोद्धाराचा हुकुम दिला. १३ नोव्हेंबर १६६८ या दिवशी महाराजाच्याच हस्ते शिलान्यास होऊन मंदिर उभे राहिले आजही हे मंदिर शिवरायाचे एकुलते एक स्मारक म्हणून खडे आहे.

हा सर्व इतिहास पाहुण्याना सांगून झाला आणि आम्ही मंदिरात गेलो. चौकावर उभे राहून सप्तनाथाचे दर्शन घेत असतांनाच माझ्या मनांत विचार आले, महाराज पूजेला कुठे बरे बसले असतील ! मोरोपंत कुठे उभे असतील ? महाराजाना पूजा सांगणारे ते भाग्यवान भटजी कोण असतील ? लव्हाळा कुठे पडला असेल ? खरोखरीच हे सारे घडले असेल काय ? की बोरकरांच्या दानपत्राप्रमाणे हीही दतकथाच ?

छे छे ! दतकथा कशी असेल ! भोगमंडपाच्या प्रवेशद्वारावरच **श्री. शिवराजा देवालयस्य प्रारंभः** या अक्षरांचा शिलालेख मी प्रत्यक्ष पाहात होतो. 'शिवराज्याभिषेक कल्पतरु' मध्ये या इतिहासाची साक्ष आहे मग ही दतकथा कशी असेल ! हा तर प्रत्यक्ष इतिहास !

आणि हा इतिहास मंदिराच्या रूपाने साकार स्वरुपांत प्रत्यक्ष पाहात असतानाच मला आणखीही इतिहास आठवला. डॉ. पिसुर्लेकर म्हणतात, "शिवाजी महाराजानी सप्तकोटेश्वराचे मंदिर बांधले ही गोष्ट तर खरीच. पण त्यात त्याचा धार्मिक कारणाशिवाय दुसराही एक हेतु होता नार्वें गांवातून गोवे शहर दृष्टीस पडते फक्त एका तासाची वाट. हे शहर काबीज करण्याच्या हेतून ते डिचोली–नार्वें या भागात तळ ठोकून बसले होते "

परंतु याही वेळी महाराजांचा गोवे घेण्याचा हेतु साध्य झाला नाही सप्तकोटीश्वराचे देवालय बांधण्याचे निमित्त करून महाराज डिचोली–नार्वेच्या परिसरांत बरेच दिवस राहिले गोवा शहरांत फंद-फितुरी करण्यासाठी त्यांनी आपली माणसे घुसवली. नागरिकांना फित-विण्याचे प्रयत्न केले पण पोर्तुगीज विजरै (व्हाईसरॉय) ला सुगावा लागला आणि महाराजाना माघार घ्यावी लागली

हा सारा इतिहास सांगतांना व ऐकताना माझ्याप्रमाणेच श्रोत्यांच्या मनांतही कालवाकालव झाली सप्तकोटीश्वर मंदिराची तीनशे वर्षांची वास्तू पाहात असताना आमची मने एका बाजूने अभिमानाने फुलून आली होती तर शिवाजी महाराजांच्या विजयी जीवनग्रंथांतील पराभ-वाच्या ह्या प्रकरणाने दुसऱ्या बाजूने विषादाची शल्यें टोचू लागली होती सौ. देसाई तर रडकुंडीला आल्यासारख्या दिसत होत्या मला वाटले मराठी मनाचे पंढरीचा विठोबा हे जसे एक श्रद्धास्थान आहे तसे शिवाजीमहाराज हे दुसरे श्रद्धास्थान आहे

मनाच्या अशा विषण्ण अवस्थेतच सप्तकोटीश्वराचे मदिर नी परिसर आम्ही पाहून घेतला. सप्तकोटीश्वराचे हे मदिर म्हणजे स्थापत्याचा एक विशेष नमुना होता. एकुण देवालय भव्य आहे. गर्भागार दगडावर दगड रचून बांधले नव्हते ते एकाच शिलाखंडात कोरले होते शिवाजीने लिंगाची पूजा केली ती याच गर्भागारात. हे गर्भागार कायम ठेवून महाराजांनी देवालयाचा इतर भाग बांधला. अंतराळ व चौकाचे छत अर्धवंतुळाकार होते व ते संपूर्ण दगडी होते अशा प्रकारचे बांधकाम केलेले गोव्यांतले हे एकमेव देवालय. साठ सत्तर वर्षांपूर्वी या बांधकामाला तडा गेलेला दिसला तेव्हा छपराचा हा भाग तोडण्यात आला व आजचे कौलाचे छपर घालण्यात आले छपर मोडले तेव्हा मोठमोठ्या दगडाची एवढी रास पडली की त्या दगडातून एक अग्रशाळा बांधण्यात आली. जुने बांधकाम कसे असेल याची कल्पना प्रदक्षिणामार्गाचे जे दगडी बांधकाम आहे त्यावरून करता येते.

आज दिसतो तो मुखमंडप मात्र शिवाजीकालीन नाही. तो नंतर बांधण्यात आला म्हणूनच शिवाजीने बांधकाम केल्याचा शिलालेख

महामंडपाच्या प्रवेशद्वारावर दिसतो

इतर देवालयांप्रमाणे हे देवालय भर वस्तीत नाही. ते आहे गर्द झाडीत. देवालयाच्या उजव्या बाजूला महाराष्ट्रांतल्यासारखा साधासुधा दीपस्तंभ आहे. तिन्ही बाजूंनी अग्रशाळा नसल्यामुळे प्राकार बंदिस्त नाही पण खोलगट जागेत असल्यामुळे आणि उंचवटे अगदी देवालयाला लागून असल्यामुळे वाटते मात्र बंदिस्त असल्यासारखे.

" चला आता परत फिरायचं ना ? " सारे पाहून झाल्यावर देसाई म्हणाला

" नाही या देवालयाशी निगडित असलेले एक 'तीर्थ' अजून पाहायचं आहे. जन्माष्टमीच्या दिवशी सामुदायिक स्नान जिथे केले जाते ती पचगंगा टेकडीच्या पलीकडे आहे. हे केवळ पुण्यतीर्थ नाही, ते धारातीर्थही आहे. चला मंडळी. "

या तीर्थावर जायला पूर्वी टेकडी चढावी लागे. टेकडीवर दगडांची 'पाज' होती अजूनही आहे पण आता टेकडीला वळसा घालून रस्ता केला आहे.

एक मैल अंतर तोडून आम्ही खाडीच्या किनाऱ्यावर आलो. मागच्या बाजूला टेकडीचा चढाव सुरू झाला होता. पायातल्या चपला काढून व खाडींतल्या खाऱ्या पाण्यात उभे राहून मी म्हटले, " ही पंचगगा. माडवीचे तीन फाटे इथे एकत्र आले आहेत. दोन नद्या गुप्त आहेत असे गृहीत धरले जाते इथे कृष्ण जन्माष्टमीची स्नाने होतात. हजारो यात्रेकरू जमतात पंढरीला आषाढी कार्तिकीला जशा संताच्या पालख्या जातात तशाच पंचक्रोशींतल्या अनेक देवाच्या पालख्या इथे येतात या टेकडीच्या माथ्यापासून पायापर्यंत फेरी भरते

१६८३ साली जन्माष्टमीच्या दिवशी अशीच फेरी भरली होती शेकडो यात्रेकरू जमले होते. अन् यात्रेकरूंत एक राजबिंडा यात्रेकरू होता शिवपुत्र संभाजी महाराज.

वडिलाची गोवे घेण्याची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वतः संभाजी निवडक स्वारानिशी गोव्याला आला होता. चौलरेवदंड्याहून

सैन्य अजून यावयाचे आहे. मोहिमेला थोडा अवकाश आहे. आज जन्माष्टमीच्या दिवशी पंचगंगेवर स्नान करण्यासाठी उघडपणे तो खंडोजीसह आला आहे.

गोवेकर पोर्तुगीजांना ही बातमी कळली आहे. संभाजीला जिवंत पकडायचा बेत वीजरै (गव्हर्नर) कांदि द आल्वोर याने केला आहे. समोरच्या दिवाडीच्या तीरावर शेकडो पोर्तुगीज सैनिक गोळा झाले आहेत. यात्रेकरूंच्या वेषाने देशी सैनिक वीजरैने यात्रेत घुसविले आहेत. संभाजीला हेराकडून हे सारे कळले आहे. तरीही संभाजीने निधड्या छातीने पंचगंगेत स्नान करून सप्तकोटीश्वराचे दर्शन घेतले आहे. सह्याद्रीच्या या सिंहाला सापळ्यात अडकवण्याचा वीजरैचा प्रयत्न फसला आहे.

संभाजी आता ईरेला पडला आहे "पोर्तुगीजांचे नांव आणि ख्रिस्ती लोक गोव्यात शिल्लक ठेवणार नाही" अशी सप्तकोटीश्वराला साक्ष ठेवून त्याने प्रतिज्ञा केली आहे

पोर्तुगीज गव्हर्नरला [illegible] आहे तो फोंड्याच्या कोटाला वेढा [illegible] स्वतः गव्हर्नर देतो. संभाजी फोंड्याला धावून जातो. दुबळ रणकंदन होते. कोसळलेला जखमी व पराजित होऊन परत फिरतो. फोंड्याचा किल्ला बांधण्याचा असतो संभाजी 'मर्दनग[illegible]' नांवाचा नवा किल्ला जवळच [illegible] त घालण्या-हुकूम देतो आणि पोर्तुगीजांच्या ममस्थानावर [illegible] साठी धावत येतो. झटक्यासरशी तो जुवे बेट काबीज करतो. या लढाईत गव्हर्नर पुन्हा एकदा मार खातो. त्याच्या पाठीत तीर शिरतो

डाव्या बाजूला समोर दिसते ते जुवे बेट इथून अर्ध्या एका तासाच्या अंतरावर असलेल्या गोवा शहरावर लगोलग हल्ला करण्याचा बेत संभाजीने ठरवला आहे. धावजीला पायउतार होऊन संभाजीचे जवान गोव्यात घुसणार आहेत वीजरै तीन दिवसपर्यंत उपासपोटी राहून संत झेवियरच्या थडग्याशेजारी बसून प्रार्थना करतो आहे. राजदंड त्याने संताच्या पायावर ठेवला आहे.

२५ नोव्हेंबर १६८३ या दिवशी तिन्हीसांजेच्या वेळी जुवे बेटातून पायउतार होऊन संभाजी गोव्यावर चालून जाणार आहे.

अरे, पण हे काय ? एवढ्याशा खाडीचा हा दरिया कसा काय झाला ? इथे पाय उतार व्हायचे कसे ?

वाटाड्या सांगतो, " समुद्राला भरती आली आहे. त्याचे पाणी खाडीला चढले आहे. अन् वीजरैने बेटाचे सारे बांध फोडून टाकले आहेत. गोव्यापर्यंतचा सारा परिसर जलमय झाला आहे. "

सल्लागार म्हणतात, " आता मुक्ती येईपर्यंत वाट पाहावी तोपर्यंत सैनिकांची जेवणे होतील. "

पण संभाजी पेटला आहे. एक क्षण थांबायला तो तयार नाही. स्वारानी घोडी पाण्यात घालावी आणि मागाहून होड्यांनी पैदलाने यावे असा हुकूम तो देत होता

खडोजीची चलबिचल होत आहे. पण ती क्षणभरच संभाजीने सर्वांत आधी आपले घोडे पाण्यात उतरवले आहे 'आज गोवे घ्यावयाचेच' असा त्याचा कृतनिश्चय आहे

पण संभाजीची जन्मभर साथ केलेले दुर्दैव आड आले आहे. त्याचा घोडा धारेला लागून वाहात चालला आहे ! पाण्याला जबरदस्त ओढ आहे काठावर आरडाओरड होत आहे, " वाचवा वाचवा, महाराजांना वाचवा. "

खडोजी पाण्यात उडी मारतो तीरासारखा पोहत जातो घोड्यावरची मांड सोडवायला संभाजीला मदत करतो दोघेही किनाऱ्यावर येतात.

खडो बल्लाळ या घटनेची माहिती देताना स्वतः लिहितो, " त्या दिवशी गोवे घ्यावयाचेच पण फिरंग्याचे दैव समुद्रीं रक्षिलें ! "

होय समुद्रातून आलेल्या पोर्तुगीजांचे दैव त्या दिवशी समुद्रानेच रक्षिलें! दुसऱ्या दिवशी सकाळी विजरैने पाहिले, जुवे बेटावरून संभाजी निघून गेला होता मोगलांचे प्रचंड सैन्य कोंकणात उतरते आहे ही बातमी त्याला रात्रीच कळली होती स्वराज्याच्या रक्षणासाठी त्याला मोगलांशी मुकाबला करणे भाग होते

विषण्ण मनावर विषण्णतेचा आणखी एक तवंग उठला आणि मूकपणाने आम्ही गाडीकडे वळलो.

# २२ साक्षात्कारी देवता लयराय

नाव्र्याहून परत डिचोलीला येतानाच्या रस्त्याला डाव्या हाताला फुटलेल्या फाट्यावर वळण घेऊन आम्ही आता शिरगांवला चाललो होतो. वाटेत मये गावातल्या तलावावरुन गाडी चालली तेव्हा त्या दृश्याने लक्ष वेधून घेतले

गोव्यात मयेचा तलाव हे प्रवाशांचे एक आकर्षणकेंद्र आहे. या ठिकाणी अगदी पाण्याला लागून सरकारने एक इमारत बांधली आहे. या ठिकाणी गॅलरीवर आरामात बसून तलावाचे दृश्य दिसते. पोहण्याची नी बोटिंगची सोय आहे. गर्द झाडीने वेष्टिलेल्या या जलाशयात डुंबायला नी निसर्गाच्या सान्निध्यात कालक्रमणा करायला काही निवडक प्रवासी येत असतात.

पन्नास वर्षांपूर्वी मी शिरगांवच्या जत्रेला आलो होतो नी अपघातात पाय मोडून परत गेलो होतो. त्यानंतर पुन्हा शिरगांवला जाण्याचा योग आज येत होता. मधल्या काळात शिरगांवशी संबंध न आल्यामुळे या देवस्थानाची मला प्रत्यक्ष अशी माहिती नव्हती. दंतकथा ऐकल्या होत्या, साक्षात्काराच्या गोष्टी ऐकल्या होत्या पण संगतवार माहितीसाठी कुणातरी जाणकाराची गरज होती.

देवस्थानाच्या प्राकारात शिरण्यापूर्वीच जे घर लागले तिथे चौकशी केली. अर्जुन गावकर भेटले. त्याच्या ओसरीवर बसून आमच्या गप्पा सुरू झाल्या

" सात बहिणींपैकी लयराय ही सर्वांत अधिक करारी, अधिक कर्तबगार. तुम्हाला या सात बहिणी माहीत आहेत ना ? " अर्जुन गावकर विचारत होते.

होय. गोव्यांतल्या या ' सप्तमातृकां 'ची कथा मी ऐकली होती.

" केळबाय, मोरजाय, लयराय, म्हामाय, सीतला, अजादेवी आणि पोर्तुगीजानी बाटवलेली मिलाग्र ह्या सात बहिणी आणि त्यांचा खेतलो किंवा खेतोबा नांवाचा भाऊ. " गावकर सांगत होते. " आठ जणांचे हे कुटुंब मये गावात नांदत होते. कुणी म्हणत या पूर्वजन्मीच्या देवता आहेत, तर कुणी म्हणत त्या अप्सरा आहेत. अशा देखण्या, गोऱ्यापान, तेजस्वी मुली माणसाच्या जन्माला येतात तेव्हा त्या स्वर्गातून आलेल्या असतात, नाही का ?

" आणि देवदेवता जेव्हा माणसाच्या जन्माला येतात तेव्हा त्याना माणसाप्रमाणेच वागावे लागते. त्या प्रेम करतात तसा द्वेष करतात गोड बोलतात तशा रागावतात, चिडतात.

" एकदा काय झाले, घरातला विस्तव विझला होता, म्हणून वायंगणे गावच्या यज्ञकुंडांतून विस्तव आणायला म्हणून खेतोबा घराबाहेर पडला पण काय झाले कुणाला माहीत त्याला परतायला खूप उशीर झाला. बहिणी वाट पाहून पाहून दमल्या. साऱ्याना भुका लागलेल्या. अंधार पडू लागला तरी खेतोबाचा पत्ता नाही कांही बहिणी त्याच्यावर रागावल्या त्याला शिव्या देऊ लागल्या राहिलेल्या त्याची कड घेऊन बोलू लागल्या. कलहरूपी कलिपुरुषाने या प्रेमळ घरात प्रवेश केला.

" खेतोबा घरी आला तेव्हा वातावरण अधिकच तापले. ते इतके की एकमेकींचे तोंड पाहू नये असे प्रत्येकीला वाटू लागले रागाच्या भरात एकेक बहीण बाहेर पडू लागली लयराय गेली शिरगावला मोरजाय मोरजीला म्हामाय मुळगावला. अजादेवी तर कारवारजवळच्या आजेरीव बेटावर गेली. म्हापशाला गेलेल्या बहिणीवर बाटून खिरस्ती व्हायचा प्रसंग आला सीतलादेवीला तर या भांडणाचा इतका तिटकारा आला की ती थेट पाताळात निघून गेली !

" बहिणींचे हे वर्तन पाहून खेतोबाही चिडला नी पुन्हा वायंगणेला निघून गेला. मयेच्या घरी राहिली ती फक्त केळबाय

" पण विभक्त झाल्याने प्रेम वाढते हा तुमचा आमचा नेहमीचा अनुभव या देवकन्यानाही कालांतराने आला. पण त्याना आता पुन्हा एकत्र

राहणे शक्य नव्हते त्या गावी त्या गेल्या त्या गांवच्या भल्याबुऱ्याची जबाबदारी त्यांनी पत्करली होती त्या गावाच्या जीवनाशी त्या समरस होऊन गेल्या होत्या तिथे रमल्या होत्या तरीही वर्षातून एक दिवस त्या एकमेकींना भेटतात. लयरायच्या जत्रेच्या दिवशी मयेहून केळबायचा आणि वायगणेहून खेतल्याचा 'कवळास' (निशाण) आल्याशिवाय जत्रेला मुळी प्रारंभच होत नाही."

सात बहिणींची ही कथा ऐकल्यावर आम्ही उठलो नी अर्जुन गावकरासह लयरायच्या मंदिरात गेलो.

पण इथे आमचा अपेक्षाभग झाला. पन्नास वर्षांच्या कालात गोव्यातल्या इतर देवस्थानाप्रमाणेच शिरगावच्या लयराय मंदिराचा कायाकल्प झाला असेल असा माझा समज होता. चौगुल्यांनी इथे नवीन मंदिर बांधल्याचेही मी ऐकले होते.

देसाई म्हणाला, "अगदीच सामान्य आहे रे ही वास्तू मागचा कळस सोडला तर मदिरशिल्पाचे कोणतेच निमय पाळल्याचे इथे दिसत नाही मंडप केवढा मोठा आहे नाटकांत्रिटकांची सोय होत असेल इथे. पण किती भकास वाटतो चार भिंतींवर किंवा खांबांवर छप्पर टाकलेल्या एखाद्या फॅक्टरीसारखी."

देसाईची टीका चुकीची नव्हती. या नव्या देवळाच्या मानाने मी पूर्वी पाहिलेले जुने देऊळ कितीतरी छोटे होते. पण शिरगावच्या ग्रामीण परिसरात ते शोभून दिसत होते. इथे अग्रशाळा, नगारखाना या अनुज-तन्या 'संस्थाना'त दिसणाऱ्या नेत्रदीपक इमारती नव्हत्या बंदिस्त प्राकार सुद्धा नव्हते. झाडीच्या मध्यभागी लयरायचे देवालय उभे होते.

देवीच्या दर्शनासाठी आम्ही आत गेलो गोव्यात काय किंवा इतरत्र भारतात काय, देवमूर्ती ही काळ्या पाषाणखडाची किंवा सफेद जयपुरी वा इटालियन संगमरवराची असते कधी धातुमूर्ती असते. ग्रामदेवता वारुळाची असते. बऱ्याच क्षेत्रदेवता म्हणजे ओबडधोबड दगड असतात. पुरीच्या जगन्नाथाचे लाकडी ठोकळे किंवा दत्ताच्या पादुका हा अपवाद. पण शिरगावचा प्रकार हा नियमाला आणि अपवादालाही अपवाद आहे.

तिथे वेदीवर नाही शिलामूर्ती की नाही धातुमूर्ती. तिथे दिसतो तो पंचधातूचा एक कलश. हा कलश म्हणजेच लयराय तशी लयरायची मूर्ती आहे, नाही असे नाही ही देवीची आद्य मूर्ती असे मानले जाते व ती पुजाऱ्याच्या घरी असलेल्या बंद पेटीत ठेवण्यात येते. जत्रेच्या दिवशीच फक्त ती बाहेर काढून तिची पूजा केली जाते. ही आद्य मूर्ती आधी शिरगांव-मुळगावच्या सीमेवर आणि नंतर मुड्डीवरील देवळात होती असे सांगतात. जत्रेच्या दिवशी देवता म्हणून टोपलीत ठेवलेला गाभाऱ्यातील कळसच मिरविला जातो. त्याला त्या वेळी म्हणतात ' चिरा ' आणि जे दोन भक्तराज हा चिरा डोकीवर घेतात त्याना म्हणतात ' मोड

शिरगावची जत्रा ही गोव्यातली एक अतिप्रसिद्ध जत्रा. 'होमखण' ( होमकुंड ? ) हे या जत्रेचे आकर्षण. होमखणांतून चालत जाण्यासाठी शेकडो ' धोंड ' इथे गोळा होतात आणि हे अग्निदिव्य पाहाण्यासाठी वीस हजाराचा समुदाय जमतो.

लयरायचे धोंड होणे हे एक दिव्य आहे. वारकरी सप्रदायाप्रमाणेच हा एक संप्रदाय आहे. धोंड हा त्याच्या हातातील वेताच्या काठीच्या विशिष्ट आकारावरून ओळखला जातो. जत्रेपूर्वी तो पाच दिवस उपवास करतो. अभक्ष्य भक्षणच नव्हे तर अवाच्य भाषणही त्याला निषिद्ध असते वारकरी साम्प्रदायाप्रमाणेच धोंड सप्रदायही घरातून परंपरेने चालतो. काही नवस बोलल्यामुळे धोंड होतात. धोंड-दीक्षा घेतलेल्या काही स्त्रियाही दिसतात

चैत्र वद्य पंचमी हा लयरायच्या जत्रेचा दिवस. त्या दिवशी सकाळपासूनच धोंडांचे आगमन होऊ लागते. मये व वायंगणेहून कवळास आला की जत्रेला प्रारंभ होतो. देवीचा कळस म्हामायच्या मंदिरात नेला जातो. तिथे नव्या ' धोंडा 'चा शपथविधी होतो.

सबंध दिवस तिथे मुक्काम करून रात्रौ १० वाजता देवी परत येते. ११ वाजता आम्रा ब्राह्मणाला आमान्न देण्यात येते. हा आम्रा ब्राह्मण म्हणजे देवीचा पहिला सेवेकरी. तो ' निर्वंशी होता. म्हणून सारा गाव जत्रेच्या दिवशी त्याला श्रद्धांजली वाहतो.

मध्यरात्री देवीचा चिरा वाहणारे 'मोड' कळस उचलतात. बरोबर २२ चौगुले असतात. हे गांवातले ब्राह्मण व ब्राह्मणेतर गावकार. ते पंधरा दिवस उपास करतात मोड व चौगुले चिरा घेऊन दोन फर्लांग अंतरावरील तलावावर स्नानासाठी जातात. वाटेत एक प्रचंड वटवृक्ष भेटतो. त्याच्या बुंध्याजवळ २५×२५ फूट आकाराचे लाकडाच्या मोठमोठ्या ओंडक्यानी बनवलेले 'होमखण तयार असते देवी पेटती चंद्रज्योत त्यात फेकून देते.

नंतर तलावात स्नान करून देवी मुड्डीला जाते पहाटे पाच वाजता देवी परत येते तेव्हा होमखणातल्या अर्ध्या लाकडाचे रसरशीत निखारे बनलेले असतात. प्रथम देवीसह मोड, मग चौगुले आणि मागाहून शेकडो धोंड त्या पंचवीस फूट पसरलेल्या निखाऱ्याच्या राशीवरून चालत जातात

पेटत्या विस्तवातून चालत जाण्याचा हा विधी हजारो लोकांच्या डोळ्यादेखत घडतो. अग्निदिव्य करणाऱ्याचे पाय कसे भाजत नाहीत हे एक देवीच जाणे

देसाई म्हणाला, "निखाऱ्यावर पाय पडल्यानंतर त्याची मेंदूला जाणीव व्हायला सेकंदाचा अमुक एवढा अंश लागतो त्याच्या आधी निखाऱ्यावरून पाय काढला गेला तर मेंदूपर्यंत संवेदना पोचत नाही "

पण अर्जुन गांवकर म्हणाले, " मोड, चौगुले व धोंड व्रतस्थ असल्या-मुळेच हा चमत्कार घडतो अपवित्र माणसाचे पाय भाजल्याचे प्रसंग मी स्वतः माझ्या डोळ्यानी पाहिले आहेत "

शिरगावची लयराय तिच्या मिलाग्र बहिणीप्रमाणेच नवसाला पावते असा भाविकांचा समज आहे यासंबधी कित्येक आख्यायिका नी अनुभव गावकरानी आम्हाला सांगितले

सुप्रसिद्ध चित्रकार मुळगावकर याच्या घराण्याचे लयराय हे उपास्य दैवत. त्याचा कुलदेव मंगेश पण लयरायवर सर्व मुळगांवकर मंडळीची अपार श्रद्धा आहे. खुद्द चित्रकार मुळगांवकराची सुद्धा होती शिरगावकर आणि गांवकर या दोनच घराण्याची लयराय ही कुलदेवी असताना मुळगावकर कुटुंबियाचा शिरगावच्या देवीशी संबंध काय, तर जुन्या काळी

मुळगांवकराचे पूर्वज शिरगांवचे कुळकर्णी होते गावकऱ्यांनी त्यांना आपल्यात सामावून घेतले होते. त्याना जमिनी दिल्या होत्या या दृष्टीने मुळगांवकर हे जितके मुळगांवकर आहेत तितकेच शिरगावकर आहेत.

मुख्य मुद्दा असा की लयरायवर लोकाची भक्ती कां? चित्रकार मुळगांवकरानी आपल्या घराण्यात घडलेली एक जुनी कथा मला सांगितली होती. ती त्याच्याच शब्दात सांगतो.

" शिरगावच्या जत्रेच्या वेळी आमचे असनोड्याचे घर माणसांनी फुलून जायचे. घरही भव्य—चार चौकाचे झाडून साऱ्या मुली परिवारासह माहेरी यायच्या घरची पाच कुटुंबे, लेकुरवाळ्या मुली नी सोयरी धायरी जत्रेच्या निमित्ताने गोळा झाली की घरालाच जत्रेचे स्वरूप यायचे."

" जत्रेच्या तिसऱ्या दिवशी शिरगांवला आम्हा मुळगावकर कुटुंबाचा खास 'कौल' असतो. देवीचा 'भार' (अवसर किंवा वारे) आलेला पुजारी डोक्यावर कळस घेऊन प्रत्येकाच्या डोक्यावर हात ठेवून कळसावरचा प्रसाद वाटीत असतो. त्या दिवशी दुपारी ४ वाजता घरातली सर्व मंडळी घराला टाळे लावून कौलासाठी शिरगावला जायची. आताच्याप्रमाणे मोटारची सोय नव्हती घराच्या मागच्या बाजूला असलेल्या नदींतल्या होडीत बसून पलीकडे जायचे, नी टेकडी चढून शिरगावला पोचायचे.

" एका वर्षी अशीच सर्व मंडळी कौलाला गेली होती कौल होत असतानाच एका माहेरवासाला आलेल्या मुलीच्या लक्ष त आले की आपले तान्हे मूल घरी माडीवरल्या पाळण्यात राहिले! तिने आकांत मांडला. घरचा एक जाणता त्या वेंधळ्या मुलीला बरोबर घेऊन असनोडेची वाट तुडवायला लागला बरोबर कंदील घेऊन एक गडी चालत होता. वाटेत देवीचा धावा चालूच होता

" पुढला दरवाजा उघडून मंडळी चौकावर आली. ज्या माडीवर मूल होते तिकडे त्याच्या भयभीत नजरा वळल्या. माडीवरच्या खिडकींतून लखलखीत उजेड येत होता! नी तो हलत होता!

" माडीवर दिवा लावला कुणी? तो इतका प्रखर कसा? तो कमीजास्ती कां होतोय? जीव मुठीत धरून नी लयरायचे नामस्मरण करीत

मंडळी माडीवर गेली. पाहातात तो काय ?

"हिरवा भरजरी बुट्टयाचा शालू नेसलेली, नाकात ठसठशीत मोत्याची नथ घातलेली, सुरंगीची वेणी माळलेली, तेजःपुंज कायेची एक प्रौढ स्त्री हातात पणती घेऊन पाळण्याभोवती फिरत होती आणि पाळण्यातले ते बाळ तिला पाहून हंसत खिदळत होते !

"मंडळीची चाहूल लागताच ती स्त्री अदृश्य झाली. पणतीचा दिव्य प्रकाश पणतीसह लुप्त झाला. उजेड उरला तो मिणमिणत्या कंदिलाचा !

"अर्भकाला आईने छातीशी कवटाळले. मंडळी पुन्हा शिरगावला आली. देवीला प्रश्न केला, 'माते, हा कुणाचा साक्षात्कार ? ती कोण होती ?' देवी उत्तरली,

'तो माझा साक्षात्कार. ती मी होते !' "

जमलेल्या मंडळीचे, विशेषतः बायकांचे डोळे आसवांनी भरून आले.

आसवांची ही लागण कशी होते कुणाला माहीत. आमच्या बरोबरच्या दोन्ही बायकांचे डोळे सुद्धा भरून आले होते.

चित्रकार मुळगावकरांनी घरच्या वडीलधाऱ्या मंडळीकडून ऐकलेली ही झाली खूप वर्षांमागची हकीकत. पण त्यांच्या स्वतःच्या अखेरच्या जीवनातही अगदी अलीकडे असा एक प्रसंग घडला होता की तो सांगताना ते थरारून जात

"मागच्या एका प्रवासात इंग्लंडवरून अमेरिकेला जावे लागले." मुळगावकर मला एका पत्रात लिहितात, "लंडनला एका हॉटेलात फक्त एक रात्र मुक्काम केला. एकुलती एक रिकामी असलेली 'सोशल रूम' घेतली व ताणून दिले. माझ्या सवयीप्रमाणे मला पहाटेच जाग आली. घड्याळ पाहिले तर बंद पडलेले जाग आली तेव्हा पाच-साडेपांच वाजले असावेत अशा कल्पनेने प्रातर्विधी उरकून घ्यावा म्हणून मी बाथरूमचे दार उघडू लागलो. पण बाथरूम आतून बंद ! आत कोण असावे ? माझ्याशिवाय तर दुसरे मनुष्य खोलीत कुणीही नव्हते.

" इतक्यात दरवाजा उघडला गेला नी सोळा-सतराची मेणबत्ती-सारखी फिकट पाढऱ्या वर्णाची एक तरुण मुलगी माझ्या अंगावरून बाहेर पडली. थंडगार बर्फाची लादी अंगावरून जावी असा मला भास झाला. भयमिश्रित कुतूहलाने तिच्याकडे पाहिले. तिला घडाखालचा भागच नव्हता !

" मी ओळखले, हे पिशाच्च आहे ! अन् त्या क्षणी मी धावा केला तो माता लयरायचा.

" क्षणार्धात ती ' पोरगी ' नाहीशी झाली.

" तसाच पळत तिसऱ्या मजल्यावरून लॉबीत गेलो समोरच्या घड्याळात पाहिले. फक्त पाऊण वाजला होता सारी माणसे आपापल्या खोल्यांत झोपली होती मी तिथेच टेबलावर डोके टेकून पडून राहिलो.

" दुसऱ्या दिवशी सकाळी अमेरिकेचे विमान पकडण्यासाठी टॅक्सीने निघालो. झाल्या गोष्टीची वाच्यता हॉटेलात केली नव्हती. मात्र वाटेत टॅक्सीवाल्याला त्या हॉटेलमधल्या अनुभवाबद्दल सहज बोललो.

" तिसऱ्या मजल्यावरची ९२ नंबरची खोली काय ! " ड्रायव्हरने विचारले

" मी ' होय ' म्हटले

" ' भाग्यवान् आहात म्हणून बचावलात ' तो म्हणाला, ' तुमचे मी अभिनंदन करतो ' "

मुळगावकराचा हा स्वतःचा अनुभव. असे अनुभव सांगणारे लोक गोव्यांत भेटतात. ही श्रद्धेची बाब आहे. कुणाला साक्षात्कार होईल, घोडाचे पाय भाजणार नाहीत. कुणाचे देवी रक्षण करील. शेवटी हे बोलणे प्रतीतीचे असते, विश्वासाचे असते. ते दुसऱ्याला सांगून, समजावून पटेलच असे नाही ते पटायला सांगणाऱ्याच्या अनुभवविश्वाशी समरस झाले पाहिजे.

# २३ : कासारपालची कमलनयना कालिका

" आता कुठं ? " गाडीत बसल्यावर देसाईने विचारले

मी घड्याळाकडे पाहिले साडेसहा वाजून गेले होते कासारपालला जाऊन घरी परतणे शक्य होते मी शातारामला म्हटले, " शांताराम, गाडी असनोड्यावरून कासारपालला घे "

" कासारपालला काय आहे ? " सौ. देसाईंचा प्रश्न.

" कालिकेचे देवालय आहे तिथे. "

" पण फार वेळ नाही ना लागायचा ? " देसाई म्हणाला, " सकाळपासनं सारखी घोडदौड चालली आहे. "

" घोडदौड कसली ! चांगले आरामात तर बसला आहा गाडीत " सौ देसाई म्हणाल्या, " या इतक्या सुंदर गाडीला घोडी म्हणून तुम्ही तिचा नी भाऊजींचा सुद्धा अपमान करताहा की. "

बायकोचे असले खवचट बोलणे ऐकून घेतले तर तो नवरा कसला ? देसाई तात्काळ म्हणाला, " कालपरवापासनं पाहातो आहे, तूं अगदी साहित्यिकासारखी बोलते आहेस !" आणि मग माझ्याकडे वळून म्हणाला, " बर का रे दादा, पुण्याला घरी असताना हिची सारखी काही ना काही चिडाचीड, कुरकूर चालू असायची. कुठे सुनेने भाजीत मीठच जास्त टाकलं, नाहीतर गवळी दुधात पाणीच घालतो किंवा मुलं ऐकत नाहीत म्हणून सारखी कातावत असायची काहीच नसलं तर हिची डोकेदुखी ठरलेली. पण या प्रवासाला बाहेर पडल्यापासून ही बाई विनोद पण करू शकते, हें मला पहिल्यांदाच दिसून आले. लग्नापूर्वी तसा थोडा अनुभव होता "

' पुरे झाला फाजीलपणा .."

पण सौ देसाईला पुढे बोलू न देता मी म्हटले, " मित्रा, हा तुझा अनुभव तुझा एकट्याचा नाही. साऱ्या पुरुषजातीचा आहे. खरं सांगू तुला देसाई, माणसानं प्रवासाला जाव ते नेहमी बायकोला बरोबर घेऊन.

नेहमी रांधा, वाढा, उष्टी काढा या चाकोरीतून ती बिचारी चालत असते. कातावणार नाही तर काय करणार बिचारी ? या चाकोरीबाहेर पडली म्हणजे तिच्या मनाच्या मिटलेल्या साऱ्या पाकळ्या अशा कांही उमलू लागतात की तिलाच नव्हे तर आपल्यालाही वयाचा विसर पडतो अन् प्रवासातच नव्हे तर प्रवासानंतरही अधिक उत्साहाने या जगातला प्रवास आपण करू शकतो. आमचा तरी असा अनुभव आहे. खर ना ग ! ''

पण जिला उद्देशून हा प्रश्न मी विचारला होता, तिच्याऐवजी सौ देसाईच म्हणाल्या, ' सागा याना. पेन्शन घेतल्यापासनं बाहेरची दिशा म्हणून नाही आपणही कुठे जात नाहीत नी मलाही नेत नाहीत ''

सौ. देसाईंच्या स्वरावरून बाई बरेच मोठे व्याख्यान सुनावणार असा रंग दिसत होता; पण तेवढ्यात गाडीने डावीकडे काटकोनात असे वळण घेतले की आमचा साऱ्याचाच उजवीकडे तोल गेला आणि सौ. देसाईंचे शब्द तोंडातल्या तोंडातच राहिले.

संधिप्रकाशाच्या धूसरतेत समोरचा देखावा एकाद्या वॉटरकलरमधील चित्राप्रमाणे सुंदर दिसत होता. आस्फाल्टचा एकदोन फर्लांग लांब असलेला तुकतुकीत रस्ता उंचवट्यावर चढत गेला होता. आणि त्याच्या शेवटी कालिकेच्या देवालयाचा घुमट हिरव्या क्षितिजाच्या अर्धवर्तुळातून वर आला होता. गोव्यातल्या आतापर्यंत पाहिलेल्या देवस्थानांपेक्षा हे चित्र निःसंशय वेगळे होते. गोव्यातली बहुतेक देवालये खोलगट जागेत होती, काही रस्त्याच्या समपातळीवर होती. फार थोडी उंचावर होती पण तिथे रस्त्यावरून थोडाशा पायऱ्या चढताच प्राकारात प्रवेश होत होता. पण कालिकेचे देवालय चढावावर होते. हा चढाव म्हणजे टेकडी नव्हे, की डोंगर नव्हे. उंच होत गेलेले टेकाड

गाडीतून खाली उतरून सभामंडपात प्रवेश केला तेव्हा या देवळाची एकूण रचनाच इतराहून कांहीशी वेगळी दिसली. इतर सर्व ठिकाणी सभामंडपात मध्यभागी प्रवेशद्वार असायचे किंवा त्याला दारच नसायचे. इथे सभामंडप दोन्ही बाजूंनी उघडा होता तर समोरून बंद होता. तिथे दुमजली बांधकाम होते. वरच्या मजल्यावर नगारखाना. खालच्या मजल्या-

वर कमिटीची ऑफीसरूम. या छोट्या इमारतीच्या दोन बाजूंनी १०–२० पायऱ्या होत्या. म्हणजे सभामंडपाला दोन प्रवेशद्वारे होती. यांपैकी एका दाराने सभामंडपात प्रवेश करायचा. सभामंडपात प्रवेश केला तेव्हा नगारखाना – कम – कमिटीऑफिसच्या मागच्या बाजूने प्रशस्त रंगमंच असल्याचे दिसून आले. याच ठिकाणी उत्सवातली नाटके व्हायची

सभामंडपात प्रवेश करून आम्ही समोर पाहिले. इतर सर्व ठिकाणी देवालय व सभामंडप एकाच पातळीवर असत. किंबहुना सभामंडप हे देवालयाचे एक्स्टेन्शन असायचे. पण इथे वेगळाच प्रकार होता सभामंडपाहून हे देवालय उंचावर होते पंधरावीस पायऱ्या चढल्यावर अर्धमंडपात प्रवेश व्हायचा

सर्वांच्याच लक्षात ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाही

"हे देऊळ वेगळंच दिसतंय, नाही हो ?" सौ. देसाईंने म्हटले.

"हो, वेगळं दिसतं खरं. अशी आणखी देवळं आहेत का रे दादा, गोव्यांत ?"

"नाही या रचनेचे हे एकच देऊळ आहे इथे म्हणूनच उलट्या बाजूं दहाबारा किलोमीटर अधिक प्रवास करून तुम्हाला आणलं इथं."

चौकावर जाऊन घंटा वाजविली तेव्हा एक पोरगेला भटजी प्रगट झाला. त्याने तीर्थप्रसाद दिल्यावर आम्ही चौकावर बसलो तिथूनच देवीकडे पाहात देसाई म्हणाला, "अगदी शांतादुर्गा, नवदुर्गेप्रमाणे लोभसवाणी मूर्ती आहे की रे ही कालिकेची."

"हो, आहे ना!"

'मला वाटलं होतं, कालिकेच्या ह्या देवालयात आठ हात असलेली, जीभ बाहेर आलेली, हातात राक्षसाचे शिर धरलेली, गळ्यात रुंडमाळा घातलेली अतिशय उग्र चेहऱ्याची मूर्ती दिसेल मुंबई–पुण्यात बंगाली लोक नवरात्रात जी कालीची मूर्ती करतात ती किती भयानक असते! खुद्द कलकत्त्यात कालीघाटावरल्या कालीच्या मंदिरातल्या कालीचं रूप म्हणजे अक्राळविक्राळ आहे दररोज तिथे आजही पशुबली दिला जातो इथेही तेच रूप पाहायला मिळेल नी तोच इतिहास ऐकायला मिळेल असं वाटलं

होतं मला कालिका म्हणजे कालीच की नाही ?"

"हो. कालिका म्हणजे कालीच. देवीची दुर्गा, चंडिका ही जी उग्र रूपे आहेत त्यातली काली किंवा कालिका हे एक. पण आश्चर्य हे की सर्व दुर्गा आणि ही एकुलती एक काली गोव्यात आल्यावर सौम्य बनल्या. पूर्वीही कधी इथे या देवतासमोर पशुबली देण्याची प्रथा नव्हती नी आजही नाही."

"मोठं आश्चर्य आहे."

"हो आश्चर्य आहे खर. पण याचे कारण काय ते मात्र कुणीच सांगू शकत नाही."

"मग या कालिकेचे ध्यान तरी काय आहे ?"

"अगदी सरळ सरळ महिषासुरमर्दिनीचे ध्यान आहे हिचे मूर्तीत महिष नाही. पण ती सिंहवाहिनी आहे ती चार हातांची आहे. समोर बघा वहिनी चार हात आहेत ना देवीला ? तिच्या उजव्या दोन हातात खड्ग व पद्म आहे डाव्या दोन हातात चक्र व त्रिशूळ आहे. कालिका स्तोत्रात तिच्या उग्र रूपाचे वर्णन केले आहे ते या कालिकेच्या रूपाला लागू पडत नाही. पण "वसाना कौशेय कमलनयना चंद्रवदना दधाना कारुण्य विपुलजघना कुंदरदना" हे वर्णन मात्र चपखलपणे हिलाही लागू पडते.

"खरच भावजी," सौ. देसाई म्हणाल्या, "कमलनयना, चंद्रवदना, कुंदरदना अशीच आहे ही काली."

"पण काय रे दादा, तिचं मुळांतलं ध्यान कसं होतं ते सांगता येईल का तुला ?"

"मूळ श्लोक काही मला आठवत नाही. पण त्याचा मतितार्थ सांगतो. ती सर्वदेवोपसेताम् म्हणजे सर्व देवानी सेवित आहे काजळाच्या डोंगरासारखी आहे. मुख कराल असून केस मोकळे आहेत. स्तन पुष्ट आहेत हातात खड्ग व नुकतेच तोडलेले नरमुंड आहे. नरमुंडातून रक्त गळत आहे. गळ्यात कवट्यांची माळ आहे."

"पण तिला काली हे नाव कां पडले ?"

" कालाचा प्रारंभ तिच्यापासून झाला म्हणून ती काली. "

इतक्यात बालभटजींचे वडील आले. त्यांनी देवस्थानाबद्दल खूप माहिती दिली. ते म्हणाले, हे गोव्यातील व गोव्याबाहेरील सर्व दैवज्ञ ब्राह्मणाचे एकमेव उपास्य दैवत आहे. प्रत्येक दैवज्ञ घराण्याचा कुलदेव वेगळा असतो पण सर्व समाजाचे मिळून देवस्थान आहे ते हे. नवरात्राचा उत्सव इथे फार थाटात होतो. पुराण, कीर्तन, मखरोत्सव हे इतर देवस्थानाप्रमाणेच इथे होतात. पण विशेष गोष्ट ही की इथे नवचंडी होते. सर्व महाजन गोळा होतात. विशेषतः नवमीला नी दसऱ्याला मोठ्या थाटाचा उत्सव होतो

दुसरा थाटाचा उत्सव म्हणजे शिमगा-शिशिरोत्सव मुख्य कार्यक्रम नाटकाचा. गोव्यानली दैवज्ञ मंडळी मोठी नाट्यप्रिय. नाटकाच्या हौसेपायी जीव गहाण टाकतील; पण नाटक पाहातील.

" हे देऊळ किती जुने आहे हो ? आणि बाटवाबाटवीच्या काळात कुठून आले हे ? "

" हे दुसऱ्या कुठल्या गावाहून आलेलं नाही. हे मूळचे इथलेच. पाचशे वर्षांचे तरी ते जुने आहे असा पुरावा आहे त्यापूर्वी देवी कुठून आली ते कांही कळत नाही. "

" ते मी सागतो देसाई " मी म्हटले, " ह्या गांवचे नाव कासारपाल आहे हे तुम्हाला मी सांगितलं ना ? "

' हो त्याचाच विचार करत होतो मी गांवाचे नाव कासारपाल. म्हणजे कासारांचा काही संबंध होता का या गावाशी ? "

" बरोबर आहे. गोव्यातले कासार महाराष्ट्रातून सावंतवाडीमार्गे इथे आले. या पाली गांवात स्थायिक झाले म्हणून या गावाला कासारपाल हे नाव पडले त्यांनीच ही देवी आपल्याबरोबर आणली. पाचशेपेक्षा अधिक वर्षे झाली या गोष्टीला पुढे काय झाले कुणाला माहीत; पण इथून कासाराची वस्ती हलली पण कालिका मात्र इथेच राहिली ती दैवज्ञांनी आपली मानली तिची उपासना केली. तिला वैभव प्राप्त करून दिले. आज हे देवस्थान फार सपन्न नसले तरी अगदीच गरीब नाही. देवालयाची इमारतच

बघ किती प्रशस्त आहे! देवीचे महाजन सारेच सुवर्णकार असल्यामुळे देवीला सोन्याच्या अलंकारांनी तर नुसती मढविलेली असते."

देवालयातून बाहेर पडून आम्ही प्राकारात शिरलो पंचिष्टांची छोटी देवालये आजूबाजूला होती. दोन्ही बाजूंना अग्रशाळा होत्या. पण त्या भव्य नव्हत्या छोट्याशाच होत्या आजूबाजूचा परिसर रम्य होता. देवळासमोरचा रस्ता गांवात गेला होता

नको नको म्हणत असताना भटजींनी आम्हाला आपल्या घरी नेऊन चहा–पोह्यांनी स्वागत केले आणि त्यांचे आभार मानून आम्ही निरोप घेतला

"आता थेट घरी, शांताराम." गाडीत बसल्यावर मी ड्रायव्हरला सूचना दिली

"म्हणजे करजाळ्याला ?" देसाईने विचारले

"हो"

"इथून किती अंतर आहे ?"

"अंतर आहे पस्तीस किलोमीटर्स"

"म्हणजे तासभर लागेल म्हणायचा"

"तास कशाला ? पाऊण तासात पोचू घरी"

पण करंजाळ्याला पोचायला आम्हाला दीड तास लागला त्याचे काय झाले नानोडे, अस्नोडे, थिवीवरून म्हापशाला आलो म्हापशाचा मोटारस्टँड जवळ येऊ लागला तशी सौ म्हणाली, "जरा मार्केटमध्ये गाडी घेता कां ?"

"कशाला ?"

"थोडे टोमॅटो नी भाजी घेऊ घरात काय आहे काय नाही कुणाला माहीत ! दोन दिवसांनंतर आपण घरी पोचतो आहो आम्ही येणार याची सूनबाईला काही कल्पना नाही सारा सैंपाक नव्यानं करावा लागणार"

कुजबुजत्या स्वरात सौ. माझ्याशी बोलत होती पण तिच्या शेजारी बसलेल्या सौ देसाईंच्या तिखट कानांनी आमचा हा संवाद ऐकलाच. त्या म्हणाल्या, "वैनी, आताच्या सैंपाकाची काळजी तुम्ही करायची नाही हं

आज फक्त पिठलं-भात खायचा. अन् पिठलं-भात मी करणार आहे. तुम्ही फक्त बसून राह्यचं काय हवं नको ते मी मागून घेईन "

" ते चालायचं नाही हं वैनी " मी म्हणालो पुढे मी काही तरी म्हणणार होतो पण त्यापूर्वीच देसाई म्हणाला,

" जेवणाच बायका पाहून घेतील रे आपण उद्याचा कार्यक्रम ठरवू "

" बर, ठरवू "

" उद्या कुठं जायचंय आपल्याला ? "

" उद्या दक्षिण गोव्याचा दौरा जाम्रावली, चंद्रनाथ, फातर्पे नी मल्लिकार्जुन नी पर्तगाळ देवळे फक्त पाच; पण प्रवास मात्र दोनअडीचशे किलोमीटर्सचा नकाशा आहे ना तुझ्याजवळ ? जरा उघड तो. "

नकाशावर ती ती स्थळे मी दाखवली तेव्हा देसाई म्हणाला, " अरे, म्हणजे जवळजवळ गोव्याच्या दक्षिण सरहद्दीवर जाताहोत आपण "

" हो "

" मग तिथूनच आम्हाला कारवारला जाता येणार नाही का ? परत वरजाळ्याला यायचं नी दुसऱ्या दिवशी त्याच रस्त्याने बसने जायचे. त्यापेक्षा सरळ पुढे गेलो तर एक दिवस वाचेल आमचा "

कल्पना वाईट नव्हती. मी होकार दिला नी सौ. ला म्हटलं, " अग, आज फक्त पिठल-भातावर बोळवण नाही हं करायची काहीतरी गोडधोड करायचं पाहुण्यासाठी. "

" हो, करूया की. " पण असे आयत्यावेळी गोडधोड काय करायचे याची चिंता सौ मनातल्या मनात करीत असेल याची मला कल्पना होती. म्हणून मी पुढे म्हणालो, " पुरणपोळी, श्रीखंडपुरी असल काही आता जमणार नाही पण दूधपाक-पुरी तरी जमेल की नाही ? "

दोन्ही बायांना मार्केटमध्ये उतरवून मी ड्रायव्हरला म्हटले, " शांताराम, आम्ही एकेक कप चहा मारून येतो रे त्या हॉटेलमधून. देसाई, चहा हवाय ना तुला ? जेवायला उशीर होणार आहे अन् शांताराम, तू पण चल. " आणि मग देसाईकडे वळून म्हटले, " गाडीला जसं पेट्रोल लागत तसा गाडी चालवतांना आमच्या या सारथ्यालाचहा लागतो.

त्याला दुसरंही काही लागत; पण ते गाडी सोडल्यावर. ”

देसाई म्हणाला, “ तू पुढे होऊन स्पेशल चहाची ऑर्डर दे. गाड्यावरून सिगरेटचं पाकिट घेऊन मी आलोच. चल शांताराम, गाडा-बिडा कुठं आहे, दाखव मला. ”

मी हॉटेलात गेलो तेव्हा समोरच मित्राच्या कोंडाळ्यात बर्वे बसलेले दिसले. के. ना. बर्वे हे माझे मित्र नाटकांचे नी संगीताचे जाणकार व लेखक म्हणून गोव्यांत प्रसिद्ध आहेत. सरळ मी त्यांच्या टेबलाशी जाऊन बसलो.

“ असा अचानक नी अवेळी कसा तू इथे ? ” बर्व्यांनी विचारले.

मी खुलासा केला. बर्व्यांनी चहाची ऑर्डर दिली. तब्बल सात मिनिटांनी शांतारामसह देसाई आला.

“ का रे, एवढा वेळ का लागला ? ” मी विचारले.

“ तुझा हा शांताराम तुझं नी तुझ्या गाडीचं कौतुक करत होता. म्हणत होता, गाडी जपानी असली तरी अशी मस्त आहे की चालवायला मजा येते. सीट्स कशा मुलायम, माणूस बसला की वीतभर खाली जातो. सीटला म्हणे स्प्रिंग्ज अजीबात नाहीत. शिवाय दारं म्हणे प्लॅस्टिकची आहेत. दार लावलं की गुंय असा आवाज येतो. परवाच माझ्या लक्षात आलं होतं रे हे सारं. प्रवासाच्या शेवटी बोलणार होतो. पण शांतारामनं प्रात्यक्षिकच करून दाखवलं. शिवाय आमच्या प्रवासावर तो खूष आहे. म्हणाला, या गाडीत मुंबईच्या मंत्र्यांना, सावंतवाडीच्या राजाला नी दिल्लीच्या पुढाऱ्यांना हिंडवून आणलं. एकदा तर गव्हर्नर दामले साहेबही बसले होते गाडीत. पण तुमचं बोलणं होतं म्हणे राजकारणावर. त्याला काही कळत नव्हतं. आपल्या तीन दिवस चाललेल्या गप्पागोष्टीत मात्र तो रंगून गेला म्हणे. ”

देसाई बसला तेव्हा बर्व्यांशी त्याची ओळख करून दिली. म्हटले, “ हा देसाईही तुझ्या-माझ्याच पंथातला आहे. साहित्याचा नी नाटकाचा शौकिन. गोवा हा भयंकर नाटकवेडा असं त्यानं ऐकलं होतं. त्याची कल्पना होती की, गोव्यात देवांप्रमाणे नटांचीही देवळे असतील. पण बिचाऱ्याची निराशा झाली. ”

“ पाहुणे, ” बर्वे म्हणाले, “ गोव्यात नटांची देवळे नाहीत. पण

सारा गोवा हेच एक नाट्यमंदिर आहे. या म्हापशाचेच बघा पुण्यात पावलापावलाला साहित्यिक भेटतात तसे म्हापशात नट दिसतात रघुवीर सावकार, वसंत व गोपीनाथ सावकार हे प्रसिद्ध नट या गांवचेच. रंगबोधेच्छु नाट्यसमाज इथेच स्थापन झाला. ”

चहा आला तेव्हा बोलण्याला खंड पडला. शेवटचा घोट घशाखाली उतरला नी हॉर्न वाजला महिलामंडळी खरेदी करून परतली होती.

बर्व्यांचा निरोप घेऊन आम्ही उठलो.

घरी पोचलो तेव्हा भिंतीवरच्या घड्याळात साडेआठचा ठोका पडत होता चौदा तासाचा नॉन–स्टॉप प्रवास झाला होता. अंग आंबून गेले होते जेवण करून अथरुणावर पडायला अकरा वाजले

## २४ : संगीत मराठी रंगभूमीचे उगमस्थान

दुसऱ्या दिवशी पहाटे जागे झालो ते गजराच्या आवाजाने. सर्व आन्हिके उरकून चहापान उरकले, तेव्हा पाहुण्याचे सामान गाडीत चढवून शांताराम आमची वाट पाहात होता.

सौ आज बाहेर पडायला कुरकुरत होती तिला आज विश्राती घ्यायची होती।

“ या हो वैनी. ’ सौ देसाई म्हणाल्या, “ दोन दिवस किती आनंदात गेले तुम्ही आल्यामुळे. ”

‘ येईल हो ती. ” मी म्हटले, “ अशी कुरकुरत कामे करायची सवय आहे तिला ”

“ घरोघरी मातीच्याच चुली बर का रे दादा ” देसाई म्हणाला, “ तुझा काय अनुभव आहे शांताराम ? ”

शांतारामने स्मित केले.

घरातून बाहेर पडण्यापूर्वी बायकांचा एक कार्यक्रम झाला सौ. देसाईंची खणानारळाने ओटी भरण्यात आली. ओटीचा खण, नारळ नी तांदुळ एका पिशवीत घालून ती सौ. देसाईंच्या बास्केटमध्ये ठेवण्यात आली. या पिशवीच्या जोडीला दुसरी एक पिशवी नी बाटली होती.

" हे काय वैनी ? " सौ. देसाईंनी विचारले.

" कुठे काय ? थोडी आमसोले अन् पापड. तुम्हाला आवडले होते ना काल आमचे सारस्वती पापड ! म्हणून टाकले हो थोडे पिशवीत अन् ही बाटली कोकमच्या सरबताची. सरबताची कृती कालच सांगितलीय मी तुम्हाला. "

" कशाला एवढं केलंत वैनी ? "

" अहो ह्यांचे जिवाभावाचे मित्र म्हणजे कुणी परके का आहेत ? तीन दिवस पाहातेय मी. अगदी भावांभावासारखे वागतात. "

मला एकदम हसू आले. हसतच मी म्हणालो, " तरी सुद्धा एकमेकींना वैनीच म्हणता ना ! अग, भावाच्या बायका म्हणजे जावा नव्हे का ? "

गाडीत बसल्यावर शांतारामला म्हटले, " गाडी आगशीच्या रस्त्याने घे. प्रथम डोंगरीला जायचं आहे " आणि मग देसाईंकडे वळून म्हटले, " अरे देसाई, काल म्हापशाला गोवा ही नाट्यभूमी असल्याचे बरें म्हणाला होता ना, त्यावरून एक कल्पना सुचली. गोव्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्याही संगीत रंगभूमीचे उगमस्थान तुम्हा लोकांना दाखवावे. "

" म्हणजे अण्णा किर्लोस्कराच्या त्या दंतकथेवर तुझा विश्वास आहे का ? "

" तुला माहीत आहे ती दंतकथा ? "

" हो ना नाटकांसंबंधीचे लेख नी पुस्तके आवर्जून वाचतो की मी. "

" कसली दंतकथा भावजी ? " सौ देसाईंनी विचारले.

" डोंगरीला जाऊ तिथेच सांगतो ती. "

सबंध पणजी शहराला वळसा घालून आम्ही दक्षिणेचा मार्ग धरला एका छोट्याशा कॅनालच्या किनाऱ्याला धरून गाडी चालू लागली.

कालापूर गांवातून पुढे गेलो आणि डोंगराची चढण सुरू झाली. डोंगराच्या पठारावर उजव्या बाजूस गोवा मेडिकल कॉलेजचा एक महान् प्रकल्प आकाराला येत होता. हजार खाटांचे हॉस्पिटल उभे राहाणार होते डाव्या हाताला मिलिटरी कँप होता.

कँपाची मर्यादा संपली. गाडी खाली उतरू लागली. शिरदोनवरून पुढे गेली नी मुख्य रस्त्याला डाव्या बाजूने फुटलेल्या एका फाट्याने पुढे जाऊ लागली एका छोट्याशा टेकडीला वळसा घालून आम्ही पुढे जात होतो टेकडीवर पाहिले एक खिस्तमंदिर तिथे दिमाखाने उभे होते.

" ते पाहिलस ? ' खिस्तमंदिराकडे बोट दाखवीत मी देसाईला विचारले

" चर्च आहे ना ते ? "

" हो, चर्च आहे ते पण ते कशावर बांधले आहे, माहीत आहे ? "

" देवळावर असेल ? "

" नाही. राजवाड्यावर. पाचसहाशे वर्षे ज्या कदंबाचे राज्य गोव्यावर होते त्या गोवेकर कदंबांचा राजवाडा इथे या टेकडीवर होता असे सागतात ज्या भागातून आपण आता चाललो आहो ते पिलार गाव पिलारला लागून थोरले गोवे त्यापुढे आगशी गाव आहे. या साऱ्या भागात कदंबांची गोवापुरी होती. साऱ्या दक्षिण कोकणात ही गोवापुरी म्हणजे एकुलते एक वैभवसपन्न शहर होते आफ्रिका नी युरोपपर्यंत इथून भारताचा व्यापार चालत होता अरबी घोड्यांच्या खरेदीविक्रीचे हे मोठे केंद्र होते डोंगरी पाहून झाल्यावर आपण आगशीला जाणार आहो या आगशी बंदरात जयकेशी कदंबाने तीन हजार वर्षांपूर्वी भारताचे पहिले सुसज्ज आरमार तयार केले. कुणी म्हणतात हे बंदर शिरदोन होते खरे काय ते देवाला माहीत !

" या राजधानीचं नाव गोवापुरी अस तू म्हणालास. थोरले गोवे नावाचं गाव जवळच आहे असही तू सांगितलस. परवाचे दिवशी आपण जुने गोवे पाहिले मग गोवे नावाची गावे इथे आहेत तरी किती ? "

" वत्सा, चांगला प्रश्न विचारलास हाच प्रश्न जन्मेजयाने शौनकाला

विचारला होता, शौनकाने सूताला विचारला होता सूताने व्यासाला विचारला होता."

"पुरे पुरे भावजी." सौ. देसाई म्हणाल्या. "व्यासाने कुणाला विचारला होता ते सांगू नका. पुराणबिराण सांगायची लहर आली की काय तुम्हाला?"

"हे असं चालत बघा आमच्या घरी." आमच्या गृहिणींनी मध्येच तोंड घातले "ऐकणारा भेटला की याच्या तोंडाचा पट्टा सुरू होतो. मग कश्शाकश्शाकडे लक्ष देत नाहीत."

मध्ये काही विक्षेप आलाच नाही असे समजून मी माझे भाषण पुढे चालू केले, "तर देसाई, गोवे नावाची बरीच गावे आहेत आमच्या या गोव्यात पहिले म्हणजे कालानुक्रमाने शेवटचे नवे गोवे. म्हणजे पणजी. नावाने पणजी असला तरी हा या गोवापुरीची नात फक्त दोनशे वर्षांचं वय आहे तिचं पोर्तुगीजानी ती वसविली. त्यापूर्वीची राजधानी परवा पाहिलेले जुने गोवे. इथेच प्रथम पोर्तुगीज आले त्यावेळी विजापूरकरांच्या ताब्यात होते ते. फार भरभराटलेले होते. विजयनगरचा माधव मंत्री आला होता तो इथेच त्याहं पूर्वीचे हे थोरले गोवे किंवा गोवापुरी. ही कदंबांची राजधानी- आणि याहीपूर्वीची गोव्याची राजधानी चंद्रपूर किंवा आजचे चांदर."

डोंगरीतल्या हमरस्त्यावर एका उंच भिंतीतल्या दरवाजात गाडी उभी राहिली नी आम्ही खाली उतरलो. आत शिरलो तेव्हा पुण्यांतल्या एकाद्या वाड्याच्या चौकांत आहो असे वाटले

"इथे देऊळ कुठे आहे?"

देऊळ असं कुठं दिसतच नव्हते गोव्यांतल्या देवालयाची ठराविक रचना कुठेच नव्हती. उंचच उंच दगडी भिंताडाच्या आंत चौक होता. डाव्या हाताला राहाते घर दिसत होते. उजव्या हाताला समोरच्या बाजूस मात्र मंदिराच्या दरवाजासारखा दरवाजा दिसला

आंत प्रवेश केला आणि परमावधीचे आश्चर्य वाटले. देऊळ होते. इतके छोटे की प्रवेश करताच छोटासा भोगमंडप, त्याहून छोटा गाभारा

आणि प्रदक्षिणामार्ग एवढ्याच गोष्टी त्यात असलेल्या दिसल्या. पण त्या इतक्या मोह पाडणाऱ्या होत्या की आतापर्यंत पाहिलेल्या प्राकार, स्तंभ, तलाव, अग्रशाळा, नगारखाना असलेल्या मंदिरापेक्षा या मंदिरात येताच जीवाला शांती लाभली. नाही तरी हे राममंदिर होते. विष्णूचा अत्यंत सात्विक व शांत असा राम हा अवतार. त्याच्या सान्निध्यात शांतीचा साक्षात्कार झाला तर नवल कोणते?

हे देऊळ फार जुने नसूनही त्याचा नुकताच, १९७८ च्या जूनमध्ये जीर्णोद्धार झाला सिमेंट, काँक्रिट, मार्बल वगैरे आधुनिक साधनांचा उपयोग करूनही या मंदिराचा जुना चेहरा कायम ठेवण्यात चालकांनी कमालीचे यश मिळविले आहे

हे राममंदिर तसे अगदी अलीकडचे. १८७१ मध्ये तर ते बांधण्यात आले. त्या काळात या ठिकाणी कृष्णंभट्ट बादकर नावाचे एक सत्पुरुष राहात होते ते कवि होते वेंगुर्ल्याचे विष्णुबुवा सोमण याच्याकडून त्यांनी रामदासी दीक्षा घेतली होती. त्यांच्या मनात राममंदिर बांधावे अशी कल्पना आली. पण या गोवे तालुक्यात नवे देवालय उभारण्यास बंदी होती. म्हणून कुणीतरी त्यांना सल्ला दिला. बाहेरून घर दिसेल पण आंतून मंदिर दिसेल अशा प्रकारे बांधकाम करावे त्याप्रमाणे या देवळाचा उभारणी करण्यात आली. हा राम म्हणजे संत बादकरांचे उपास्य दैवत. म्हणूनच या देवस्थानचे जुने महाजन नाहीत डोंगरीच्या काही घराण्यांनीही बादकरा-प्रमाणे या श्रीरामाला उपास्य दैवत मानले. इथे चौघडा झडत नाही हड्यासुंभराचे वैभव दिसत नाही सीतारामची मूर्ती सुद्धा बोरी गावच्या एका कलावंताकडून करून घेतलेली.

गावात दुसरे देवस्थान नव्हते. म्हणून गावकरी मग या राममंदिरात पूजेअर्चेसाठी येऊ लागले. रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटात होऊ लागला. गोव्यातल्या उत्सवपरंपरेप्रमाणे नाटके होऊ लागली. गावकरी त्यांत उत्साहाने भाग घेऊ लागले.

पण डोंगरींतल्या नाटकात नी इतर देवस्थानांतल्या नाटकांत फरक होता इतरत्र दशावतारी खेळ होत. त्यात सूत्रधार संवाद म्हणे, गाणी

गायी. पण डोंगरींतल्या नाटकांत स्वतः पात्रेच ही कामें करीत. स्वतः बांदकरांनी ही नाटकें लिहिली होती नी ते स्वतःच ती बसवून घेत त्यांना गाण्याचे अंग होतें. ते भजनें म्हणत, कीर्तनें करीत. या कीर्तनाच्या अनुभवातून त्यांनी संगीत नाटकाचा हा नवा प्रयोग केला होता आणि त्यामुळेच नाटकें पाहावी तर डोंगरीला अशी कीर्ती डोंगरीच्या रामनवमीच्या उत्सवाने मिळविली होती.

धूमधडाक्याने ही नाटकें चालू असताना अण्णा किर्लोस्करांचा मुक्काम गोव्याला होता. १८७५ च्या सुमारास गोव्यातल्या मिठाचे कंत्राट हिंदुस्थान सरकारने घेतले होतें आणि हे मीठ खरेदी करून भारतांत पाठवायच्या व्यवस्थेसाठी क्रॉफर्ड नावाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याला पणजीला एक ऑफीस थाटून दिले होते. या क्रॉफर्डचे एक कारकून म्हणून अण्णा इथे आले होते पणजीलाच ते पहात होते. काही स्थानिक मित्रमंडळीचा लाभही त्यांना झाला होता. याच मित्रांत शंखवाळकर नांवाचा एक मित्र होता

या शंखवाळकरने अण्णाना डोंगरीच्या रामनवमीच्या उत्सवाला नेले त्या दिवशी शुकरंभासंवाद हे नाटक होतें. अण्णा हे नाटक पाहून भारावून गेले त्यांनी त्यापूर्वी कानडी भागवत मेळे पाहिले होते. मराठी दशावतार खेळ पाहिले होते आणि आता ते संगीत नाटक पाहात होते ते पाहात असतानाच त्यांना वाटले की आपणही अशी नाटकें लिहावी.

खेळ संपतांच ते कृष्णंभट्टाना म्हणाले, "तुम्ही ही नाटकें घेऊन पुण्या-मुंबईला चला. विष्णुदास भाव्यापेक्षा वेगळ्या पद्धतीची तुमची ही नाटकें आहेत. लोकाश्रय चांगला मिळेल. पैसेही मिळतील."

बांदकर उत्तरले, "श्रीरामसेवा म्हणून आम्ही ही नाटकें करतो. आम्हाला पैशांचा मोह नाही"

"तर मग मला आशीर्वाद द्या तुमच्यासारखी नाटकें लिहायची स्फूर्ती मला या ठिकाणी झाली आहे."

"आम्ही कोण तुम्हाला आशीर्वाद देणार! श्रीरामकृपा झाली पाहिजे." असे म्हणून अण्णाना बांदकरांनी राममूर्तीसमोर उभे केले

गाऱ्हाणे घातले आणि अण्णाचा नवा सकल्प सिद्धीस जावो अशी प्रार्थना केली

त्यानंतर पाच वर्षांनी अण्णाचे सगीत शाकुंतल रंगभूमीवर आले. मधल्या काळात त्यानी मुंबईची पारशी नाटके पाहिली होती. परंतु संगीत नाटके लिहायची प्रेरणा त्याना डोंगरीला झाली ही दंतकथा नव्हे. त्या काळानतर अवघ्या पंचवीस वर्षांत गोव्याला येऊन स्थायिक झालेल्या रामचंद्र कृष्ण कामतानी ही कथा मला सांगितली होती. त्याना ती खुद्द शंखवाळकराकडून कळली होती. म्हणून मी म्हणतो की ही दंतकथा नव्हे. म्हणूनच कुणीही म्हणेल की संगीत मराठी रगभूमीचे डोंगरी हे उगमस्थान आहे. भले मग मराठी रगभूमीचे इतिहासकार ही गोष्ट नाकारोत.

## २९ : भक्तांच्या भक्तीचे प्रतीक—दामोदर

पिलारवरून आगशीच्या धक्क्यावर आलो नी घड्याळाकडे पाहिले. अवघे आडेआठ वाजलेले होते

फेरीबोट तयारच होती. माणसे तुरळक दिसत होती. फेरीबोटीत तीन गाड्या आधीच चढल्या होत्या आणखी एका गाडीला जागा होती मी खाली उतरलो नी शातारामने अलगद आमची गाडी फेरीबोटीत घुसवली गाडीचे नी आतल्या उतारूंची तिकिटे घेऊन मी फेरीबोटींत चढलो नी तेवढ्यात शिटी झाली.

इंजीन सुरू झाले फेरीबोटीने मोहरा वळवला आणि प्रथम मंदगतीने व मग जरा वेगाने फेरीबोट कुठाळच्या दिशेने पाणी कापीत जाऊ लागली

"गोव्यांत असं काही पाह्यला मिळेल असं वाटलं नव्हत हो." गाडींतून खाली उतरून फेरीबोटीच्या कठड्याला रेलून उभ्या राहिलेल्या सौ देसाई म्हणाल्या.

" असं कांही म्हणजे काय वैनी ? "

" अहो, एवढी मोठी नदी, त्यांतून ही बोट चाललेली, बोटींत चारचार गाड्या ! त्यातच माणसं. पुण्याला कुणी हे सांगितलं असतं तर खरं वाटलं नसतं हो "

" हा अनुभव घ्यावा म्हणून तर मुद्दाम तुम्हाला आणलं ह्या बाजूनं वैनी. नाहीतर जांबावलीला जायला फोंडा–सावर्ड्यावरून दुसरा जवळचा रस्ता होता की. या फेरीबोटी म्हणजे गोव्याचं एक वैशिष्ट्य होतं आता सगळ्या नद्यांवर पूल होताहेत. हा बघा, या नदीवर सुद्धा पुलाचं बांधकाम चालू आहे दोनेक वर्षांत तो तयार झाला म्हणजे हा फेरीबोटीचा प्रवास इतिहासजमा होईल. कसा काय वाटला हा प्रवास तुम्हाला वैनी ? "

" फार फार बरं वाटलं. पुण्याला आमच्या मुठेचं केवढं कौतुक करतो आम्ही ! पण तुमची ही नदी पाहिली, ...काय नाव हो या नदीचं ?"

" आगशीची नदी पूर्वीचं संस्कृत नांव अघनाशिनी "

" तर ही तुमची नदी म्हणजे समुद्रच आहे की. पाणी कसं शांत आहे. बोटीला गचके नाहीत की .."

पण सौ देसाईंचे पुढचे शब्द तोंडातल्या तोंडातच उरले बोटीच्या पुढच्या पसरट भागाला लाटेचा असा एक जबरदस्त तडाखा बसला की एका बाजूने ती दोन फूट उंच गेली नी दुसऱ्या बाजूने तितकीच खाली ! बोटीत खाऱ्या पाण्याचे शिंतोडे उडाले लाटामागून लाटा आल्या. बोटीला आपटून लाटा फेरीबोटींत घुसायचा प्रयत्न करू लागल्या लाटांवर बोट हेलकावे खाऊ लागली सौ. देसाईंची तर भीतीने बोबडीच वळली त्यांच्या तोंडून शब्द फुटेना.

" घाबरू नका वैनी. बोट बुडायची नाही. समोरून ती बार्ज लोहखनिज घेऊन मुरगांवला गेली ना, अहो... तेच मुरगाव बंदर. उजव्या हाताचं. तर त्या बार्जमुळे पाण्यावर लाटा उठल्या. अहो, ही फेरीबोट आता फक्त हलते आहे, डुलते आहे. पावसाळ्यातल्या वादळात काय होतं ते पाहायला पाहिजे तुम्ही घोंघावणारा वारा, तोही चारी बाजूंनी आलेला, वरून पाऊस कोसळत असलेला, मुरगावहून येणाऱ्या प्रचंड लाटा, फेरीबोट

एकदा पाचसहा फूट एका बाजूने वर जाते तर दुसऱ्या बाजूने पाण्यात घुसते. आतमध्ये पाऊलभर पाणी. इंजीनवाला बोट पुढे न्यायचा प्रयत्न करतो आहे, तर ती हलायलाच तयार नाही. ऐसी मजा येते वैनी ! ”

कुडाळच्या धक्क्याला फेरीबोट लागली तशी शांतारामने गाडी बाहेर काढली. मडगावच्या दिशेने सत्तरच्या स्पीडने डॅट्सन धावू लागली.

हा कुडाळ गाव म्हणजे मंगेश देवतेचा मूळ गाव. बाटवाबाटवीच्या काळात इथूनच तो प्रियोळला गेला.

एक मोठे डोंगरपठार ओलांडून वेर्णे गावातून गाडी पुढे जाऊ लागली. हा वेर्णे गाव मूळ म्हाळसेचा

वीस मिनिटात आम्ही मडगावला पोचलो. गावात एक फेरी मारली. एका हॉटेलात नास्ता घेतला.

मडगाव हे गोव्याचे व्यापार–व्यवहाराचे केंद्र. शहराच्या मूळ भागात रस्ते अरुंद नी वस्ती जास्त. पणजी जशी आखीव, रेखीव आहे तसे मडगांवचे नाही. शहराचा विस्तार मात्र खूप आहे.

नास्ता आटापून मार्गाला लागलो. भर वस्तींतल्या रेल्वे क्रॉसिंगमधून पुढे गेलो नावेली गाव मागे पडले आणि कांही वेळाने दुरून उजव्या हाताला चंद्रेश्वराचे शिखर उजव्या हाताच्या दूरच्या टेकडीवर दाट झाडीतून वर आलेले दिसू लागले. मी त्या शिखराकडे बोट दाखवीत म्हणालो, “ त्या टेकडीवर देवळाचे शिखर दिसते आहे ना, त्याचे नाव चंद्रेश्वर आणि टेकडीचे नाव पर्वत ! ”

“ पर्वत ! एवढ्याशा टेकडीचं नांव पर्वत ? ” सौ. देसाई म्हणाल्या. “ नाव सोनूबाई नी हाती कथलाचा वाळा म्हणतात तसा प्रकार. ”

“ अन् काय हो वहिनी ? तुमच्या पुण्याला पर्वती आहे ती काय हिमालयाएवढी उंच आहे का ? ”

सौ देसाईंजवळ उत्तर नव्हते.

“ रागावलात वहिनी ? ”

“ छे हो ”

“ जाऊ दे दादा. नायकांच्या रागालोभाची पर्वा या वयात करायची

असते का ? तू त्या चंद्रेश्वराबद्दल बोल ? ”

“ हे बघा मंडळी, आपण आता पोर्तुगीजांच्या मूळ ख्रिस्ती गोव्यातून हिंदू गोव्यात शिरत आहो. चंद्रेश्वर या देवतेची आणि या रस्त्याच्या डाव्या हाताला असलेलं चांदर किंवा चंद्रपूर राजधानी याची स्थापना सातवाहन किंवा भोज राजानी केली असावी. फार फार जुन्या काळी. ”

इतक्यात चंद्रेश्वराकडे जाणारा रस्ता दिसला शांतारामने ९० अंशाचा कोन करून गाडी उजवीकडे वळवली अन् मग लक्षात आले; चंद्रेश्वराला भेट देणे नशिबी नाही! कारण रस्ता कच्चा होता. तेवढ्यात एक गावकरी दिसला. गाडी थांबवून त्याला विचारले, “ चंद्रेश्वरापर्यंत टेकडीवर जाणारा पक्का रस्ता होणार होता. त्याचं काय झालं हो ? ”

“ काय होणार ? ’ तो म्हणाला, “ जे गोव्यातल्या आडरस्त्याचं झालं तेच इथं घडलं. पक्का रस्ता नकाशांवर आहे. पण प्रत्यक्षात आलेला नाही. तुम्ही पर्वतावर जाणार आहा का ? ”

“ होय ”

“ मग पर्वत चढून जावं लागेल. ”

मी देसाईला विचारले, “ काय करायचं देसाई ? पर्वत सिंहगडा-इतका उंच नाही चढून जाणार का ? अन् तो सुद्धा आता, उन्हं तापलेली असताना ? ”

देसाईने ठाम नकार दिला

बायकाना विचारायचे कारणच नव्हते. पर्वत सोडाच, पर्वती चढून जाण्याचाही आयुष्यातला काळ मागे पडला होता.

गाडी वळवून घेतली आणि जांबावली जवळ करीत असताना चंद्रेश्वराची आठवली ती माहिती सांगून शेवटी म्हटले, “ या पर्वताने मराठी रंगभूमीला व संगीताला खूप काही दिले आहे एकेकाळी इथे नाटककार उदयाला आले नट निर्माण झाले. वत्सला पर्वतकर, दत्ताराम पर्वतकर आणि लयब्रह्मभास्कर खाप्रूमाम पर्वतकरानी या गावाचे आणि गोव्याचेही नांव उजळ केले. ऐकली आहेस ना तू ही नावे ? ”

“ हे काय विचारतोस दादा ? संगीताची आवड असलेला माणूस

ही नावं कशी विसरेल ! ”

देसाई बोलत असतानाच एका भव्य पटांगणातल्या पिंपळ वृक्षाखाली गाडी थांबली आम्ही खाली उतरलो तेव्हा प्रवासाचा सारा शीण नाहीसा झाला होता घामाने चेणचटलेल्या अंगाला गार वारा गुदगुल्या करीत होता. पिंपळाची पाने सळसळत होती. आणि समोर जांबावलीच्या दामोदराच्या प्राकारात शिरायची दुमजली इमारत दिसत होती. इमारतीच्या मधोमध प्राकारात शिरायला तीन दरवाजे होते

आत प्रवेश केला तेव्हा समोरची इमारत जणू अंगावर येते आहे असा भास झाला महाद्वार आणि ही सभामंडपाची भव्य वास्तू यांत मोकळी अशी थोडीच जागा होती.

प्राकारात शिरलो नी थोडा डाव्या बाजूला वळून सभामंडप नी देवालयाकडे पाहिले. आपण पाहातो आहो ते देवालय खरोखरीच दामोदर-मंदिर आहे की दुसरे कुठले आहे याचा संभ्रम पडला. सातआठ वर्षांपूर्वी पाहिलेल्या या देवस्थानाचा ओळखू न येण्याएवढा कायापालट झाला असेल याची मला सुतराम् कल्पना नव्हती

आम्ही मंदिरासभोवतालच्या प्राकारातून देवालयाला प्रदक्षिणा घातली तिन्ही बाजूंच्या जुन्या अग्रशाळा कायम होत्या भोजनाची अग्रशाळा तर खूपच जुनी होती. १९३४ साली बांधलेली दर्शनी इमारत—जिच्या महाद्वारांतून आम्ही प्राकारात आलो होतो—कायम होती. १९५० मधली महाजनमंडळीला वा इतर भक्तजनांना निवासासाठी बांधलेली २५ खिन्हा-डाची अग्रशाळाही तशीच होती. पण दामोदर मंदिराचे बाह्यस्वरूप पूर्णपणे बदलले होते. जुन्या सभामंडपाची खूण सुद्धा शिल्लक राहिलेली नव्हती तिथे अत्याधुनिक वास्तुशिल्पाचा नमुना उभा राहिला होता. केवळ खांबांवर उभे केलेले हे बांधकाम होते. खालचा सर्व भाग मोकळा होता दर्शनी भागाची वरची बाजू आडव्या व तिरकस अशा काँक्रिटच्या भूमितियुक्त आकृतींनी चटेरी-पटेरी बनविली होती १९६६ साली सव्वा लक्ष रुपये खर्च करून मडगावचे एक धनिक गंगाधर नरसिंगदास अग्रवाल यांनी हा सभामंडप बांधून दामोदरचरणी अर्पण केला

खुद्द देवालयाची आठ वर्षांपूर्वी पाहिलेली इमारत जुनी होती. ती केव्हा बांधली याचा कसलाही उल्लेख दप्तरात सांपडत नाही. १५६७ साली रामनाथ–दामोदर मडगांवहून इथे आले व त्यानंतर केव्हातरी दामोदर व त्याची परिचिष्ट यांची निवासस्थाने बांधली गेली. १८९५ साली देवालयाचा जीर्णोद्धार करण्यात येऊन १९०२ मध्ये ते काम पूर्ण करण्यात आले. या वेळी सबंध छप्पराला कौलांऐवजी ताब्याचा पत्रा बसविण्यात आला. सुमारे सत्तर वर्षांनंतर म्हणजे नवा सभामंडप तयार झाल्यानंतर १९६८ साली देवालयाच्या नव्या वास्तूची कल्पना अमलात आणण्याचे ठरले. देवस्थानचे महाजन श्रीनिवास उपेंद्र शेणवी भोबे काकुले व दामोदर विष्णु तुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली निधी गोळा करून १९७२ च्या डिसेंबर महिन्यात नव्या मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले व ' प्रासाद व शिखर कलश प्रतिष्ठा ' समारंभ मोठ्या थाटाने पार पडला.

देवालयाचे नवे स्वरूप हे उत्तर भारतीय शैलीचे आहे. गर्भागार व अर्धमंडपावरील शिखरे लंबगोलाकार आहेत. महामंडपाची रचना आधुनिक शैलीची आहे. स्वतंत्रपणे पाहिले तर देवालय व सभामंडप या दोन्ही वास्तू सुंदर आहेत. आधुनिक आहेत. पण त्या एकत्र पाहिल्या आणि त्याचबरोबर दर्शनी सजाच्या इमारतीकडे लक्ष दिले म्हणजे कुठेतरी कांहीतरी हरवल्याचे, शिल्पाच्या शैलींतील साधा सुटल्याचे मनाला जाणवते आणि अकारण हुरहुर लागते. आणि रामनाथ व श्रीदेवी यांची छोटेखानी मंदिरे, दीपस्तंभ, जुनी अग्रशाळा, नवी अग्रशाळा या गोष्टींचा तपशील त्या चित्रात भरला तर ही हुरहुर अधिकच वाढते.

प्राकारात फिरून आम्ही सभामंडपात प्रवेश करतो. त्याच्या भव्यतेचे, सौंदर्याचे, शिल्पाचे कौतुक करतो आणि मग देवालयात प्रवेश करतो. आंतला भागही मनाला उत्तेजित, उल्हसित करून सोडतो. भरपूर प्रकाश. आधुनिक बांधणीचे एक वैशिष्ट्य. प्रकाशाचे परावर्तन करणारी तुकतुकीत फरशी नक्षीने सुशोभित केलेला वरचा भाग. आधुनिकतेने अंतर्बाह्य स्पर्श केलेले गोपाळ–गणपतीप्रमाणे हे दुसरे देवालय. पण त्याच्यापेक्षा कितीतरी मोठे कितीतरी भव्य, कितीतरी सुंदर! महाजनमंडळीच्या

भक्तीबरोबरच समृद्धीचीही साक्ष देणारे.

आमची दृष्टी मग गर्भागारातील कवचधारी दामोदराकडे जाते. दामोदर हे मूळात शिवलिंग. पण रामनाथाप्रमाणे त्याचे महाजन मात्र वैष्णव रामनाथ नी दामोदर दोघेही घोड्यावर स्वार झालेले. पण दोघांच्या चेहऱ्यात फरक जाणवतो घोड्यावर असूनही रामनाथींचा रामनाथ सौम्य वाटतो तर जांबावलीचा दामोदर कांहीसा उग्र असे का ? माझ्या मनात शंका येऊन जाते

दामोदर... दामोदर... हे तर श्रीविष्णूचे एक नांव. हे नाव शिवलिंगाला का देण्यात आले? रामनाथ. रामाने ज्याची उपासना केली तो शिवशंकर होता पण दामोदर हा शंकर कसा ? कुणी जाणकार हे सांगेल काय ?

दामोदराचे दर्शन घेऊन आम्ही उजवीकडील प्राकारात महाकाली, चामुंडेश्वरी व महेश आणि डावीकडील रामनाथ या पंचिष्टांची भेट घेतो डावीकडील अग्रशाळेच्या बाहेर ' म्हारांगण ' नावाने संबोधिली जाणारी देवळी पाहातो ज्या मडगावच्या महाराचा पुण्यवान् आत्मा अजून दामोदराच्या ' पिळगे ' ची चिंता वाहतो तो या म्हारांगणात स्थित आहे.

गोव्यातल्या बहुतेक देवस्थानाशी या महाराचा, गावड्याचा, जलम्याचा, वेळिपाचा असा भक्तिभावाचा संबंध असतो. त्याची शिलारूप प्रतीके देवस्थानाच्या आवारात असतात कुणी देवाला जागा दिलेली असते, कुणी रानावनात देवाचा शोध लावलेला असतो, कुणी बाटवा-बाटवीत देव पळवून नेताना प्राण पणाला लावलेले असतात. आणि म्हणूनच त्याना देवाइतकेच आजही पूजनीय मानले जाते.

आणखी एक प्रथा गोव्यातल्या देवळांत दिसते बाटवाबाटवींतल्या काळात ज्या गावाहून हे देव नव्या वस्तीत आले, तिथून प्रसाद–पाकळी-साठी कुणी ख्रिश्चन— हो, ख्रिश्चन देवळांत आला तर चालू असलेले प्रसाद बंद करून या नवागत ख्रिश्चनाचे प्रसाद आधी घेतले जातात

देसाईला ही गोष्ट ऐकून कमालीचे आश्चर्य वाटले. त्याने विचारले,

“ ख्रिश्चन लोक अजून हिंदू देवताकडे कौलासाठी येतात ? ”

"होय आग्रा, होय. जवळच्या हिंदू देवस्थानातून तर ते जातातच; पण विशेषतः आपल्या गावातल्या मूळ देवाकडे जातात. तिथे प्रसाद घेतात. कुठे गुरवाने वेताळाला किंवा काळभैरवाला कोंबडा द्यायला सांगितला तर तो देतात, नवस करतात नी काम झाल्यावर तो फेडतातही. फक्त ख्रिश्चन बहुजन समाजच नव्हे, तर कधी कधी सुशिक्षित सुद्धा. धर्म बदलला तरी मूळ संस्कार मनावर किती प्रभाव पाडतात त्याचे हे उदाहरण."

हा रामनाथ मूळ मडगावचा गोव्यातल्या अनेक घराण्यांचा तो कुलदेव असला तरी एकूण एक मडगावकर हिंदूंचे ते एका दृष्टीने उपास्य दैवत तर दुसऱ्या दृष्टीने ग्रामदैवत दामोदरावर त्यांची अमाप श्रद्धा. 'उतरापावलाला' 'दामोदराचे' नांव घेणारे मडगावकर माझ्या परिचयाचे आहेत. अनेक सस्थाना, व्यापारी पेढ्याना दामोदराचे नाव देण्यात आले आहे जाबावलीचा ऐतिहासिक शिशिरोत्सव म्हणजे मडगावकराच्या प्रतिष्ठेची बाब असते. पाच दिवस मोठ्या धूमधडाक्याने चालणाऱ्या या शिशिरोत्सवाला पूर्वी पायी किंवा मेण्या-मंचिलांतून किंवा गाड्याखटाऱ्यां-तून मडगावातली कुटुंबेच्या कुटुंबे आठ आठ दिवस राहाण्यासाठी जात असत. आजच्या मोटारयुगात सुद्धा या परपरेत खड पडलेला नाही उत्सवाच्या चौथ्या दिवशी गुलालाची उधळण होते. देवावर गुलाल उधळून गुलालोत्सवाची सुरुवात होते आणि मग एकमेकावर गुलाल उधळला जातो किती मण गुलालाची त्या दिवशी उधळपट्टी होते हे त्या दामोदरालाच माहीत! सारे मडगाव लोटते त्या दिवशी जाबावलीला मडगावचा बाजार बंद. एक टाचणी त्या दिवशी विकत मिळायची नाही

या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मोफत अन्नछत्र. कुणीही यावे, जेवून जावे दररोज हजारो पान उठते पांच दिवसाची बेरीज केली तर अर्धा लाख पान होईल. गुलालाच्या दिवशी तर या 'पानसंख्ये'ने कमाल मर्यादा गाठलेली असते. हा गुलालोत्सव म्हणजे एक दंगलच म्हणेनास, आरडाओरडा, गोंधळ, चेंगराचेंगरी, मुले हरवणे असले प्रकार कितीतरी होतात. दोनचार वर्षांपूर्वी तर एक कॉलेजतरुण प्राणाला मुकला.

आणि मग एकदम आठवण झाली. मी म्हटले, "देसाई, तू गोपाळकृष्ण भोबे हे नाव ऐकलं आहेस का!"

"होय ना संगीतसमीक्षक म्हणून ते प्रसिद्ध होते. लेखक म्हणून पुढे आले होते. गोवा हिंदू असोसिएशनने त्याचं एक संगीत नाटकही बसवलं होतं वारले बिचारे."

"होय त्याचा दामोदर हा कुलदेव. आपल्या एकमेव नाटकाचं कुलदेवासमोर वाचन करण्यासाठी तो इथं जांबावलीला आला वाचन झालं. रात्री भजनाचा कार्यक्रम झाला. त्यांत त्यानं भाग घेतला. अन् अभंग म्हणता म्हणतांच खाली कोसळला तो पुन्हा उठलाच नाही. याच दामोदराच्या चौकावर घडलेली ही हकीकत."

"भोब्यावरून आठवण झाली या जांबावली गावांत सरस्वतीबाई जांबावलीकर नांवाची एक मोठी गायिका होऊन गेली. नत्थनखाँसाहेबाना त्यांनी गोव्यात मुद्दाम बोलावून घेऊन त्याचा गंडा बांधला होता. त्यांनी भरभरून संगीतविद्या आपल्या शिष्येच्या ओंजळीत टाकली होती. पण शेवटी बाई परमार्थाकडे वळली. टेंबे महाराजाचे शिष्यत्व पत्करून अखेरीस फक्त भजने गाऊ लागली."

बहुतेक गोष्टी पाहून झाल्या होत्या. फक्त जांबावलीचा धबधबा पाहायचा होता देवालयाच्या मागून कुशावती नदी वाहते. गोड्या पाण्याची सुंदर वाहती नदी. देवालयाजवळच एक डोह आहे. तिथे स्नान करण्यात एक और मजा असते. सत्तेचाळीस वर्षांपूर्वी शिवजयंतीचा त्रिशतसांवत्सरिक जयंत्युत्सव साजरा करून डॉ. सुशील कवळेकरासह मी पहिल्याप्रथम जांबावलीला गेलो होतो आणि या पाण्यात स्नान केले होते. ही गोष्ट सांगून मी एकदम देसाईला म्हटले, "देसाई, करणार का स्नान? बघ तरी कशी गंमत येईल!"

"कसलं खूळ काढलंय हे स्नानाच!" सौ म्हणाली, "हे गार पाणी आता तुम्हाला सोसायचं नाही अन् तुम्ही पण उतरू नका हो पाण्यात देसाई भावजी. हे वय आहे का गार पाण्याशी खेळायचं?"

"तू काय ऐकतोहेस तिचं देसाई? मी म्हणेन त्याच्या विरुद्ध

बोलायचा वसा घेतलाय तिनं अन् वयाबद्दल म्हणशील तर खेळायचा मक्ता काय तरुणांनाच दिलाय का कुणी ?. वैनी, तुमचा टॉवेल बिवेल आहे ना ?"

पण वैनीला तोंड उघडायची संधी देण्यापूर्वीच देसाई म्हणाला, "टॉवेल आहे अन् सुदैवानं तो होल्डॉलमध्ये बांधलेला नाही. बास्केटमध्ये बाहेरच आहे. आत्ता घेऊन येतो मी गाडीतनं."

"तू नको जाऊस. शांताराम घेऊन येईल. जा रे शांताराम, याचा टॉवेल घेऊन ये बघू."

मी कपडे काढले नी पाण्यात उडी ठोकली. माझेच अनुकरण देसाईने केले टॉवेल आणून शांतारामने एका लाकडावर ठेवला नी तोही जरा लांब पाण्यात उतरला.

अगतिक होऊन दोघीही 'वैन्या' आमच्या या वेडगळ साहसाकडे पाहात होत्या!

"तुम्ही उतरता का ग पाण्यात ?" लाकडावर थोडा वेळ विसाव्यासाठी बसत मी म्हटले, "खुशाल उतरा. लाजायला तुम्ही काही स्वर्गातल्या अप्सरा लागून राहिला नाहीत. हो, आता या वयात कुणी ढुंकून देखील पाहाणार नाही तुमच्याकडे!"

"पुरे रे अधिक चिडवू नकोस वैनीला"

आणखी थोडा वेळ पाण्यात डुंबून आम्ही वर आलो.

कपडे करता करता मी म्हटले, "देसाई, भूक लागलीय की नाही ?"

"हो तर."

"चला तर. प्राकाशबाहेर कँटिन आहे. तिथं कांही खाऊन घेऊ."

कँटिनमधल्या बाकावर असलो तेव्हा सौ देसाई म्हणाल्या, "शहाळी मिळाली असती तर..."

"वैनी, कांही काळजी करू नका मनासारखं जमून आलं तर आज शहाळी खायला मिळतील." कांहीच न कळल्याने सारीजणे माझ्याकडे पाहातच राहिली!

# २६ : जेजुरीच्या खंडोबाची बहीण शांतादुर्गा

केपे गांवाच्या चौकातून बाळ्ळीला जाणारा रस्ता फुटतो. या रस्त्याने आम्ही आता जाऊ लागलो.

अर्ध्या तासाने बाळ्ळीला पोचलो. मडगाव-कारवार किंवा ज्याला १७ नं या नॅशनल हायवे म्हटले जाते तो रस्ता क्रॉस करून पुढे गेलो आणि फातर्पे गावात पोचलो

किंचित् उजवीकडे वळवून गाडी उभी केली समोर देवालय दिसत होते. ही शातादुर्गा कुकळीकरीण. शांतादुर्गा हे इथल्या अनेक देवतांचे सामान्य नाम. पण सर्वप्रसिद्ध आहे ती कवळ्याची. तिच्याहून इतर शांतादुर्गांचे भिन्नत्व दाखवण्यासाठी त्यांना त्याच्या मूळ गांवावरून पडलेली आडनावे जोडण्यात येतात ही शातादुर्गा मूळची कुकळीची. म्हणून ती कुकळीकरीण.

"बाटवाबाटवीच्या काळातच ती इथे आली ना?" देसाईने विचारले.

"हो. पण साष्टीच्या इतर गांवांत घडले तसे इथे घडले नाही."

"इतर गांवांत काय घडले?"

"इतर गावातल्या देवता गुपचूपपणे पळून गेल्या रायतूरच्या किल्लेदाराची जेसुईट पाद्र्यासह धाड येणार असल्याचा सुगावा लागावा, गांवकऱ्यांनी रातोरात देवतेची मूर्ती पळवून न्यावी आणि पाठोपाठ पोर्तुगीजानी देवळे जाळून पोळून किंवा मोडून टाकावी असा प्रकार घडला काही ठिकाणी तर गावकऱ्यांना मूर्ती न्यायला सुद्धा उसंत मिळाली नाही पण कुकळीत पोर्तुगीजाना प्रखर प्रतिकार झाला. गावकऱ्यांनी सरकार-विरुद्ध एक बंडच उभारले. कुकळीचे बंड या नावानेच ते इतिहासांत नमूद आहे."

"इथेच असं बंड व्हायचं कारण काय?"

"कारण कुकळी हा गाव क्षत्रिय देसायांचा. अन्यायाला प्रतिकार करणे हे त्याचे ब्रीद होते"

" बंद झाले म्हणजे काय झाले ? "

कुकळीच्या बंडाची हकीकत फिलीप नॅरि शाविएर या लेखकाने नमूद करून ठेवली आहे. प्रो. बा. बा. सावर्डेकर यांनीही ती दिलेली आहे. आठवली तशी ती मी पाहुण्यांना सांगू लागलो

कुकळी, वेळ्ळी, असोळणे हे गाव साष्टी तालुक्यात मोडत असले तरी ते सरहद्दीवरचे गाव अजून या गांवापर्यंत त्याच्या शासनाची पकड बसली नव्हती. धर्मच्छळाला घाबरून अनेक हिंदु घराणी इथे येऊन देसायाचा आश्रय घेत. त्यामुळे या गावावर सरकारचा नी पाद्र्याचा दांत होता. गांवाचा कबजा करायला अधुनमधून सरकारी सैन्य नी पाद्री येत. त्याच्याशी कुकळीकर प्राणपणाने झुंजत.

अशी पांच दहा वर्षे गेली आणि एक दिवस सरकारी वसूलदार वसुलीसाठी आला. काही बाचाबाची होऊन गांवकऱ्याकडून तो मारला गेला. कोचीनहून गोव्याला चाललेल्या एका पोर्तुगीज दूतालाही कुकळी-करानी ठार केला.

रायतूरचा किल्लेदार चिडला. त्याने शिपायाचे आणि पाद्रींचे एक मोठे सैन्य कुकळीला पाठविले. या सैन्याने असोळणे व कुकळी गावातल्या देवळाची राखरागोळी करून टाकली. त्यांत आंतॉनियु फ्रासीस्कु व पॅरु बॅर्नु नावाच्या दोन पाद्र्यांनी पुढाकार घेतला होता.

सैन्य परत गेले आणि लगोलग गावकऱ्यानी आपापली देवळे पुन्हा उभारली पुन्हा ते दोन्ही पाद्री सैन्य घेऊन आले. या वेळी त्यानी फक्त देवळेच मोडली नाहीत, तर घरे मोडली, नारळीच्या बागा उध्वस्त केल्या, शेतातले उभे पीक जाळून टाकले. इतकेच करून ते थांबले नाहीत, गावकऱ्यांना चिडवावे म्हणून देवळाच्या उध्वस्त वास्तूंत गायी कापल्या

सैन्य परत गेले; पण पाद्रींनी कुकळीला चर्च बांधायचे ठरवले पन्नास माणसाचा लवाजमा मडगांवहून आला. त्यातच देवळे मोडणारे नी गायी कापणारे ते दोन पाद्री होते

ते दोन पाद्री दिसताच गांवकऱ्यांचे रक्त तापून उठले त्यानी त्या पन्नास माणसावर असा हल्ला केला की त्यात पाद्र्यांसह सर्वजण मारले गेले.

फक्त एकच इसम कत्तलीची हकीकत वरिष्ठांना सांगण्यासाठी पळून जाऊ शकला.

किल्लेदाराने मग गांवकऱ्यांचा सूड घेतला कुकळी गाव त्याने जवळ जवळ नष्ट करून टाकला. ग्रामसंस्थेच्या जमिनी जप्त केल्या. काही ख्रिस्ती मठांना दिल्या

कुकळी ख्रिस्ती करण्यासाठी मारल्या गेलेल्या त्या पाद्र्यांचे स्मारक आज कुकळी गांवात उभे आहे. हुतात्म्याचे स्मारक म्हणून ते ओळखले जाते! आणि बिचारे हिंदु हुतात्मे! त्यांची नावे इतिहासाला अज्ञात आहेत!

"आणि याच धामधुमीत कुकळीची शांतादुर्गा इथे आली?" देसाईने विचारले

"होय. कुकळीचे देसाई मोठ्या जिद्दीचे. ते आपली कुलदेवी घेऊन फातर्प्याला आले. पण ते कायम इथे राहिले नाहीत जमिनी गेल्या, घरेदारे मोडली, पण कुकळी त्यांनी कायमची सोडली नाही."

शांतादुर्गेचे देवालय गोव्यातल्या इतर देवालयाप्रमाणेच आहे. जुने आहे. पण निश्चित केव्हा बांधले गेले ते कळत नाही

गर्भागारांतील देवीची मूर्ती चार फूट उंचीची आहे. अवयव नी मुखवटा सोन्याचा आहे. उंची वस्त्रे तिला नेसविली जातात. तिचे ध्यान महिषासुरमर्दिनीचे आहे.

पण आश्चर्याची गोष्ट अशी की सोन्याच्या कवचाच्या आंत पाषाणी अभिषेकमूर्ती नाही. तिची पाषाणी मूर्ती करायचे ठरविण्यात आले तेव्हा देवीचा दृष्टांत झाला. म्हणाली, "माझी पाषाणी मूर्ती करू नका. मूळची कुकळीहून आणलेली धातूची छोटी मूर्तीच अभिषेकमूर्ती म्हणून वापरा"

ही धातूची मूळ मूर्ती खाली ठेवण्यात आली आहे. तिलाच अभिषेक घालतात, नैवेद्य दाखवतात

या शांतादुर्गेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या सोबत खंडेरायाची पाषाणी मूर्ती आहे त्यालाही अभिषेक-नैवेद्य दाखविला जातो हा खंडेराय म्हणजे शांतादुर्गेचा भाऊ.

"शातादुर्गेचा भाऊ खंडेराय?" आम्हाला माहिती देणाऱ्या भटजींना मी आश्चर्याने विचारले फातर्पेच्या या देवालयात मी प्रथमच येत होतो त्यामुळे मला इथली विशेष माहितीही नव्हती.

"होय." भटजी म्हणाले, "परंपरेने हे नाते चालत आले आहे."

खंडेराय ऊर्फ जेजुरीच्या खंडोबाचे चरित्र मला माहीत होते मल्ल राक्षसाचा नाश केल्यामुळे त्याला मल्लारि हे नांव पडले. हा खंडोबा किंवा मल्लारि शिवावतार आहे. विष्णूने घेतलेल्या मोहिनीरूपावर तो भाळला तेव्हा मोहिनीने म्हटले, "तू खंडोबाच्या रूपाने पृथ्वीवर अवतार घेशील तेव्हा मी तुझ्याशी लग्न करीन मोहिनीने दिला शब्द पाळला व तिच्याशी लग्न केले. पण या खंडेरायाला कुणी बहीण होती हे मी कुठेच वाचले वा ऐकले नव्हते अन् ती बहीण म्हणजे ही शातादुर्गा कुंकळीकरीण असेल हे तर माझ्या स्वप्नात सुद्धा आले नव्हते ही शांतादुर्गा म्हणजे शिवपत्नी. ती खंडोबाची बहीण कशी असेल? पण आपली हिंदु मिथॉलॉजी म्हणजे एक अजबखाना आहे. ग्रीक मिथॉलॉजीत जसा देवाच्या आपसातील नात्याचा गोंधळ आहे तसाच आपल्याही पुराणात आहे

एक वेळ हेही मान्य करू की खंडोबाची बहीण शातादुर्गा आहे. पण मग इतर सर्व शातादुर्गा सोडून खंडोबा हा कुंकळीलाच का आला? एक मुद्दा आहे. इतर सर्व शातादुर्गा या एक तर सारस्वताच्या किंवा दैवज्ञाच्या ही कुंकळीकरीण शातादुर्गा तेवढी क्षत्रियांची. खंडोबाही क्षात्रदैवत. तेव्हा या दृष्टीने हीच शातादुर्गा त्याची बहीण असेल! कुणी सांगावे?

शिवाय त्याची पत्नी म्हाळसा ही म्हाडदोळला आहे तिथे तो लिंगरूपाने नी मल्हारि या नांवाने राहात आहे. कधी तरी तो जेजुरीहून सासुरवाडीला आला असेल नी मग कुंकळीला बहिणीकडे भाऊबीजेसाठी गेला असेल! काय झाले असेल कुणाला माहीत! आपण नुसत्या कल्पना करायच्या!

कसेही असो, जेजुरीचा खंडोबा म्हाडदोळ व फातर्पे या दोन गावात वस्ती करून आहे हे खरे. फरक एवढाच की जेजुरीला तो मुख्य दैवताचा

मान उपभोगतो आहे. पेशवाईपासून मोठ्या वैभवात नादतो आहे. नाना फडणीसाने, सवाई माधवरावाने लाखो रुपयांची धनदौलत त्याच्या चरणी वाहिली आहे. या धनदौलतीच्या रक्षणार्थ त्याच्या मंदिराभोवती भक्कम तट उभारला आहे आणि इथे गोव्यात म्हाळदोळला आल्यावर एक उपदैवत म्हणून त्याला राहावे लागत आहे! तेही एका कोपऱ्यातल्या देवळीत.

सुदैवाने बहिणीने मात्र त्याचा मान राखला आहे. त्याच्या सहवासात ती अभिषेक घेते, नैवेद्य ग्रहण करते आणि आपल्या बरोबरीने त्याला मिरविते शांतादुर्गा वस्त्रालंकार लेऊन उत्सवाच्या दिवसात पालखीत बसते तर खंडेराय जामानिमा करून घोड्यावर स्वार होतो.

इथे वार्षिक जत्रा भरते ती मोठ्या थाटामाटात. साऱ्या गोव्यांत ती प्रसिद्ध आहे प्रसिद्ध आहे ती दोन कारणासाठी. एक, इथला जुगार. म्हाळदोळप्रमाणे फातर्पें जत्रेला गोव्यातले अट्टल जुगारी गोळा होत काळवेळेचे नी अन्नपाण्याचे भान हरपून पत्त्यांचा जुगार खेळत पैसे मिळवणे हा हेतु नसे. कलेसाठी कला तसा जुगारासाठी जुगार. माणसाने कर्म करावे, फळाची आकांक्षा धरू नये ह्या गीतेतल्या कर्मयोगाचे आचरण करून हे जुगारी मग घरोघर परतत.

प्रसिद्धीचे दुसरे कारण म्हणजे देवीने मागितलेल्या वस्तू जत्रेच्या वेळी तिला अर्पण केल्या जातात हे नागेश, महालक्ष्मी, कामाक्षा अशा काही गोव्यातल्या देवता भक्ताच्या स्वप्नात येऊन त्याच्याकडून आपणास हव्या त्या वस्तू मागून घेतात अन् या वस्तू त्याना द्याव्या लागतात. त्या दिल्या नाहीत तर न देणाराचे भले होत नाही असे सागतात प्रथम या गोष्टी ऐकीव म्हणून मी त्या साडून देत होतो. पण अलीकडे कित्येक परिचित माणसे भेटली की ज्याच्याकडे देवतेने वस्तू मागितल्या होत्या; आणि त्यानी देऊन टाकल्या होत्या स्वानुभवाच्या या सुरस कथा किमान दहा जणांनी तरी मला सांगितल्या असतील.

फातर्पेंची शांतादुर्गा या मागणीबद्दल फार प्रसिद्ध आहे. बहुतेक सर्वच देवता दागिने मागतात आणि विशेषेकरून बायकाकडे. पण कधी

कधी त्या काय मागतील याचा नेम नसतो. श्रीमंताकडे त्या मोटार मागतील, तर गरिबाकडे तेल, तांदूळ मागतील. कुकळीकरणीने तर एका बसमालकाजवळ त्याची बस मागितली होती एका सुवासिनीचे केस मागितले होते आईबापाची आवडती मुले हा तर दागिन्याप्रमाणेच मागणीचा एक सामान्य प्रकार!"

देसाई आश्चर्याने विचारू लागला, "अन् या वस्तू लोक देतात?"

"न देऊन कुणाला सांगतात? देवीने मागितल्यावर द्यायला नको?"

"सुवासिनीचे केस मागितले ते तिने कसे दिले?"

'कसे म्हणजे? कातरीने कापून!"

"बाई बाई बाई आश्चर्य म्हणायचे" सौ देसाई उद्गारल्या.

"अन् बस, मोटार मागितली त्याचं काय? बस घेऊन देवी काय करणार? अन् मुलाचं काय? त्याना काय जेजुरीप्रमाणे वाघ्या, मुरळी करून देवाला वाहतात की काय?"

"भटजी, तुम्ही द्या हो याच्या प्रश्नाचं उत्तर. मला काही एवढी तपशीलवार माहिती नाही." मी म्हणालो

भटजी सांगू लागले, "मुलाना वाघ्या–मुरळ्या करत नाहीत त्याचा इथे तुळाभार करतात कुणी नारळ तर कुणी तांदूळ किंवा दुसरे कुणी आणखी कसल्या तरी वस्तूंचा तुळाभार करून त्या देवीला अर्पण करून मागणीची फेड करतात. मोटारीची किंमत शक्यनुसार रोख रकमेत चुकती करतात बस किंवा तिची किंमत देत नाहीत. तिचे वार्षिक उत्पन्न येते ते देऊन टाकतात ही सारी फेड करण्यासाठी माणसे येतात ती जत्रेच्या दिवशी"

"इथे रेड्याचा बळी द्यायची प्रथा होती नाही भटजी?" मी विचारले.

"हो. महिषासुरमर्दिनीचं तर हे देवालय. इथे जत्रेच्या वेळी रेड्याचा बळी देत आता बकऱ्याचा बळी दिला जातो"

"काय रे दादा, ह्या आपल्या आर्यांच्या देवता अन् बळी देण्याची

प्रथा तर अनार्यांची ही सुसंस्कृत आर्यांनी कशी काय उचलली?" देसाईने विचारले.

"या विषयावर पुष्कळ लिहिल गेलं आहे देसाई. काल की परवा आपण संस्कृतिसमन्वयाबद्दल बोलत होतो ना! लिंग व शक्ती या देवतांची कल्पना आर्यांनी अनार्यांकडून घेतली त्याच वेळी त्याची पूजापद्धती पण आर्यांनी आपल्या पूजापद्धतींत समाविष्ट करून घेतली. आपल्या प्रिय देवतेला जनावरांचे बळी देणे हा अनार्यांच्या उपासनापद्धतीचा एक भाग. तो आपण शक्ती व शिव अशा दैवतांसाठी स्वीकारला त्यांची नरबळीची कल्पना सुद्धा आर्यांनी घेतली नी आपण ती आजही अमलात आणीत आहो"

"आपण ती आज अमलात आणीत आहो?"

"हो ना. कोणत्याही नैमित्तिक पूजाविधीनंतर गाऱ्हाणे घालून आपण शेंडीवाला नारळ फोडतो की नाही, ते नरबलीचं प्रतीक आहे. शेंडीवाला नारळ म्हणजे माणसाचं शीर. त्याला दोन डोळे असतात तसे माणसालाही असतात आपण हा नारळ फोडतो आणि त्यातले पाणी पितो व नतर खोबऱ्याचे तुकडे खातो. म्हणजे बळी दिलेल्या माणसाचे रक्त पितो नी मासखंड खातो दुसर काय?"

"काय भयंकर कल्पना आहे ही भावजी!"

"यावरून मला दुसरी एक कल्पना सुचलीय दादा. तुझ्या वाचनात त्याला कुठे त्याबद्दलचा आधार आहे का बघ"

"बोल, कसली कल्पना?"

"काही जातींतून हातात शेंडीवाला नारळ घेऊन नवरदेव नवऱ्या मुलीच्या घरी लग्नासाठी जातो. होय ना?"

"हो."

"पूर्वी मानवप्राणी जेव्हा जंगली अवस्थेत होता, तेव्हा माणसांच्या वेगवेगळ्या टोळ्यात संघर्ष होत या संघर्षांत दुसऱ्या टोळ्यांतल्या एकाद्या माणसाचे शीर कापून घेऊन जो तरुण पुरुष येई त्याला त्याच्या गटातली एकादी तरुणी माळ घाली, असा कांही संकेत, नवरदेवाच्या हातात नारळ

देण्याच्या पद्धतींत असेल का ? ”

“ कांही कल्पना नाही या प्रथेचं असं स्पष्टीकरण माझ्या तरी वाचनात आलेलं नाही पण तुझ्या या कल्पनेत काही तथ्य असू शकेल. पराक्रमी पुरुषावर स्त्री मोहीत होते हे सनातन तत्व तुझ्या या कल्पनेत आहे ”

बोलत असतानाच मी घड्याळाकडे पाहिले चारा वाजायला आले होते. “ मंडळी, चला निघूया आता. मल्लिकार्जुन नी राम तेवढे आता पाहायचे राहिले आहेत. तेवढे झाले की आपली ही य.त्रा अ.टोपेल ”

बाहेर प्राकारात आल्यावर आजूबाजूला नजर टाकली अत्रूज महालातल्या देवालयांप्रमाणे आजूबाजूला भव्य अग्रशाळा नव्हत्या होत्या त्या लक्षात न राहाण्यासारख्या. त्यामुळे प्राकारही उघडेवागडे वाटत होते.

गाडीत बसल्यावर मनातल्या मनात थोडा हिशेब केला मल्लिकार्जु-नला पोचायला पाऊण तास तरी लागणार होता पुढे देवालय पाहायला अर्धापाऊण तास. म्हणजे दीड वाजणार पुढे काणकोणला परत येऊन हॉटेलचा शोध त्यापेक्षा असे केले तर... हो असेच करावे. लगेच शातारामला म्हटले, “ शाताराम, गाडी सरळ काणकोणच्या रस्त्याने घे. कुठे वळवायची, कुठे थावबायचं ते मी तुला सागेन ”

एवढी सूचना देऊन पुन्हा एकदा गप्पाकडे वळलो हा गप्पान्चा नाद फार वाईट. स्वतःचा आवाज माणसाला लता मंगेशकरच्या आवाजा-पेक्षाही अधिक प्रिय असतो. अन् तो एकसारखा कानांवर पडावा म्हणून तो गप्पा मारतो आपल्याप्रमाणेच दुसऱ्यालाही काही बोलायचे आहे, सांगायचे आहे, विचारायचे आहे हे तो विसरून जातो.

माझेही असेच झाले होते गोव्याची माझ्याएवढी माझ्या श्रोत्यांना माहिती नाही, या त्याच्या दुबळेपणाचा फायदा मी उठवीत होतो. बुद्धीला हे पटत होते, पण जीभ बुद्धीची ताबेदारी पत्करायला तयार नव्हती

मी म्हटले, ‘ देसाई, तुम्ही गोवा–यात्रेचा भलताच सीझन निवडलात हा सीझन काही तेवढासा चागला नाही. देवालयांतून होणारे उत्सव

संपलेले असतात. नी गोव्याचा रसराज मानकुराद आम्रा अजून तयार व्हायचा असतो."

"म्हणजे गोवा पाहायचा सुद्धा सीझन असतो वाटतं. मागे आपल्या तरुणपणी एका बोट कंपनीची जाहिरात यायची 'कुठलेही दिवस गोवे पाहायचे. मग आताच निघालेलं काय वाईट?' अशी ती जाहिरात असायची."

"अरे, जाहिरातच ती. अमुक कंपनीची पेस्ट वापरून माझे दात कसे सुंदर बनले आहेत अशी जाहिरात करणाऱ्या सिनेमा नटीचे दांत आतून किडलेले असतात हे किती लोकाना माहीत असतं?"

"तर मग कुठला सीझन गोवे पाहायचा?"

"गोव्याला यावे ते शरद ऋतूंत. नवरात्र, दिवाळीत. आश्विन ते पौष महिन्यात. या काळात गोव्याच सौंदर्य पिऊन घ्यावंसं वाटतं. शारदीयेचे चंद्रकळे। माजी अमृतकण कोवळे ।। ते वेचिती मने मवाळे। चकोरतलगें ।। असा प्रवाशाना अनुभव येतो. निदान तुमच्यासारख्या रसिक प्रवाशाना तरी. या काळात गोव्यातला निसर्ग उन्मादक, उत्तेजित अवस्थेत असतो सहस्र हातानी तो सौंदर्याची नी सुबत्तेची उधळण करतो याच दिवसात गोव्यातल्या देवस्थानातून उत्सवांना उधाण आलेले असते. पावसाळा सोडला तर गोव्यात आठ महिने उत्सव चालूच असतात रामकृष्णाच्या जयंत्या, दसरा, दिवाळी, लक्ष्मीपूजन, कोजागरी, हरिजागर, तुलसीविवाह, होळी हे हिंदु धर्मातले सर्वसामान्य उत्सव तर इथे होतातच पण याशिवाय दर आठवड्याला एक दिवस किंवा पंधरवड्याच्या एका तिथीला शिबिकोत्सव होतो. गंधपूजा, रंगपूजा, जाईची पुष्पपूजा, केळीच्या सोपटांनी बांधलेली केळपूजा असे खास गोमंतकीय उत्सवप्रकारही असतात पण गोव्यांतल्या देवस्थानातून दोन उत्सव पाहावे आणि मग म्हणावे, आम्ही गोव्याची यात्रा केली. एक नवरात्र आणि दुसरा जत्रा.

"नवरात्राचे नऊ दिवस साऱ्या देवालयातून उत्साह उदंड उतू

जातो. पहिल्या दिवशी घटस्थापना होते दुपारी अभिषेकमूर्ती सजविली जाते महानैवेद्य, अन्नसंतर्पण नऊही दिवस चालू. संध्याकाळी पूजा, पुराण, कीर्तन. या कीर्तनासाठी महाराष्ट्रातल्या नामांकित हरिदासांना दामदुप्पट बिदागी देऊन बोलावलं जातं आणि कीर्तनानंतरचा मखरोत्सव किंवा दोलोत्सव चौकावर एक झुलते मखर टांगलेले असते. त्यांत दररोज वेगवेगळे वाहन तयार केले जाते. सिंह, हत्ती, गरुड अशी ही वाहने त्यांवर उत्सवमूर्ती विराजित झालेली. महाआरत्याना सुरुवात झाली की हे मखर मागेपुढे, बाजूला, अर्धचंद्राकार असे हलविले जाते. दीपरत्नांनी प्रज्वलित केलेले मखर वाद्यांच्या तालावर हलू लागले की प्रेक्षक तहानभूक विसरतात

" आणि नवरात्रापेक्षाही अधिक मोठा उत्सव जत्रेचा परवा मडकईला गेलो होतो, तेव्हा या जत्रेचे वर्णन तुम्हाला मी ऐकवले आहे. पण हा उत्सव वर्णन करून कळणार नाही. तो प्रत्यक्ष अनुभवला पाहिजे "

बोलत असतानाच गाडीबाहेरही मी लक्ष देत होतो. चाळली गाव मागे पडला, करमल घाटातून गाडी पुढे गेली, काणकोण आले नी गेले, तरी गाडी धावतच होती. डाव्या हाताच्या एका वळणावर 'श्री मल्लिकार्जुन सस्थान' असा बोर्ड दिसला नी लगेच अदृश्य झाला, तेव्हा सौ म्हणाली, "अहो, कुठं चाललाहांत तुम्ही! मल्लिकार्जुनाचा रस्ता तर मागे गेला."

"माहीत आहे ग मला पण आधी वैनींना चांगलं शिवराक जेवण द्यायचं ठरवलं आहे मल्लिकार्जुनाची भेट मग सावकाश घेऊ "

" पुढं जेवण कुठं मिळणार ? "

" रामदास प्रभु आला आहे ना मुंबईहून ? त्याच्या घरी चाललो आहोत आपण. "

" अग बाई ! या अशा अवेळी रामदासच्या घरी ? काय वाटेल त्या मंडळीला ? "

" पुंडलिका भेटी परब्रह्म आले असे वाटेल. अरं कारे देसाई, हा रामदास प्रभु एक चित्रकार पण कविमनाचा. माझ्यावर त्याचं भक्ती

म्हणण्याइतके प्रेम. अलीकडे नात्याचाही संबंध जुळला. असतो मुंबईला. दर वर्षी गोव्याला येतो नी आम्हाला आपल्या माशे गावात बोलावतो. आज तुमच्यामुळे हा योग आला ”

“ पण अशा अवेळी ? ”

“ पुरे ग तुझं तुणतुणे. साधुसंत येति घरा तोचि दिवाळी दसरा असे संतवचन आहे हे माहीत नाही तुला ! एवढ्या मोठ्या साहित्यिकाची बायको असून सुद्धा ? ”

# २७ : काणकोणचे क्षात्रदैवत : मल्लिकार्जुन

घराच्या अंगणात आरामखुर्ची टाकून रामदास बसला होता. दुरून आम्हाला येताना पाहून त्याला आश्चर्य वाटले. लगबगीने तो उठला नी पुढे आला

नमस्कार–चमत्कार झाले. ओळखीचा विधी आटोपला बायका-मंडळी घरात गेली आम्ही अंगणातच बैठक मारली.

“ जेवणं झाली की नाही तुमची ? ” मी विचारले

“ एक वाजला नाही अजून दोन ही इथली जेवणाची वेळ. ” रामदास उत्तरला, “ तोपर्यंत तुम्ही स्नानं उरकून घ्या पाणी तापलेलं आहे. ”

“ आज दोन वेळा आम्ही स्नान केलं आहे. ” असे म्हणून सकाळचा सारा इतिहास मी रामदासला कथन केला शेवटी म्हणालो, “ प्यायला पाणी मात्र सांग. ”

रामदासने शेजारच्या मुलाला हाक मारली. अंगणातल्या एका माडावर चढायला सांगितले. मुलगा माकडासारखा सरसर माडावर चढला

दोन मिनिटांत अंगणांत शहाळ्याची ही रास झाली.

"वैनी, वैनी, बाहेर या." मी ओरडून म्हटले.

घरातल्या लेकी–सुनांसह दोन्ही वैन्या बाहेर आल्या सौ देसाईंनी दोन शहाळ्यांचे पाणी पोटात गेल्यावर म्हटले, "केवढा गोडी आहे हो ह्या शहाळ्याला ! नी चव सुद्धा किती मस्त."

जेवणे उरकून थोडा वेळ विश्रांती घेतली आणि चहाचा कप तोंडाला लावून आल्या वाटेने पुन्हा मागे गेलो या वेळी आणखी एक जोडपे आमच्याबरोबर होते. श्री. रामदास आणि सौ. रामदास.

टेकडी उतरून मल्लिकार्जुनाच्या मंदिरासमोर गाडी उभी केली आणि मंडळी खाली उतरली.

या देवालयाची बाह्यरचना आणि एकूण दृश्य खूपच वेगळे होते. ज्या प्रचंड उघड्या पटांगणात आम्ही उभे होतो त्याच्या पातळीवर मुखमंडपाचा वरचा मजला आला होता. पटांगणाचा उंच कट्टा दगडानी बांधून काढला होता आणि देवालयाच्या तळमजल्यावर जायला पायऱ्या केल्या होत्या मुखमंडपाच्या वरच्या मजल्यावर जे एक प्रशस्त दालन होते ते कमिटीचे ऑफीस होते. पटांगणातून परस्पर तिथे जाता येत होते. मुखमंडपाच्या मागे महामंडप किंवा चौक आणि त्याहीमागे गर्भागार. गर्भागारावर तिमजली शिखर होते आणि त्यावर कळस होता.

कमिटीचे ऑफीस बंद असल्याचे दिसतांच आम्ही खाली उतरलो मुखमंडप उघडा होता नी भिंतीऐवजी भव्य कमानी होत्या.

सुंदर कोरीव काम केलेल्या रुंद लाकडी खांबानी चौकाचे छप्पर सावरून धरले होते. त्यातल्या एका खांबाला इथे प्रसाद लावण्यात येतात.

गर्भागाराच्या दारात उभे राहून मल्लिकार्जुनचे दर्शन घेतले लिंगावर मुखवटा चढवला होता. भरघूर गलमिशा, छोटीशी दाढी, मस्तकावरील जटावर चंद्र आणि गंगेचा मुखवटा. मल्लिकार्जुन हा महादेव आहे हे कुणी न सांगताच पाहाणाऱ्याला कळून येत होते

तेवढ्यात एक छोटी लंगोटी लावलेला छोटा मुलगा पुढे आला

ताटांसला तीर्थप्रसाद तो आम्हाला देऊ लागला.

" कोण रे बाबा तू? अन् इथले भटजी कुठे आहेत?" देसाईने विचारले

" मी वेळीप. भटजी घरी आहेत " मुलाने उत्तर दिले.

भटजी घरी आहेत हे देसाईला कळले. पण 'मी वेळीप' या शब्दाचा मात्र त्याला अर्थबोध होऊ शकला नाही.

मी म्हटले, " देसाई, मी सांगतो तुला त्याच्या शब्दाचा अर्थ. वेळीप ही एक गोव्यांतली आदिवासी जमात. या काणकोण तालुक्यांत त्याची बरीच वस्ती आहे दंतकथा सांगते की या मल्लिकार्जुनाचा शोध [illegible] झाडे तोडायला म्हणून लो गेला होता झाड तोडता तोडता कुऱ्हाड जमिनीला लागली नी 'खण्ण' असा आवाज आला कुदळ आणून ती जागा त्याने खणून पाहिली. तर आत एक लिंग. खणतांना कांही घाव लिंगाला लागले मल्लिकार्जुनाचे लिंग आजही खडबडीत आहे, ते हे घाव बसल्यामुळे असे सांगितले जाते. जिथे हे लिंग सांपडले ती जागा हीच. अन् हा लंगोटीवाला छोकरा त्या मूळ वेळिपाचा वारस वेळिपाला लिंग सापडले म्हणून वर्षातून एक का दोन महिने देवाच्या पूजाअर्चेचे काम या वेळिपाकडे सोपवलेले असते."

पंधरा वर्षांपूर्वी माझे एक मित्र डी वाय. एस. पी. कृष्णा देसाई यांनी मला मल्लिकार्जुनाच्या जत्रेला आणले होते तेव्हा या देवस्थानाची माहिती मी आवर्जून घेतली होती. आणि आज त्यातला एवढाच भाग मला आठवत होता अधिक माहितीसाठी कुणा तरी जाणकाराची गरज होती. मी पोऱ्याला म्हटले, " काय रे, तुमचे हे भटजी राहातात कुठे? आम्हाला घेऊन चलतोस का त्याच्याकडे?"

मुलगा एका पायावर तयार झाला

पण भटजींकडे जाण्यापूर्वी आम्ही प्राकारात हिंडून घेतले.

छोटेसे प्राकार. देवालयाच्या उजवी व मागची, दोन्ही बाजू अतिशय आकुंचित. डाव्या बाजूला मात्र उघडे पटांगण असलेली. या पटांगणात

जत्रेचा मुख्य उत्सव होतो. जत्रेच्या वेळी इथे तरंगे अधांतरी उभी राहाण्याचा एक चमत्कार होतो ''

" तरंगे उभी राहायचा चमत्कार ? " देसाई म्हणाला.

" होय तरंग म्हणजे देवतेचे एक प्रतीक. वेळूच्या आकाराच्या, आठ फूट उंचीच्या एका लाकडी दांड्याला वरच्या टोकावर लुगड्यांचा एक बोंगा तयार करतात ज्याच्या अंगावर देवाचा अवसर येतो ते ही तरंगे खांद्यावर घेतात दसऱ्याच्या उत्सवात ठराविक देवस्थानात ठराविक दिवशी ही तरंगे ' कुडी ' ने खांद्यावर घेतली की महाराचे ढोल कडाडून वाजू लागतात तरंगांवर ' शेंसर ' ( तांदूळ ) मारून देवाला गाऱ्हाणे घातले जाते. ढोलांची लय जसजशी वाढू लागते तसतसा अवसर घुमू लागतो. खांद्यावरचे तरंग मागेपुढे होते. देवाचे संपूर्ण वारे ' कुडी ' त आले म्हणजे ढोलांचा आवाज मंद होतो. प्रत्येक भाविकाच्या तक्रारी, अडचणी, मागण्या ऐकून अवसर त्याला नारळाचा कौल देतो

" तरंगाची ही प्रथा गोव्यात तर सर्वत्र आहेच. पण गोव्याच्या उत्तरेला कोकणच्या भागात आणि दक्षिणेला कारवार – कुमठ्यापर्यंत प्रचलित आहे. पेडणे गांवात तर या तरंगाचे मोठेच प्रस्थ तिथला दसऱ्याचा रवळनाथाचा उत्सव या तरंगांमुळे नी अवसरामुळे गाजतो आहे.

" तर अशी ही तरंगे इथे जत्रेच्या वेळी जमिनीवरल्या एका फळीवर उभी करतात. आणि उत्सवाचा कार्यक्रम होईपर्यंत एक तासभर ती अधांतरी उभी असतात. "

" तू स्वतः पाहिला आहेस हा चमत्कार ? "

" जत्रेच्या वेळी मी इथे हजर होतो पण एकसारखं एक तासभर तरंगांकडे नजर ठेवून बसलो असतो तर दुसरं काहीच पाहू शकलो नसतो "

" म्हणजे पुढाऱ्याप्रमाणे प्रश्नाचे उत्तर देऊनही मूळ मुद्दा डावललास की तू "

मी हंसलो रामदासही माझ्या हसण्यात सामील झाला मी रामदासला

म्हटले. " तू इथला रहिवासी या जत्रेचं वर्णन करून सांग वर पाहुण्याना "

रामदास सांगू लागला, " इथली जत्रा ही गोव्यांतल्या इतर देवस्थानांप्रमाणेंच पण इथे दरवर्षी आलटून पालटून 'हिरामेळ' आणि 'शिशारांधन' नांवाचे दोन कार्यक्रम होतात. तीन माणसावर देवाचे वारे येते त्यांच्या हातात तलवारी असतात. बरोबर तीन कलश घेतले जातात अवसर आला म्हणजे त्याना तावडतोब विडा द्यावा लागतो. विड्याला क्षणभर उशीर झाला तर अवसर खाली कोसळतात असा काही प्रकार झाला तर गांवावर अरिष्ट येणार असल्याची सूचना मिळते विडा दिला की अवसर सात किलोमीटर अंतरावर असलेल्या ठराविक ठिकाणी धावत जाऊन ४० मिनिटाच्या आत परत येतात याला म्हणतात, हिरामेळ हिरामेळ याचा मूळ शब्द वीरमेळा. हे दैवत क्षात्रदैवत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

" दुसऱ्या वर्षीचा प्रकार म्हणजे शिशारांधन तरंगे अधातरी उभी राहिली म्हणजे तीन माणसे डोक्याला ओली धोतरे गुंडाळून जमिनीवर झोपतात. तिघाची डोकी एकत्र येऊन चूल बनलेली असते. या चुलीत शिसवीच्या लाकडांचा विस्तव केला जातो त्यावर मातीच्या मडक्यात भात शिजविला जातो. तेवढ्यात अवसर आलेला मनुष्य त्याच्या कपाळावर तलवारीने उभा वार करतो. रक्त ठिबकते ते भातात कालवतात आणि हा 'चरू' चारी दिशाना फेकला जातो."

"अय्या! काय बाई तरी अघोरी प्रकार हा!" सौ. देसाई उद्गारल्या.

"हा सारा प्रकार इथं मंडव उभारलेल्या या पटांगणांत होतो याला म्हणतात शिशारांधण म्हणजे शीर्षावर-मस्तकाची केलेली चूल."

भटजीचे घर अर्ध्या फर्लांगावर होते. अंगणात पोचताच सोबतच्या मुलाने हाकारा दिला, " भाऊभट, हे पळय कोण येयल्या तुका मेळूंक."

भाऊभटजी बाहेर आले ते साधारण प्रौढ होते त्यांनी मला ओळखले. आम्हाला ओसरीवरल्या खुर्च्या—बाकावर बसायला सांगून घरात जाऊन आले.

"भाऊभटजी," मी म्हणालो, "मी आपल्याला भाऊभटजी म्हणून ओळखतो. पण माफ करा, आपलं सबंध नाव मला माहीत नाही."

"माझं नाव केशव अनंत जोशी. आम्ही इथले पुजारी. देव मात्र क्षत्रिय देसायांचा फार पुरातन देवस्थान हजारो वर्षांपूर्वीच"

"त्याचीच थोडी माहिती आम्हाला हवी सांगता का?"

"हो हो सांगतो की" आणि भाऊभटजी मल्लिकार्जुनाची माहिती सांगू लागले.

वेळिपाला शिवलिंग कसे सांपडले ही कथा सांगून ते पुढे म्हणाले, "लिंग सापडले आणि तो मनुष्य धावत गावातल्या देसाई कुटुंबांना सांगायला गेला. देसाई मंडळी रानात गेली. रानात म्हणजे जिथं आज मंदिर आहे तीच जागा बर का! झाडं तोडण्यात आली. लहानसं छप्पर उभारलं. पूजाअर्चा सुरू झाली त्या वेळिराची आठवण म्हणून दर आषाढी पौर्णिमेला उकड्या तांदळाचा नैवेद्य करमलांच्या पानात गुंडाळून देवाला दाखवला जातो दर वर्षी एक बकरा देवाला बळी दिला जातो

"या देवाचा परिवार फार मोठा आहे. त्याच्या परिवारात ६८ उपदेवतांचा समावेश होतो. 'साठ पूर्वांचा धनी' असं त्याला संबोधले जाते. "अष्टषष्टी शिवलिंग सार्वभौम अडवट सिंहासनाधीश्वर महापती कण्वपुरम्" अशी त्याची शमीपत्रात बिरुदावली आहे. शमीपत्र म्हणजे दसऱ्याच्या दिवशी शमीच्या झाडाखाली दरवर्षी जो एक पट वाचतात तो. याला टका अशी संज्ञा आहे

"मल्लिकार्जुनाच्या बिरुदावलीत अडवट आणि कण्वपुरम् असे शब्द आले आहेत ना त्याचा अर्थ सांगतो अडवट हे या प्रदेशाचे जुने नाव. आजचा काणकोण तालुका नी कर्नाटकातला कारवार तालुका—ज्याला पूर्वी शिवेश्वर म्हणत मिळून हा प्रदेश बनला होता त्या प्रदेशाचा हा अधिपती. अन् कण्वपुरम् हे काणकोणचे जुने नाव. इथे कण्वऋषींचा आश्रम होता म्हणून या प्रदेशाला कण्वपूर असे नाव पडले इथून जी नदी वाहते तिच्या तीरावर कण्वऋषी तर्पण करीत म्हणून तिला तरपण हे

नांव पडले. आज या नदीला तळपणची नदी म्हणतात.

" पूर्वी हा सर्व प्रदेश जंगलाने व्याप्त होता हब्बू नावाचे द्रविड लोक इथे राहात. श्रृंगारपट्टणाहून काशीपुरुष नावाचा एक क्षत्रिय इथे आला आणि त्याने या हब्बूंशी लढाई करून त्याचा नायनाट केला. या काशीपुरुषाचे वंशज तेच हे आजचे देसाई. इथे जे झुले दर सोमवारी म्हणतात त्यात ' श्रृंगारपट्टण पूर्वाठाया ' असा उल्लेख असतो

" झुले म्हणजे काय ? " देसाईंने विचारले.

" झुला म्हणजे अभंगाचा एक प्रकार म्हणा ना. गोव्यात सर्व ठिकाणी पालखीच्या प्रत्येक पेण्याच्या वेळी एकेक झुला म्हणतात. जितकी पेणी तितके झुले रचलेले असतात. "

" अन् पेणा म्हणजे काय ? " सौ देसाईंचा प्रश्न.

" पेणा म्हणजे थांबा. आजच्या परिभाषेत स्टॉप. " मी म्हणालो, " पालखी वा लालखी किंवा दुसरे एकादे वाहन जिथे थांबते त्याला पेणा हा शब्द जुन्या मराठीत नी कोकणीत रूढ होता. पाहेचा पेणा वाटवधा असा ज्ञानेश्वरीत उल्लेख आला आहे. आता वैनी, तुम्ही पाहेचा नी वाटवधा या शब्दाचे अर्थ विचारणार. "

" विचारणारच. आपल्याला माहीत नाही ते विचारायला नको ! "

" काय हे वहिनी ? ज्ञानेश्वरी मराठी भाषेत लिहिली आहे. अन् ह्या मराठी शब्दांचे अर्थ तुम्ही एका कोकणी माणसाला विचारावे ? अहो, ज्ञानेश्वर म्हणतात, माझा मराठाचि बोलु कौतुके । परि अमृतातेंही पैंजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन ।। जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादीचे रंग थोडे । वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ।। ऐकें रसाळपणाचिया

" पुरे भावजी. आता किती शब्दाचे अर्थ विचारीत बसू ? भटजी, सांगा हो तुम्ही पुढे "

भटजींनी आपली कथा पुढे चालू केली. " तर या काशीपुरुषाने हब्बूंचा नायनाट करून काणकोण वसविले त्याच्या मूळ घराची जागा,

लढाईची जागा, सभेचे स्थान, मृत्यूचे स्थान इथे दाखवतात. घोड्यावर बसून तो चौफेर हिंडायचा. घोड्यावर स्वार झाला असतानाच त्याचा कुणीतरी शिरच्छेद केला. देवालयाच्या समोर पटांगणात एक शिराविना घोड्यावर बसलेल्या स्वाराची मूर्ती आहे ती त्याचीच कुणी म्हणतात, त्याने काशीला आपले शीर कापून आत्महत्त्या केली. ''

आतून चहा आला तसे भटजींचे बोलणे थांबले चहा झाल्यावर भाऊभटजींचे आभार मानून आम्ही बाहेर पडलो

पटांगणावर आलो तेव्हा भाऊभटजींच्या म्हणण्याची प्रतीती आली. देवालयासमोर शीर नसलेल्या घोडेस्वाराची एक मूर्ती होती. इझनानी मोजाव्या अशा घुमट्या होत्या, पाषाणखड होते. ते ६८ आहेत की काय याची मोजदाद करायच्या भानगडीत न पडता आम्ही मार्गाला लागलो.

भटजींनी सांगितलेल्या देसायाच्या आगमनाच्या कथेवरून याच भागातले एक इतिहासाचे अभ्यासू, शिवाजी विद्यापीठातले स. शं देसाई यानी लिहिलेल्या एका लेखाची आठवण झाली. 'शृंगारपट्टण पूर्वांठाया' असा जो उल्लेख आहे ते श्रृंगारपट्टण राजस्थानात कुठेतरी असावे असा समज होता तिथून राजघराण्यातले चार भाऊ गोव्याला आले. त्यांतला पहिला सत्तरीला राहिला तो तिथल्या राण्याचा पूर्वज दुसरा मडगावला, तिसरा काणकोणला व चौथा हल्याळला गेला या सर्वांनी देसकती मिळवल्या म्हणून त्याना देसाई नाव पडले. पण हे शृंगारपट्टण राजस्थानात नसून रत्नागिरी जिल्ह्यातले संगमेश्वर गाव असे देसाईंचे म्हणणे आहे विजयानगरच्या काळात ते चार भाऊ गोव्यांत आले असा अंदाज ऐतिहासिक घटनांवरून त्यानी केला आहे.

पाहुण्याना हा इतिहास ऐकवता ऐकवता हमरस्ता केव्हा आला ते कळलेच नाही !

# २७ : पर्तगाळचा कानडा राम

" शांताराम, आता कुठं चलायचं ? सांग पाहू. " गाडीचे दरवाजे लावून गाडी स्टार्ट करण्यासाठी चावी फिरवीत असलेल्या ड्रायव्हरकडे वळून मी विचारले.

" पर्तगाळ ? " त्याच्या या प्रश्नार्थक शब्दात फक्त प्रश्न नव्हता आम्ही यानंतर आता पर्तगाळला जाणार हे त्याने गृहीतच धरले होते. आमच्या गाडींतल्या बोलण्यावरून आमची ही धर्मयात्रा आहे हे त्याने हेरले होते.

" हो. बरोबर. ' मी उत्तरलो.

गाडी बोलबोलता हमरस्त्यावर आली. आणि ५–१० मिनिटाच्या आत हमरस्त्यावरून डाव्या हाताला वळली. अर्धा मैल आम्ही डोंगराळ वाटेनून जवळ जवळ रानांतूनच प्रवास केला होता.

रस्ता एक वळण घेऊन खाली उतरला आणि आम्ही एकदम एका भव्य मैदानवजा प्राकारात शिरलो. प्राकाराच्या प्रारंभीच एक उंचच उंच असे बांधकाम होते आणि प्राकाराच्या दुसऱ्या टोकाला एक दुमजली इमारत होती. या इमारतीला भव्य प्रवेशद्वार होते या प्रवेशद्वाराजवळ गाडी खडी झाली

"हेच इथले देवालय का ? " देसाईने विचारले.

"हे म्हणजे समोर दिसते ते नव्हे." मी म्हटले, "ही इमारत म्हणजे इथल्या मठाचा एक भाग आहे देवालय पुढे आहे "

" मठाचा भाग ! '

" होय दाक्षिणात्य सारस्वतात स्मार्त आणि वैष्णव असे दोन पंथ आहेत. त्यातला स्मार्त मठ कवळयाला असल्याचे मी तुला सांगितले होते. हा गोकर्ण पर्तगाळ मठ वैष्णव पंथाचा हा मठ म्हणजे वैष्णव पंथाचे गुरुपीठ या पीठाचे आचार्य इथे राहातात. आणि या मठाच्या आत

आपण आता पाहायला आलो आहोत ते राममंदिर आहे."

"पण हे स्मार्त वैष्णव भेद फक्त सारस्वतात नाहीत दक्षिणेतल्या द्राविड ब्राह्मणातही ते आहेत देशस्थात तर बहुसंख्य मंडळी वैष्णव आहे. माध्वमतावर कित्येक ग्रंथ विद्वान देशस्थ ब्राह्मणानी लिहिले आहेत. आद्य शंकराचार्यांचे अद्वैतमत खोडून टाकून मनुष्य व परमात्मा या दोन गोष्टी भिन्न आहेत, त्यांच्यात एकता नसून द्वैत आहे, आणि मानवाने भक्तीची कास धरल्यास त्याला परमेश्वराचे सान्निध्य प्राप्त होते, पण परमेश्वरात तो विलीन मात्र होत नाही, हे तत्त्वज्ञान मध्याचार्यांनी मांडले. होय ना ?"

आतापर्यंतच्या प्रवासात मीच बोलत होतो, मीच पाहुण्याना माहिती पुरवीत होतो आता अगदी अखेरच्या टप्प्याला देसाईने संवादाची सूत्रे आपल्या हाती घेतली होती तोच पुढे बोलत होता.

"आमच्या दक्षिणेच्या या यात्रेत दोन स्थाने मला पाहायची आहेत. आद्य शंकराचार्यांचे केरळांतले कालदी हे जन्मस्थान. आणि दुसरे द्वैतमताचे प्रवर्तक मध्याचार्यांचा जन्म जिथे झाला ते उडुपी गाव."

देसाईला अडवायची एक चांगली संधी मला मिळाली मी चटकन् म्हटले, "चुकलास तूं दोस्ता. उडुपी हे मध्वाचार्यांचे जन्मगाव नव्हे उडुपी इथे मध्वाचार्यांनी श्रीकृष्ण मंदिर स्थापन केले आणि आपल्या आठ शिष्याना आठ मठ बांधून दिले म्हणून उडुपी हे माध्वमताचे व वैष्णव पंथाचे केंद्र समजले जाते पण त्यांचा जन्म झाला तो मात्र उडुपीपासून आठदहा मैलावर असलेल्या पाजकक्षेत्र नावाच्या गावी फार रम्य स्थळ आहे ते. मध्वाचार्यांचे राहाते घर अजूनही तिथे आठशे वर्षांनतर नांदते आहे, आणि मध्वगुडी नावाचे त्यांचे एक मंदिरही तिथे बांधले आहे. मुद्दाम जा तिथे. पाहाण्यासारखे आहे"

"म्हणजे तूं पाहिले आहेस ?"

"हो मी पाहिले आहे."

"भाग्यवान आहेस." देसाई म्हणाला

"तुम्हालाही हे भाग्य लाभेलच कीं"

"अहो, किती वेळ बोलत उभे राहाणार आहात इथे ? देवळात

जायचं नाही का ? '' सौ. देसाई म्हणाल्या, तेव्हा आम्ही प्रवेशद्वाराकडे वळलो

भव्य अशा प्रवेशद्वारातून बऱ्याच पायऱ्या उतरून आम्हाला खाली उतरावे लागले खाली उतरल्यावर समोर पाचदहा पावलावरच मंदिराचे प्रवेशद्वार दिसले भव्यते ऐवजी पहिला साक्षात्कार झाला तो मंदिराच्या टुमदारपणाचा. दोन्ही बाजूंना नजर फिरविली तेव्हा दोन ओवऱ्या दिसल्या. मोठ्या वाड्याना जशा सदरा किंवा देवड्या असतात तशा या ओवऱ्या होत्या. त्याच्यावर माडीचे बांधकाम होते.

समोरचे छोटे प्रवेशद्वार, छोटा मुखमंडप आणि मुखमंडपापलीकडे चौकाच्या मागे असलेल्या गर्भागारांत असलेल्या देवमूर्ती देवळात प्रवेश करण्यापूर्वीच आम्हाला दिसत होत्या देवालयाच्या भोवती गोव्यातल्या इतर देवस्थानांप्रमाणेच अग्रशाळा होत्या, पण त्या देवळाच्या इतक्या जवळ होत्या की अग्रशाळा आणि देवालय याच्या मध्ये फक्त दहाएक फुटांचे अंतर होते म्हणजे देवालयाभोवती इतर देवस्थानांत आतापर्यंत पाहिले तसे भव्य प्राकार नव्हते, होता तो एक चिंचोळा प्रदक्षिणामार्ग. या प्रदक्षिणामार्गावरून एक फेरी टाकून आम्ही पुन्हा देवालयाच्या प्रवेशद्वारी आलो

प्रवेशद्वाराकडे आता पाहुण्याची दृष्टि वेधली होती. समोर दिसणारी मंदिराची भिंत आणि एकूण देवालयाची बाह्य रचनाच वेगळी दिसत होती. देवालयात प्रवेश करण्यासाठी चार पायऱ्या होत्या आणि पायऱ्यांच्या दोन बाजूंना विशिष्ट गोलाकार आकृतीचे दोन कठडे दिसत होते प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस आणि वरच्या अंगाला लाकडी चौकट होती आणि त्यावर दशावताराच्या प्रतिमा कोरल्या होत्या. त्या रंगवण्यात आल्या होत्या.

आम्ही मंदिरांत प्रवेश केला भोगमंडप छोटासा होता. त्यातील खांब लाकडी होते व अप्रतिम कलाकुसरीने कोरलेले होते इतर देवळात भोगमंडपाच्या दारातच दोनतीन घंटा असतात. पण इथे साऱ्या चौकावर

चार पांच आडव्या पट्ट्यांवर खूपशा घंटिका लटकावलेल्या होत्या

गर्भागारात राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती होत्या वस्त्रालंकारानी त्या सुरेख नटवलेल्या होत्या व नदादीपाच्या माळा दोन्ही बाजूस लटकलेल्या होत्या.

हे सारे दृश्य गोव्यांतल्या इतर देवळाहून संपूर्णपणे वेगळे आहे हे देसाई पतिपत्नींच्या ताबडतोब लक्षात आले. देसाई म्हणाला, "अरे, हे मंदिर काही वेगळ्या प्रकारचे दिसते आतापर्यंत पाहिलेल्या सर्व देवस्थानात साम्यस्थळे खूपच होती. हे मंदिर मात्र अगदीच निराळे दिसते. या मंदिराच्या शिल्पाची कांही माहिती सांगशील की नाही ?"

"खरे सांगायचे तर मी सुद्धा या शिल्पाबद्दल गोंधळातच पडलो होतो. पण परवा तुळूनाडूचा प्रवास करून आलो. "

"तुळूनाडू ? हा कुठला तुळूनाडू काढलास ?" देसाई म्हणाला

"तुला तामीळनाडू माहीत आहे ना ?"

"होय. तामीळनाडू म्हणजे तामीळ भाषेचा प्रदेश."

"तसाच तुळूनाडू म्हणजे तुळू भाषेचा प्रदेश. संपूर्ण दक्षिण कानडा, उत्तर कानड्याचा दक्षिणेकडील दोन तृतीयांश भाग आणि मलबारचा कासारगोड जिल्हा मिळून एके काळी तुळू भाषिक प्रदेश म्हणून ओळखला जात होता. आज तो कर्नाटकने आणि केरळने खाऊन टाकला आहे. या भागात मी हल्लीच दौरा करून आलो या सर्व प्रदेशात मठाची आणि देवालयाची रचना अशी पर्तगाळसारखीच आहे. चारही बाजूंनी बंदिस्त अशा अग्रशाळा किंवा धर्मशाळा. त्यात पुजाऱ्याची वा यात्रेकरूची राहाण्याची व्यवस्था. रस्त्यावरून एकुलते एक प्रवेशद्वार अग्रशाळानी बंदिस्त असलेल्या छोट्याशा चौकात-तुमच्या पुण्याच्या जुन्या वाड्यात चौक असतात ना, तसले किंवा त्याहून थोडे मोठे असलेले हे चौक तर या चौकात छोटेसे चौरस वा आयताकार देवालय देवालय व धर्मशाळा यांच्यामध्ये चिंचोळा प्रदक्षिणामार्ग या मार्गावरूनच देवतेची उत्सवमूर्ती पालखीतून वा अन्य वाहनातून मिरवतात मंदिराचे शिल्प साधे पण वैशिष्ट्यपूर्ण. जोते उंच. छप्पर कौलारू किंवा तांब्याच्या पत्र्याने

मढविलेले समोर असलाच तर एक लाकडी सरळसोट ध्वजस्तंभ–दीपस्तंभ नव्हे. तो ध्वजस्तंभही ताब्याच्या पत्र्याने मढवलेला. हे मंदिरशिल्प धड नागर नव्हे की द्राविड नव्हे. द्राविड शिल्प पुढे केरळ-पासून सुरू होते, आणि तमीळनाडून त्याचे वैभव वाढत जाते. तर हे जे तुळूनाडूचे विशेष शिल्प आहे ते तुला इथे पर्तगाळीत दिसते गोव्यात तुला या प्रकारचे हे एकुलते एक मंदिर दिसेल. तुम्ही आता गोकर्णवरून पुढे जाणार आहा ना ? तर तिथे अंकोला, कुमठा, कुंदापूर अशी गावे तुम्हाला लागतील. उडुपी अन् पाजकक्षेत्रालाही तुम्ही भेट देणार आहां तर तिथे अशा प्रकारचें शिल्प सर्रास दिसेल. मुद्दाम पाहून घ्या आणि मग एकदम त्रिवेंद्रमला जाल तेव्हा तिथल्या पद्मनाथ मंदिराशी या शिल्पाची तुलना करा म्हणजे मग द्राविडी नी तुळू शिल्पातला फरक तुम्हाला कळून येईल.''

"पण हे तुळू शिल्प गोव्यात कसे काय आले ?'' देसाईचा प्रश्न.

"सांगतो. मध्वाचार्यांबद्दल मी आतांच बोललो ना, त्या उडुपीतल्या अष्टमठात फलमारु नावाचा एक मठ आहे. त्या पीठाच्या एका आचार्यांने एका सारस्वत ब्राह्मण बटूस सन्यास दीक्षा दिली, आणि स्वतंत्र मठस्थापना करून सारस्वतांत द्वैतमताचा प्रचार करण्यास आज्ञा दिली त्याप्रमाणे त्या शिष्याने भटकळ इथे मठस्थापना केली. यानंतर काही वर्षांनी गोकर्ण इथे या मठाचे स्थलांतर झाले गोकर्ण इथे महाबळेश्वर मंदिरात जाण्याच्या मुख्य रस्त्यावरच तुला हा वैष्णव मठ दिसेल

"पुढे कांही वर्षांनंतर या गोकर्णमठात रामचंद्रतीर्थ नावाचे एक आचार्य होऊन गेले. त्याना या मठाच्या मागे डोंगराचा पायथा खणत असताना राम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या चार शिलामूर्ती सापडल्या रात्रौ त्यांना दृष्टांत झाला की 'आम्हाला उत्तरेला घेऊन चला जिथे आम्ही जड होऊं तिथे आमची स्थापना करा.'

"झाले त्याप्रमाणे हे स्वामीजी उत्तरेच्या मार्गाला लागले. अंकोला, कारवारवरून काळी नदी पार करून सदाशिवगडावरून पैंगीण गावात आले,

या ठिकाणी मूर्ती जड झाल्या. म्हणून तिथे मूर्तीची स्थापना करायचे आचार्यांनी ठरवले रात्री पुन्हा दृष्टांत झाला. 'इथे रस्त्यावर आमची स्थापना करू नका. गाय दुधाची धार सोडील तिथे करा

"अन् दुसऱ्या दिवशी दारात आपली एक गोमाता उभी तिची पूजाबिजा करून स्वामीजी म्हणाले, 'गोमाते, आता आम्हाला जागा दाखव'

"गाय रानातून चालू लागली अन् इथे नदीकिनाऱ्यावर या ठिकाणी उभी राहून तिने दुधाची धार सोडली इथे मग स्वामीजींनी हे राममंदिर आणि मठ बांधला पुढल्या आचार्यांनी हेच आपले निवासस्थान केले म्हणून तेव्हापासून या वैष्णव पीठाला नाव पडले गोकर्णपर्तगाळ मठ."

"केव्हांची गोष्ट ही?"

"सन सोळाशे छप्पन्न मधली. म्हणजे आज या घटनेला तीनशे सव्वीस वर्षे झाली"

"हे मंदिर इतक्या जुन्या काळी इथे बांधले ते गोकर्णहून आलेल्या आचार्यांनी त्यांनी ते तिकडच्या पद्धतीनुसार बांधले, म्हणून हे शिल्प तुळू शिल्प आहे असे तुझे म्हणणे दिसते" देसाई म्हणाला.

बरोबर ओळखलंस."

आम्ही देवतास नमस्कार करून बाहेर पडलो. देवळाबाहेरची घंटा वाजवतांच हजर झालेले आचार्य नावाचे पुजारी आता आमच्याबरोबर होते उघड्या अन् चिरेबोळ्या प्रदक्षिणामार्गातून आम्ही देवळाला प्रदक्षिणा घातली आणि मंदिरासमोर आलो पुन्हा एकदा देवाला नमस्कार केला

"इथे पीठाचे आचार्य राहातात असं तू म्हटलस," मला उद्देशून देसाई म्हणाला, "मग आपण आता स्वामीजींना भेटूया का?"

"स्वामीजींचा मुक्काम तूर्त इथे नाही त सचाराला गेले आहेत." रामदासने माहिती पुरवली आणि पुजाऱ्याने त्याला दुजोरा दिला.

"संचाराला?" देसाईचा प्रश्न.

"स्वामीजींच्या दौऱ्याला सचार असा शब्द वापरला जातो अधून-मधून ते यात्रेला किंवा दौऱ्याला जातात." रामदास म्हणाला.

आतापर्यंत आमच्याबरोबर असलेल्या तिन्ही बाया गप्पगप्प होत्या त्यापैकी सौ. देसाई वहिनीला आता कंठ फुटला त्यानी एकदम सौ सातोस्करकडे वळून विचारले, "तुम्ही यापूर्वी आला होता का हो इथं ?"

"हो ना. दोनचार वेळा येऊन गेले. एकदा यांच जवळच काणकोणला व्याख्यान होतं तेव्हा आले होते दोन वर्षांमागे हे वारंवार इथे येत होते तेव्हाही गाड्याबरोबर नळाला यात्रा घडत होतीच "

"वारवार येत होते भावजी इथं ? ते कशाला बाई ?"

"त्यानी मठाचा इतिहास लिहिलाय मठाला पांचशे वर्षे झाली म्हणून "

"या मठाला पाचशे वर्षे झाली ?" देसाईने विचारले, "केव्हा ?"

"हो. गेल्या वर्षीच्या चैत्र प्रतिपदेला."

"अन् तू हा इतिहास लिहिला आहेस ? पण तू इतिहासकार आहेस हे मला माहीत नव्हत. गोव्यांत येऊन संपादक बनलास पूर्वी कथाकादंबरीकार होतास "

"खर म्हणजे मी इतिहासकार नाही रे. पण प्रसंगपरत्वे नाना सोंगे घ्यावी लागतात या मठाचे चारशे वर्षांचे अस्सल कागदपत्र उपलब्ध आहेत ते ग ह. खरे यानी तपासले आहेत."

"म्हणजे भारतेतिहास सशोधक मंडळाचे खरे ?"

"हो. त्यानी या मूळ कागदपत्रांतून कांही निवडक महत्वाचे कागदपत्र शोधून काढले अन् त्याच्या आधाराने इतिहासलेखनाची कामाठी मी करीत आहे. या इतिहास सशोधनात किती रत्ने सापडली आहेत तुला माहीत आहे का ? अरे आदिलशाहीतले फारशी कागद तर आहेतच; पण शिवाजीच्या पंतप्रधानाचे कागद आहेत. सभाजीराजाची दोन पत्रे आहेत, त्या काळच्या समाजस्थितीवर प्रकाश पाडणारेही कागद आहेत."

बोलण्याच्या नादात किती वेळ गेला याकडे आमचे लक्ष नव्हते. पण रामदासचे होते. तो म्हणाला, "याना सदाशिवगडला जायचे आहे

ना दादा ! जरा लौकर निघायला हवं. ''

आणि मग पुजारी म्हणाले, "पण त्यापूर्वी जरा मठ पाहून जा. स्वामीजी नसले तर पाहुण्यांना मठ दाखवणे हे आमचं काम ''

"चला तर. '' असे म्हणून मी पुढे झालो प्रथम सदरेवरील माडीवर गेलो इथे मठाचे ग्रंथालय व संग्रहालय होते प्रचंड लांबच लांब दालनात हारीने कपाटे होती आणि त्यांत शेकडो संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी असे ग्रंथ होते एखाद्या म्युझियममध्ये असतात तसल्या जुन्यापुराण्या वस्तू होत्या.

खाली उतरून आम्ही स्वामीजींचे देवघर पाहिले. एका बंदिस्त दालनात सात आचार्यांच्या समाधी होता. आणि त्यावर वृंदावने होती वृंदावने पाहून देसाईवहिनी उद्गारल्या, "हे हो काय ? घरातल्या खोलीत वृंदावने ! ''

पुजारी गंभीर स्वरात म्हणाले, "बाई, या ठिकाणी आमच्या परपरेतल्या सात स्वामीजींचे देह पद्मासन घालून बसले आहेत त्याच्यावर ही वृंदावने बांधली आहेत या वृंदावनांची नित्यपूजा होत असते '' आणि पुजाऱ्यांनी त्या स्वामीजींची कितीतरी माहिती दिली

पाहुण्यांना हा प्रकारच नवीन होता एका लहानशा दालनात सात आचार्यांच्या समाधी ! शेवटची १९७३ सालची ! अगदी भर तारुण्यात सर्व ऐहिक सुखाकडे पाठ करून संन्यासदीक्षा घेणारे हे सात महापुरुष ! देसाईवहिनींचे हात आपोआप जुळले गेले त्यांचे डोळे पाणावले

नंतर चार चौकांच्या त्या प्रचंड वाड्यात आम्ही हिंडलो माडीवरली आचार्यांच्या निवासाची जागा, त्यांची भिक्षेची म्हणजे अन्नग्रहणाची जागा, संस्कृत पाठशाळा, भोजनकक्ष, प्रचंड स्वयंपाकघर, पुजाऱ्यांची निवासस्थाने हे सारे पाहून मागच्या बाजूने बाहेर पडलो, तेव्हा आम्ही नदीतीरावर उभे होतो.

नदीकिनाऱ्याचे दृश्य अत्यंत प्रेक्षणीय होते. स्फटिकासारखे स्वच्छ पाणी कुशावती नदीतून वाहात होते दोन्ही तीरावर गर्द झाडी होती

एकूण सारा परिसर नयनरम्य होता.

नदीवरून मठाला वळसा घालून आम्ही मंदिराच्या डाव्या बाजूकडून पुन्हा मठाबाहेरच्या प्राकारात आलो, तेव्हा एक भल्या मोठ्या चाकाचा रथ दिसला.

" फार मोठा रथ आहे हा ! " देसाई म्हणाला.

" हो. गोव्यांत पर्तगाळएवढा दुसरा मोठा रथ नाही याच्याहून मोठा रथ तुला उडुपीला श्रीकृष्णमंदिरात दिसेल. ही रथसंस्कृती सुद्धा दक्षिणेतूनच इथे आली. "

" म्हणजे तुळूनाडूतून ? जसा हा राम गोकर्णेहून आला ! " आणि मग एकदम एक कल्पना सुचल्यासारखे करून देसाई म्हणाला, " अरे, पंढरपूरचा पाण्डुरंग कर्नाटकातून आला म्हणतात, तसा हा राम देखील कर्नाटकातूनच आला नाही का इथे ? म्हणजे कानड्या विठ्ठलाप्रमाणे हा राम देखील कानडाच की ! "

" हो, असं म्हणायला हरकत नाही अन् या कानडेपणाची आणखी एक साक्ष तुला दाखवतो. समोर बघ "

मी तर्जनीने दाखविल्या ठिकाणी प्राकाराच्या दुसऱ्या टोकाशी एक उंचच उंच बांधकाम होते त्याला दहावीस पायऱ्या होत्या पायऱ्यांच्या वर एक देवळी होती व तीत मारुतीची मूर्ती होती

मंडळींनी तिकडे पाहिले तेव्हा मी म्हटले, " हा मुख्य प्राण. "

" काय म्हणालास ? मुख्य प्राण ? मुख्य प्राण म्हणजे काय ? "

' अरे, शिवदेवतेसमोर जसा नंदी असतो, तसा रामासमोर मारुती असतो. निदान कर्नाटकाच्या भागात तरी असतोच असतो. त्या मारुतीला म्हणतात मुख्य प्राण तू दक्षिणेला विशेषतः तुळूनाडूत जाशील तेव्हा हनुमान, मारुती, हनुमंत वगैरे नावांनी या रामभक्ताला कुणी ओळखणार नाही. तो तिथे मुख्य प्राण बनला आहे '

" आश्चर्य आहे ! हा शब्द मी पहिल्या प्रथम ऐकतो आहे. "

" हा शब्द म्हणजे सुद्धा कर्नाटकाचीच देणगी बरे का ! आणखी

एक ऐकून घे गोव्यांत इतर कुठेही नाही अशी एक प्रथा इथे आहे इथे रामनवमीचा फार मोठा उत्सव होतो. दहा दिवस चालतो तो. हजारो पान उठते. नवमीच्या दिवशी या मुख्य प्राणाच्या देवळीवरून तेलात भिजवलेली दोन कोरी वस्त्रे जाळतात ही प्रथाही तिकडचीच. भुताखेतांचा मान म्हणून अशी वस्त्रे उत्सवातून जाळण्याची तिथली प्रथा आहे. रामनवमीच्या दिवशी नारायण नांवाच्या एका महाभूताने रथाची गती थांबवली म्हणून त्या भुताला स्वामीजींनी नारळात कोंडून त्याला या मुख्य प्राणाच्या पायाशी स्तंभित केले होते म्हणे. तेव्हापासून ही प्रथा पडली खरे ना हो भटजी ? "

भटजींनी मान हलविली. आणि त्यांचा निरोप घेऊन आम्ही गाडी गांठली.

गाडी हमरस्त्याला लागली वाटेत भेटलेली तळपणची नदी रामदासने आम्हाला दाखविली पैंगीण, माशे, माजाळी असे गाव मागे टाकून आम्ही सदाशिवगडाच्या बंदरावर पोचलो. आगशीची आठवण करून देणारे काळी नदीचे विशाल पात्र दिसले. पाहुण्यांची गोव्याची यात्रा पूर्ण झाली होती. पुढला टप्पा गोकर्ण होता.

मंडळी खाली उतरली. लाँच पलीकडल्या तीराला होती अर्धा तास अवकाश होता. उजव्या हाताच्या गावटी हॉटेलात बसून स्पेशल चहाची ऑर्डर दिली.

" काय वैनी, कशी काय झाली तुमची ही यात्रा ?" मी सौ देसाईंना विचारले.

" फार चांगली झाली हो. तुमची गाडी मिळाली म्हणून तीन दिवसात एवढ सार पाहून झाल. केवढा खर्च झाला असेल पेट्रोलला या महागाईच्या दिवसात ! अन् तुम्ही इतकी माहिती दिलीत तुम्ही नी वैनी तीन दिवस आमच्याबरोबर उन्हातान्हातून हिंडलात कोण कुणासाठी करतो हो एवढ ! "

सौ देसाईंच्या डोळ्यातून कृतज्ञतेचे दोन अश्रू ठिबकलेले पाहिले अन् मलाही घेतल्या श्रमाचे चीज झाले असे वाटले

मग मी देसाईला म्हटले, " काय रे दोस्ता, तुझे काय कॉमेंट्स ? "

" तुझ्या वैनींशी मी संपूर्ण सहमत आहे. "

" हे टाळी " मी म्हणालो, " पतिपत्नींचं असं एकमत होण्याचे प्रसंग आयुष्यात क्वचितच येतात. "

साऱ्यानाच हंसू आले. येणारच. हा तर प्रत्येकाचा स्वानुभव होता.

" आणि हे तुझं सहमत–एकमताचं राहू दे. " मी म्हणालो, " एकूण गोव्याच्या तीर्थयात्रेबद्दल तुझं इंप्रेशन काय ? "

" इंप्रेशन फार चांगलं आहे. तुमची देवालये ही आदर्श देवालये आहेत. जिथे शांती असते, भक्ती असते, प्रीती असते तिथेच देवांची वसती असते या गोष्टी जशा इथे आहेत तशाच काही गोष्टी इथे नाहीत. इथे बडवेगिरी नाही, पैशाचा लोभ नाही, भिकाऱ्याचा उपद्रव नाही, फसवणूक नाही, गर्दी नाही, गोंगाट नाही, भजनाचा हलकल्लोळ नाही. खूप खूप बरे वाटले मनाला.

" आणखी एक गोष्ट लक्षात आली इथे विष्णूचा किंवा विष्णूच्या अवतारांचा कडिवार नाही. बहुसंख्य देवता शिव आणि शक्तिस्वरूपी आहेत या दृष्टीने गोवा हा शिव–शक्तीचा उपासक आहे असे वाटले एकूण भारतीयांनी या उपासनेचे अनुकरण केले पाहिजे शिवाची म्हणजे मांगल्याची आणि शक्तीची म्हणजे भौतिक सामर्थ्याची उपासना हीच आपल्या देशाची खरी गरज आहे तुला नाही असं वाटत ? "

" हो खरे आहे "

लाँच एव्हाना किनाऱ्याला लागली होती.

" आता पुन्हा केव्हा भेट ? " सौ ने विचारले.

" आता तुम्हीच पुण्याला या वैनी " सौ देसाई म्हणाल्या. आमच्याकडेच उतरा. आमचा ब्लॉक तसा मोठा नाही. पण गोड करून घ्या "

" हो, लवकरच येतो वैनी पुण्याला. " मी म्हटले, म्हणजे " परतफेड तेवढीच लवकर होईल. "

"छी छी. असं मनात सुद्धा आणू नका तुमचे उपकार फेडायची कल्पना सुद्धा आमच्या मनात येणार नाही होय ना हो ?"

"होय तर."

"तुम्हाला खरं सांगू वैनी, उपकारांचे म्हणाल, तर तुमचेच उपकार झाले आहेत आमच्यावर. कित्येक वर्षांत असे आनंदाचे दिवस घालवल्याचं मला आठवत नाही गेल्या तीन दिवसात गेलेलं तारुण्य परत आल्याचं जाणवत होतं सारखं"

"वृद्धांच्या सहवासात तारुण्य परत येणं हा एक वदतोव्याघात, नाही का हो प्रभू ?" देसाई म्हणाला

"वदतोव्याघात नव्हे हा देसाईसाहेब. वृद्धत्वीं निजशैशवास जपणारी माणसे असली तर तारुण्य गवसणे कांही कठीण नाही."

"या गोवा यात्रेने माझा दुहेरी फायदा झाला. पुण्यलाभ झाला नी जुना मित्र गवसला" माझे हात घट्ट पकडीत देसाई भावनावेगाने म्हणाला. त्याच्या हाताचा आवेग नी स्वरातला कंप मला जाणवत होता

"चलतो आता पुन्हा भेटूच."

"हो पुन्हा भेटूच"

देसाई कपनी लाँचवर चढली. लाँच हलली हळूहळू तिची आकृती लहान होऊ लागली.

उंच केलेले हात खाली करून आम्ही मागे वळलो

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
830
वा. क्र. २३५५८
शाखा

REFBK-0023774